म. ग्रं. सं. ठाणे
विषय ११ू·प्रकार१
सं. क्र. ३५९
१८६४

# सिगरेट आणि वसंत ऋतु

बाळ गाडगीळ

REFBK-0014265
REFBK-0014265

३७६८६
मा. २॥.
६।२।६९
क्र. प्रवास—
३५१

# सिगरेट आणि

REFBK-0014265
REFBK-0014265

## बा ळ  गा ड गी ळ

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ....३७६६६.... वि: ....मु.प्रवास
क्रमांक ....३५१.... नों. दि. ....११५१६५

प्रकाशक
श्यामकांत बनहट्टी
सुविचार प्रकाशन मंडळ
४६१।४ सदाशिव, पुणे २
धनतोली, नागपूर १

पहिली आवृत्ति
१५ सप्टेंबर १९६४

सर्व हक्क सुरक्षित

मुद्रक
चिं. स. लाटकर
कल्पना मुद्रणालय
' शिव-पार्वती '
४६१।४ सदाशिव, पुणे २

किं. ८ रु.

**To**

Victor, Lee and Carol

with grateful remembrances.

— *Bal Gadgil.*

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ३७६८८ वि: ...
क्रमांक ...३५९... नों दि. ४५४६३

# प्रस्तावना

आमच्या अमेरिका-भेटीचा वृत्तांत म्हणून हें पुस्तक वेगळें आहे. ('आगळें' आहे कीं नाहीं कुणास ठाऊक!) समस्त अमेरिकन जीवनावर हा प्रकाशझोत वगैरे नाही. पण या जीवनाच्या कांहीं बाजूंचे मला घडलेलें निकटचें दर्शन इतरांना घडविणें हा मुख्य हेतू.

व्हिक्टर आणि इन्ग्रिड, जॅक् आणि मेरी लुईज्, ली आणि कॅरॉल, रॉल्फ आणि सीस्, ॲलन् आणि मेरिॲन् या आमच्या अमेरिकन मित्रांनीं आमच्यावर मनापासून प्रेम केलें त्यांच्या आपुलकीमुळें आम्हीं त्यांचे झालो. भौगोलिक कारणांमुळें आमच्यांत निर्माण झालेलें अंतर त्यांनीं नाहीसें केलें. ही ध्वनिरेषा आम्हीं ओलांडली, पूर्वेकडच्या दोन माणसांचे स्वर पश्चिमेकडच्या माणसांशीं जुळले. हें आम्हांला साधलें याबद्दल धन्यता वाटते. पृथ्वीच्या पाठीवर कुठेंहि गेलें तरी माणसें हीं शेवटीं एकच असतात कां?


या पुस्तकाचें लेखन शक्य झालें याबद्दल आभार किती जणांचे मानायचे? बायकोचे, तिनें जगप्रवासांत कौटुंबिक आघाडी दक्षतेनें संभाळली म्हणून; 'हंस' चे संपादक अनंत अंतरकर यांचे, त्यांनीं आग्रहानें ही लेख-

माला मला लिहायला सांगितली म्हणून; लेखक-मित्रांचे, आतां तरी ते हें लेख वाचतील म्हणून, सन्मित्र पारगांवकर यांचे, त्यांनी देशीं आणि परदेशीं माझ्यावर तितकाच अकृत्रिम स्नेह केला म्हणून; चित्रकार फडणीसांचे, त्यांनी पुस्तकासाठीं केलेल्या रोषणाईबद्दल; प्रकाशक श्री. राजेंद्र बनहट्टी यांचे विशेष आभार, त्यांनी इतक्या झपाट्यानें, इतक्या आकर्षक प्रकारे पुस्तक तयार केलें म्हणून; श्री. लाटकर यांचे; त्यांनीं बनहट्टींचा झपाटा कमी पडूं दिला नाहीं म्हणून.

मी असें ऐकून आहे कीं परदेशाच्या प्रवासाबद्दल लिहिणें हें खरें नाहीं! म्हणजे लोक जितकीं जास्त वर्षं तिकडे राहतात तितक्या प्रमाणांत ते कमी लिहितात. दहा वर्षं अमेरिकेंत राहिलेल्या एका गृहस्थानें आपल्या प्रवासाबद्दल अवाक्षरहि लिहिलें नाहीं म्हणे. हें मला माहीत असूनही मीं प्रस्तुतचें पुस्तक लिहिलें आहे. या प्रमादाबद्दल माझें समर्थन एवढेंच कीं मी अमेरिकेंत फक्त सव्वा वर्ष राहिलों होतों.

बाळ गाडगीळ

| | |
|---|---|
| १ | विलायतेच्या प्याशिंजरास उपदेश |
| ७ | सिगरेट आणि वसंतऋतु |
| २२ | वेगळे जग |
| ३८ | नोकरी : एक अनुभव |
| ५१ | मी शिशुपाल बनतो |
| ६६ | अमेरिकन इंग्रजी |
| ७८ | माझी अमेरिकन शाळा |
| ८९ | माझा दोस्त व्हिक्टर |
| १०५ | अमेरिकन 'अबला' (!) |
| ११८ | बिचारा अमेरिकन नवरा |
| १३२ | चोरी कशी करतात ? |
| १४७ | अमेरिकेत 'उषावहिनी' |
| १६३ | अमेरिकन कुत्री आणि मांजरे |
| १७९ | अमेरिकेत कसे मरावे |
| १९४ | हवाईऽऽ : मंतरलेले बेट |



ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ........................ वि: ........................
........................ नों दि: ........................

# विलायतेच्या प्याशिंजरास उपदेश

'परदेशी' होणाऱ्या पांथस्थाला अनेक अडचणींना तोंड द्यावें लागतें. त्यांपैकीं जेवणें, फराळ इत्यादि नामांकित अडचणींना तोंड देणें हें माझ्या-सारख्या द्विजकुलोत्पन्नाला अवघड जात नाहीं. उरलेल्या अडचणी या खऱ्या. पास्पोर्ट नांवाची दुर्मिळ वस्तू मिळवितां मिळवितां माणसाचा जीव अर्धमेला होतो. 'व्हिसा' नांवाची जी चीज आहे तीसुद्धां अनेक दिवसांच्या यमयातना सहन केल्याशिवाय हातीं लागत नाहीं. त्यांतहि जीव अर्धमेला होतोच. ( जीव अर्धमेला होऊनहि उरतोच याचें कारण हें कीं, दुसऱ्या वेळीं तो अर्ध्याचा अर्धा होत असतो. ) एवढ्या खटाटोपानंतर जो पाव जीव उरतो त्यांतील पन्नास टक्के रिझर्व्ह बँक ही संस्था घेत असते. नोटा छापण्याचें लोकोपयोगी कृत्य ही करीत असली तरी परदेशी जाणाऱ्या माणसाला आपल्या डॉलर्सच्या पुरचुंडीच्या आसपासहि ती फिरकूं देत नाहीं. एवढेंच नव्हे तर दुसरा कोणी आपल्याला डॉलर्स देणार असेल तरी तें वापरण्यासाठीं या बँकेच्या साहेबाची परवानगी

लागत असते. रिझर्व्ह बँकेच्या पावनखिंडींतून जे सहीसलामत बाहेर पडतात त्यांची परदेशी जाण्याची हौस पुरी झाली असली तरच बाजीप्रभूप्रमाणें 'आतां मी सुखानें मरतों' असें म्हणून देह ठेवणें शक्य असतें. पण जित्या माणसाची हौस खरोखरींच मेल्याशिवाय जात नाहीं हेंच शेवटीं खरें.

अडचणींची एवढी शर्यत संपली कीं परदेशीं जाणारी आपली बोट दिसूं लागते असें मुळींच नव्हे. हें सर्व चालू असतांना निरनिराळे आप्तेष्ट, मित्र, ओळखीचे, अनोळखी इ. सर्व प्रकारचे लोक आपल्याला सल्ला नांवाची वस्तू विनामूल्य देत असतात.

माझी अमेरिकेला बरोबर न्यावयाची ट्रंक संपूर्णपणें भरून झाली होती. त्यांत ती कुटुंबानें भरली असल्यामुळें इतकी व्यवस्थित भरली गेली होती कीं, तिच्यांत आणखी कांहीं भरून दाखविणें हें जादूगार रघुवीर यांनाहि अशक्य झालें असतें. आवश्यक तेवढ्या सर्व वस्तु ( माझ्या मतें ) मीं घेतल्या असल्यामुळें बरेचसें निर्धास्त वाटत होतें. पण माझें हें सुख दैवाला कसचें पाहवतें !

त्याच दिवशीं संध्याकाळीं मला आमचे एक स्नेही भेटले :

" हं, काय झाली तयारी ? " त्यांनीं मला प्रेमळपणें विचारलें.

" हो. सगळी झाली असं वाटतं निदान "

" मग बूटबीट किती घेतले ? "

" कांहीं नवीन घेतले नाहींत बुवा. म्हणजे हे जे फ्लेक्सचे आहेत तेच मीं नुकते घेतले होते म्हणून म्हटलं... "

" अर्रर्रर्र ( र्रर्रर्र ) म्हणजे भलतीच चूक करतां आहांत तुम्ही ! "

माझ्या चुका मला अलीकडे सहसा लवकर कळत नाहींत हें खरें असलें तरी या वेळीं मात्र माझी खरोखरच कांहीं चूक होते आहे हें मला कळलेंच नाहीं. मी आपला स्वस्थ उभा राहिलों.

" माझं ऐका तुम्ही आतां. निदान चार पांच नवे बुटांचे जोड घेतल्याशिवाय जाण्याचा वेडेपणा करूं नका. "

" कां, बुवा ? "

" अहो कां म्हणजे काय ? अमेरिकेंत बूट भयंकर महाग असतात. एकेका जोडीला दोनशें ते अडीचशें. काय समजलांत ! "

तें ऐकून मी इतका घाबरलों कीं त्याच पावलीं बाजारांत जाऊन बुटाच्या दोन नव्या जोड्या खरेदी करून आणल्या. बूट नसल्यामुळें अमेरिकेंत आपली किती भयानक स्थिति होऊं शकली असती हें वाटेंत मला पावलोपावलीं जाणवत होतें. एका दृश्यांत मला असें दिसलें कीं मी जिकडे तिकडे अनवाणी फिरतों आहे, आणि रस्त्यांतून जाणारे लोक म्हणताहेत, "गरीब बिचारा इंडियन. अनवाणी चालला आहे. तो तरी काय करणार म्हणा! नेहरूंखेरीज इंडियांत बूट वापरणें सगळ्यांना थोडेंच परवडणार!" आणखी एक दृश्य असें कीं, आम्हीं अमेरिकन बूट विकत घेतल्यामुळें आम्हांला जेवणखर्चासाठीं पैसे शिल्लक नाहींत. आणि शक्ति नसल्यामुळें बूट घालण्याचे त्राणहि अंगांत शिल्लक नाहीं.

सारांश, त्या दिवशीं आमच्या सामानांत आणखी एका बॅगेची भर पडली. आणि बॅगेची भर पडल्यामुळें आणखी सामानाची भर पडली हें वेगळें सांगण्याची आवश्यकता नाहीं.

याशिवाय मीं दोन नवीन चष्मे (कांचांसह) विकत घेतले तेहि अशाच एका हितचिंतकाच्या सांगण्यावरून. हे नवे चष्मे वापरण्याचा योग मला अमेरिकेंत कधींच आला नाहीं. तो यावा म्हणून अमेरिकन फुटबॉल खेळून पाहावा असा मोह अनावर झाला होता. पण दातांची एकच कवळी, आणि हातापायांच्या दोनच जोड्या जवळ असल्यामुळें तो आवरावा लागला.

वुलन कपड्यांविषयीं मला बरोबर विरुद्ध असे सल्ले मिळाले. 'वुलनचे कपडे येथून नेणें हें अत्यंत मूर्खपणाचें आहे' असें कांहींनीं सांगितलें तर 'ते येथून न नेणें हेंहि तितक्याच मूर्खपणाचें आहे' असें कांहींनीं सांगितलें. त्यामुळें कोणत्या प्रकारचा 'अत्यंत मूर्खपणा' करावा असा चांद्रसेनीय पेंच मजपुढें पडला असल्यास नवल नाहीं. अगोदरचा उपदेश सरळ होता—जोडे घेऊन ये किंवा चाळशी घेऊन ये—पण या बाबतींत काय करणार? 'करावे कीं मरावें?' वास्तविक या प्रश्नाचें उत्तर किती सोपें आहे हें मला जरी येथें कळलें नाहीं तरी अमेरिकेंत गेल्यावर पूर्णपणें कळलें. गंमत अशी आहे कीं, अमेरिकेंत वुलनचे कपडे केले काय किंवा न केले काय, माणसाला मरण चुकत नाहीं. म्हणजे कपडे न केले तर थंडीमुळें आणि केले तर त्यांच्या बिलांमुळें मरण हें ठेवलेलेंच.

पण माझ्यापेक्षांहि आमच्या बोटीवर असलेल्या प्रोफेसर देवनाथन् यांची पंचाईत अधिक झाली हें मला कबूल केलें पाहिजे. त्यांना कोणीतरी सांगितलें होतें कीं, बोटीवर तुमचे खाण्याचे हाल होतील तेव्हां जातांना कांहींतरी खायचे पदार्थ घेऊन जा. देवनाथन्च्या पत्नीनें हें ऐकण्याचा अवकाश. त्या माऊलीनें लग्नाच्या रुखवताला देतात तसे (आणि तितके) निरनिराळे पदार्थ करून यजमानांबरोबर दिले. अगोदरच आम्ही इटालियन् बोटीवरचे ते निरनिराळे प्रकार खाऊन हैराण झालों होतों. त्यांत देवनाथन्चे हें रुखवत. त्यांना एकट्याला तें सर्व खाणें अशक्य होतें. बरें, बोट सोडल्यानंतर ते सगळे पदार्थ कुठें नेणार? त्यांतल्या गोड, तुपट हलव्याचा आमच्या उत्तर हिंदुस्थानी मित्रांनीं समाचार घेतला. पण 'मुरुक्कू'चे डबे संपवितांना मात्र आम्हीं कामीं येणार कीं काय अशी भीति वाटूं लागली. शिवाय देवनाथन् यांचा स्वभाव इतका देवमाणसासारखा होता कीं, त्यांच्या आग्रहाला एकदम 'नाहीं' म्हणणें हेंहि गळ्याच्या जिवावर येई. त्या भरलेल्या डब्यांकडे पाहून त्यांना वारंवार भडभडून येई आणि चेहरा भयंकर दीनवाणा करून ते म्हणत "च्, मिस्टर गॅडगिल, यू मस्ट हॅव् सम् मुरुक्कू ॲटलीस्ट. व्हॉट इज् धिस् सर! नॉट् सो लिटल्." अशा रीतीनें देवनाथनच्या जेवणाचे जरी हाल झाले नाहींत तरी आमच्या खाण्याचे 'हाल' भयंकर झाले एवढें मात्र खरें. त्या मुरुक्कूच्या भीतीनें आम्ही देवनाथनच्या केबिनमध्यें जायचें सारखें टाळीत होतों; पण बोट मोठी असली तरी पळून पळून कुठें जाणार? मित्रांनीं संकटांत मदत न केल्यामुळें उदास झालेले देवनाथन् बापुडवाणा चेहरा करून आम्हांला डेकवर कुठेंतरी भेटतच. आणि ओघानेंच बोलणें मुरुक्कूवर येऊन थडके. "तुमच्या मुरुक्कूचा अमेरिकेंत व्यापार करून डॉलर्स मिळवतां येतील काय किंवा कसें?" असें मी थट्टेनें एकदां त्यांना म्हणालों खरा; पण त्या वेळीं काळजीनें त्यांचा चेहरा इतका केविलवाणा झाला होता कीं, पुन्हां त्यांची असली क्रूर थट्टा करण्याचें मीं सोडून दिलें.

पण हे सर्व सल्ले तोंडी होते आणि त्यांना कितपत महत्त्व द्यायचें हें ज्याचें त्यानें ठरवायला पाहिजे होतें. यानंतर मिळालेले सल्ले 'छापील' होते. चक्क छापलेल्या असल्यामुळें कित्येक गोष्टी इतरांप्रमाणें माझ्या मनावरहि फार

परिणाम करतात.

'परदेशांत कसें वागावें?' यासंबंधीं मौलिक उपदेश करणारे दोन ग्रंथ आम्हांला बोटीवर वाचावयास देण्यांत आले. फाउन्डेशनच्या अमेरिकन साहेबानें ते बोटीवर आम्हांला पोंचतील अशा बेतानें मुद्दाम पाठविले होते. त्यामुळें ते वाचणें क्रमप्राप्तच होतें. त्यांत ते अनेक वर्षांच्या स्वानुभवावर आधारलेले असल्यामुळें शेवटच्या तासाला सांगितलेल्या प्रश्नांइतकें त्यांना महत्त्व असणेंहि साहजिकच होतें.

त्यांतलें 'अमेरिकेंत कसें जेवावें?' हें प्रकरण मीं जेव्हां वाचलें तेव्हां तेवढ्यापुरती तरी माझी तहानभूक नाहींशी झाली.

त्या सगळ्या सूचनांचा एकमेव अर्थ अमेरिकेंत दुसऱ्याकडे गेल्यावर माणसानें जेवूं नये असा असल्याची माझी खात्री झाली. कारण जेवायला जाण्याच्या पूर्वतयारीपासून तों जेवल्यानंतरचीं तुमचीं कर्तव्यें काय याविषयींहि बऱ्याच गोष्टी त्यांत हडसून खडसून लेखक-महाशयांनीं बजावल्या होत्या. जेवायला फार उशिरांहि जाऊं नका, फार आधींहि जाऊं नका. पांचच मिनिटें आधीं जा. जातांना मुलांसाठीं कॅन्डी, खाऊ किंवा फुलें घेऊन जा. गेल्यावर घरमालकिणीला कांहीं मदत पाहिजे असल्यास द्या. जेवायला बसल्यावर इतर लोक कसे जेवतात तें पाहून जेवा. कांटा-चमचा बरोबर हातांत घ्या. उजव्या बाजूनें वाढायला आल्यास तें तुमच्यासाठीं नसतें. तुमच्या डाव्या बाजूनें येईल तेव्हां तुम्ही तिकडे लक्ष द्या. जेवतांना फार तोंड उघडूं नका. आवाज करूं नका. गंभीर विषयावर बोलायचें टाळा. केवळ जेवणावर चित्त एकाग्र करूं नका 'जेवण उत्तम झालें आहे' असें मधूनमधून म्हणा, वगैरे वगैरे. जेवणानंतर बाईसाहेबांना कामांत मदत करा. जेवण 'बेष्ट' झालें होतें हें परत सांगा. त्यांचे आभार माना आणि घरीं आल्यावर त्यांना पत्र पाठवा. क्रिसमसचें कार्ड पाठवायलाहि विसरूं नका.

जेवायला गेल्यावर जेवायचें कीं नाहीं एवढा क्षुल्लक मुद्दा सोडला तर बाकी प्रत्येक लहानसहान बाबतींत सविस्तर विवेचन या ग्रंथांत करण्यांत आलें होतें. दोन्ही ग्रंथांचें परिशीलन केल्यानंतर माझें असें मत झालें कीं त्यांचे लेखक पुनु (कीं मुनु) स्वामी हे बारकावे आणि स्पष्टवक्तेपणा या बाबतींत रामदासस्वामींनासुद्धां हार जाणें एकंदरींत कठीणच आहे.

‘ उपदेश ऐकायचा नसतो, करायचा असतो ’ असें कोणी म्हटलें असल्यास मला माहीत नाहीं. (म्हणून मीच आतां तें म्हणून टाकतों.) परंतु तरीहि उपदेश किती करावा यालाहि शेवटीं ‘ कोण किती सहन करूं शकेल ’ ही एक मर्यादा पडतेच. वरील स्वामींनीं जेव्हां ‘ प्रियाराधन कसें करावें ? ’ या विषयावरील उपदेशामृताचे पेग्ज भरायला सुरुवात केली तेव्हां माझ्या सहनशक्तीनें आपली मर्यादा गांठली होती. या विषयाशीं मला कांहीं कर्तव्य होतें म्हणून नव्हे पण अमेरिकेला जाणाऱ्या ‘ होतकरू ’ तरुणाबद्दल मला आवश्यक तेवढा आदर आहे म्हणून.

वास्तविक परदेशीं जाणाऱ्या माणसास कोण काय उपदेश करणार ? ‘ तिकिटें नीट ठेवलीं आहेत ना ? ’ एवढें विचारतां येईल, किंवा अगदीं सांगायचेंच झालें तर एवढें म्हणतां येईल— “ सांभाळून जा. बोटीच्या कठड्यावरून फार वाकूं नकोस. ”

निरोप द्यायच्या वेळीं डोळे पुसतां पुसतां आजीनें सांगितलेले हे अश्रूंनीं भिजलेले शब्द ज्यानें ऐकलेले असतात त्याला जरी चंद्रावर जायचें असलें तरी आणखी कुठल्याहि उपदेशाची आवश्यकता असत नाहीं.

ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ................ वि: ....................
क्रमांक ........................ नों. दि. ................

# १ : सिगरेट आणि वसंत ऋतु

काय केलें म्हणजे काय होतें याविषयीं सामान्य माणसाचे कांहीं आडाखे असतात. उशिरा ऑफिसांत गेलें की, साहेब रागावतो, उशिरा घरीं आलें की, बायको संतापते. कोर्टाची पायरी चढली, तर न्याय मिळतोच असें नक्की नसलें तरी निदान फिर्यादीचें किंवा आरोपीचें किंवा दोघांचेंहि दिवाळें वाजतें. डॉक्टरचें औषध घेऊन रोगी बरा झाला नाहीं, तरी निदान तो दगावल्यावर त्याच्या मृत्यूचें कारण कळतें. तसेंच, कोणत्या गोष्टीचा परिणाम काय होतो याविषयींहि सामान्य माणसाच्या कांहीं घट्ट कल्पना असतात. उदाहरणार्थ, पैसे खाल्ले असतां ते पचत नाहींत, हें त्याला माहीत असतें; दारू प्याली म्हणजे कविता सुचतात किंवा आपण क्रुश्चॉव्ह आहोंत असें वाटतें हें त्याला माहीत नसलें, तरी दारू पिणें हें एकंदरीत वाईटच, हें त्याला समजत असतें. तसेंच सिगरेट् ओढली असतां कॅन्सर होतो हें धूम्रपान करणाऱ्या नवऱ्याला पटत नसलें तरी त्याच्या बायकोची तशी खात्री असते. ( 'चघळलेला चोथा' या डायजेस्टमध्यें तें तिनें गाडगिळांच्या बंडूप्रमाणेंच वाचलेलें असतें. )

अमेरिकेला येईपर्यंत अशा कित्येक कल्पना गोमाशीसारख्या मला चिकटून बसल्या होत्या. इथें आल्यानंतर प्रथमच माझें सामान्यज्ञान किती सामान्य आहे आणि माझें अज्ञान किती असामान्य आहें हें मला कळून चुकलें. स्वदेशांत मी स्वतःच शिक्षक असल्यामुळें आपल्याला कांहीं माहींत नाही हें मुळीं मला पटतच नसे. अमेरिकेंत मी शिकण्यासाठीं आलों असल्यामुळें ज्याला मी

पूर्वीं ज्ञान असें समजत असें तें किती अगाध अज्ञान आहे हें समजणें सोपें गेलें. ' शाकुंतल ' शिकवितांना आमचे संस्कृतचे प्राध्यापक म्हणत असत–" The depth of Shakuntala is too high. " हें मला इथें सारखें आठवायचें. मी जर अमेरिकेला आलों नसतों तर माझ्या अज्ञानाची खोली किती उंच आहे याची कल्पना मला कधींहि आली नसती !

साधी सिगरेटचीच गोष्ट घ्या. गेलीं चारपांच वर्षें मी सिगरेट ओढत होतों हें खरें. पण एरवी सिगरेटबद्दल कोरडा ठणठणीतच होतों. खरें सांगावयाचें म्हणजे आपण सिगरेट ओढली असता वसंतऋतु येतो इतकी साधी गोष्ट समजण्याची अक्कलहि मला नव्हती. सुदैवानें एका विडी-कारखानदारानें ती माझ्या नजरेस आणली. कोणाला, कशाचें ज्ञान कुठें होईल हें आजकाल सांगतां येत नाहीं. कोणाला झाडाखालीं बसलें म्हणजे ज्ञान होतें, तर कोणाला वर्गात बसलें असतांनाहि होतें. मला हें ज्ञान टेलिव्हिजनसमोर बसलों असतांना झालें. ( मागें एकदां रेल्वेस्टेशनवर बसलों होतों तेव्हां तीं बाकें माणसांना बसण्यासाठीं नसून ढेकणांना राहण्यासाठीं असतात आणि चहा पिण्याचे एकंदर बारा फायदे असतात असें दुहेरी ज्ञान मला झालें होतें. )

इथें आल्यापासून मी सिगरेटसूविषयींचें ज्ञान क्षणाक्षणाला आणि कणाकणानें गोळा करीत आहे. माझ्या ज्ञानाचें हें पोतें मोकळें करतांना साहजिकच अखिल अमेरिकेंतील विडी-कारखानदारांबद्दलच्या कृतज्ञतेनें माझें अंतःकरण भरून आलें आहे. हें लिहितानाहि हात त्याच कृतज्ञतेनें थरथरत आहे.

' पॅलमॅल ' नांवाची सिगरेट ज्या प्रतिभावंतानें निर्माण केली तो म्हणतो, ' पॅलमॅलचा नैसर्गिक सौम्यपणा तुम्हांला इतका आवडेल, इतका आवडेल! पॅलमॅल म्हणजे किती मऊमऊ, समाधान देणारी, आणि ( खरें तर ) संपूर्ण ओढण्यालायक ! उत्कृष्ट तंबाखूमधून ' प्रवास ' करणारा धूर !... वा वा ! त्याची खुमारी औरच. वैशिष्ट्यपूर्ण आणि शिवाय सौम्य. आणि पॅलमॅलची लांबी–पॅलमॅलची सुप्रसिद्ध लांबी. बाजारांतल्या सर्वोत्कृष्ट तंबाखूची, एकमेव ! पॅलमॅलच्या प्रचंड लांबींतून धूर स्वाभाविकपणें, सहज प्रवास करतो. त्या झकास तंबाखूच्या वरून, खालून, बाजूनें आणि मधून प्रवास करतो. ' ' चेस्टरफील्ड ' ही अशीच ( एकमेव ) सिगरेट. हिच्या निर्मात्यांचें म्हणणें कीं, हें चेस्टरफील्डमध्यें

एकंदर एकवीस प्रकारचे तंबाखू असतात आणि तिच्यांतून तुम्ही वीस वेळां धूर काढू शकतां. हिची 'चव' ग्रेट असते, कारण तिच्यांतले तंबाखू ग्रेट असतात. चेस्टरफील्डच्या दोन टोकांतील लांब अंतराचा प्रवास करतांना धूर धूर राहात नाहीं. तो तुमच्या ओठाशीं येतो तेव्हां जंटल्मन झालेला असतो. पॅल्मॅल–चेस्टरफील्डप्रमाणेंच लकी स्ट्राइक ( म्हणजे उत्तम तंबाखू ), कॅमल (इंचाइंचांत धुरानें ठासून भरलेली ) अशा आणखी सिगरेटस.

पण फिल्टर असलेल्या सिगरेटस् हा एक आगळाच प्रकार आहे. या गाळणेवाल्या सिगरेटस्चे निर्माते म्हणतात की, एकदां तुम्ही आमचें गाळणें हातांत घेतलें की, परत तें तुम्ही कधीं सोडणार म्हणून नाहीं. पण सगळींच गाळणीं सारखीं नसतात आणि आमचें सर्वांत चांगलें असा प्रत्येकाचा आग्रह असतो. 'केंट' वाले म्हणतात, आमची सिगरेट तुमच्या चवीला सौजन्यानें वागवते. छे छे ! आमचा फिल्टर काय चारचौघासारखा आहे म्हणतां ! अं हं ! आमचा 'मायक्रोनाइट' फिल्टर आहे साहेब. 'जर्मन माल आहे. हां ! बोलू देणार नाही,' असें आपल्याकडील व्यापारी म्हणत असत, त्याची अशा वेळीं आठवण येते. 'विन्स्टन्' वाले म्हणतात, 'आमची चव कशी, जशी असायला पाहिजे तशी !' 'पार्लमेंट' कर्ते म्हणतात, 'आमचें गाळणें आम्ही तुमच्या ओठांना लागूं देत नाहीं. तुमच्या ओठांपासून पाव इंच हें गाळणें दूर राहतें.' एखाद्या माणसाला आपण चार हात दूर ठेवावें त्याप्रमाणें सिगरेट तीन इंच दूर ठेवण्याचा हा एक प्रकार ! 'ओल्ड गोल्ड' वाले म्हणतात, 'आमच्या गाळण्याचें वैशिष्ट्य काय आहे माहितैय, फिरकीचें गाळणें आहे तें. त्याच्यांतून येणारा धूर चकरा खात येतो, सरळ येत नाहीं. यामुळें तुमच्या नाकातोंडांत जाणारा धूर हा एक वेगळाच 'धुंद' धूर असतो.' 'सेलम्' ही मेंथॉल असलेली थंड सिगरेट आहे. या लोकांचें म्हणणें असें की, तुम्ही एक वेळ 'सेलम्' ओढून तर पाहा. जादूची कांडी फिरल्यासारखे सगळीकडे वसंतऋतु बहरतो कीं नाहीं तें...या गोष्टीवर हें ऐकतांना माझा मुळींच विश्वास नव्हता. पण टेलिव्हिजनच्या पडद्यावरच्या माणसानें ही सिगरेट शिलगवायचाच अवकाश, पाणी झुळूझुळू वाहू लागलें, झाडांवरून पक्ष्यांचा किलबिलाट सुरू झाला, समोरच्या हिरवळीवरून एक सुंदर तरुणी नाचतनाचत आली आणि सेलम् ओढ-

णाऱ्या त्या तरुणाच्या हातांत हात घालून म्हणाली, ' माझे सेलम्वर प्रेम आहे ' ...मीं प्रत्यक्ष पडद्यावर पाहिलें नसतें तर या प्रकारावर माझा कधींहि विश्वास बसला नसता.

गाळणें चांगलें कीं वाईट याबद्दल 'पार्लमेंट 'च्या निर्मात्यांची खात्री नाहीं. ' गाळणें असूनहि आमच्या सिगारेटची चव गाळणें नसल्यासारखी लागते ' असें ते सांगतात. यावरून गाळण्याच्या कुठल्या बाजूचा धूर चांगला याबद्दल त्यांची खात्री नसावी. याचा फायदा घेऊन साधी सिगरेट् तयार करणारे म्हणतात, 'पहा, सांगत नव्हतों, आमच्या सिगरेटच्या उत्कृष्ट स्वादाला आम्ही गाळणें लावत नाहीं!' ते आवर्जून म्हणतात, ' आमची सिगरेट कुठल्याहि बाजूनं पेटवतां येते. उगाच नाहीं!' पण हे लोक आपसांत खूप भांडत असले तरी प्रत्येकाचें वैशिष्ट्य हें की, तो आपल्या सिगरेटची जाहिरात गाण्यानें करतो. जाहिरातींतली प्रत्येक ओळ गायली जाते. अर्थात् इंग्रजीमध्यें कुठल्याहि गद्य ओळींचें गाणें होऊं शकतें. ('लाडके, तूं खिडकींत उभी होतीस ' अशा अर्थाचें गाणें माझा मित्र डिसोझा म्हणत असे. म्हणतांना थोडें कापलें म्हणजे झालें.) पण अशा गद्यांतहि थोडेसें यमक, किंचितसा अनुप्रास जुळवला म्हणजे बरें असतें.

## चालीवर म्हणावयाचीं गाणीं

(चाल कोणतीहि)

1. Winston tastes good, like a cigarette should.

2. Treat your taste kindly, with Kent–the Micronite filter cigarette.

3. You get a lot to like...Marlboro–filtered, flavoured pack or box.

आणखी एक समूहगीत :

4. Not too strong, not too light, Viceroy has got the taste--that's right, that's right, that 's right.

- सिगरेटस्‌विषयीच्या या मतामतांच्या गलबल्यांत आपण कोणती जवळ करावी

याविषयीं संभ्रम पडण्याचा संभव आहे असें वाटेल, पण तें तितकेंसें बरोबर नाहीं. कारण प्रत्येक सिगरेट् इतर सर्वांपेक्षां अधिक चांगली असल्यामुळें आपण ओढूं ती कुठलीहि चांगलीच असते. मी इथें केंट ही सिगरेट ओढतों. पहिलें कारण असें की, तिच्या एका बाजूनेंच पेटवावी लागते. म्हणजे 'ही बाजू की ती' हा पेंच मला पडत नाहीं. दुसरें की, हें कुठलीहि सिगरेट् पेटवली तर तिच्यांतून मुख्यतः धूर बाहेर येतो हें गुपित आतां मला माहीत झालेलें आहे; आणि शिवाय जाहिरातवाल्यांच्या नियमाप्रमाणें केंट सिगरेट ही सर्वोत्तम असते; हें मी कधींहि दाखवूं शकेन. आतां माझीं सिगरेट् ओढली म्हणजे वसंतऋतु बहरत नाहीं हें खरें आहे. तसें पाहिलें तर वसंतऋतु, झुळझुळ-णारें पाणी, 'हरित तृणांचे हिरवे हिरवे गार गालिचे' इ. इ. मला फार आवड-तात. प्रश्न आहे तो त्यानंतर धांवत येणाऱ्या त्या सुन्दर अमेरिकन तरुणीचा, म्हणजे, माझी एक वेळ हरकत नाहीं, पण आमचें कुटुंब आमच्याबरोबर आहे मेहेरबान !

मला आतां हें चांगलें ठाऊक झालें आहे कीं इथले कारखानदार ( इतर सर्व व्यापाऱ्यांप्रमाणेंच ) लुच्चे आहेत. खरें म्हणजे फिल्टरचा कापूस हा तितक्याच जागेंत बसणाऱ्या तंबाखूपेक्षां महाग असतो. म्हणून कांहीं विडीवाले फिल्टरच वापरत नाहींत. पण जे वापरतात ते कांहीं कमी लुच्चे नसतात. ते वेटे उरलेल्या जागेंत जो तंबाखू वापरतात तोच कमी प्रतीचा, हलका वापरतात. त्यामुळें एकंदर किंमत सगळ्याच सिगरेट्सची सारखी असते. वस्तूंतले दोष घालविण्यापेक्षां तिची जाहिरात करून तिचा उठाव करणें हें अधिक फायदेशीर असतें. त्यामुळें रेडिओ आणि टेलिव्हिजनवरच्या जाहिरातींत लक्षावधि डॉलर्स खर्च करून हे व्यापारी आपला माल ग्राहकांच्या गळयांत बांधतात. जें पाहतो, जें ऐकतों, तें खरेंच असतें असा ( माझ्याप्रमाणें ) बऱ्याच साध्या भोळ्या लोकांचा गैरसमज असतो. गॅरिमूरसारखा प्रसिद्ध टेलिव्हिजनचा तारा अमुक सिगरेट् ओढतो म्हणून ती चांगलीं असतें, अर्नोल्ड पामरसारखा असामान्य गोल्फपटू अमुक सिगरेट् गेलीं दोन वर्षें सतत ओढत आहे म्हणून ती चांगली असते. यांत वेगळें कांहीं नाहीं. आपल्याकडे ज्याप्रमाणें साधना वापरते तो साबण सर्वोत्कृष्ट असतो, त्यांतलाच हा प्रकार आहे. पण हें सत्य असलें तरी

जाहिरातींच्या साहाय्यानें लोकांना अमोल माहिती पुरवून आपण त्यांची अहोरात्र सेवा करीत असतों असें व्यापारी लोकांचें मत असतें आणि हें मतसुद्धां ते प्रचंड जाहिरात करूनच लोकांच्या गळीं उतरवीत असतात.

सिगरेटची जाहिरात रेडिओ, टेलिव्हिजन, साप्ताहिकें, मासिकें आणि इतरत्र इतकी होत असते की, सिगरेटचा धूर सगळीकडे कोंडून राहिला आहे असें वाटतें. कोणीतरी लिहिल्याचें मीं वाचलें की, इतक्या सिगरेटच्या जाहिराती देऊनहि टी. व्ही. सेट्सचीं धुराडीं बनत नाहींत हें आश्चर्य नव्हे काय ? मला हा दृष्टिकोण पटत नाहीं. सूर्योदयापासून अखंडपणें जनतेची सेवा करणाऱ्या विडीवाल्यांना असे टोमणे मारणें हें माझ्या मतें बरोबर नाही. आनंदाची गोष्ट एवढीच की, त्या सेवाव्रतांत विडीवाले एकटेच नाहींत, त्यांच्या खांद्याला खांदा लावून बिअरवाले, साबण आणि सौंदर्यप्रसाधनवाले ( आणि इतर ) सेवेला उभे असतात; आणि या सगळ्यांच्या सेवेमुळें जनता बेजार होऊन तिचें डोकें दुखूं लागूं नये म्हणून डोकेंदुखीवर रामबाणांचे अक्षयभाते असलेले ॲस्पिरिन आणि बफरिनचे विक्रेते तयार असतातच.

× × किंवा × × यांसारख्या वजनदार मद्यांची जाहिरात रेडिओ टेलिव्हिजनवर करायला बंदी आहे, पण त्याचा वचपा बिअरचे उत्पादक भरून काढतात. आपल्याकडच्या हातभट्टीवाल्यांप्रमाणें त्यांना आपले व्यवहार चोरून करावे लागत नाहींत. त्यामुळें ‘ उठा बंधूंनो, त्वरा करा; चहापेक्षां रस बरा ’ अशा चालीवर केलेल्या बिअरच्या जाहिराती सतत पाहाव्या आणि ऐकाव्या लागतात. कलकत्त्याचा प्रत्येक सोनार ज्याप्रमाणें लखीबाबूचा खराखुरा वंशज फक्त मीच आहें असें सांगत असतो, त्याप्रमाणें मिल्वॉकीची खरी, एकमेव बिअर म्हणजे फक्त आमचीच असा सर्वच बिअर कंपन्यांचा दावा असतो. ( मला या बाबतींत विशेष गम्य नाहीं पण ) माझ्या माहितीप्रमाणें कोणत्याहि प्रकारच्या बिअरमध्यें सहा टक्क्यांपेक्षां जास्त मद्यार्क असत नाहीं, सगळ्यांची चव कडवट असते, सगळ्यांच्या किंमती सारख्या असतात. सगळ्या बिअर्सच्या जाहिराती याच चालीवर असतात, ‘ आराम करा, जग हें फार सुंदर आहे, जीवन म्हणजे मजा आहे— आमची बिअर घेऊन हें सर्व अनुभवा. ’ असा सगळ्यांना संदेश असतो. बिअर घ्यायची ती कॅनमधून की बाटलींतून एवढाच

प्रश्न. " छे छे ! कॅन् उघडण्यांत कांहीं तकलीफ नाहीं बाईसाहेब ! आमच्या या टॅप्टॉप् कॅनस् चटचट हातानें उघडतां येतात. कॅन् ओपनरचीसुद्धां जरूरी नाहीं." पडद्यावर एक बाई दिसते. ती नवऱ्याला विचारते, " टॉम्, अरे आपलं तें डबे उघडायचं कुठं गेलं ?" टॉम्, वर्तमानपत्रावरून नजर न काढतां म्हणतो, " हनी, त्याला कशाचीहि जरूरी नाहीं. नुसतं हातांनीं उघडायचं." आणि उघडण्याचा हा प्रकार हनीला इतका आवडतो की, ती पांचपंचवीस कॅन्स् फट्फट् करीत उघडून टाकते. " अय्या ! काय मज्जा आहे मेली." ती म्हणते. हा सगळा प्रकार पाहून टॉम् ओरडतो, " तूं हें काय चालवलं आहेस. इतकीं कॅन्स उघडलींस ? आतां करायचं तरी काय त्यांचं ?" तिच्यापुढें कसलाच प्रश्न नाहीं. ती म्हणते, " त्यांत काय आहे ? शेजारच्यांना बोलावूं आणि करूं पार्टी ?"

साबणाच्या जाहिरातींचा असाच प्रकार. विशेषतः भांडीं आणि कपबशा, तसेच कपडे धुण्याच्या साबणवाल्यांत स्पर्धा फार. साबणाची एक जाहिरात म्हणते :

' स्वान तुमच्या दोन्ही इच्छा पुऱ्या करतो.

तुमचे हात सुंदर, मुलायम ठेवतो,

तुमचीं भांडीं स्वच्छ चकचकीत करतो.' हात मुलायम ठेवणें यालाच या जाहिरातींतून इतकें महत्त्व असतें की, साबणानें भांडीं किंवा कपडे यांचें काय होतें याचा कधींकधीं प्रश्न पडतो. असा साबण जर पुण्यामुंबईला कोणी घरीं आणला तर कशा प्रकारचा संवाद होईल याची मी कल्पना करीत असतों.

" ए, हा नवीन साबण मीं आणलाय बरं का." तो.

" कां, घरांत नव्हते वाटतं दुसरे ?" ती.

" अग, पण हा नवीन साबण अमेरिकेंतून आलेला साबण आहे. तो वापरला म्हणजे हात मुलामय होतात."

" कशाकरतां वापरायचा तो ?"

" भांडीं आणि कपडे धुवायला !"

यानंतर एक प्रचंड स्फोट किंवा केरसुणी, धुण्याची काठी किंवा लाटणें हातांत घेऊन त्याचा पाठलाग.

" चुलींत घाला तो साबण. त्या मोलकरणीने हात तुम्हांला मुलायम करून पाहिजेत काय ? स्वतःच्या बायकोची कधीं गोड शब्दांत चौकशी तरी केली होती का ? म्हणे, साबणानं हॅत मुलायम् होतॅत. "

...त्याच दिवशीं मोलकरणीला नोटीस आणि दोन्ही इच्छा एकदम पुऱ्या करणाऱ्या साबणाचें खोकें कचऱ्याच्या पेटींत.

सौंदर्यप्रसाधन हा स्त्रीच्या जीवनांतला एक अटळ, अत्यावश्यक भाग. या विषयीच्या जाहिराती इतक्या प्रचंड प्रमाणावर असतात की, त्या पाहिल्यावर ॲस्पिरिनच्या जाहिरातींची महति पटते. एक जाहिरात विचारते, " तुझ्या नवऱ्यानं तुला किती दिवसांत स्वतःबरोबर नाचायला बोलविलं नाहीं ? इतर नवरे ऑफिसांतून घरीं येतांना आपल्या बायकांना फुलं घेऊन येतात. तुझ्या नवऱ्यानं तुला किती दिवसांत फुलं आणलीं नाहींत ? खूप दिवसांत ना ! मला माहीत आहे... कारण. याचं एकच कारण, तुझे पांढरे होत चाललेले केस... पण त्यामुळं एवढं दुःखी व्हायचं काय कारण बाईसाहेब ? आमचं ' लव्हिंग केअर लोशन ' वापरा आणि पाहा नवरोजी तुमच्यावर खूष होतात नाहींत... मग ते फुलं आणायला लागतील, तुला नाचायला घेऊन जातील... " सारांश काय, दोन डॉलर्सकरितां आपलें सबंध आयुष्य फुकट घालवूं नका. आमचें लोशन वापरा. यासारख्याच कातडी मुलायम ठेवण्यासाठीं, वजन आटोक्यांत ठेवण्यासाठी, चेहरा आकर्षक ठेवण्यासाठीं, हजार प्रकारच्या जाहिराती. वजन कमी करण्यासाठीं कमी कॅलरीज्‌चा नुसता पावच नाही तर फक्त एक कॅलरी असलेला कोकाकोलासुद्धां.



फिल्टर टिपची सिगरेट ओढण्यांत
कांहीं निराळीच मजा असते !

अमेरिकेमध्यें माणसानें काय खावें यापेक्षां कुत्र्यामांजरांनीं काय खावें

याच्या जाहिराती अधिक असतात. अमेरिकन लोकांनी लक्षावधि कुत्रीं आणि मांजरेंसुद्धा पाळलेलीं आहेत. हॉलिवूडमधल्या एका नटीच्या घरीं मांजरांचा इतका सुळसुळाट होता की, शेजाऱ्यांनीं शेवटीं कंटाळून पोलिसाकडे तक्रार केली आणि या चतुष्पाद शेजाऱ्यांची इतरत्र व्यवस्था करणें त्या नटीला भाग पाडलें. कुत्रीं आणि मांजरें हे कुटुंबाचे महत्त्वाचे घटक असल्यामुळें जाहिरातदारांचें त्यांच्यावर लक्ष असावें यांत नवल नाहीं. इथल्या कुत्र्यांना केवळ शिळ्यापाक्यावर दिवस काढावा लागत नाहीं किंवा मांजरांना शेजारच्या घरचें दूध चोरून पिण्याची वेळ येत नाहीं. कुत्र्यांचें खाद्य तयार करणारे जाहिरातदार ग्वाही देतात, "थांबा--आतां आम्हीं कुत्र्यांकरितां जें नवीन खाद्य बनविलें आहे त्यामुळें तुमच्या कुत्र्याला अधिक चांगलें जीवन जगतां येईल. केन–एल–रेशनमुळें आतां तुमच्या लाडक्या कुत्र्यांना केवळ पोटभर खातां येईल; एवढेंच नव्हे तर त्यांची कातडी निरोगी राहून तीवर भरदार केसांचा कोट येईल. आतां तुमच्या कुत्र्याचें तारुण्य अधिक काळ टिकणार आणि त्याची तब्येत अधिक गुटगुटीत आणि निरोगी राहणार."

दुसऱ्या एकाचें असें म्हणणें की, "मालकांनो, तुमच्या कुत्र्यांच्या जेवणांतला तोचतोचपणा घालवा. त्यांना जेवणाचा कंटाळा येऊं देऊं नका. सहा प्रकारच्या चवी आणि सहा निरनिराळे रंग असलेलीं आमचीं बिस्किटें त्यांना देऊन पाहा. त्यांना आम्ही हाडांचा आकार मुद्दाम दिला आहे. त्यामुळें तुमच्या टायगरच्या पोटाला इजा न होतां त्याला हाडें चघळतां येतील. शिवाय, तुमच्या कुत्र्याला वेडेंवाकडें कांहींहि खाऊं देऊं नका. त्याचा आहार समतोल हवा इकडे तुमचें लक्ष आहे काय?" कुत्र्यांचें आणि मांजरांचें अन्न हीं कधींच सारखीं नसतात. मांजरांना कुत्र्यांचें अन्न ( आणि जीवनहि ) आवडत नाहीं. 'पूस इन् बूटस' त्यांना देऊन पाहा. मांस आणि मासे यांचा स्वाद असलेलें हें खाद्य पाहूनच तीं खूष होतील. त्यामुळें त्यांचे डोळे अधिक चमकदार होतील आणि त्यांचे केस वाढून तीं जास्त गुबगुबीत होतील – एकंदरींत अमेरिकन कुत्र्यामांजरांचें जीवनसुद्धां अगदींच कुत्र्यामांजरांसारखें नाहीं

बहुतेक जाहिराती लांबलचक आणि कंटाळवाण्या असल्या तरी सगळ्याच कांहीं तशा नसतात. कांहीं जितक्या छोट्या तितक्याच चांगल्या असतात. हार्वेस्टर

सिगार्सची पंधरा सेकंदाची एक मजेदार जाहिरात मधेंच येऊन जाते आणि आपल्या कायमची लक्षांत राहते. सिगार शिलगावलेला एक माणूस पडद्यावर दिसतो. मग सिगार ओठांतून काढून तो आपल्याला उद्देशून म्हणतो, " उत्कृष्ट हार्वेस्टर सिगार फक्त एका डाइमला मिळतो. तुम्ही ओढून पाहाच. अरेच्या! अजून तुम्ही तिथेंच. वाट कशाची पाहातां आहांत? " दुसऱ्या वेळीं तो म्हणतो, " फक्त दहा सेंट्सना मिळणारा हार्वेस्टर सिगार इतर दहा सेंटस्ना मिळणाऱ्या सिगारपेक्षां चांगला नसता तर मीं तुम्हाला तसं सांगितलं असतं का? " तिसऱ्या वेळीं तो जरा धमकीच्या सुरांत बोलतों, " फिल्टरटिप असलेले हार्वेस्टर सिगार्स इतर फिल्टरटिप सिगार्सपेक्षां चांगले असतात हें मीं तुम्हांला किती वेळा सांगायचं? किती वेळां? " कुऱ्यांच्याकरितां केलेल्या एका ग्रेव्हीची जाहिरात अशीच मजेदार असते. एका मोठ्या थाळींत ही ग्रेव्ही करून ठेवलेली असते, आणि कुठूनतरी बदकाचीं सातआठ पिटुकलीं पिल्लें येतात. इतकी पिटुकली की त्यांना पलीकडे बसलेला प्रचंड कुत्रा दिसतसुद्धां नाहीं. चक्क त्याच्या पायांवरून एखादी भिंत चढून जावें तशीं तीं जातात. एक चलाख पिल्लू म्हणतें, " तो मोठा कुत्रोबा पाहिलास का? " दुसरें खाण्यांत गढून गेलेलें बदक म्हणतें, " आं? कुत्रोबा? कुठला? मला तर कोणी दिसत नाहीं. " आणि तो कुत्रा शांतपणें आपल्या वशीवर चाललेलें तें बालचमूचें आक्रमण पाहात बसतो. बशा आणि भांडी स्वच्छ करायला आईला मदत न करणारी धिटुकली मुलगी बाहेर जातांना म्हणते, " मी नाहीं म्हटल्यामुळें सगळें जग तुला नाकारतें आहे असं वाटतं का ग? तुझा अहंकार (ego) त्यामुळं दुखावतो? मग तूं लक्स कां वापरीत नाहींस? जेनीची आई तोच वापरते. " बिचारी आई खांदे उडवून म्हणते, " हं:, माझा अहंकार! "

प्रेक्षकांना जाहिराती कंटाळवाण्या वाटतात हें नवलाचें नाहीं. (कांहीं लोक जाहिराती टाळण्यासाठीं त्या आल्या कीं आपोआप तेवढ्यापुरता आवाज ऐकूं येणार नाहीं अशी व्यवस्था करून घेतात.) पण आल्फ्रेड हिचकॉकसारखे दिग्दर्शक आपल्या कार्यक्रमाच्या वेळीं स्वतःच्या जाहिरातदारांची भरपूर टिंगल उडवत असतात. एका कार्यक्रमाच्या वेळीं हिचकॉक हा आपल्या जाहिरातदारांवर पिस्तुल झाडीत असतांना दिसतो. या जाहिरातींच्यामध्यें माझा सँडविच होतो अशी तक्रार करतांना तो आढळतो. माझ्या कार्यक्रमांत येणारा हा शेवटचा व्यत्यय

असेल अशी आपण अपेक्षा करूं या, असेंहि तो म्हणतो.

टेलिव्हिजनवरच्या जाहिरातींची गंमत अशी की, त्या मधूनच कुठें तरी सुरू होतात. त्यामुळें सुरुवातीला कार्यक्रम कुठला आणि जाहिरात कुठली हें कळत नाहीं. अर्थात् रहस्य कथा चालू असली तर जाहिरातीमुळें रहस्य हें कदाचित् अधिकच गहिरें होत असावें. पण तें कसेंहिं असो, या जाहिराती नसल्या तर चांगले किंवा वाईट कसलेच कार्यक्रम टेलिव्हिजनवर देतां येणार नाहींत. कारण जाहिरातदार जो प्रचंड खर्च प्रसिद्धीसाठीं करतात त्यामुळेंच नटनट्या आणि दिग्दर्शक यांचे प्रचंड पगार देणें शक्य होते. शिवाय जाहिरातींना लोक कितीहि कंटाळले किंवा रागावले तरी जाहिरातींचा त्यांच्यावर थोडाबहुत परिणाम झाल्याशिवाय राहात नाहींच. ' स्ट्राइप ' नांवाच्या रंगीत पट्ट्या असलेल्या टूथपेस्टची जाहिरात मीं इतके वेळां पाहिली की, एक दिवशी बाजारांतून घरीं आल्यावर माझ्या लक्षांत आलें की, आपण कोलगेटऐवजी ' स्ट्राइप ' घेऊन आलों आहोंत. ' टूथ पावडर म्हणजे माकड छाप ' असें समीकरण आपल्या डोक्यांत घट्ट बसलेलें असतें हें खरें; पण जाहिरातदारांनीं कंबर कसली की, हें समीकरण बदलूं शकतें.

खर्च केला असतां बचत होते हें एक फार मोठें सत्य आहे, पण त्याची मला इथें येण्यापूर्वीं मुळींच कल्पना नव्हती. खर्च केला नाहीं म्हणजे बचत होते असें माझें भोळें मन मनाला पूर्वीं सांगत असे. पण खरें सत्य हें किती वेगळें आणि अद्भुत आहे हें इथल्या जाहिरातदारांनीं माझ्या लक्षांत आणून दिलें. मी न्यूयॉर्कला आलों तेव्हां निरनिराळ्या वस्तूंचे ' जंगी सेल' चालू होते. शहाणे अमेरिकन लोक या संधीचा फायदा घेऊन हजारो डॉलर्स खर्च करीत होते आणि शेंकडों डॉलर्सची बचत करीत होते. मग मी काय अशी संधि सोडतों ? मींसुद्धां त्या सेलच्या जाहिराती पाहिल्या आणि चांगलीच लबाडी केली. बाजारांत गेलों आणि ७५ डॉलर्सचा कॅमेरा घेतला. एरवी मला खर्च केल्याचें दुःख नेहमींप्रमाणें झालें असतें; पण त्या वेळीं मात्र भलताच आनंद झाला होता; आणि मीहि कितीकदा कसा धूर्तपणें वागूं शकतों याचें कौतुक वाटत होतें. याचें कारण असें की, मीं त्या दिवशीं २५ डॉलर्सची बचत केली होती. नेहमीं १०० डॉलर्सना मिळणारा कॅमेरा मी अवघ्या ७५ डॉलर्सना विकत घेऊन ही बचत केली होती. त्या दिवसापासून अशी बचत करायची संधि मीं अजूनपर्यंत सहसा सोडलेली नाहीं.

खरें सांगायचें म्हणजे मला कितीतरी संध्यांचा अजून फायदा घेतांच आला नाहीं. उदाहरणार्थ, नुकतेच माझ्या लक्षांत आलें की, मॅडिसन्‌मध्यें १५ हजार डॉलर्स किंमतीचीं घरें अवघ्या १२ हजार डॉलर्सना मिळतात. ४ हजार डॉलर्सच्या मोटारी ३ हजार डॉलर्सना मिळतात. पण मला इथे राहायचें नसल्यामुळें घराचा थोडाही उपयोग नाहीं आणि मोटार घेऊन तरी काय उपयोग? ती परत नेणार कशी? सारांश, या वैय्यक्तिक अडचणींमुळेंच केवळ एका दिवसांत माझे ४ हजार डॉलर्स ( सुमारे २० हजार रुपये ) नुकसान झालें आहे. खर्च करून शिवाय बचत करायची अशी संधि मला परत मिळणार नाहीं आणि त्यामुळें माझे अतोनात नुकसान होईल याची मला सारखी हळहळ वाटत असते.

श्रीमंत होण्याचा हा अमेरिकन मार्ग जसा मला इथें आल्यावर दिसला तशाच थेट ज्ञानसमुद्राकडे नेणाऱ्या अनेक लहानसहान पायवाटासुद्धा मला स्पष्ट दिसू लागल्या. माझा शिक्षकी पेशा परत गेल्यावर मला सोडायचा नसल्यामुळें मी काय शिकलों हें सगळेंच एका दमांत सांगून टाकणें धूर्तपणाचें होणार नाहीं. पण तरीहि शिक्षकी पेशामुळेंच जें कळलें तें दुसऱ्याला सांगितल्याशिवाय राहवत नाहीं. कोलगेट टूथपेस्ट वापरली म्हणजे कुटुंबांत एकी होते, फ्रिजिडेअर वापरला असतां स्त्रियांना आपण 'राणी' आहोंत असें वाटायला लागतें, अमुक प्रकारची बिअर प्यायली असतां तुम्ही तिला आवडता, तमुक प्रकारची ब्लेड्स वापरलीं म्हणजे बायको ( बायका! ) तुमच्यावर खूष असते. अशा प्रकारचें जें ज्ञान मीं इथें गोळा केलें आहे तें आपल्या कस्टम अधिकाऱ्यांच्या तावडींतून सहीसलामत पुण्याला कसें न्यायचें याची मला आतांपासूनच काळजी लागून राहिली आहे.

'गुण न आल्यास पैसे परत' अशा तऱ्हेचें आश्वासन आपल्याप्रमाणेंच इकडेहि मिळतें. एका रक्तवर्धक औषधाची जाहिरात सांगते– "नुसतीं व्हिटॅमिन्स घेऊन काय उपयोग? त्यामुळें तुमचें रक्त थोडेंच वाढणार. त्यापेक्षां आमचें जेरिटॉल घेऊन पाहा. जेरिटॉलच्या एका चमचांत, किंवा एका गोळींत, सात व्हिटॅमिन्स असतात. एवढेंच नव्हे तर गाईच्या वासरांच्या अर्धा शेर वजनाच्या लिव्हरमध्यें ( शिव शिव! ) असते इतकी शक्ति असते. तेव्हां ताबडतोब जेरिटॉल घ्या आणि हां हां म्हणतां सशक्त व गुटगुटीत व्हा...गुण

न आल्यास आम्ही तुमचे पैसे तुम्हांला परत देऊं, मग तर झालं ! " झोपेच्या गोळ्या विकणाऱ्या कंपन्यांच्या जाहिराती अशाच. " झोप न आल्यास पैसे परत." आता प्रश्न असा आहे की, गुण आला नाहीं हें दाखवायचें कसे आणि पैसे परत मिळवावयाचे कसे ? पुण्याला कोचिंग क्लास चालविणारे एक प्राध्यापक विद्यार्थी नापास झाल्यास त्याचे फीचे पैसे परत देतात. नापास झालों हें चेहऱ्यावरून आणि सर्टिफिकेट दाखवून सिद्ध करतां येते, पण शक्ति वाढली नाहीं हें खोल गेलेल्या आवाजांत सांगितलें किंवा झोप आली नाहीं हें तारवटलेल्या डोळ्यांनीं आणि केस पिंजारून सांगितलें तरी तें पटलें पाहिजे ना ! सेलम सिगरेट् ओढली म्हणजे वसंतऋतु येत नाहीं असें दाखवून माझे पैसे परत मिळविण्याचा मीं कांहीं दिवसापूर्वी विचार केला होता, पण माझा नाइलाजच झाला. कारण त्या वेळीं खरोखरच वसंतऋतु चालू होता. शिवाय आमची जाहिरात फक्त अमेरिकन नागरिकांच्या बाबतींतच खरी आहे आहे असें दुकानदार म्हणेल ही भीतीहि मला वाटत होतीच.

' आज रोख उद्या उधार ' अशी आपल्याकडे देण्यांत येत असलेली ताकीद इथें कुठेंच आढळत नाहीं. उलट, ' आज उधार आणि रोज उधार ' असें इथल्या व्यापाऱ्यांचें आश्वासन असतें. कुठल्याहि वस्तूची किंमत तुम्हांला ताबडतोब रोखीनें द्यावी लागणार नाहीं असें टेलिव्हिजनवर, रेडिओवर, वर्तमानपत्रांतून लोकांना सारखें बजावण्यांत येत असतें. आठवड्याच्या किंवा महिन्याच्या हप्त्यानें हे पैसे कोणालाहि देता येतात. या एका सोयीमुळे शेकडों अमेरिकन लोक सारखें आपलें ' शॉपिंग 'च करीत असतात. माझ्या माहितीचे असे लोक आहेत की, ज्यांनी मोटार, घर, फर्निचर, टेलिव्हिजन यांसारख्या गोष्टी एकहि सेंट रोख न देतां घेतल्या आहेत. त्यामुळें या बिचाऱ्या लोकांची गैरसोय एवढीच होते की, त्यांच्या पगारांची परस्पर हप्तेबंदी होते आणि चारपांच वर्षे हप्ते भरण्याशिवाय त्यांना पैशाचें कांहींच करतां येत नाही. हप्तेबंदीची इथल्या लोकांना इतकी संवय आहे की, कांहीं लोक प्रेम, लग्न यांवरचा खर्चसुद्धां हप्त्यानें करीत असावेत असा मला संशय आहे.

जाहिरातींची या लोकांना इतकी सवय असते की, दीडशें पानांच्या रविवारच्या न्यूयॉर्क टाइम्समध्यें जाहिरातींच्या घोळक्यांतून नागमोडी वळणें घेत जाणाऱ्या

बातम्या ते वाचूं शकतात. कांही लोकांना जाहिराती देणें आणि वाचणें हेंच आवडत असावें आणि बातम्यांची त्यांना अडचण होत असावी. कारण जन्म, लग्न, घटस्फोट, पुनर्लग्न, एंगेजमेंट, मृत्यु, दफनविधी सगळ्यांचीच जाहिरात येथें लोक करीत असतात; आणि कितीतरी लोक त्या जाहिराती आवडीनें वाचत असतात. छापण्यालायक अशा सर्व बातम्या आम्ही छापतों असें न्यूयॉर्क टाइम्सचें ध्येयवाक्य आहे. जाहिराती या सर्व छापण्यालायकहि असतात असें यांत गृहित धरलेलें असावें.

'बिजनेस् करून अमाप पैसा मिळवावा, नोकरी करण्यांत कांहींहि अर्थ नाही' असें प्रत्येक महाराष्ट्रीय माणसाप्रमाणे मला अर्थातच लहानपणापासून वाटत आलें आहे. इथें आल्यापासून मला असें नेहमीं वाटतें की, महाराष्ट्रीय माणसाला पुढें येण्याच्या दृष्टीनें दुसरा कोणताहि देश अमेरिकेइतका योग्य नाहीं. माझी अशी खात्री आहे की, न्यूयॉर्क किंवा शिकागो किंवा लॉस् एंजेलिसला जर मी 'समाधान विश्रांतिगृह' किंवा 'गाडगीळ आहारभवन' नांवाचें हॉटेल काढलें तर आमच्या कुठल्याहि प्रोफेसरापेक्षा अधिक पैसा मी मिळवूं शकेन. मात्र मला जाहिरातहि तशीच प्रचंड प्रमाणावर करावी लागेल; आणि इथल्या लोकांची सवय माहीत असल्यामुळे मी ती करायला बिलकुल मागेंपुढें पाहणार नाही. माझ्या बटाटेवड्यांची जाहिरात मी अशी करीन— "तरुणींनो, सुंदर होण्याचा एकच उपाय—आमचे बटाटेवडे खा." टेलिव्हिजनवर जेव्हां माझी जाहिरात येईल तेव्हां टॉम् नांवाचा नवरा हनीला म्हणत असेल, "हल्लीं तूं फार सुन्दर दिसतेस." बायको प्रेक्षकांकडे वळून आणि त्यांना विश्वासांत घेऊन म्हणेल, "माझ्या सौंदर्याचं रहस्य मी टॉम्‌ला कधींहि सांगणार नाहीं. गेल्या आठवड्यापासून मी ते गॅडगिल्चे इंडियन वडे खायला सुरुवात केली आणि माझ्या कांतींत विलक्षण फरक पडला. मी टॉम्‌ला आवडूं लागलें. तुमच्या टॉम्‌नं तुमच्यावर प्रेम करावं असं तुम्हांला वाटत नाहीं काय?" 'लोकप्रिय होण्याचें एकच साधन म्हणजे आमचीं पुणेरी मिसळ' अशी मी मिसळीची जाहिरात करीन. रेडियो, टेलिव्हिजन वर्तमानपत्रें—सर्वत्र या जाहिराती दिसूं लागतील आणि सुंदर होऊं पाहणाऱ्या स्त्रियांची, लोकप्रिय होऊं इच्छिणाऱ्या पुरुषांची समाधान—विश्रांतिगृहावर प्रचंड गर्दी होईल. माझ्या

हॉटेलांतील मसाला डोसा, इटलियन पिझ्झ्याला कधीच मागें टाकील यांत मला संशय वाटत नाहीं. कारण पिझ्झा खाऊन नुसतेंच पोट भरतें. ' जंटल्मन ' होतां येत नाही, अशी जाहिरात मी करणारच ! आतां एवढें खरें की, या सर्व जाहिरातींसाठीं मला फारच मोठ्या प्रमाणावर खर्च करावा लागेल; पण जाहिरातीचा खर्च शेवटीं लोकांकडूनच परत यायचा असतो हें साधें तत्त्व का मला माहीत नाहीं ?

' गुण न आल्यास, समाधान न झाल्यास पैसे परत, ' ' आज उधार, उद्याहि उधार ' हीं ब्रीदवाक्यें मी अर्थातच सगळ्या जाहिरातींत नेहमीं वापरणार. लोकांनी सारखें तेंच वाचलें, पाहिलें, ऐकलें म्हणजे त्यांचा माझ्या जाहिरातींवर चांगलाच विश्वास बसेल याविषयीं मला तिळमात्र संशय नाहीं, कारण सिगरेट ओढल्यावर जर वसंतऋतु येत असेल तर आमच्या हॉटेलांतला बटाटेवडा खाल्ल्यावर कोणत्याहि तरुणीने अधिक सुन्दर कां दिसूं नये ?

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ३७६८६ वि: ...
स्थळ ... नों दि: ६।५।६७

# २ : वेगळें जग

अमेरिकेंतल्या थंडीला मी एक दिवशीं इतका कंटाळलों कीं, उठून तडक बाजारांत गेलों आणि एक टेलेव्हिजनचा सेट टॅक्सींत घालून घरीं घेऊन आलों. म्हणजे तसें मीं तिथल्या थंडीचें कौतुक केलें नाहीं असें नव्हे. पहिला हिमवर्षाव जेव्हां मीं पाहिला तेव्हां खरोखरच पस्तीस वर्षांपूर्वीचें माझें बाळपण इतकीं वर्षें ओलांडून माझ्याकडे दुडदुडत आलें आणि मला बिलगलें. आम्हीं त्या हिमसेकाचें इतकें कौतुक केलें कीं, शक्य असतें तर एखादी कविताहि करायला मीं मागेंपुढें पाहिलें नसतें. पण कवितेचें एक जमलें नाहीं म्हणून सोडा, इतर सर्व गोष्टी मीं केल्या. हिमाच्या मुलायम पायघड्यांवरून चाललों—अगदीं जोडे वगैरे काढून. (कारण कविता नाहीं तरी कविमनजागृत झालें होतें ना!) हें आपलें जवळ-पास. पण नंतर पादत्राणापासून चिलखत-शिरस्त्राणापर्यंत सर्व बंदोबस्त करून दूर दूरहि जाऊन आलों. हिमानें न्हालेल्या घरांचे, झाडांचे, रस्त्यांचे फोटो काढले. हिमवर्षावाच्या 'अनुभवा' बद्दल मित्रांना लिहिलें. ग्रामीण मित्रांच्या भाषेंत सांगायचें तर आभाळानें केलेल्या हवेपेक्षांहि हलक्या अशा हिमाच्या कवितेनें मी अगदीं 'येडबडून' गेलों.

—पण हें किती दिवस चालणार? सृष्टीचें कौतुक बाळ जाणून-जाणून किती जाणणार? साध्या बुटांवर रबराचे बूट, थर्मल सूट, त्यावर पँट, शर्ट, शक्य तर दोन स्वेटर्स, कोट, टॉप् कोट, हातमोजे (हरे राम!), आणि इतका अव-तार पुरेसा नव्हता म्हणून कीं काय, त्यावर फरची कानटोपी! या एस्किमोंच्या

अवतारांतसुद्धां मी सुरुवातीला हिंडलों. लोक माझें ध्यान पाहून हंसतील हें शक्य नव्हतें. कारण कमीअधिक प्रमाणांत त्यांचे कपडेहि 'कडकलक्ष्मी' ते 'वासुदेव' यांच्यासारखेच असायचे. पण खरी महत्वाची गोष्ट ही कीं, तो सर्व सरंजाम अंगावर चढविला म्हणजे मी कोण आहें हें माझें मलाच कळत नसे, तिथें इतरांचें काय? ते मला ओळखतील तर हंसणार ना!

सारांश काय, थंडीच्या भीतीनें बाहेर जाणें नको आणि घरांत बसून कंटाळा म्हणून घरांत रहाणें नको, असें होऊन गेलें. शेवटी मीं 'ली' या माझ्या मित्राला फोन केला आणि सांगितलें, "बाबा रे, तुझ्या देशांतल्या या थंडीला मी कंटाळलों, म्हंजे हें हिम वगैरे ठीक आहे. पण तें आतां इतकं झालं कीं माझा हिममानव व्हायची वेळ आलीय्! माझ्याबरोबर चलत असलास तर आपण एक टेलेव्हिजनचा सेट घेऊन येऊं या."

"अरे, यंदा नाहींतरी आमच्या मानानंहि थंडी जरा जास्तच आहे बरं का! टेलेव्हिजन घेण्याचा तुझा विचार अगदीं योग्य आहे. मी लगेच माझी गाडी घेऊन सुटतोंच. आपण घेऊन टाकूं एक छानसा सेट. काय?"

"छान!" मी म्हणालों, "अगदीं 'एक्सप्रेस' सूट तूं घरून!"

—आणि त्या दिवशीं आम्ही टेले-व्हिजन घेऊनच घरीं आलो.



मी कोण हें माझें मलाच कळेना!

टेलेव्हिजन हा कुठल्याहि अमेरिकन घराचा अविभाज्य घटक आहे. त्याशिवाय अमेरिकन घर हें घरच होऊं शकत नाहीं. कित्येक घरांत तर

मुलांचा एक आणि मोठ्यांचा एक, असे दोनदोन सेटस् असतात. वर्तमानपत्रात मीं एकदां असें वाचलें होतें कीं, न्हाणीघरांतल्या बाथ-टब्जपेक्षां जास्त संख्येनें टेलेव्हिजन अमेरिकन घरांत आहेत. म्हणजे अंघोळ जुम्मेके जुम्मे झाली तरी चालेल; पण हें जादूचें खोकें मात्र घरांत हवें. आकडे सांगितल्यामुळें ज्यांना विधानांची सत्यता पटते अशांच्याकरितां हें सांगितलेलें बरें कीं, अमेरिकेंतल्या १९ कोटी लोकांजवळ ५ कोटी टेलेव्हिजन सेट्स असून वर्षाला सुमारें २०० अब्ज तास अमेरिकन लोक 'टेलेव्हिजन पाहणें' या सत्कार्यासाठीं खर्च करीत असतात. म्हणजे प्रत्येकाचे दिवसांतले सरासरी तीनचार तास या लाकडी खोक्याच्या चौकोनी कांचेच्या चेहऱ्याकडे पाहण्यांत जातात.

अमेरिकेंत टेलेव्हिजनचे कार्यक्रम निर्मिणाऱ्या तीन प्रचंड संघटना आहेत. 'कोलंबिया ब्रॉडकॅस्टिंग सिस्टिम्' (CBS), 'नॅशनल ब्रॉडकॅस्टिंग कॉर्पोरेशन' (NBC) आणि 'असोशिएटेड् ब्रॉडकॅस्टिंग कॉर्पोरेशन (ABC)' सुदैवानें या धंद्याचें राष्ट्रीयीकरण अमेरिकेंत झालेलें नाहीं. या संघटना खाजगी मालकीच्या आहेत. प्रेक्षकांचें लक्ष आपल्याकडे खेंचून घेण्यासाठीं त्यांची सतत स्पर्धा चालू असते. प्रेक्षकांना मनोरंजन (आणि ज्ञानहि) मिळावें या उच्च हेतूनें नसेल कदाचित्; पण जाहिरातदारांखातर कां होईना, ही स्पर्धा चालू असते आणि या स्पर्धेचा फायदा प्रेक्षकांना मिळून जातो. अर्थात् अशा परिस्थितींतहि टेलेव्हिजनच्या कार्यक्रमाबद्दल तक्रारी होत नाहींत असें नाहीं. या तक्रारी सतत चालू असतात, चौकशी-मंडळें नेमलीं जात असतात, कार्यक्रमांचें कांहीं प्रमाणावर नियंत्रणहि करण्यांत येत असतें. 'टी. व्ही. इन् अमेरिका' या मेयर वाइन्बर्गनें लिहिलेल्या पुस्तकासारखी ज्वलज्जहाल टीकेचीं पुस्तकें प्रसिद्ध होत असतात. वर्तमानपत्रें, मासिकें टी. व्ही. संघटनांवर आग पाखडीत असतात. पण सरकारनें या धंद्याचा ताबा घ्यावा असें सुदैवानें फार थोड्यांना वाटतें. नाहींतर टेलेव्हिजनची 'आकाशवाणी' व्हायला कांहींच वेळ लागणार नाहीं!

आतां ही गोष्ट खरी कीं, टेलेव्हिजनवर जाहिरातींचा सुळसुळाट फार असतो. म्हणजे प्रत्येक कार्यक्रमाच्या सुरुवातीला, मधें आणि शेवटीं कमींत कमी कसलीना कसली तरी जाहिरात असतेच. बहुतेकांचा या जाहिरातींवर

रोष असतो. आणि हिचकॉकसारखा मिष्किल दिग्दर्शक तर दर आठवड्याला होणाऱ्या आपल्या कार्यक्रमांत या जाहिरातदारांचीच आपल्या खेळकर शैलीनें टिंगलहि उडवीत असतो. पण त्यांतल्या त्यांत बरी गोष्ट एवढीच कीं, या जाहिराती रेडिओ सिलोनवरील जाहिरातींइतक्या बटबटीत आणि कर्कश नसतात. बदलत्या दृश्यांमुळें त्यांत बराचसा सौम्यपणा आणि क्वचित् रंजकताहि येणें शक्य असतें. ' बड्वायजर ' या नामांकित अमेरिकन बिअरची जाहिरात मला सारखी आठवते. ( आणि अस्वस्थहि करून सोडते ! )

एक सुंदर सरोवर आहे. त्याच्या कडेच्या खडकांवर लाटांवर लाटा येऊन हळुवारपणें आघात करीत आहेत. आणि या नैसर्गिक फ्रिजिडेअरमधें ठेवलेले आहेत सोनेरी रंगाच्या बडवायजरचे शिसे. या पार्श्वभूमीवर कोणातरी स्वरसुंदरीनें छेडलेल्या आलापाचे कर्णमधुर संगीत ऐकूं येत आहे. ' री ऽ ऽ ऽ लॅक्स. इटस अ वंडरफुल व ऽ ऽ र्ल्ड – रसिका, तुला हें आवाहान आहे. ये. करवादी जीवनामुळे आक्रसलेलें तुझे मन येथें सैल, शिथिल होऊं दे. ' बड्'च्या मंद आणि शीतल लहरी तुझ्या रक्तांतून, स्नायूस्नायूंतून वाहूं देत आणि जीवनांतलें सगळें सगळें विसरायला लावणाऱ्या या आनंदाची धुंदी तुझ्या डोळ्यांत चढूं दे. तुझ्या अंगाअंगांत पसरूं दे. '

अजूनहि केव्हां केव्हां मला या जाहिरातींतलें सरोवराचें ' तें ' दृश्य आठवतें, ' ते' स्वर कानीं पडतात आणि मी धुंद होऊन जातों. टेलिव्हिजनवर येणारी दर्जेदार जाहिरात अशी ही एकच नव्हे; अनेक.

कंपन्यांच्या प्रसिद्धिखात्यांत अशा कलात्मक जाहिराती निर्मिणाऱ्या कलावंतांचे ताफेच्या ताफे असतात आणि नव्यानव्या युक्त्याप्रयुक्त्या लढवून ते ग्राहकांची मनें ( आणि अर्थातच पाकिटेंहि ) काबीज करीत असतात. १९५९ सालींच ६५० कोटी रुपये अमेरिकन व्यापाऱ्यांनीं जाहिरातीवर खर्च केले आणि त्यांतले बरेचसे टेलेव्हिजनवरल्या जाहिरातींत. उत्पन्नाचा बराच मोठा भाग जाहिरातींवर खर्च करणें हें या व्यापाऱ्यांना अधिकाधिक फायदेशीर ठरत आलें आहे. ' जेरिटॉल ' हें केवळ बालांनाच ' सशक्त आणि गुटगुटीत ' बनविणारें बालामृत नव्हे; तर थोरामृतहि आहे. या अमृतवाल्या कंपनीनें तर उत्पन्नाच्या ४० टक्के जाहिरातीवर खर्च केले, आणि आपली फायद्याची कमान

अधिकाधिक उंचउंच चढविली. बरें, जाहिरातीमुळें वस्तूंच्या किमती वाढतात आणि गिऱ्हाइकांचें नुकसान होतें असें म्हणण्यांतहि तथ्य नाहीं हें व्यापारी लोक आपल्याला बजावीत असतातच. आणि कांहीं अंशीं हें खरेंहि आहे. ' कोलगेट ' टुथपेस्टची किंमत तिनाऐवजीं पावणेतीन झाली म्हणून कांहीं कोणी ' सदा दांत घासोनि तोंडा धुवावें ' या ' अन्योक्तीचा ' जप करीत पेस्टच्या अधिक ट्यूब्ज विकत घेईल असें नाहीं.

आणि निव्वळ स्वार्थाकरितां कां होईना, पण जाहिरातदारांनीं एवढा प्रचंड खर्च करायचें नाकारलें तर डॅनी के, जॅक बेनी, बॉब् होप यांसारख्या असामान्य कलावंतांचें ' मानवेतन ' देणार कुठून ? जॅक बेनी या श्रेष्ठ नटाला वर्षाचे १० लाख डॉलर्स मिळतात आणि डॅनी केला त्याहूनहि अधिक. ' जेलो ' किंवा ' स्टेट फार्म इन्शुअरन्स ' यांसारख्या जाहिरातदारांनीं जर आपल्या थैल्यांच्या दोऱ्या सैल सोडल्या नाहींत तर मंगळवारीं रात्रीं टेलेव्हिजनवर घराघरांत दिसणारें आणि हास्याच्या सरींवर सरी शिंपडणारें जॅक बेनीचें निर्मळ आणि प्रसन्न व्यक्तिमत्व रसिकांना दिसणार नाहीं. हीच गोष्ट डॅनी केची किंवा बॉब् होपची.

अर्थातच टेलेव्हिजनवरचें सगळेच्या सगळेच कार्यक्रम चांगले असतात असें नाहीं. ते तसे असायलाच पाहिजेत असा दावा करणेंहि फारसें बरोबर नाहीं. कारण टेलेव्हिजनवरचे कार्यक्रम जवळजवळ चोवीस तास चालूच असतात. मी मॅडीसनला असेपर्यंत, रात्रीं दीड वाजेपर्यंत हे कार्यक्रम चालू असतात आणि साडेदहा वाजतां 'लेट् शो' व बारा वाजतां 'लेट् लेट् शो' असतो हें मला माहीत होतें. शिकागोला गेल्यावर मला असें कळलें कीं, तिकडे पहाटे साडेतीन वाजतां सुरू होऊन साडेपांचला संपणारा 'लेट् लेट् लेट् शो' सुरू करण्यांत आला आहे. इतका वेळ—आणि तोसुद्धां तिन्ही निर्माते ' आगळे ' कार्यक्रम कुठून दाखवणार ? वर्षांतून दिवाळी–अंक एखादाच. खरे म्हणजे एकच ! शिवाय कार्यक्रम फार उत्तम नसावेत असा कांहीं मानसशास्त्रवाल्यांचा सल्ला असतोच. त्यांचें रोकडें व्यवहारी म्हणणें असें कीं, तुम्ही श्रोत्यांना खूष करण्यासाठीं एखादी भलतीच चित्तथरारक रहस्यकथा दाखविलीत किंवा एखादा विलक्षण उदरविदारक विनोदी कार्यक्रम दिलात तर त्यांचें लक्ष कार्यक्रमांतच राहील आणि नकली माला-

पासून सावध राहून जाहिरातींतलाच माल घेण्याचें लक्षांत ठेवण्याऐवजी रहस्य-कथेंतील खुनाच्या ' पुनःप्रत्ययाच्या आनंदांतच ' ते बुचकळ्या मारीत रहातील. ल्यूसिल् बॉल या विनोदी नटीच्या ' I love Lucy ' या तुफानी हास्यकारक कार्यक्रमावर या मानसशास्त्र्यांनीं अशीच मल्लिनाथी केली. ते म्हणाले, " छे बुवा ! हास्य असें अनेक–मजली असून उपयोग नाहीं. पोट धरधरून हंसतांना जाहिरातीचें पालुपद लोकांच्या लक्षांत तरी रहात नाहीं किंवा तो आवाजच हास्याच्या कल्लोळांत बुडून जातो. सारांश, जाहिरातीच्या दृष्टीनें पाहिलें तर हास्य माफक प्रमाणांतच असावें. फार फार तर एखादा मजला म्हणजे अगदीं डोक्यावरून पाणी. "

लोकांच्या खिशांकडे अविचल नजर ठेवण्याचें हें ब्रीद पाळण्याकरितां म्हणून कीं काय, कांहीं कार्यक्रम अगदींच सुमार असतात. गॅरी मूरचा एक तासाचा साप्ताहिक कार्यक्रम या प्रकारचा असतो. या गृहस्थाला आठवड्याच्या कार्यक्रमाला ४५ हजार डॉलर्स म्हणजे सव्वादोन लाख रुपये आणि वर्षाचे सव्वा कोटी रुपये कां देतात हें कोडें मला कधींहि उलगडलें नाहीं. ( याविषयीं मीं मिरासदारांना सहज लिहिलें होतें. त्यांनीं मला उलट टपालीं कळविलें कीं, मेहेरबानी करून असलें कांहीं आम्हांला कळवीत जाऊं नका. यातना होतात. आमच्याहि सहनशक्तीला कांहीं सीमा आहेत ! ) गॅरी मूर हा बुटका, व्यक्तिमत्व नसलेला आणि अतिशय मठ्ठ दिसणारा नट आहे. माफक वाक्चातुर्य हेंच त्याचें भांडवल. आश्चर्य असें कीं, याचे विविध कार्यक्रम सामान्य असूनसुद्धां लोकप्रियतेच्या दृष्टीनें पाहिले तरी लोकमताचा कौलसुद्धां त्याच्या बाजूनें दिला जात असतो. जॅकी ग्लीसन या आणखी एका लोकप्रिय टेलेव्हिजन–ताऱ्याची हकीकत हीच. याच्या चित्रपटांच्या मानानें त्याचे कार्यक्रम अगदींच गचाळ असतात आणि आपल्या लठ्ठपणाचें तो इतकें भांडवल करतो ( त्याचें वजन तीनशें पौंड आहे म्हणतात ! ) कीं, शेवटीं त्याची कींव यायला लागते. सिनेमांतल्या कामांमुळें प्रसिद्धि पावलेला रेड स्केल्टन् हाहि कमालीचे विदूषकी चाळे करणारा नट आहे. त्याला शुद्ध आचरटपणाहि म्हणतां येणार नाहीं. पण तरीहि हे नट आपापलीं लोकप्रियतेचीं साम्राज्यें बाळगून आहेत. त्यामुळें जाहिरातदार आणि म्हणून त्यामुळें टेलेव्हिजनवाले त्यांच्यापुढें ' दोन्ही कर जोडून आणि त्रिकालचरणीं मस्तक ठेवून '

नम्र असतात.

आणि हें सगळें असूनहि शिवाय दर्जेदार कार्यक्रम देणारे डॅनी के, जॅक् वेनी, बॉब् होप यांच्यासारखे कलावंत आहेतच. जॅक् वेनी सत्तरीच्या पलिकडे गेला आहे, पण त्याची तुफान लोकप्रियता आणि त्याच्या कलेची उंची — कांहींच कमी झालेलें नाहीं. आपलें वय फक्त ३९ आहे असें तो सारखें सांगत असतो. पराकाष्ठेचा चिक्कूपणा हेंही त्याचें एक वैशिष्ट्य. शिवाय आपल्या निळ्या डोळ्यांचेंसुद्धां त्याला फार कौतुक असतें. या दोनतीन साध्या गोष्टींच्या मूळ भांडवलावर आधारलेले जॅक्चे कितीतरी कार्यक्रम मीं पाहिले; पण दर वेळीं त्यांत कांहींतरी नवीन आणि खास असें असायचेंच. मजेदार, गुदगुल्या करणारें, खुसखुशीत असें कांहींतरी जॅक् बोलतो आणि चेहेऱ्याचा एक विशिष्ट कोन करून अत्यंत निर्विकार मुद्रेनें प्रेक्षकांकडे पहातो. स्वतःच्या आणि प्रेक्षकांच्या दृष्टिकोनांतून पहाणाऱ्या जॅक्ची ही पोज् टेलेव्हिजन पहाणाऱ्या प्रत्येकाला परिचित असते. जॅक्ला आणि जॅक्बरोबर हंसतांना प्रेक्षक अंतर्मुख होतात. अंतर्मुख होतात आणि स्वतःकडे पाहूनहि हंसतात. बॉब् होप आणि डॅनी के हे तर आपले जुने मित्र. त्यांनीं कोणाला हंसविलें नाहीं ? प्रेसिडेंट केनेडींनीं व्हाइट हाउसमध्यें बॉब्चा सत्कार केला आणि त्याला सुवर्णपदक दिलें. " या वेळीं आपल्याला काय वाटतें ? " — त्याला कोणीतरी पत्रकारानें विचारलें. " जॅक् वेनीच्या मनांत माझ्याविषयीं किती हिंस्र विचार येत असतील असा विचार माझ्या मनांत येतो आहे. "— बॉब् म्हणाला. आणि नंतर जो हंशा पिकला त्यांत केनेडींसकट सगळे सामील झाले. हें सगळें किती खेळीमेळींत चाललें होतें ! आणि नंतर थोडक्यांतच, पण किती गंभीर विचार त्यानें किती सहज सांगितले. सहजता हा तर मुळीं त्याच्या वाक्चातुर्याचा आत्मा. दारूकाम चालू असतांना एखाद्यानें एकामागून एक भुईनळे पेटवीत जावें आणि प्रकाशाचीं अनेक झाडें एकामागून एक फुलत जावींत त्याप्रमाणें बॉब् बोलूं लागला कीं हास्याच्या सरींवर सरी येत रहातात, हास्याचीं कारंजीं सारखीं थुईथुई नाचतच रहातात. डॅनी केचा दिमाखच वेगळा. त्याचें पदलालित्य अधिक चांगलें कीं स्वरलालित्य अधिक, असा संभ्रम पडावा. डॅनी के इतका बोलका चेहेरा तर मीं कधीं पाहिलाच नाहीं आणि कोणीच कधीं पाहिला नसेल ! मनाच्या वेदनेचें

दर्शन आणि ती सहजासहजीं झेलून सहन करण्याची ताकद एकाच हातानें देण्याचें सामर्थ्य या श्रेष्ठ कलावंतामध्यें आहे. कार्यक्रमाच्या शेवटींशेवटीं डॅनी प्रेक्षकांसमोर एका लहानशा स्टुलावर बसतो आणि त्यांच्याशीं हितगुज करतो तेव्हां एका मुखानें हजारों मनाशीं तो एकदम संवाद करतो आहे असें वाटतें. हजारों तंबोरे एकदम बोलूं लागावे तसें वाटतें. एका नदीनें हजार मुखांनीं सागराला मिळावें तसें वाटतें.

डॅनीच्या हितगुजांतील अशी एक गोष्ट मला आठवते. त्या लहानशा स्टुलावर बसून, पुढें वांकून डॅनी म्हणाला, "माझी एक जर्मन मैत्रीण आहे. एवढीशी, पिटुकली, पण चुणचुणीत जर्मन मुलगी. कसल्यातरी भयंकर दुःखानें, वेदनेनें भारलेली, कोमेजलेली. कुठेंतरी गर्दीत हरवलेली ती मला दिसली आणि मी तिला. आणि आश्चर्य सांगूं का ? मला जर्मन येत नसतांना मी तिच्याशीं बोललों आणि तिला इंग्रजी येत नसतांना ती माझ्याशीं बोलली ! तिच्या डोळ्यांनीं मला कितीतरी सांगितलें आणि मला तें सारें सारें समजलें. पण तिची वेदना मला समजल्यामुळें मी व्याकुळ झालों आणि तिच्या नाजुक, कोमेजलेल्या चेहेऱ्यावर हंसूं उमललेलें पाहिलें तेव्हां मला पिसासारखें हलकेंहलकें वाटलें. आतां एकमेकांच्या भाषा येत नसतांना आम्ही एकमेकांशीं कसें बोललों याचें तुम्हांला आश्चर्य वाटेल. पण त्यांत आश्चर्य कसलें महाराज ? आम्ही दोघें अखेर रक्तामांसाचीं माणसंच होतो ना ?"

मला असें वाटायचें कीं, डॅनीनें त्या स्टुलावर तसेंच बसावें आणि आपल्याशीं सारखें बोलत रहावें. हजारों मुखांनीं महासागराला सारखें मिळत रहावें.

अमेरिकन टेलेव्हिजनवरचे जे कार्यक्रम विशेषतः परदेशांत दाखविले जातात आणि लोकप्रिय होतात त्यामुळें सामान्य अमेरिकन माणसाच्या जीवनाबद्दल या देशांत बरेचसे गैरसमज निर्माण झाले आहेत. म्हणजे फडक्यांच्या कादंबऱ्या वाचून ज्याप्रमाणें महाराष्ट्रांतल्या मध्यमवर्गीय जीवनाबद्दल वाचकांच्या मनांत होतात त्याप्रमाणें. हाणामारीचे वेस्टर्न्स आणि खुनाखुनीच्या रहस्यकथा पाहून आपल्या मनांतहि असेच गैरसमज निर्माण झालेले आहेत. म्हणजे आपल्याला असें खात्रीपूर्वक वाटतें कीं, अमेरिकेंत फक्त दोन जातीचेच लोक असावेत. एकमेकांवर ठो-ठो गोळ्या झाडणाऱ्या लोकांची एक 'गोळीबंद' जात,

आणि आलिशान गाड्यांतून हिंडणाऱ्या, कामबिम कुछ नसलेल्या लोकांची दुसरी एक जात. आपल्याला आणखी असेंसुद्धां वाटतें कीं पिॲनो या वस्तूचा उपयोग अमेरिकेंत मुडदे लपवून ठेवण्यासाठीं केला जातो आणि एकमेकांकडे पिस्तुलें रोखल्यानंतर लोकांमध्यें चारदोन शब्दांचें जें टोंकदार संभाषण होतें त्यापलिकडे अमेरिकन लोक आपापसांत चकारशब्दसुद्धां बोलत नाहींत. शिवाय नाइट क्लब-मधल्या गुंड लोकांच्या टोळ्यांपुढें म्हटलें जातें तेवढेंच अमेरिकन संगीत. याशिवाय अमेरिकेंत न्हाणीघरांतलें संगीतसुद्धां पिकत नाहीं.

हें सर्व अर्थातच बरोबर नाहीं. म्हणजे खरें अमेरिकन जीवनहि असें नाहीं आणि टेलेव्हिजनवरसुद्धां सगळेच कार्यक्रम "हेंच" जीवन चित्रित करतात असेंहि नाहीं. अमेरितकेंसुद्धां कंगाल, भकास असें जीवन जगणारीं माणसें आहेत, तिथेंहि अंतः-करण विकल करणारें दारिद्र्य आहे. तिथेंसुद्धां जीवनांतलीं लहानसहान सुखदुःखें आहेत, लहानमोठ्या इच्छा–आकांक्षा असलेले छोटेमोठे लोक आहेत. आशा–निराशांचा ऊनसांव-लीचा खेळ आहे, क्षणांत अस्मानांत चढविणारें यश आहे, तसेंच दुसऱ्या क्षणीं धूळ चारणारें विदारक अपयशहि आहे. सगळ्याच विवाद्य गोष्टी–मग त्या प्रेमप्रकरणांच्या असोत किंवा पैशा-अडक्याच्या, सत्तेच्या असोत– 'नेमबाजी'च्या कौशल्यानें निकालांत काढल्या जात नाहींत. खरें म्हणजे अशा फारच थोड्या काढल्या जातात. अमेरिकन




एक 'गोळीबंद' जात

माणसेंसुद्धां भित्रीं, दुबळीं, हळवीं, लोभी, लंपट—सगळ्या प्रकारचीं असतात. चेकॉव्हनें आपल्या नायकनायिकांविषयीं लिहिलें होतें तसे अमेरिकन पुरुषहि निमूटपणें ऑफिसांत जाऊन कामें उपसतात, आपल्या नायकांशीं भांडतात आणि वेळीप्रसंगीं त्यांच्या झिंज्याहि उपटतात. चेकॉव्ह म्हणतो त्याप्रमाणें ते कोबीची भाजी खातातच; पण भेंडीचीसुद्धां खातात. ( आणि अमेरिकेंत अळू मिळत असतें तर ती भाजीसुद्धां त्यांनीं हाणली असतीच ! )

सारांश काय कीं, अमेरिकेंतहि माणसें आहेत ( माणसेंच आहेत ! ) आणि विशेष म्हणजे अमेरिकन टेलिव्हिजनवरसुद्धां तीं आपल्याला दिसतात. मी येथें येण्यापूर्वी नुकतीच ‘ East side— West side ’ नांवाची एक कथामालिका टेलेव्हिजनवर सुरू झाली होती. आणि अमेरिकन शहरांतल्या स्लम्सचे वास्तव-वादी चित्र प्रभावीपणानें पण भडकपणा टाळून या मालिकेंत दाखवण्यांत येत होतें. अमेरिकन लोकांचें कौटुंबिक जीवन हलक्याफुलक्या पद्धतीनें दाखविणाऱ्या कितीतरी चित्रमालिका होत्या. त्यांतले ‘ डिक् व्हॅन् डाइक् ’, ‘ ॲन्डी ग्रिफिथ ’ ‘ डॅनी थॉमस ’, ‘ हेझल ’ यांचे शोज् चांगले असतात. ‘ डिक् व्हॅन् डाइक् ’ म्हणजे गंगाधर गाडगीळांच्या बंडूची अमेरिकन आवृत्ति वाटते. ‘ ॲन्डी ग्रिफिथ ’ मध्यें एक विधुर शेरिफ, त्याचा सहकारी आणि मुलगा यांच्याभोंवतीं गुंतलेलीं कथानकें असतात. यांतला डॉन् नॉट्स् हा एक फार चांगला नट आहे. ‘ ओपी ’ नावाचा शेरिफ्चा मुलगाहि मोठा चलाख आणि चुणचुणीत दिसतो. ‘ डेनिस द मेनेस ’ या अमेरिकन ‘ गोट्या ’च्या व्रात्य लीलांपेक्षांहि मला हा बोलका आणि चमकदार डोळयांचा मुलगा आवडत असे. ‘ पेरी मेसन् ’च्या चातुर्यकथांत पिॲनोंतील मुडदे आढळले यांत नवल नाहीं. पण त्याच्या चातुर्यावर सगळेच लोक इतके खूष आहेत कीं, जगांतल्या चाळीस देशांत तो दाखवला जातो. ‘ वॅगन् ट्रेन् ’ , ‘ गन् स्मोक ’ यांत तर सस्त्या प्रमाणांत दिवसाढवळ्या आणि देवाब्राह्मणाप्रमाणें चारचौघांना साक्ष ठेवूनसुद्धां खून पडावेत यांत नवल नाहीं. ‘ गन् स्मोक ’मध्यें पिस्तुलाचा धूर इतका आहे कीं, तो प्रेक्षकांच्या नाका-तोंडांतसुद्धां जातो, पण ‘ डिफेंडर्स ’सारखा कथामालिकेंत रहस्य, उत्कंठा या हुकमी मालमसाल्याबरोबर वास्तववादी चित्रणहि असतें. सर्वांची आवड सारखी नसतेच. कुणाला कोबीची भाजी खाऊन नित्यनियमानें ऑफिसमध्यें वेळेवर


हजर होणाऱ्यांच्याच गोष्टी आवडतात, तर कुणाला शांतपणें आरामखुर्चीत बसल्या बसल्या खून ( इतरांचे ) होत असतांना पाहिल्याशिवाय चैनच पडत नाहीं. कोणाला आपल्या Mr. Ed नांवाच्या बोलणाऱ्या घोड्याच्या गोष्टीच पसंत असतात.

याशिवाय ' ओळखा पाहूं ' जातीचे कितीतरी कार्यक्रम जवळजवळ शब्द-कोड्यांइतके लोकप्रिय आहेत. मग त्यांत समानार्थक शब्द जुळविण्याच्या स्पर्धा असतात, समोर बसलेल्या व्यक्तीचा व्यवसाय ठरविण्याच्या समस्या असतात, कुणाचें गुपित ओळखायचें असतें, कुठें नांवें ओळखायचीं असतात, कुठें शब्द जुळवून दाखवायचे असतात, कुठें वस्तूंच्या किमती ओळखायच्या असतात. आणि गंमत अशी कीं, लाखों डॉलर्सची बक्षिसांची खैरातहि या कार्यक्रमांतल्या ' विजेत्यांना ' करण्यांत येत असते. मार्क गुडसन् आणि बिल टॉड्मन् हे निर्माते अशा नव्यानव्या क्लृप्त्या सारख्या शोधून काढीत असतात आणि त्यांना लोकप्रियताहि मिळवून देत असतात. माहितीपट, चर्चा, जुने चित्रपट, बातम्या असे करमणुकीचे आणखी कितीतरी प्रकार. रात्रीं साडेदहा वाजतां बहुधा आठवड्यांतले पांच दिवस तरी एक ' वेगळा ' कार्यक्रम असे. म्हणजे या कार्यक्रमांत नकलेप्रमाणें बोलणें किंवा पूर्वी ठरल्याप्रमाणें पिस्तुलाचा चाप दाबणें आणि कंसांतील आज्ञेप्रमाणें कोणीतरी मरून पडणें वगैरे कांहींच अगोदर ठरलेलें नसतें. जॅक् पार, जॉनी कार्सन् किंवा जेरी लुई यांच्यासारखे संभाषण-चतुर लोक सुचेल त्या कोणत्याहि विषयावर आपल्या निमंत्रित पाहुण्यांशीं सुखसंवाद करीत असतात. या चारपांच लोकांच्या शिळोप्याच्या गप्पांत प्रेक्षक-श्रोत्यांनीं सामील व्हावें, अशी कल्पना. जॅक पार हा असा फार मजेदार गप्पा-टप्पा करणारा, संभाषणचतुर म्हणून लोकप्रिय आहे.

टेलेव्हिजनवर व्यायामाचे पाठ देणारा एक कार्यक्रमहि असतो आणि अर्थातच तो आकाशवाणीवरील हिन्दी–पाठाच्या कार्यक्रमाइतकाच कंटाळ-वाणाहि असतो. गंमत अशी कीं, हे शक्ति–पाठ देणारे ' बाबू पैलवान ' कार्यक्रम संपतेवेळीं चक्क गातगात व्यायामप्रेमी प्रेक्षकांचा निरोप घेत असतात.

टेलेव्हिजन हा अमेरिकन कुटुंबाचा एक अवयवच आहे. आणि मला असें वाटतें कीं, या कुटुंबावर टेलेव्हिजनचे कांहीं विशिष्ट परिणामहि झाले आहेत.

अमेरिकन कुटुंब आधींच छोटेखानी असतें. म्हणजे त्यांत फक्त आई, बाबा आणि आई—बाबांचीं मुलें, एवढेंच. फार तर क्वचित् फक्त आईचीं मुलें किंवा फक्त बाबांचींच मुलें. पण याव्यतिरिक्त आणखी कोणी नाहीं. सर्व सुखसोयींनीं सज्ज असलेल्या स्वतंत्र घरांत रहाणारें हें कुटुंब इतरांपासून अगदीं वेगळें असतें, वेगळें राहू शकतें. टेलेव्हिजन घरांत असल्यामुळें तर करमणुकीसाठींसुद्धां बाहेर जायलाच पाहिजे असेंहि नाहीं. त्यामुळें प्रत्येक कुटुंब हें इतरांच्या समुद्रानें वेढलेल्या एखाद्या बेटासारखें वाटायचें. आणखी एक गंमत अशी कीं, एकदां टेलेव्हिजनचा पडदा प्रकाशमान झाला कीं आई—बाबा आणि बाबा-लोक यांच्यांत तासन्तास भाषण नाहीं. प्रत्येकाचे स्वतंत्र संबंध कांचेच्या पडद्यावरील व्यक्तीशीं. म्हणजे या लहानशा बेटावरसुद्धां सगळ्यांची मिळून एक टोळी नाहीं; तर प्रत्येक माणूस म्हणजेच एकेक टोळी. जाहि-रात सुरू झाली कीं छोटें मध्यंतर होतें. आणि तेवढ्यांत धांवत स्वैंपाकघरांत जाऊन कांहींतरी चघळायला घेऊन येतां येतें. महत्त्वाचा कार्यक्रम असला कीं अर्थातच बाईसाहेबांना स्वैंपाक करायला वेळ नसतो. पण ही विशेष बिकट अशी समस्या नव्हे. सुपर मार्केटमध्यें 'टी. व्ही. डिनर' नांवाचा प्रकार मिळतो. एका ताटली-मध्यें एका माणसाचें एका वेळचें जेवण तयारच असतें. कोंबडीचा एक पाय, उकडलेले बटाटे, गाजराचे तुकडे, मटाराचे दाणे आणि एखादद‌ुसरा पदार्थ. हें प्रकरण थोडा वेळ शेगडींत ठेवून आणलें कीं झालें. विशेष वेळ जात नाहीं;


'टी. व्ही. डिनर'



२

आनंदांत व्यत्यय येत नाहीं. खातांखातां पहातां येतें; पहातांपहातां खातां येतें. हें ' टी. व्ही. जेवण ' म्हणजे निव्वळ कावळयाच्या अंघोळीचा प्रकार आहे असें अनेक अमेरिकन नवऱ्यांना वाटत असतें; पण बहुधा तसें बाईसाहेबांना सांगण्याची त्यांची छाती होत नाहीं. फार तर बाईसाहेबांचा राग कोंबडीच्या पायावर काढून तो काडकन् मोडावा. पण एकंदरीत अगदींच शिवरात्र, होण्यापेक्षां ही छोटी हजेरीही कांहीं वाईट नाहीं.

कांहीं उपद्व्यापी लोकांनीं असें संशोधन केलें आहे कीं, टेलेव्हिजन हें झोपेवरील रामबाण औषध होय. या लोकांनीं देशव्यापी पाहणी केली, आणि त्यांत त्यांना असें आढळलें कीं, ज्यांची मतें त्यांनीं घेतलीं त्यांपैकीं चाळीस टक्क्यांपेक्षां अधिक लोकांचें मत हें कीं, टेलेव्हिजनमुळें त्यांना उत्तम डुल्की येऊन शेवटी ब्रह्मानंदीं टाळी लागण्यास मदत होते. विशेषतः जेव्हां संगीत चालू असतें तेव्हां तर अशी कांहीं गडद झोंप लागते कीं विचारूं नका. या सगळ्यावरून बांधलेला अंदाज असा कीं, झोंप आणण्यासाठीं झोंपेच्या गोळ्या जेवढ्या उपयोगी पडत नाहींत तेवढा टेलेव्हिजन उपयोगीं पडतो. आतां या मौलिक संशोधनाला लागलेला खर्च एका टेलेव्हिजन-संघटनेनेंच दिला हें खरें; पण हा अहवाल वाचून ' हेंचि फळ काय मम तपाला ? ' म्हणून त्या लोकांनीं आपापल्या कपाळांना हात लावला असावा. पण खरें म्हणजे यांत मनाला लावून घेण्यासारखे काय आहे ? दुपारचें जेवण झाल्यानंतर पलंगावर पडल्यापडल्या वर्तमानपत्र वाचीत असतांना चिनी आक्रमणाची समस्या डोक्यावर घेऊन आपणही झोंपीं जात नाहीं काय ? आणि अशा वेळीं ज्या ' सूज्ञ जनतेचें ' या गंभीर समस्येकडे संपादकमहाशय लक्ष वेधूं इच्छीत असतात त्यांना आपल्या जळजळीत अग्रलेखाची संभावना ही जनता कशी करते हें वाचून काय वाटावें बरें ?

पण टेलेव्हिजन ही माणसाला झोंपेनें घेरून टाकणारी शक्ति आहे, त्याचप्रमाणें त्याला झोंपेतून जागें करण्याचें—एवढेंच काय, त्याला एखाद्या कळसूत्री बाहुलीप्रमाणें नाचायला लावण्याचें सामर्थ्यहि त्याच्यांत आहे. गेल्या वर्षीं दोन लाखाच्यावर प्रचंड संख्येनें नीग्रो लोकांनीं वॉशिंग्टनला जो मोर्चा काढला होता तो सगळाच कार्यक्रम मीं टेलेव्हिजनवर पाहिला. त्यांत खडबडून जाग्या झालेल्या साऱ्या अमेरिकन नीग्रो जनतेचें प्रभावी दर्शन मला झालें. रे०

मार्टिन ल्युथर किंग यांचें सागरासारखे गंभीर, पण झंझावातासारखें सामर्थ्यवान् वक्तृत्व मीं ऐकलें, मेहेलिया जॅक्सन् या नीग्रो गायिकेचें विद्युत्प्रवाहानें अंग-अंग पेटवीत नेणारें गीत ऐकलें, आणि हजारों मैलांवरच्या माणसाला दिव्य दृष्टीनें त्या अनुभवांत प्रत्यक्ष सामील करून टाकणाऱ्या टेलेव्हिजनच्या शक्तीनें मी थक्क होऊन गेलों. अनेक पुस्तकें, लेख वाचून मला जें समजलें नव्हतें त्याचा साक्षात्कार मला त्या दिवशीं टेलेव्हिजनसमोर बसून झाला. असेंच मला प्रेसिडेंट केनेडींचें क्यूबाच्या वेळीं गंभीर पण निश्चयी स्वरांत केलेलें भाषण आठवतें. आणखी खूप कार्यक्रम आठवतात. मेरेडिथ या नीग्रो विद्यार्थ्यानें मिसिसिपीमधल्या कॉलेजांत दोनशें सैनिकांच्या कडेकोट बंदोबस्तांत प्रवेश केला तें आठवतें. आणि वाटतें कीं, टेलेव्हिजनच्या रचनात्मक ( आणि विध्वंसकसुद्धां) शक्तीला तोड नाहीं.

पण या शक्तीचा उपयोग अशा प्रकारें फार क्वचितच केला जातो. टेलेव्हिजनच्या लोकांना या कार्यांत स्वारस्य नाहीं. कारण जाहिरातदारांना— म्हणजेच त्यांच्या अन्नदात्यांना त्यांत स्वारस्य नाहीं. लोकांनीं कुठली सिगरेट ओढावी, कुठल्या ब्रँडची बीअर प्यावी, कुठली टूथपेस्ट वापरून दांत ' शुभ्र आणि चमकदार ' ठेवावेत याचें त्यांना खरें महत्त्व. आणि कोट्यवधि डॉलर्स ओतून ते श्रोत्यांना आपलाच माल सर्वश्रेष्ठ कसा हें कानींकपाळीं ओरडून सांगत असतात. जाहिरातदारांचा हा सल्ला पहिल्यांदां कानांवर आणि नंतर मनावर ठसतो. आणि प्रत्यक्ष सुपर मार्केटात गेल्यावर जो मतामतांचा गलबला दिसतो त्यांतून ' योग्य ' वस्तूकडे जाण्याची वाट शोधणें अवघड पडत नाहीं.

टेलेव्हिजनवरच्या जाहिरातींत आणखी सुधारणा होत आहेत. रंगांची दुनिया टेलेव्हिजनवर अवतरली आहे. आणि एक उलटी सुधारणा अशीहि झाली आहे कीं, जाहिराती ऐकायचा कंटाळा आला तर त्या चालू असतात तोंपर्यंत ऐकूं येणार नाहींत अशीहि व्यवस्था करतां येते. फक्त एक बटन दाबलें कीं झालें. व्हॅन्स पॅकार्ड या गाजलेल्या लेखकानें असें भाकित केलें आहे कीं, ही बटनांची किमया टेलेव्हिजनवर यापुढें अतिशय वाढणार. म्हणजे जाहिरातींतला माणूस सांगणार, " पाहिलांत ना तो व्हॅक्यूम् क्लीनर ? आहे ना पसंत ? आतां ' सी ' हें बटन दाबा. व्हॅक्यूम् क्लीनर तुमच्या घरांतच येऊन पडेल.

बिलाची घाई नाहीं बाईसाहेब. बिल मागाहून पोस्टानें येईल. सावकाश घ्या." अशींच प्रत्येक गोष्टीकरतां बटनें असतील आणि केबलच्या साहाय्यानें प्रत्येक घरांत त्या त्या वस्तू देण्याची सोय होईल. याला म्हणतात 'बटन दाबलें—कीं—स्वर्ग—योजना.'

या अजब शोधाबिषयीं जेव्हां निरनिराळ्या विक्रेत्यांना सांगितलें तेव्हां त्यांनीं साहजिकच कपाळाला हात लावला. एकानें सांगितलें, "त्या संशोधकांना म्हणावं कीं तुम्ही स्वतःला गळफांस लावून घ्या आणि मरा! दोरीचा खर्च मी आनंदानं देईन." पण एका छोट्याला जेव्हां ही कल्पना सांगितली तेव्हां त्यानें आनंदानें टुणकन् उडी मारली आणि तो म्हणाला, "वेस्ट! काय टॉप मजा येईल! मग मी सगळीच्या सगळीं बटनं दावीन. बाबांकरत एक नवी गाडी मागवीन, आईकरतां नवा कोरा व्हॅक्यूम् क्लीनर. आणि माझ्याकरतां अर्थातच टकाक टकाक चालणारे घोडोबा!"

सातासमुद्रापलिकडे उखाण्यांतून राज्य करणाऱ्या राजेलोकांच्या गोष्टी असतात, आणि राज्यकारभार करण्याऐवजीं भात शिजवणें, पोळ्या लाटणें इत्यादि मुदपाकखान्यांतील पौष्टिक उद्योगांत ते गढलेले असतात. या उखाण्यांतल्या राजेसाहेबांच्या बागेंत एक मजेदार झाड असतें आणि त्यावर जीं फळें उगवतात त्यांत बाहेर फळ असतें आणि आंत टरफल असतें. शिवाय टरफलाच्या आंतहि एक फळ असतेंच. सातासमुद्रापलिकडच्या अमेरिकन जगांतहि टेलेव्हिजनचें असेंच वेगळें जग आहे. या जगांत डबींच भरलेलें हास्य ( Canned laughter ) नांवाची अजब चीज मिळते. प्रेक्षकांच्या अनुपस्थितींत जेव्हां टेलेव्हिजनच्या कार्यक्रमाचें चित्रीकरण करतात, तेव्हां या डबीचीं झांकणें उघडतात आणि त्यांत भरलेलें हास्य, कोयरीच्या फळांतून म्हाताऱ्या हवेंत उडाव्या त्याप्रमाणें भुरु भुरु बाहेर येतें आणि सगळीकडे हास्याची खसखस पिकते. पण जेव्हां प्रेक्षक समोर असतात आणि त्यांच्यासमोर जॅक बेनी किंवा डॅनी के यांच्यासारख्या कलावंतांचें कार्यक्रम चालू असतात, तेव्हां असल्या कृत्रिम हास्याची गरजच पडत नाहीं. या हास्यकारांच्या कोट्या आणि किस्से ऐकून खरेखुरे, तुमच्या आमच्यासारखे लोक सारखे हंसत असतात आणि या हास्याचे प्रतिध्वनि अमेरिकेंतल्या घरांघरांतून उमटत असतात. हें चालू असतांनाच मग डॅनी

थांबतो, दमूनभागून एका छोट्या स्टुलावर बसतो आणि म्हणतो, —

" मी तुम्हांला एक मजेदार गोष्ट सांगतों... "

मग हजारों, लाखों सामान्य लोकांच्या डोळ्यांत हास्य आणि कारुण्य यांचीं इंद्रधनुष्यें उमटविणारा हा श्रेष्ठ कलावंत अशा गोष्टी असतो सांगत असतो आणि सारी अमेरिका या गोष्टी एकचित्तानें ऐकत असते.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम .................. दि: ......................
क्रमांक ........................ नों: दि: ..................

# ३ : नोकरी : एक अनुभव

" नोकरी पाहिजे ना तुम्हांला ? हॅत्तिच्या. त्यांत काय अवघड आहे ? अहो, इथें नोकऱ्याच नोकऱ्या. "

" छेः छेः उगाच काय थापा मारतां राव ! इतक्या नोकऱ्या अमेरिकेंत आहेत म्हणतां ? "

" तुम्हीं पुण्याचे असाल बहुधा. तुम्हांला नाहीं खरं वाटायचं. पण मला सांगा आणि मी तुम्हांला दाखवितों किती सहजासहजीं नोकऱ्या मिळतात तें. " असें म्हणून आमच्या ओळखीच्या त्या गृहस्थानें वर्तमानपत्राचा त्या दिवशींचा अंक माझ्यापुढें टाकला.

" पहा. हव्या तेवढ्या नोकऱ्या आहेत तुम्हांला त्यांत. "

आणि ' पाहिजेत 'ची पहिली जाहिरात मी पाहिली. जाहिरात अशी होती–

" दारोदार हिंडून मालाचा बटवडा करण्याठीं माणूस पाहिजे. काम करण्यास तयार, संभाषण–कुशल, आकर्षक व्यक्तिमत्व असलेल्यांनीं भेटावे. मेहरबानी करून फोन करूं नये. योग्य माणसाला योग्य पगार. मोटार. "

" झालं. म्हणजे तुम्हांला ही नोकरी उपयोगी नाहीं. "

" कां बुवा ? यांतलं काय माझ्याजवळ कमी आहे ? मी काम करण्यास तयार आहे. संभाषण-कुशल आहे, तसं म्हटलं तर व्यक्तिमत्वही ... "

" अहो, ते ठीक आहे. पण मोटारीचें काय ? "

" मोटारीचें काय ? मला मोटार हवीच आहे. दारोदार हिंडायला मला मोटार

नको ?"

"तसं नाहीं मेहेरबान. 'मोटार', याचा अर्थ तुमची स्वतःची मोटार पाहिजे. आणि ती तुम्ही कंपनीच्या कामासाठीं वापरली पाहिजे."

"वा वा ! शहाणाच दिसतो की हा कंपनीवाला. म्हंजे माझी स्वःतची मोटार असती तर दारोदार हिंडून गिऱ्हाइकांसमोर तोंड वेंगाडायचं काम मी कशाला केलं असत ?"

"राहिलं. ही नोकरी तुमच्याकरतां नाहीं."

ही नोकरी मी शोधली नाहीं. पण मोटार या शब्दानें मला नंतर फसवलें नाही.

'कपबशा विसळावयास माणूस पाहिजे. दररोज आठ तास. ताशीं ७॥ रुपये. न्याहारी, जेवण, सुट्ट्या, विमा, मोटार'

'मुलांना संभाळायला विश्वासू व्यक्ति पाहिजे. पुरुष चालेल. ताशीं ६। रुपये. फक्त चहा. शिफारसपत्रांसह लिहावें. मोटार.'

आता कपबशा विसळायला माझी तयारी होती. अर्थात् त्या पुरेशा मजबूत नसत्या तर माझी नोकरीही विशेष टिकावू ठरली नसती हें वेगळें. पण माझी तयारी होती. मी मुलांनाही संभाळलें असतें. कदाचित् कोणाचें शिफारसपत्रही मिळविलें असतें. निदान 'हे गृहस्थ मुलांना बऱ्यापैकीं संभाळतात, गोष्टीही ते ठीकपैकीं सांगू शकतात' असें शिफारसपत्र माझ्या मुलानें तरी मला नक्कीच पाठविलें असतें. पण मोटारीचे काय करायचें ? मी या जाहिरातीविषयीं जास्त विचार करूं लागलों. तेव्हां मला संशय आला कीं, 'मोटार' या मोघम शब्दाचा अर्थ ज्याप्रमाणें 'तुमची मोटार पाहिजे' असा होतो त्याचप्रमाणें 'न्याहारी' जेवण, सुट्ट्या, विमा, यांचा अर्थ 'न्याहारी, जेवण, सुट्ट्या मिळणार नाहींत. बिमा तुमचा तुम्ही उतरवला पाहिजे' असा असू शकेल. आतां विम्याचें एक वेळ ठीक होतें. कारण नाहींतर मी फोडलेल्या कपबशांची नुकसानभरपाई कोणी केली असती ?

या मोटारप्रकरणाचें आतां मला मुळींच महत्त्व वाटेनासें झालें आहे. कारण मोटारशिवाय मुळीं इथें कोणी हलायलाच तयार नसतो. आमचे गवळीबुवा सकाळीं मोटारनें दूध द्यायला येतात. आमचे पोस्टमनसाहेब आमच्या घरासमोर आपली स्वतःची मोटार उभी करतात आणि नंतर पेटींतलीं पत्रें वाटायला

सुरुवात करतात. आमच्या शेजारचे न्हावीदादा दररोज सकाळीं आपल्या कोऱ्या करकरीत मोटारींतून फिरायला बाहेर पडतात. आमच्या शेजारीं बांधल्या जात असलेल्या नव्या इमारतींत काम करणाऱ्या गवंडीदादाची बायको संध्याकाळीं काम संपायच्या वेळीं त्याला घरीं नेण्यासाठीं मोटार घेऊन हजर असते...

सारांश काय, मजजवळ मोटार नाहीं या क्षुल्लक कारणामुळें जवळ जवळ कुठलीच नोकरी मला मिळणें शक्य नव्हतें.

" त्यापेक्षां असं कां नाहीं करत तुम्हीं ? विद्यार्थ्यांना नोकऱ्या देण्यासाठीं तो एंप्लॉयमेंट ब्यूरो आहे तिथें मारून या कीं चक्कर ! "

माझ्या सल्लागारानें मला एके दिवशी सांगितलें. मी तिकडे चक्कर मारली. पण तिथल्या जाहिराती वाचून मला जवळजवळ घेरीच आली. एक जाहिरात अशी होती—

' वैद्यकीय संशोधनासाठीं पाहिजेत. पोटांतील द्रवपदार्थांवर संशोधन करावयाचें आहे. उमेदवाराला एकदम पोट भरेल एवढा चव नसलेला पदार्थ गिळावा लागेल. ज्यांना कुठल्याही वस्तूंची शिसारी येत असेल अशांनीं अर्ज करूं नये. ज्या दिवशीं तुमचा हा गिळण्याचा कार्यक्रम असेल त्या दिवशीं तुम्हांला उपाशी रहावें लागेल. प्रयोग सकाळीं ८॥ ला सुरूं होतो अणि दीड तास चालतो. आठवड्यांतून हा प्रयोग जास्तींत जास्त एकदां करतां येईल. '

मला नोकरी हवी होती हें खरें. पण ती मिळविण्याची एवढी घाई नव्हती. लहानपणीं एकदां मी एक पैसा गिळला होता तेव्हांपासून निदान ज्यांची चव माहिती नाहीं अशा वस्तू एकदम पोट भरेल इतक्या गिळण्याची मला संवय नव्हती.

नंतर दुसरी जाहिरात :

' मोहिनीविद्येचे शारीरिक आणि मानसिक परिणाम तपासण्यासाठीं विद्यार्थी पाहिजेत. वय निदान १८ वर्षांचे पाहिजे. मातृभाषा इंग्रजी असावी. या प्रयोगाला एक किंवा दोन तास लागतात. प्रयोग एकदांच करण्यांत येईल. '

सुदैवानें माझी मातृभाषा इंग्रजी नसल्यामुळें ही नोकरी मला मुळींच मोहिनी घालूं शकली नाहीं. आणि त्यामुळें या विद्येचे माझ्यावर काय परिणाम झाले असते याची कल्पना करणें कठीण आहे. पण निदान त्या डॉक्टरच्या ऑफिसां-

तल्या एखाद्या मोहिनीला माझ्या खिशांतलें पैशाचें पाकिट काढून घेतां आलें असतें त्यापासून मी बचावलो हें काही कमी नाहीं.

" मी तुम्हाला आणखी एक युक्ति सांगतो. " माझ्यापेक्षां सहा महिने अगोदर अमेरिकेंत आल्यामुळें आमच्या ज्या सल्लागारांना आपल्याला अमेरिका ' कळली ' आहे असा आत्मविश्वास वाटत होता ते मला एके दिवशीं म्हणाले.

" बोला " मी अत्यंत भाबडा चेहरा करून म्हटलें.

" माझं ऐकायचं असलं तर तुम्हीं नोकरीच करूं नका " सल्लागारांनीं सांगितलें.

" ही युक्ति तुम्हीं मला अगोदर सांगितली असती तर फार बरें झालें असतें. पण हा तुमचा सल्ला मी अगोदरच अंमलांत आणला आहे साहेब. "

" नाहीं म्हणजे नोकरी करूं नका याचा अर्थ कांहींच करूं नका असा नाहीं. नोकरीपेक्षां तुम्ही ' बिजनेस ' कां करून पाहात नाहीं...? "

" कसला करूं या बरं. हां, बहुधा मोटारींचा बिजनेस फायदेशीर होईल नाहीं कां ? कीं पापडाचाच करूं ? मागें मी वाचलं होतं कीं अमेरिकन लोकांना पापड ' भयंकर ' आवडतात. काय पापडांची ' आयडिया ' कशी वाटते तुम्हाला ? "

" थट्टा राहूं द्या. तुम्हांला अगदीं ' सीरिअसली ' सांगतोय. बिजनेस-शिवाय दुसरा उपाय नाहीं हें खरंच. पण मोटारी आणि पापड हें कांहीं खरं नाहीं... माझ्या अनुभवावरून जर सांगायचं तर तुम्हाला दुसरं एक सुचवेन. मी म्हणतों तुम्हीं आपल्या इंडियन साड्या कां नाहीं विकून पहात ? म्हंजे मी हे वहिनींना उद्देशून म्हणतो आहे हो. "

हा बायकी सल्ला मला उद्देशून नसल्यामुळें मी गप्प बसलों.

" तुम्हाला मूर्खपणाचं वाटेल पण हेंच किती ' लॉजिकल ' आहे हें मी तुम्हाला पटवून देऊं शकेन. आतां तुम्हाला माहीत आहे कीं मिसेस केनेडी गेल्या वर्षीं आपल्याकडे जाऊन आल्या. मिसेस केनेडींनीं तिकडून साड्या आणल्या. आणि मिसेस केनेडी इथें फारच लोकप्रिय आहेत. "

" थोडक्यांत म्हणजे त्यामुळें इथें आपल्या साड्या अतिशय लोकप्रिय ठरण्याचा संभव आहे. अन् दुसरी गंमत सांगतों तुम्हाला. या अमेरिकन

लोकांना अक्कल त्या मानानें कमीच असते. तुम्हीं साड्या घेऊन तर जा आणि पहा अक्षरशः त्यांवर तुटून पडतात कीं नाहीं तें. "

वहिनींना ही कल्पना इतकी आवडली की त्यामुळें सल्लागारसाहेबांना फक्कडसा चहा मिळाला. आणि दुसऱ्या दिवशीं संध्याकाळीं वहिनीसाहेब आपल्या भारतीय साड्या घेऊन बाहेर पडल्या. घराच्या आसपासचे कांहीं भाग 'कव्हर' करायचें त्यांनीं ठरविलें.

एका अमेरिकन बाईला त्या साड्या इतक्या आवडल्या, इतक्या आवडल्या कीं तिला होत्या तेवढ्या सगळ्या देऊन शिवाय विमानानें आणखी कांहीं मागवाव्या लागतील असें वाटलें. अडचण होती फक्त पैशांची. म्हणजे साड्या चांगल्या होत्या, तिला त्या आवडल्या होत्या पण किंमतीचा प्रश्न आहे ना? "आतां सौ. केनेडींना परवडलें. नवरा अमेरिकेचा अध्यक्ष आहे. सॉरी. मी परत कधींतरी पाहीन. आणि घेतली तर तुमच्याकडूनच नक्की."

दुसऱ्या एका बाईला जेव्हां कळलें कीं ही बाई आपल्याला कांहींतरी विकायला आली आहे तेव्हां ती इतकी घाबरली कीं आपल्याकडे पाहुणे यायचे आहेत याची तिला ताबडतोब आठवण झाली. "थांबणें अशक्य आहे. माफ करा..." म्हणून ती तरातरा घरांत निघून गेली. जातांना परत एकदां "साड्या फार सुंदर आहेत" असें बजावावयाला मात्र ती विसरली नाहीं.

तिसरें 'गिऱ्हाईक' बागकाम करण्यांत इतकें गढलेलें होतें कीं, त्याला 'मला साड्या नकोत' असें सांगायलाही बराच वेळ लागला. विक्रीचा सर्व माल जागच्या जागीं येऊन पडला आणि बिजनेस पहिल्याच दिवशीं थंडावला हें कळून चुकलें.

"तुम्हीं एक चूक केलीत वहिनी." दुसऱ्या दिवशीं सल्लागार म्हणाले.

"काय बाई? मी कसली चूक केली? सगळ्यांना मी सांगितलं कीं मिसेस केनेडीला आमच्या साड्या आवडल्या म्हणून! तुम्हींच नव्हता कां म्हणालांत?"

"काय म्हणतां? तुम्हीं हें सांगितलंत? आणि त्या रीजंट स्ट्रीटवर? मग आटोपलाच कीं हो कारभार!"

"इतकी भयंकर गोष्ट काय झाली त्यांत?"

"अहो, भयंकर म्हणजे काय विचारतां? त्या रस्त्यावरचे सगळे लोक

रिपब्लिकन् आहेत. सौ. केनेडी डेमोक्रॅटिक प्रेसिडेंटची बायको. कशा खपाव्या तुमच्या साड्या तिथें ? अं...''

यावर वहिनी कांहीं बोलल्या नाहींत. त्यांनीं कपाळाला हात लावला.

बिजनेस करून पैसे मिळवायची कल्पना मी केव्हांच सोडून दिली होती. शिवाय ' धंदा कधींहि करूं नका, उपाशी राहिलांत तरी चालेल. पण धंद्याला हात घातलात तर साफ बुडाल. ' असें मला एका ज्योतिषानें प्रेमळपणें बजावलें असल्यामुळें माझ्या मराठी मनाला धंद्याची भीति होतीच. पण ' वहिनीं 'च्या डोक्यांत धंदा नाहीं तरी निदान नोकरी करायलाच पाहिजे ही कल्पना अगदीं घट्ट बसली. आपल्या अनुभवी सल्लागाराला तिनें सारखा सल्ला विचारला. आणि तोहि बिचारा सारखा सल्ला देत राहिला.

दुसऱ्याच दिवशीं हिनें एक जाहिरात पाहिली. कुठल्याशा लॅबोरेटरींत ' डिश वॉशिंग 'ची नोकरी होती. यांत कांहीं विशेष नव्हतें. कारण कपबशा विसळणें एवढाच इथें ' डिश वॉशिंग 'चा अर्थ होत नाहीं. प्रयोगशाळेंतल्या बाटल्या स्वच्छ करणे हेंही त्यांतच येतें. या नोकरींबिषयीं हिला इतकी खात्री होती कीं आपल्या मैत्रिणीच्या गाडींतून ती ताबडतोब प्रयोगशाळेंत गेली.

" डिश वॉशिंग तुम्हीं कराल हें ठीक आहे. पण आणखीहि एक काम तुम्हाला करावं लागेल ! ''

" टायपिंग वगैरे असलं तर नक्कीच करीन मी. मला छान टायपिंग येतें. ''

" काम दुसरंच आहे. ते उंदीर पाहिलेत त्या पिंजऱ्यांत ठेवले आहेत ते ?''

भयभीत नजरेनें बायकोनें पाहिलें. आणि पिंजऱ्यांतले उंदीर पिंजऱ्यांतच हें त्यांतल्या त्यांत सुदैव. आहेत याबद्दल तिला बिलक्षण समाधान वाटलें. ते उंदीर पांढरे होते.

" तर काम असं कीं त्या उंदरांना तुम्हाला निम्मा वेळ इंजेक्शनस् द्यावीं लागतील ! ''

ही नुसती कल्पनाच कोणत्याहि धीट स्त्रीला किंचाळून पळून जायला पुरेशी होती. पण नोकरी एकदम नाकारल्यासारखें होऊं नये म्हणून हिनें विचारलें,

" अहो, इंजेक्शन्स द्यायची हें ठीक आहे. पण कशी द्यायची ?

" कशी म्हणजे ? सोपं आहे. उंदराला एका हातानं पकडायचं. दुसऱ्या

हातानें इंजेक्शन् द्यायचं. संपलं. एक झाला कीं दुसरा!"

" पण एका हातानं धरल्यावर चावत नाहींत कां हो ते? मला बाई भयंकर भीति वाटते त्यांची.

" चावतात कां म्हणजे काय! चावायचेच. उंदीरच आहेत ते बोलून चालून! पण तुम्हाला भ्यायचं कारण नाहीं."

" हें अजबच आहे. चक्क तुम्हीं सांगतां चावतात म्हणून आणि शिवाय म्हणतां भ्यायचं कारण नाहीं."

" बरोबर आहे मी म्हणतों तें. कारण त्यांच्या चावण्याचा तुमच्यावर कांहीं परिणाम होऊं नये म्हणून तुम्हालाच अगोदर आम्ही एक इंजेक्शन देऊं. मग चावेनात कां कितीहि."

एवढें संभाषण झाल्यावर त्या माणसानें वर पाहिलें. तेव्हां नवीन उमेदवार म्हणून आलेली इंडियन बाई त्याला तिथें दिसली नाहीं. तिनें धांवत जाऊन केव्हांच आपल्या मैत्रिणीची मोटार गांठली होती.

यावेळी हिनें आमच्या सल्लागारसाहेबांना विचारलें नाहीं. पण जर विचारलें असतें तर ते नक्कीच म्हणाले असते. " तुम्हीं फक्त एकच चूक केलीत. तुम्हीं विचारायला हवं होतं कीं मी कामाला येतांना माझ्या संरक्षणासाठीं एखादं मांजर बरोबर घेऊन आलें तर चालेल कां?" पण हें कांहीं जमलें असतें असे मला वाटत नाहीं. कारण उंदरांना स्वतःच इंजेक्शन्स द्यायचा हट्ट त्या माऊनें धरला असता आणि उंदरांवर याचा मानसिक आणि शारीरिक परिणाम चांगला झाला असता कीं नाहीं याविषयीं मला शंकाच होती.

उंदराच्या भीतीमुळें हिच्या मनांत निर्माण झालेली नोकरीची भीति, मला वाटत होती. तितके दिवस टिकली नाहीं.

थोड्याच दिवसांत हिनें माझ्यापुढें वर्तमानपत्राचा एक अंक टाकला.

" ही कशी काय वाटते तुम्हाला नोकरी? आपल्या जवळच्या हॉस्पिटलमध्यें आहे. कामहि अवघड दिसत नाहीं. त्यांच्या जेवणघरांत कामाला मुली हव्या आहेत."

" छान आहे. प्रयत्न करायला कांहीं हरकत नाहीं. पण त्यांच्या जेवणघरांतहि तुझी डाळ शिजेल अशी फारशी अपेक्षा बाळगूं नकोस."

उमेदवार बाई नव्या उत्साहानें हॉस्पिटलमध्यें गेल्या. सुदैवानें मुलाखत देण्याच्या बाबतींत त्यांचा फारसा निरुत्साह झाला नाहीं. पण पहिलाच प्रश्न ऐकून त्यांचा उत्साह मावळला.

" तुमची उंची काय ? " पहिला प्रश्न.

" पांच फूट दीड इंच. " उत्तर.

" च्...च्...च्... माफ करा बरं कां. तुमचा या नोकरीसाठीं कांहीं उपयोग नाहीं. मला फारच वाईट वाटतें. "

" का बाई ! माझ्या उंचीचा या नोकरीशीं संबंध काय ? "

" त्याचं असं आहे कीं आम्हांला कमींत कमी पांच फूट चार इंच उंचीच्या मुली हव्या आहेत. "

" ते कळलं. पण कां ? "

" रोग्यांना द्यायच्या जेवणाच्या गाड्या ढकलायला आम्हांला याच उंचीच्या मुली लागतात. "

" अहो, पण मी चांगली धडधाकट आहे कीं. मीं सहज करूं शकेन तें काम. "

" सॉरी. त्याचा कांहीं उपयोग नाहीं. आम्हांला पांच फूट चार इंच उंचीच्याच मुली हव्या आहेत. "

" बरं. पण दुसरी आहे कां एखादी नोकरी ? डिश वॉशिंग वगैरे. मला चालेल. "

" मला हें सांगायला फारच वाईट वाटतं. पण सगळ्या जागा अगोदरच भरल्या आहेत. नाहींतर..."

" मग निदान माझं नांव, पत्ता एवढं तरी ठेवतां कां ? कधीं झालीच एखादी जागा रिकामी, तर कळवा मेहेरबानी करून. "

" जरूर. जरूर. कां नाहीं ? तुमचं नांव आणि पत्ता लिहून घ्यायला मला फारच आनंद होईल. आणि असं करा, तेवढा टेलिफोन नंबरहि देऊन ठेवा बरं कां तुमचा ! "

" थँक्स हं, मनापासून अगदीं. "

या नोकरीबद्दल हिला समजावून सांगतांना मला फारसें कठिण गेलें नाहीं.

" प्रत्येक नोकरींत उंचीचा आग्रह या लोकांनीं धरावा यांत त्यांचा राग यायचें तसें कारण नव्हतें. आतां आपल्याकडे आलेले अमेरिकेचे राजदूत गालब्रेथ यांची उंची काय होती माहीत आहे कां ?...सहा फूट आठ इंच ! यामानानें तुला किती कमी उंची लागत होती ही नोकरी मिळवायला ? "

या अनुभवावरून नोकरीच्या महत्त्वाप्रमाणें उमेदवाराची उंची असण्याचें महत्त्व माझ्या लक्षांत आलें. उमेदवारांच्या उंचीचा मुळींच विचार न करतां त्याला मंत्रिपद दिल्यामुळें आपल्याकडे राज्यकारभाराचा जो खेळखंडोबा चालला आहे, तो हा नियम नेहरूंनीं पाळला असता तर ते नक्कीच टाळूं शकले असते.

असो. पण आपल्या राज्यकारभारापेक्षांहि अधिक महत्त्वाचा प्रश्न हिच्या-पुढें होता. तो म्हणजे नोकरी मिळविणें. आणि तशी संधि आमच्या अंदा-जाच्या मानानें फारच लवकर चालून आली.

एक कुठलेसें ऑफिस होतें. तरुण मुलींना शिक्षणासाठीं पैसे मिळवायला उत्तेजन द्यायचें, हें त्यांचें ब्रीदवाक्य. याकरितां फारसा त्रास घ्यायचीही आवश्यकता नव्हती. फक्त मिस्टर जॅक विल्यम्स याला फोन करायचा आणि आपली माहिती सांगायची. त्यानें कामाला सुरुवात करा म्हटलें कीं काम सुरूं करायचें.

त्या दिवशीं दुपारीं जॅक विल्यम्सच्या टेबलवरच्या फोनची घंटा वाजायला लागली.

" हाय्. मी जॅक विल्यम्स बोलतों आहे. "

" गुड मॉर्निंग मिस्टर जॅक. मी तुमची जाहिरात वाचली सकाळीं. अठरा वर्षांवरच्या मुली पाहिजेत असं तुम्हीं लिहिलं आहे. मी अठरापेक्षां जास्त आहे. मला नोकरी पाहिजे आहे. "

" तुम्हीं अठरापेक्षां वयानें जास्त आहांत ? वाः फार आनंदाची गोष्ट आहे. मग सांगा पाहूं तुमचं नांव, पत्ता आणि वयसुद्धां. तें तर फारच महत्त्वाचं आहे. "

उमेदवारानें नांव, पत्ता, वय हीं सर्व माहिती सांगितली.

" अं, काय म्हणालांत ? वय वर्षें ३० ? अरेरे, म्हणजे सगळंच मुसळ केरांत.

वय वर्षं ३०. अरेरे...च्...च्..."

"अहो, पण असं काय करतां मिस्टर विल्यम्स ? तुम्हींच जाहिरातींत लिहिलं आहेत ना अठरा वर्षांवरच्या मुली हव्या म्हणून. तीस हें वय अठराच्या वरचें नाहीं असें तुमचें मत आहे काय ?" उमेदवाराचा धीर सुटत चालला होता.

"तसं नाहीं, पण गंमत अशी आहे कीं आम्हांला अठराच्या वरच्या आणि सत्तावीसच्या आंतल्या मुली हव्या आहेत. आमची पॉलिसीच मुळीं तशी आहे."

"यांत गंमत आहे असं तुम्हाला वाटत असलं मिस्टर विल्यम्स, तरी मला मुळींच वाटत नाहीं."

यावर विल्यम्सला आणखी कांहींतरी बोलायचे होते. पण दुसऱ्या टोकाला एकदम टेलिफोन बंद केला गेल्याचा आवाज झाला, आणि आपली 'पॉलिसी' समजावून सांगायचें काम शेवटीं विल्यम्सला जमलेंच नाहीं.

पण विल्यम्सनें नोकरी दिली नाहीं म्हणून काय झालें ? अशा लहान सहान अपयशामुळें आमचा उमेदवार मुळीच डरणार नव्हता. उलट त्यामुळें हिचा महाराष्ट्रीय बाणा अधिकच जागृत झाला. आणि नोकरी मिळवायला गनिमी कावा उपयोगी पडला नाहीं तरी सरळ सरळ हल्ला चढविल्यावर शत्रू नक्की शरण येईल असें हिला वाटलें. ताबडतोब इथल्या उद्योगशाळेंत तिनें आपलें नांव घातलें. आणि सहा आठवड्यांचा 'सेल्स गर्ल'चा कोर्स पुरा केला. सातव्या आठवड्यांत तिनें विक्रेत्या मुलीचे सर्टिफिकेट काबीज केलें. आतां नोकरी न देऊन कसें चालेल ? "कसें नाहीं म्हणतात तेंच पहाते ना आतां मी !"

आणि त्या दिवशीं बाईसाहेब टॅक्सी करून नोकरीच्या शोधार्थ बाहेर पडल्या.

ही त्या दिवशीं गेली त्या त्या सर्व ठिकाणीं विक्रेत्या मुलीचें काम करण्यासाठीं जागा होत्या. हिनें चौकशी केल्याबद्दल प्रत्येक दुकानांतल्या मॅनेजरसाहेबांना फारच आनंद झाला होता. "वा व्वा ! तुमच्याजवळ डिप्लोमाहि आहे म्हणतां ? वंडरफुल." या गरजू भारतीय विद्यार्थिनीला मदत करायची प्रत्येकाची

विलक्षण इच्छा होती. नव्हे जवळजवळ तशी तळमळच प्रत्येकाला लागल्याचे त्याच्या चेहेऱ्यावरून स्पष्ट दिसत होतें. पण इतकें सगळें असूनहि नेहमीप्रमाणें खेदाची एकच गोष्ट होती. जागा रिकाम्या असल्या तरी त्या तावडतोब भरण्याचा कोणाचाच मानस नव्हता. म्हंजे काय होतं, प्रत्येकाला एक 'वेटिंग लिस्ट' करायची होती. आणि ही यादी एकदां तयार झाली म्हणजे मगच ते कुणाला घ्यायचें याचा विचार करणार होते.

त्या दिवशीं सर्व ठिकाणीं नांव, पत्ता, टेलिफोन नंबर इ. सर्व माहिती देऊन उमेदवार परत आला.—आणि मी टॅक्सीच्या भाड्याचें पांच डॉलर्स लिहिण्यासाठीं अक्कलखात्याचें नवें पान उघडलें.

आडवळणानें 'नाहीं' सांगण्याच्या या सौजन्याच्या मला आता संताप येऊं लागला होता. त्यापेक्षां 'नोकरी नाहीं. रस्ता सुधारा' असें उद्धट उत्तर कोणी दिलें असतें तर तें नेहमींपेक्षा वेगळें आणि चांगलें वाटलें असतें. 'आहे, नाहीं म्हटलं तरी भांडवलशाहीचं पाणी आहे.' असें धन्योद्‌गारच आमच्या तोंडून बाहेर पडले असते. पण पंचाईत अशी कीं सौजन्य हेंच मुळीं इथल्या लोकांचें एक भांडवल असतें.

यापुढें नोकरीच्या फंदांत म्हणून पडायचें नाहीं, असें आम्हीं त्या दिवशींच एकमतानें ठरविलें.

नंतर एके दिवशीं आम्हीं शिकागोला गेलों.

"काय असेल तें असो बुवा. पण या अमेरिकेंत बेकार रहाणें ही फार कठिण गोष्ट आहे." आमचे शिकागोचे मित्र म्हणाले.

"एकंदर अमेरिकेविषयीं आम्हांला कांहीं माहिती नाहीं. पण मॅडिसनला निदान दोन व्यक्ति आज कितीतरी दिवस बेकार आहेत असें मला खात्रीनें माहीत आहे."

"छेः छेः शक्यच नाहीं ही गोष्ट. इथें नोकरी मिळणार नाहीं ही गोष्ट आपल्याला पटत नाहीं. अन् यांचं एकवेळ राहूं द्या. पण मिसेस् गाडगीळ, तुम्हांला नोकरी मिळणं हा हातचा मळ आहे."

आम्हीं कांहींच बोललों नाहीं. फक्त हतबुद्ध नजरेनें आमच्या मित्राकडे पाहिलें.

“ अहो काय सांगूं तुम्हांला ? शिकागोला जर कोणी साडी नेसलेली भारतीय स्त्री दिसली तर इथले लोक अक्षरशः आग्रह करून तिला नोकरी घ्यायला लावतात. ”

हें म्हणणें खोडून काढण्याचा प्रयत्न करण्याचेंही माझ्या लक्षांत राहिलें नाहीं. मला एक वेगळाच संवाद ऐकूं येत होता.

मालक : ( ‘ मार्शल फील्डस् ’या शिकागोतल्या प्रचंड दुकानाचा मालक —दीनवाणेपणानें ) बाईसाहेब.

बाईसाहेब : ( नुसतेंच ‘ हूं ’ म्हणतात. पण लक्ष देत नाहींत. )

मालक : ( अधिकच दीनवाणेपणानें ) बाईसाहेब, कृपा करून माझी एक विनंति ऐकाल कां ?

बाईसाहेब : कां रे बाबा, उगाच कटकट लावली आहेस दुपारच्या वेळीं. मी जरा विश्रांति घेतें हें तुला सहन कां होत नाहीं ?

मालक : तसं नाहीं बाईसाहेब. पण आमच्या दुकानाला आपण आपल्या सेवेचा लाभ द्याल काय, अशी विनंति करण्यासाठीं खास मी आपल्याकडे आलो आहे ( धापा टाकतो. आणि घाम पुसतो )

बाईसाहेब : पण मला तुमच्या नोकरीची पर्वा नाहीं. मला नोकरी नको तुमची. समजलं ? हं. आतां सुधारा बघूं रस्ता आपला.

मालक : ( अजीजीनें ) च्...च्...असा गैरसमज करून घेऊं नका बाईसाहेब. तुम्हांला गरज आहे असं मी कुठें म्हणतो आहे, बाईसाहेब ? गरज आम्हांला आहे. साडी नेसणारी भारतीय स्त्री आमच्या दुकानांत काम करते असें सांगण्याचा अखिल अमेरिकेंतला पहिला मान आम्हांला मिळवावयाचा आहे. ( गुडघे टेकून हात पसरतो ) बाईसाहेब आतां नका ‘ नाहीं ’ म्हणूं.

बाईसाहेब : नाहीं, नाहीं, नाहीं. त्रिवार नाहीं. आणि आतां मी तुमच्याशीं शब्दहि बोलूं इच्छित नाहीं......( नोकराला उद्देशून ) कोण आहे रे तिकडे ? या गृहस्थांना बाहेर जाण्याचा रस्ता दाखव बघूं !

शिकागोहून आम्हीं परत आलों. आणि एका सुप्रभातीं आमचे अनुभवी सल्लागार आम्हांला भेटलेच.

“ आतां तुम्हांला एक अखेरचं सांगूं कां ? ”

" कृपा करून तुम्हीं सांगू नका. मीच तुम्हांला सांगतों, ते मेहेरबानी करून ऐका. हिला शिकागोच्या मार्शल फील्डस्मध्यें नोकरी मिळाली आहे. आणि ती स्वीकारण्याचे..."

" मला वाटलंच होतं. तुम्हीं कांहीं स्वस्थ बसणार नाहीं. आणि तुम्हांला नोकरी मिळाल्याशिवाय राहणार नाहीं ."

" अहो, पण तुम्हीं पुढचं ऐकून घ्याल कीं नाहीं !"

" पुढचं काय ऐकायचंय. तुम्हीं नोकरी स्वीकारणारच..."

" नाहीं. आम्हीं नोकरी स्वीकारणार नाहीं. चक्क 'नाही' असं सांगूनच आम्हीं परत आलों की काल."

" ही असली संधि तुम्हीं वाया घालवतां कामा नये."

" अहो पण तुम्हाला एवढं कसं कळत नाहीं ?" मी अगदीं दबलेल्या आवाजांत त्यांना म्हणालों, आणि खुणेनें त्यांना आणखीच जवळ बोलावलें. नंतर त्यांच्या कानापाशीं वांकून सांगितलें.

" अहो, आम्हाला आंतून कळलं आहे कीं तो माणूस कम्युनिष्ट आहे म्हणून. बोला आतां कशी करायची त्याच्याकडे नोकरी ?"

—एवढें बोलून आम्हीं सल्लागारसाहेबांकडे पाहिलें आणि ते रागानें लाल होईपर्यंत त्यांच्याकडे पहात हंसत राहिलों.

मराठी ... क्र. नं. १४२६५ ... ग्रंथ संग्रहालय ...
राठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळ
अनुक्रम ........................ विः ...............
क्रमांक ........................ नों. दि. ...........

# ४ : मी शिशुपाल बनतो

जेरी हा अमेरिकन मुलगा असला तरी तो मराठींत हंसतो, आणि मराठींत रडतो. तो फक्त सात महिन्यांचा आहे. त्यामुळें त्याला बोलतां येत नाहीं. पण बोलतां येत असतें तर तो लवकरच मराठी फर्डे बोलूं लागला असता, आणि एकदम पुण्याच्या 'गीर्वाणवाग्वर्धिनीं'त नव्हे, पण निदान रेडिओवरच्या नानांना 'अंऽ... अंऽ...' करीत त्यानें सिंड्रेलाची गोष्ट मराठींतून सांगितली असती. कारण तो केव्हांपासूनच 'दा दा' हीं शुद्ध मराठी अक्षरें बोलतो. अर्थात् त्यानें 'मा...मा' म्हटलेलें मला आवडत नाहीं, पण हा आणखी एक थोर मराठी शब्दहि त्याला येतो.

जेरी वयाच्या मानानें भलताच गंभीर आहे. त्याचे वाटोळे तपकिरी डोळे, जवळजवळ केंस नसलेलें तुळतुळीत डोकें आणि विलक्षण गंभीर चेहरा, यामुळें तो एखाद्या मुत्सद्यासारखा दिसतो. मीं मुळीं त्याचें नांव जॉन फॉस्टर डलेस असेंच असेंच ठेवलें आहे. एकदां मीं त्याला खूप हंसवायचा प्रयत्न केला बायको आसपास नाहीं असें पाहून इंग्रजींतून गाणें म्हटलें. माझे १५८ पौंड वजन सांभाळून नाचलों, चुटक्या वाजविल्या. शिट्ट्या वाजविल्या. फक्त कोलांटी-उडी मारायचीच काय ती बाकी राहिली. पण जेरीच्या तोंडावर एक सुरकतीसद्धां उमटली नाहीं. शेवटीं मी कंटाळलों आणि रागावून म्हणालों, "जेऱ्या, अरे तुला हंसायला काय झालं? तूं काय जॉन् फॉस्टर डलेस आहेस?" यावर जेरी मुळींच बोलला नाहीं. उलट त्याच्या कपाळावर एकदोन लहानशा आंठ्याच

दिसायला लागल्या. कदाचित् तो 'डेमोक्रॅट' असावा. त्यामुळें मीं त्याला दिलेलें 'रिपब्लिकन' डलेसचें नांव आवडलें नसावें. मग इतका वेळ खुर्चीच्या मागें टाकलेले हात त्यानें पुढें घेतले आणि पोटावर ठेवले.—आणि माझ्या मनांत एक कल्पना आली. मीं त्याच्या जवळ गेलों आणि त्याच्या पोटाला गुदगुल्या केल्या. त्याबरोबर पोट्टं हंसायला लागलं आणि मला म्हणतें, "मा... म्मा..."... असे तुटक पण अर्थगंभीर शब्द बोलून जेरी मला अनेकदां गप्प बसवतो.

जेरीच्या आईनें जेव्हां पहिल्यांदां त्याला आणून माझ्या बायकोकडे सोंपविलें तेव्हां तिनें बरोबर त्याचा सगळा जामानिमा आणलाच होता, पण शिवाय एक मोसंब्याच्या रसाची बाटली, एक दुधाची बाटली, एक सफरचंदाच्या सॉसची बाटली, मटनपेस्ट, टोमॅटोचा रस इत्यादि 'अ' ते 'ज्ञ' पर्यंत सगळीं व्हिटॅमिन्स असलेल्या गोष्टीहि ती घेऊन आली. जेरीला कसें सांभाळावें याविषयीं बरेंचसें 'मार्गदर्शन' तिनें केलें आणि जेरीचें 'वेळापत्रक' आम्हांला देऊन ती शाळेंत निघून गेली. तें फारच गमतीदार होतें.


'भारतीय' नृत्य

१—जेरीची न्याहारी बहुधा घरींच झालेली असेल. पण जेव्हां झालेली नसेल तेव्हां त्याप्रमाणें तुम्हांला सांगण्यांत येईल. अशा वेळीं ८॥ वाजतां त्याला ओट्स्ची किंवा रव्याची खीर द्यावी.

२—यानंतर जेरी थोडा वेळ कांहीं खात नाहीं. तेव्हां तो खुर्चींत बसेल किंवा खेळेल. सकाळीं तो उशीरा उठतो. त्यामुळें न्याहारीनंतर लगेच

झोपायला आवडत नाहीं.

३— दहा वाजतां जेरीला परत भूक लागेल. यावेळीं त्याला टोमॅटो किंवा संत्र्यांचा रस द्यावा. रसपानानंतरहि तो झोंपेलच असें नाहीं. झोंपल्यास झोंपूं द्यावें. नाहींतर त्याला टेलिव्हिजन पहायला आवडतें. तो त्याला पाहूं द्यावा. टेलिव्हिजन सुद्धां फार वेळ पहायला त्याला आवडत नाहीं. रडून किंवा झोंपून तो आपली नापसंती व्यक्त करतो.

४—जेरी झोंपला असल्यास तो १२॥ वाजतां उठेल. ही त्याच्या मोठ्या जेवणाची वेळ असते. यावेळीं तो खीर खातो, दूध पितो आणि सफरचंदाचें सॉस आणि मटनपेस्ट खातो. जेवणानंतर तो खेळेल किंवा स्वस्थ बसून राहील. भोजनोत्तर झोंपणें जेरीला विशेष आवडत नाहीं.

५—जेरीला कोरडें आणि स्वच्छ राहणें आवडतें. त्याचे कपडे वारंवार बदलावे.

६—जेव्हां बाहेर फार थंड नसेल तेव्हां बाहेर फिरायला जायला जेरीला फार आवडतें. घरांत बसून तो कंटाळतो. असें होईल तेव्हां त्याला बाबागाडींत घालून आसपास फिरवून आणावें.

७—खाण्याच्या, पिण्याच्या किंवा जेवण्याच्या वेळी जेरीला एप्रन बांधावा म्हणजे त्याचे कपडे खराब होणार नाहींत. घरांत आल्यानंतर बरेंच गरम असतें तेव्हां जेरीच्या अंगावरचे गरम कपडे काढून टाकावे. त्याला गरम पांघरूण घालूं नये, त्याचे पायमोजेहि काढावे. यामुळें त्याला अधिक आराम वाटतो.

८—ठराविक वेळीं जेरीचे वडील येतील आणि त्याला घेऊन जातील.

माझें वेळापत्रक वाचून झालें तेव्हां जेरीची आई निघून गेली होती.

एव्हांना जेरी टेलिव्हिजन पाहण्यांत गढून गेला होता. मीं त्याच्याशीं बोलायचा प्रयत्न केला खरा, पण बेटयानें माझ्याकडे लक्षच दिलें नाहीं. फक्त हातानें खुणावून मला गप्प बसवलें. थोड्याच वेळांत टेलेव्हिजनवरची जाहिरात संपली आणि कसला तरी कार्यक्रम सुरू झाला. मोठ्या माणसांना जरी कार्यक्रम आवडत असले आणि जाहिरातींचा संताप येत असला तरी जेरीला जाहिरातीच आवडतात. कार्यक्रमाकडे तो ढुंकूनसुद्धां पहात नाहीं. यामुळेंच कार्यक्रम सुरू झाल्यावर त्याला माझ्याशीं बोलायला फावलें.

" हं ! काय म्हणत होतास बडी ? शूट ! " जेरीला तोंडानें बोलतां येत नसलें तरी डोळ्यांनीं खूपच बोलतां येतें.

" कांहीं नाहीं. हें तुझं वेळापत्रक वाचीत होतों. "

" ठीक आहे. तूं वेळापत्रक वाचीत होतास, माझं वेळापत्रक वाचीत होतास. मग काय म्हणायचं आहे तुला त्याबद्दल ? "

"नाहीं—म्हणजे मला असं म्हणायचं आहे कीं तूं स्वतःला समजतोस तरी काय ? केनेडी कीं रॉकफेलर ? तुझं हें वेळापत्रक पाहून म्हणतों हां ! "

" हें पहा बॉल, अमेरिका हा स्वतंत्र देश आहे. धिस इज अ फ्री कंट्री. "

" अरे जेऱ्या, पण त्याचा तुझ्या या वेळापत्रकाशीं काय संबंध; शहाण्या ? "

" संबंध असा कीं, माझ्या मनाप्रमाणं खाण्याचा आणि आराम करण्याचा अधिकार मला स्वातंत्र्याच्या जाहिरनाम्यामुळं मिळाला आहे. "

" बरं तें जाऊं द्या. पण माझा दुसरा मुद्दा असा कीं खाणं, पिणं, आराम करणं याशिवाय दुसरं या वेळापत्रकांत कांहींच दिसत नाहीं. "

" मग आपलं काय मत आहे मेहेरबान ? आम्ही अभ्यास करावा ? नो बॉय. तें आम्हीं आमच्या मॉम् आणि डॅड्वर सोपवलं आहे. "

—यानंतर जेरी कांहींच बोलला नाहीं. कारण तेवढ्यांत कुठल्यातरी बेबी फूडची जाहिरात सुरू झाली होती.

' बेबी सिटिंग ' हा अमेरिकेंतला एक मोठाच धंदा आहे. मूल लहान असलें तर त्याला संभाळणारी दयाळू आजी आपल्याकडे असते, आणि मोठें असलें तर ' आमच्या बंड्याकडे जरा लक्ष ठेवा हं. मी जरा मंडईत जातें. ' असें सांगून सिनेमाला जातां येतें. पण इथल्या आज्या एक तर इतक्या दयाळू नसतात. किंवा त्यांना इतका वेळहि नसतो. आणि शेजारच्या काकूंना तर बिलकूलच वेळ नसतो. त्यामुळें बेबी सिटर बोलवावी लागते आणि तिला ताशीं २॥ ते ६ रुपये द्यावे लागतात. ' बेबी सिटर पाहिजे ' अशा जाहिराती दररोज सगळ्या वर्तमानपत्रांत असतात आणि हा उद्योग इथें खूप बायका करीत असतात. अमेरिकेंत प्रत्येक गोष्टीचें शास्त्र असतें. नवऱ्याला कायम आपल्या मुठींत कसा ठेवावा, बायकोला नेहमीं स्वैपाकघरांत ठेवूनहि सुखी आणि समाधानी कसें ठेवावें, याचें जसें शास्त्र आहे त्याप्रमाणें मुलांना कसें संभाळावें याचेंहि शास्त्र

आहेच. ' यूनोला जागतिक शांततेसाठीं काय करतां येईल ? ' या पुस्तकाला खेटून उभी असलेली ' शिशुपालिकांची मार्गदर्शिका ' मीं पाहिलेली आहे.

पण असल्या पुस्तकी विद्येवर इथल्या लोकांचें समाधान नाहीं. बेबीसिटिंग-वर व्याख्यानेंहि असतात, आणि तें कसें करावें याबद्दल प्रात्यक्षिकेंसुद्धां असतील. नुसतें बसून राहून बेबी सिटरचें कधींच भागत नाहीं. तिला अनेक गोष्टी माहीत असाव्या लागतात आणि त्याप्रमाणें सारखें लक्ष देऊन वागावें लागतें.

माझी बायको जेरीला कांहीं दिवसापुरतीच गंमत म्हणून संभाळींत होती हें ठीक; नाहींतर तिला बहुधा एखादा कोर्स करून त्यावर परीक्षा द्यावी लागली असती. तिनें इथल्या महिला-मंडळांतून आणलेला एक कागद मीं सहज पाहिला. तो ' बेबी सिटरला माहिती कोणकोणती हवी याविषयीं होता. त्यांत डॉक्टर, शेजारी किंवा मित्र, पोलीस यांचे आणि खोटें वाटेल, पण फायरब्रिगेडचा टेलिफोन-नंबर लिहिण्यासाठीं जागा होती. मुलांचीं नांवें आणि लाडकीं नांवें लिहिण्यासाठीं जागा होती. शिशुपालिका कामावर असतांना तिथें वावरणारे घरांत राहणारे इतर लोक, नातेवाईक आणि पाळलेलीं कुत्रीं, मांजरें यांचीं नांवें आणि वर्णनें लिहिण्यासाठीं जागा होती. आपलें मूल किंवा आपलीं मुलें सोंपवून जेव्हां तुम्ही बाहेर जाल तेव्हा तुम्हीं जिथे जाणार तिथला घर-नंबर, नांव, पत्ता, फोन-नंबर इ० त्या कागदावर लिहिणें आवश्यक होतें. तुम्ही घरीं कधी परतणार याची नोंद आवश्यक होती. मुलें छोट्या डुलक्या, मोठीं झोप, जेवण कधीं घेतात, त्यांची दुपटी, गलोती, कपडे बिछाने कुठें आहेत हें ( बहुधा नकाशा काढून दिशांसह ) दर्शविणें जरूर होतें. याशिवाय मुलांच्या निरनिराळ्या संवयी, त्यांच्या आवडीनिवडी, त्यांना औषधें द्यावयाचीं हें सुद्धां. खाण्याचे पदार्थ, कॉफी कप ( बशा लागत नाहींत ! ) चमचे, रेडिओ, टेलेव्हिजन हीं सर्व आयुधें कुठें आहेत याबद्दलची माहिती, ही आणखी. ही यादी वाचून मला वाटले कीं त्यात दिलेली माहिती संपूर्ण नाहीं. कुत्रीं असल्यास ती नुसतीच भुंकतात कीं चावतातसुद्धा याविषयीची माहिती हवी. नातेवाईकांशीं संबंध कसे आहेत, घरांत राहणाऱ्या इतर लोकांचे पोलिसांशी कांहीं संबंध आहेत काय, असल्यास कशा प्रकारचे, मुलांनीं सतावल्यानंतर किंवा घराला आग लागल्यानंतर घराबाहेर पडण्यासाठीं पळवाटा आहेत कीं नाहीं, असल्यास कुठें आहेत, घरांत चोर

शिरल्यास त्यांना माहीत नसलेल्या चोरवाटा कुठें आहेत, औषधामध्ये डोकें-दुखीवरची औषधें नेमकी कुठें आहेत, मुलांना एका वेळीं किती कप फोडायला आवडतें; याविषयींची संपूर्ण माहिती आवश्यक तिथें नकाशासह द्यायला न कोकाय ?

जेरीनें आम्हांला त्रास दिला नाहीं असें मुळींच नाहीं; पण साधारणपणें तासाला तो अडीच रुपयांपेक्षां अधिक किंमतीचा त्रास देत नसे. शिवाय बायकोच्या महाराष्ट्रीय गनिमी काव्यामुळें जेरीच्या घरी तिनें जाण्याऐवजीं जेरीच आमच्या घरीं येत असे. त्यामुळें पळवाटा शोधण्याचा प्रसंग आलाच असता तर तो त्याच्यावर–आमच्यावर नाहीं. आम्हांला सगळ्या पळवाटा आणि चोरवाटा ठाऊक होत्या. जेरी आमच्याकडे आल्यामुळें माझा आणखी एक फायदा झाला. तो म्हणजे मी औट-घटकेचा कां होईना, पण शिशु-पाल होऊं शकलों. पुरुषांवर मुलें विसंबायला इथल्या बायका सहसा तयार नसतात. त्यामुळें जेरी आमच्याकडे आला नसता तर आमच्या घरांत डोकेंदुखी-वरच्या गोळ्या नेमक्या कुठें ठेवल्या आहेत हें मला कधींहि कळलें नसतें आणि 'इथें इथें बैस रे काऊ' हें सुमारें आठदहा वर्षांपूर्वी मी म्हणत असलेलें (चालीवर म्हणायचें) गाणें मला हक्कानें इथें कधींच म्हणता आलें नसतें. 'मूल्मानसशास्त्रा'चे धडे मी जवळजवळ विसरून गेलों होतों. अमेरिकेंत या धड्यांची उजळणी करायची संधि मला केवळ जेरीनें दिली.




'बलशाली व्हा'

हा अनुभवहि कांहीं कमी नाहीं. पण जेरीपेक्षां मोठ्या मुलांना संभाळणाऱ्यांचें अनुभव जेव्हां मी वाचतों तेव्हां माझा अनुभव किती तोकडा आहे हें मला जाणवतें आणि त्या इतर शिशुपालिकांचा मला हेवा वाटतो. उदाहरणार्थ, मुलें

मोठीं असलीं म्हणजे ती दंगेखोर असतात आणि त्यामुळें बेबी सिटरला आपो-आपच स्वसंरक्षण कसें करावें, लहानशी आग घरच्या घरीं कशी विझवावी, संकटप्रसंगीं मनाचा तोल जाऊ न देतां डोकें शांत कसें ठेवावें, आरडाओरडा चालू असतांना डुलकी कशी घ्यावी, यासारखे बहुमोल अनुभव मला कधींहि घेतां येणार नाहींत याची मला सारखी रुखरुख वाटते.

आपल्याकडे ज्याप्रमाणें ना. धों. ताम्हणकरांचा 'गोट्या' ही विभूति होऊन गेली त्याचप्रमाणें अमेरिकन वाङ्मयांत 'डेनिस–तो–भयंकर' ('Dennis the menace' चें हें भाषांतर 'मनोऱ्यावर दोघे'— 'Two on a Tower'–




वाळूचा 'प्रयोग'

या चालीवर मीं केलें आहे!) नांवाची एक वल्ली सध्या अस्तित्वांत आहे. डेनिसचा एक कार्यक्रम दर आठवड्याला टेलेव्हिजनवरहि होत असतो. शिशु-पालकांना मार्गदर्शन व्हावें या सोज्वळ आणि विधायक हेतूनें डेनिसनें त्यांच्या-करितां एक 'गाइड' लिहिलें आहे. हा धंदा करू पाहणाऱ्या प्रत्येक बाईनें आणि बुवानें आपल्या अंगांत अलौकिक धीरोदात्तपणा बाणवून घेतला पाहिजे. असा डेनिसचा त्यांना आदेश आहे. प्रत्येकानें ताकदवान् असायला पाहिजे,

निदान पाल्यापेक्षां पालकांत ताकद जास्त हवी, असें डेनिस मोठ्या कळवळ्यानें सांगतो. जर का तुम्ही दीन आणि दुबळे असाल तर तुमची शंभर वर्षं भरलींच म्हणून समजा ! बालचमू तुमची दाणादाण उडवून टाकल्याशिवाय राहणार नाहीं. ताकद, सामर्थ्य या एकाच गुणाच्या बळावर नाहींतरी मोठे लोक लहान मुलांशीं 'दादागिरी' करतात कीं नाहीं ? म्हणून सांगतों, शिशुपालकांनों, तुम्ही हर्क्यु-लससारखे (इंग्रजी भीम) बलशाली व्हा ! आतां दुधाची चव चांगली नसते हें का मला माहीत नाहीं ? पण नाइलाज आहे. ताकद कमावण्यासाठीं तुम्हांला भरपूर दुधाचा रतीब चालू ठेवलाच पाहिजे. दुसरें असें कीं, तुम्ही 'ड्यूटी' वर यायच्या आधीं भरपूर झोंप घेऊन ताजेतवानें होऊनच आलें पाहिजे. जर का तुम्ही कामाला लागल्यावर डुलक्या घ्यायला लागलात तर संपलेंच ! पहाऱ्यावर असतांना जर तुम्ही झोंपलांत, तर चिरंजीव तुम्हांला बसल्या जागी बांधून टाकायला कमी करणार नाहींत. ते तुमच्या उघड्या तोंडांत वाळू ओततील. तुमचे बूट तुमच्या पायांतून हळूच काढून खिळ्यानें जमिनींत कायमचे ठोकून ठेवतील किंवा तुमचे केंस कापून तुमचा 'वेणीसंहार' करतील. अर्थात् तुम्हांला व्यायाम करायची फारशी जरुरी नाहीं. कारण कामावर आल्यानंतर तो तुम्हांला भरपूर करावाच लागेल.

जेरीनें आम्हांला डेनिसइतका त्रास कधींच दिला नाहीं. सुरुवातीला तरी तो खूपच शांतताप्रिय होता आणि अहिंसात्मक मार्गानें जात होता. पण कांहीं महिन्याच्या 'समतोल' आहारानंतर जेरीनें हळूहळू शांततेचा मार्ग सोडून दिला. उभे रहातां येत नव्हतें तरी हातापायांनीं रांगत, सरपटत तो कुठेंहि जात असे आणि नको त्या गोष्टी नेमक्या करीत असे. जगांतल्या सर्व लहान मुलांना जर सर्वांत कांहीं आवडत असेल तर तें बहुधा बूट, जोडे, वहाणा, चपला हें असावें. जेरी याला कसा अपवाद असणार ? त्याला कुठेंहि ठेवलें तरी बूट–वाहणांकडे गेल्याशिवाय त्याला करमत नसे. बुटासारख्या अलौकिक, चवदार वस्तू चघळण्यासाठीं जगांत असतांना माणसें आपल्याला वेचव मटन–पेस्टसारखा पदार्थ घालण्याचा हट्ट कां धरतात, हें कोडें जेरीलाहि पडलें होतें. विजेची वायर, टेलेव्हिजनचा पडदा, ताजे वर्तमानपत्र या वस्तू पाहिल्यावर जेरीच्या डोळ्यांत वेगळेंच तेज चमकत असे. आणि कधीं एकदां ती तोडीन, किंवा तो फोडीन,

किंवा तें फाडीन असें त्याला होत असे. टेबलाला धरून उभें रहाणें आणि तसें करतांना टेबलक्लॉथ् ओढून त्यावरच्या चिठ्ठयाचपाट्या, कागद, पेन, पेन्सिली घड्याळ, पाइप, सिगरेटची पेटी, ॲश-ट्रे, काडेपेटी, पुस्तकें आणि वह्या ओढून खालीं पाडणें हा तर पुढेंपुढें जेरीच्या एक आवडता छंद झाला होता. माझ्या तें लक्षांत येऊन मी त्याच्या हालचाली थांबवायच्या आंत भलत्याच चलाखीनें जेरी हे नेहमी साधत असे आणि त्यामुळें जेरीकडे रागानें आणि खोलीभर पसरलेल्या चिठ्ठयाचपाट्या, कागद, पेन्, पेन्सिलीं, घड्याळ, पाइप, सिगरेटची पेटी, ॲश-ट्रे, काडेपेटी, पुस्तकें आणि वह्या या वस्तूकडे दीन-वाण्या आणि हताश नजरेनें पाहण्यापलीकडे मला कांहींच करतां येत नसें.

'डेनिस-तो भयंकर' यानें मुलांचे एकंदर चार प्रकार मानले आहेत : भुके-लेलीं मुलें, तहानलेलीं मुलें, झोंपणारी मुलें आणि रडणारीं मुलें. मला वाटतें, यांत धडपडणारी मुलें या मुलांच्या एका भयानक प्रकाराचा समावेश व्हावयास पाहिजे. इतर सर्व प्रकारची मुलें परवडली; पण धडपडणारीं मुलें नकोत. भुकेनें वखवखलेलीं मुलें कांहीं विशेष त्रासदायक नसतात. तीं आपलीं कांहीं ना कांहीं खात बसतात. आपलें काय गेलें? खुशाल खाईनात! आपल्या कांहीं वस्तू खायला लागलीं तर त्या उंचावर उचलून ठेवल्या म्हणजे झालें. अमेरिकेंत धुणी वाळत घालण्याच्या काठ्या नसल्यामुळें फळीवरचे डबे पाडणें ही गोष्ट तिथें सहजासहजी शक्य नाहीं. तहानेलेलीं मुलें असलीं तर त्यांना पाणी पिऊं द्यावें. त्यांतहि आपलें कांहीं नुकसान नाहीं. फक्त बाबा पितात ती व्हिस्कीची किंवा बिअरची बाटली त्यांच्या हातीं लागूं दिली नाहीं म्हणजे झालें. रडणारी मुलें असतात तीं आपलीं रडतच बसतात. कांहीं मुलांना ज्याप्रमाणें माती खाण्यांत आनंद वाटतो त्याप्रमाणें यांना रडण्यांतच आनंद वाटतो. कदाचित् त्यांचे अश्रू हेही आनंदाश्रू असतील. अशा मुलांना रडूं द्यावें. त्यांचा आनंद उगाच हिरावून घेण्यांत काय अर्थ आहे? फार कंटाळा किंवा राग आला तर द्यावी एक चापटी ठेवून! विशेष काय होणार आहे? पोरगं रडेल. पण अगोदरच तें रडत असल्यामुळें आणखी विशेष असें कांहीं होणार नाहीं. फार तर वरचा षड्ज लावील. एकंदरीत रडणारें पोर अधिक रडले तरी कोणाचेंच कांहीं बिघडत नाहीं उलट जास्त रडायला मिळाल्यामुळें मुलाला जास्त आनंद होतो आणि आपण

त्याला एक ठेवून दिलेली असल्यामुळें आपल्या मनावरचा ताण थोडा कमी होतो, आपल्यालाहिं बरें वाटतें. हें सगळें ठीक आहे. पण धडपडणाऱ्या मुलांचें काय करणार ? त्यांची धडपड थांबणार कशी ?

आणि जेरी मुळींच रडायचा नाहीं असेंहि नाहीं. एकदां त्यानें असें कांहीं भोकाड पसरलें आहे कीं विचारूं नका ! काय केलें म्हणजे तो थांबेल हें मला सुचेना. मी म्हणालों, "बाबा, तुला बूट चघळायचे असले तर चघळ. वाट-ल्यास त्या इंडियन चपला पाहा. त्यांची चव वेगळी लागेल कदाचित्. किंवा टेबलक्लॉथवरील सर्व वस्तूंसकट तें खालीं ओढ. टेलेव्हिजनवरच्या माणसाला पकडायचं असल्यास पकड. इलेक्ट्रिकची वायर चाव. काय वाटेल तें कर, पण रडूं तेवढा नकोस," पण असें सर्व प्रकारचें स्वातंत्र्य देऊनहि जेरी कांहीं रडा-यचा थांबला नाहीं. छे छे ! बहुधा रडण्याच्या आनंदापुढे बूट चघळण्याचा आनंदहि तुच्छ असावा.

आणि मी असा हवालदिल झालों असतांना जेरीची खरी बेबी सिटर—म्हणजे माझी बायको—सुदैवानें घरीं येती झाली.

"या पोरट्याला रडायला काय झालं आहे पहा बुवा ! उगाचच्च कोकल-तोय् मघांपासून ! दूध दिलं; खायला दिलं; बूट, वायर चघळायची परवानगी दिली, तरी आपलं रडणं चालूच्च आहे."

तिनें त्याला उचलून घेतलें, क्षणार्धांत सर्व परिस्थिति जाणली, आणि मास्तर मठ्ठ मुलांकडे पाहातात तसें माझ्याकडे पाहिलें.

"अहो रडायला काय झालं आहे म्हंजे काय ? यानं चक्क 'प्रकार' केला आहे. आणि म्हणे रडायला काय झालं ?"

त्यानंतर जेरी रडायचा थांबला; पण माझ्याकडे असा कांहीं पहात होता, कीं बहुधा तो श्रीकृष्ण असता तर त्यानें 'शिशुपाल--वध' परत एकदां करा-यला कमी केलें नसतें.

पण थोड्या वेळानेंच्च मी जें पाहिलें आणि ऐकलें त्यावर माझा विश्वासच बसेना !

जेऱ्या एक मराठी गाणें मन लावून ऐकत होता आणि मोठ्यानें हंसतसुद्धां होता.

'आमुच्या जेरूडी बाळाला,

मारूं नका कोणी,
राग जातो मनीं,
चोकस वाइच्या.
आमुचा जेरूबाळ,
आम्हांला आवडे,
दारींचे केवडे
जून झाले. '

... ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळ...
अनुक्रम . ३७६६६ दि: ...
क्रमांक ३५१ नों दि. ...

हे दोन भाग निदान समजण्यासारखे होते. पण त्यानंतर आलेलें काव्य असें होतें :--

' आमुच्या जेरू बाळाची,
येत्या शुक्रवारी 'डेट',
त्याच्या मैत्रिणीचें 'फेट',
फार 'ग्रेट' '

मी तिथेंच शेजारीं बसलों असतांना माझ्याकडे संपूर्ण दुर्लक्ष करून जेरी आणि त्याची बेबी सिटर यांचें हितगुज चाललें होतें.

" जेऱ्या, तुला तोंडानं फुरफुर करायला काय झालं रे ? चल ! वात्रट कुठला. आजारी पडायचं आहे वाटतं ? " जेरीची बेबी सिटर त्याला लटक्या रागानें म्हणाली.

" कसला आजारी अन् कसलं काय ? दर तासाला कुठलं ना कुठलंतरी व्हिटॅमिन् चावतो किंवा गिळतो आहे. चांगला टणक्या आहे बरं तुमचा जेरू-बाळ. ताप यायचा असला तर त्याला येणार नाहीं. मला येईल बाईसाहेब ! परत एकदां त्याला संभाळायचा प्रसंग माझ्यावर आला तर मला अगदीं हुड-हुडी भरून ताप येईल ! "

" कां हो उगीच आमच्या जेरूबाळाला टणक्या म्हणतां ? त्याला दृष्ट लागेल ना ! दृष्ट लागेल असंच पोर आहे हो बाकी ! "

" बाप रे ! म्हणजे अमेरिकेंतसुद्धां दृष्ट वगैरे प्रकार होतात असं तुम्हीं म्हणतां आहांत कीं ! "

हा आपला एक मासला झाला. पण अशा शुद्ध मराठीं भाषेंत आणि मराठी

पद्धतीनें जेरीचें कौतुक आमच्याकडे नेहमींच होत होतें.

माझा शिशुपालकाचा अनुभव एवढ्यावरच संपला ही फार समाधानाची गोष्ट आहे. कारण नंतर जेव्हां मीं निरनिराळ्या लोकांचे अनुभव ऐकले, तेव्हां हें दिव्य प्रतिपच्चंद्ररेखेप्रमाणें मुलाच्या वयाबरोबर कसें सारखें अधिकअधिक दिव्य होत जातें हें माझ्या लक्षात आलें. जेरी सध्यां फार तर सातआठ महिन्यांचा असेल. पण जेव्हां तो चारपांच वर्षांचा होईल तेव्हां आपल्या बेबी सिटरचे तो कसेकसे हाल करील आणि त्याचा परिणाम काय होईल याचें मनोरम चित्र मला सध्यांच दिसतें आहे.

तेव्हां जेरीची आई बेबी सिटरला फोन करतांना म्हणेल, "छे हो! तुम्ही कशाला घाबरताय जेरीला? तो आतां तुम्हांला बिलकुल चावणं शक्य नाहीं. गेल्या वेळच्या बेबी सिटरनं त्याचे चावायचे दांत केव्हांच पाडून टाकले!"

हें वाक्य पुरें व्हायच्या आंतच त्या बेबी सिटरनें फोन बंद केला नसेल तर निदान वाक्य पुरें झाल्यावर तरी तो बंद केला जाईलच!

बेबी सिटरची विनवणी करतांना जेरीची आई म्हणेल, "माझी बिलकुल हरकत नाहीं. तुम्ही दोघीजणी या. दोघींचे पैसे मी देईन. माझा मुलगा जरासा हूड आहे, मी कबूल करतें...हो, तुम्ही येतांना तुमच्या मित्राला घेऊन आलांत सोबतीला (आणि संरक्षणाला) तरी चालेल." एवढीं प्रलोभनें दाखविलीं तरी ती बिचारी बेबी सिटर घुटमळेलच. जेरीची आई लगेच घाई-घाईनें म्हणेल, "मीं इतर सगळा बंदोबस्त केला आहे. फायरब्रिगेडला, पोलिसला, डॉक्टरला—सगळ्यांना फोन करून कळवलं आहे. शिवाय थिएटर-मधल्या माझ्या खुर्चीचा आणि रांगेचा नंबर आणि थिएटरचा टेलिफोन-नंबरहि मी तुम्हांला देतें. कुत्र्याला कोंडून ठेवतें. आणखी काय पाहिजे? बोला!"

मग ती बेबी सिटर म्हणेल, "इतकं तुम्ही माझ्याकरतां करणार आहांत म्हणून आणखी कांहीं सांगायला मला संकोच वाटतो. पण एकच मेहेरबानी कराल का आणखी?"

"हो हो! जरूर! आणखी कांहीं करायचं राहिलं तर जरूर आनंदानं करीन."

" मेहरबानी करून एवढंच करा. जेरीला घेऊनच तुम्ही सिनेमाला कां जात नाहीं ? मी आणि माझा मित्र तुमचं घर शांतपणं संभाळूं. "

यानंतर कांहीं न बोलतां टेलिफोन बंद करण्याची पाळी जेरीच्या आईची असेल. आनंदाची गोष्ट एवढीच आहे कीं, वरच्या संभाषणांतली बेबी सिटर माझी बायको नसेल.

जेरीला संभाळण्याचें संपूर्ण श्रेय मला घेतां येत नसलें तरी निदान चॉकीचा मात्र मी दोनतीनदां संपूर्णपणें शिशुपाल होतों. चॉकी हा आमच्या घरमालकिणीचा मुलगा. तो दहाअकरा वर्षांचा असला तरी अर्धवट होता. लहानपणींच त्यांच्या मेंदूला इजा झाल्यामुळें त्याचें असें झालें होतें. चॉकीला बोलतां येत नसे. तो तोंडानें फक्त ' ऊं–ऊं ' असे आवाज काढीत असे. आमच्या मालकीणबाई चॉकूला माझ्यावर सोंपवून एकदां मतदान करायला आणि दोनदां चर्चेमधल्या कामाला गेल्या होत्या. बहुधा त्या शॉपिंगला किंवा मैत्रिणीकडे गप्पा मारायला गेल्या असण्याचाहि संभव आहे. पण 'आमच्या चॉकूकडे जरा पहाल का ? ' असें विचारतांना मूर्तिमंत अमेरिकन सौजन्यानें त्यांनीं मला विचारलें असल्यामुळें मी नाहीं म्हणणें अशक्यच होतें. शिवाय मी त्यांच्याकडून पैसे घेणार नसल्यामुळें त्यांच्या मुलाला संभाळण्यांत मला चांगलेंच नीतिधैर्य येणार होतें.

चॉकीला बोलतां येत नसलें तरी सगळें समजत असे. विशेषतः रेफ्रिजरेटर किंवा कपाट अशा बंद ठिकाणीं खायच्या वस्तू ठेवलेल्या असतात हें रहस्य त्याला चांगलेंच माहीत होतें. याशिवाय रॉकिंग चेअरवर बसून झोके घ्यायचा त्याला एक छंद होता. तासन् तास हा मुलगा त्या खुर्चीत बसून झोके घेत असे.

त्या दिवशीं चॉकीची आई बाहेर गेल्यानंतर तो आमच्या घरांत आला आणि प्रथम गेला स्वैपाकघरांत. पहिल्याच फेरींत त्यानें एक सफरचंद आणि दोनचार कुकीज् काबीज केल्या होत्या. तो कोणतीहि गोष्ट लपवूनछपवून करीत नव्हता याचेंच मला समाधान वाटत होतें. खाण्याचा पहिला हप्ता संपल्यानंतर चॉकी परत उठला आणि त्यानें आपला मोर्चा स्वैपाकघराकडे वळवला.

" हं ! चॉकू, घरांत नाहीं जायचं. इथं बस पाहूं या खुर्चीवर. " मीं त्याला फर्मावलें. आणि तो आज्ञाधारकपणें जवळजवळ धांवतच जाऊन खुर्चीवर बसला

नि झोके घ्यायला लागला.

थोड्या वेळानें मलाच त्याची दया आली आणि मीं त्याला घरांतून कांहीं-तरी आणखी खायला आणून दिलें. मला वाटलें, त्यानें तरी काय करावें दुसरें? त्याला खेळतां येत नाहीं, वाचतां येत नाहीं, बोलतां येत नाहीं. त्यामुळें त्याला आपली सारखी भूक लागते आणि सारखें खायला हवें असतें.

नंतर बराच वेळ चॉकी खुर्चीवर झोके घेत होता. आणि त्याचे निळे डोळे सुंदर दिसायला पाहिजे असून किती भकास आणि शून्य दिसताहेत याचा मी विचार करीत होतों. मग मला एकाएकी आठवण झाली कीं चॉकीला चित्रें पहायला आवडतात. त्याच्या आईशीं बोलतांना तिनें मला एकदां हें सांगितलें होतें. मी आंत गेलों आणि टेबलावरचा 'लाइफ्'च्या अंकांचा एक गठ्ठा आणून चॉकीच्या हातांत दिला. मग तो काय करतो आहे हें पहातच राहिलों.

सफ्रचंद किंवा केक तो जितक्या अधाशीपणानें खात असे, तितक्याच अधाशी अधिरेपणानें त्यानें भसाभसा त्या 'लाइफ'च्या अंकांचीं पानें उलटलीं एक—दोन—तीन अंक पाहून झाले. आणि मग तो मग एके ठिकाणीं थांबला. मला थोडेंसें आश्चर्य वाटलें. त्याला परत खाण्याची आठवण झाली असेल

पण तसें कांहींच नव्हतें. तें पान पाहिल्यावर चॉकीला स्वस्थ बसविलें नाहीं. तो ताडकन् आपल्या खुर्चीवरून उठला आणि धांवत मी बसलों होतों तिथें आला. तो एकदम उठल्यामुळें अंकांची सगळी चळत खालीं वेडीवांकडी पडली याकडे त्याचें बिलकुल लक्ष नव्हतें. चॉकी तो अंक लोंबत घेऊन माझ्यापाशीं आला आणि तें पान त्यानें माझ्यासमोर धरलें. आणि त्यावर बोट ठेवून मला दाखविलें. फ्लॉवरपॉटमध्यें ठेवलेलीं डेझीजचीं सुंदर रंगीबेरंगी फुलें त्या पाना-वर पसरलेलीं होतीं.

"तुला आवडतात का रे हीं फुलं चॉक्?" मीं विचारलें.

चॉक बोलला नाहीं. त्यानें मिटकी मारल्यासारखा आवाज तोंडानें केला. कदाचित् तो म्हणत असेल, 'मूर्खा! आवडतात म्हणजे काय? डेझीचीं किती सुंदर फुलं आहेत तीं! इतकीं सुंदर आहेत, आणि शिवाय तूं मला सफरचंद दिलंस म्हणून तुला दाखवलीं. आलं का लक्षांत?'

पण माझें चॉकीकडे लक्ष नव्हतें. कात्रीनें कागदाच्या आकृत्या कापणाऱ्या

'वासू' या गाडगीळांच्या कथेंतला तो वेडा मुलगा मला आठवत होता

एकदां मला चॉकीनें चांगलेंच घाबरवलें !

जेरी आमच्याकडे असतांना चॉकी धांवत घरांत आला. आणि आश्चर्य असें कीं, रेफ्रिजरेटरकडे धांवायच्याऐवजी जेरीकडे धांवला. मी एकदम घाबरून उठलों. या धांवणाऱ्या पोराचें शंभर पौंड वजनाचें धूड जेरीच्या अंगावर पडलें तर ?

" चॉक्—चॉक्, अरे तूं काय करतो आहेस ? " मी जवळजवळ ओरडलोंच.

पण चॉक्नें माझ्याकडे लक्षहि दिलें नाहीं आणि भलतें कांहीं केलेंहि नाहीं.

जेरी गालिच्यावर खेळत होता तिथें तो गेला. गुडघ्यावर बसून पुढें वांकला आणि अगदीं नाजूकपणें त्यानें जेरीच्या कपाळाचा मुका घेतला. त्याचीं छोटीं-छोटीं बोटें कुरवाळलीं.

मला भीति वाटत होती कीं जेरी आतां घाबरेल आणि रडेल. म्हणून मीं चॉक्ला जवळजवळ मागें खेचले.

परंतु जेरी घाबरलाहि नाहीं किंवा रडलाहि नाहीं. त्यानें आपले वाटोळे शोधक डोळे चॉक्वर रोखले होते आणि त्या बेरक्या नजरेनें तो चॉक्ला न्याहाळीत होता.

त्यानें चॉक्ला बहुधा सांगितलें असेल, 'म्हणजे हा चष्मेवाला इंडियन तुझाहि बेबी सिटर आहे कीं काय ? भले ! पण एक सांगून ठेवतो हां ! या प्राण्यावर विश्वास ठेवण्यांत कांहींहि अर्थ नाहीं. लहान मुलांच्या चड्ड्या कधीं बदलायला पाहिजेत एवढी साधी गोष्टसुद्धां याला कळत नाहीं बरें कां ! '

# ५ : अमेरिकन इंग्रजी

पांडवांना भेटलेला यक्ष जर कधीं मला अमेरिकेंत भेटला असता तर त्यानें मला कांहीं विचारण्याऐवजीं मींच त्याला पांच प्रश्न विचारले असते.

“ यक्षमहाराज, त्या बिअरच्या ग्लासला हात लावायच्या आधीं माझ्या प्रश्नांचीं उत्तरें द्या. बरोबर उत्तरें दिलींत तर एक सोडून दोन ग्लास बिअर मी तुम्हांला स्व–खर्चानें आणि आनंदानें देईन. ”

यक्षलोक दाढी वापरतात कीं नाहीं हें मला माहीत नाहीं. पण समजा, या यक्षमहाराजांना दाढी असती तर ती कुरवाळीत ते म्हणाले असते, “ खुशाल विचार. वत्सा, तुझ्या कोणत्याहि प्रश्नांना उत्तरें देण्याची माझी तयारी आहे.”

“ ठीक आहे तर मग. माझा पहिला प्रश्न असा कीं, अमेरिकेंत हॅम्बर्गर नांवाचा जो खाद्यपदार्थ मिळतो त्यांत हॅम् नसून बीफ असतें, तरी त्याला हॅम्बर्गर असें कां म्हणतात ? ”

“ प्रश्न नंबर दोन. अमेरिकन लोक जेवणाच्या टेबलावर कांटा डाव्या बाजूला ठेवतात, पण जेवतांना तोच कांटा उजव्या हातांत घेऊन जेवायला लागतात. यक्षमहाराज, असें कां ? ”

“ तिसरा प्रश्न. धुणीं वाळत घालण्याची काठी ही संस्था अमेरिकेंत कुठें आहे काय ? असल्यास धुणीं वाळत घालण्याशिवाय तिचे दुसरे उपयोग कोणते ? उंच ठिकाणीं ठेवलेले लाडूचे डबे खालीं पाडण्यासाठीं अमेरिकन बालकें या अस्त्राचा वापर करतात कीं नाहीं ? ”

" प्रश्न चौथा. अमेरिकेंत फूटबॉल नांवाचा जो खेळ आहे त्यांत कुस्ती, धांगडधिंगा आणि मारामारी हींच जास्त प्रमाणावर असतात. असें असूनहि या खेळाला फूटबॉल हें नांव देण्याचें कारण काय ? "

" पांचवा आणि अखेरचा प्रश्न. अमेरिकेंत जी भाषा बोलतात तिला ' इंग्रजी ' असें कां म्हणतात ? "

माझ्या पहिल्या चार प्रश्नांना यक्षमहाराजांनीं कदाचित् कशींबशीं उत्तरें दिलीं असतीं, पण पांचवा प्रश्न ऐकतांच त्यांचें देहभान हरपून ते तत्काळ बेशुद्ध होऊन पडले असते यांत मला तिळमात्र संशय नाहीं.

हाच यक्षप्रश्न मी याच अटींवर माझ्या अनेक चाणाक्ष अमेरिकन मित्रांनाहि विचारला होता. पण त्यांपैकीं कोणीहि मला या प्रश्नाचें समाधानकारक उत्तर कधींच देऊं शकला नाहीं.

या सगळ्याचें खरें कारण असें आहे कीं, माझ्या पांचव्या प्रश्नाला मुळीं उत्तरच नाहीं. कधींकधीं मला असें वाटतें कीं, अमेरिकन साहेबानें इंग्रज साहेबावर उगवलेला हा एक सूड आहे. अमेरिकनांची टिंगल उडविण्याकरितां इंग्रज लोक त्यांना ' यँकी ' म्हणूं लागले. पण बेट्या अमेरिकन लोकांनीं ही शिवीच मुळीं लोकप्रिय करून टाकली. इंग्रजी भाषेच्या बाबतींतला सूडाचा एक आगळाच प्रकार आहे. कारण इंग्रजी आणि अमेरिकन इंग्रजी या खरें म्हणजे दोन वेगळ्या भाषा आहेत.

अमेरिकेंतल्या ' इतिहास–संशोधक–मंडळां 'त मी कधींच गेलों नाहीं. पण मला संशय आहे, कीं तिकडचीं जुनीं दप्तरें चाळलीं तर बोस्टन् येथें जी सुप्रसिद्ध चहापार्टी झाली त्यावेळीं पाणी तापवितांना इंग्रजी डिक्शनऱ्यांचा उपयोग करण्यांत आला असावा असें अनुमान करण्यास आधार देणारे कांहीं ' रुमाल ' त्यांत सांपडणें हें मुळींच अशक्य नाहीं. या पार्टीनंतर अमेरिकन साहेबानें जसें कर न देण्याचें स्वातंत्र्य मिळविलें तसेंच इंग्रजी भाषेच्या बाबतींत मन मानेल त्याप्रमाणें ' तोंडसुख ' घेण्याचें स्वातंत्र्यहि आपलेंसें केलें असावें.

अमेरिकन भाषास्वातंत्र्याच्या जाहीरनाम्यांतलें पहिलें कलम उच्चारस्वातंत्र्याचें असावें. ' Yes ' या शब्दाचा उच्चार ' यॅस् ' किंवा फार तर ' येऽस ' अशी माझी बरींच वर्षे समजूत होती. पण अमेरिकेला गेल्यावर याच शब्दाचा

उच्चार ' याः ' किंवा ' यॅप् ' असाहि असू शकतो हें माझ्या लक्षांत आलें. ' No ' चा उच्चार साधा ' नो ' अशी आपली माझी बाळबोध समजूत होती. पण खरें म्हणजे हा उच्चार ' नॉः ' किंवा ' नोप् ' असा करायचा असतो हें ज्ञान मला अमेरिकेंत झालें. आपल्या मातृभाषेंतील शब्दांचे असे अभूतपूर्व उच्चार इंग्रज साहेबानें जेव्हां पहिल्यांदां ऐकले असतील तेव्हां तो डामरी फटाक्या-प्रमाणें उडाला असला पाहिजे. आमच्या शाळेंत जर आम्हीं असे उच्चार केले असते तर आम्हांला छड्या खाव्या लागल्या असत्या, कीं बांकावर उभें रहावें लागलें असतें, कीं अंगठे धरावे लागले असते, कीं वर्गाबाहेर जावें लागलें असतें, कीं आम्हांला आमच्या ह्या गुन्ह्याबद्दल ' कुठें ठेवूं अन् कुठें नको ' असें आमच्या गुरुजींना झाल्यामुळें सर्वच गोष्टी एकदम कराव्या लागल्या असत्या याचा अंदाज करणें कठीण आहे.

आपल्याकडे शब्द ठांसून बोलणारे कांहीं वक्ते असतात. पण ते नेहमींच कांहीं इतके ठांशीव बोलत नाहींत. ' बेळगांव, कारवार, निपाणी, भालकी इ. इ. सह संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे ', किंवा ' चिनी लोकांनीं भारताची हद्द सोडून चालतें झालेंच पाहिजे ' असल्या सनसनाटी घोषणाच ते ठां[illegible] [illegible]नात. अर्थात् चिनी लोकांना ऐकविण्याची भाषा ते भारतीय श्रोत्यांना कां ऐकवतात हें आपल्याला कळत नाहीं हें खरें असलें तरी कोणत्याहि अमेरिकन माणसाप्रमाणें सदासर्वकाळ प्रत्येक शब्द ते ठांसून बोलत नाहींत हेंहि कांहीं कमी नाहीं. अमेरिकन लोक प्रत्येक शब्दांत ' ह ' या उच्चाराचें असें कांहीं मिश्रण करतात कीं ते बोलत असलेली प्रत्येक गोष्ट त्यांना आपल्याला पटवून द्यायची आहे असें आपल्याला वाटायला लागतें. आतां माझें ' गाडगीळ ' हें नांव कांहीं विशेष चांगलें नसलें तरी तें पिढ्यान्‌पिढ्या चालत आलेलें नांव आहे आणि त्याची मला आतां संवयहि झाली आहे. निदान तें माझें नांव आहे, किंवा माझेंच नांव आहे असें मला कोणी पटवून द्यावें लागत नाहीं. पण अमेरिकन मित्र जेव्हां माझें नांव ' घॅडधिल ' असें उच्चारायचे तेव्हां सारखें मी कोण आहें हें मला पटवून देण्याचा प्रयत्न केला जात आहे असें वाटायचें. याशिवाय अनेक वेळा ' आजचा दिवस फार सुंदर आहे ' किंवा ' हा वीकएंड तुम्हांला चांगला जावो ' असें म्हणतांनाहि ' ह ' चा इतका उपयोग व्हायचा, कीं त्या

त्या दिवसाचें सौंदर्य किंवा त्या त्या वीकएंडविषयींच्या त्यांच्या इच्छा मला एकदम पटायच्या.


कित्येकदां आणखी एक गंमत व्हायची. टेलेफोनवरून बोलतांना एखाद्या शब्दाचें स्पेलिंग कळलें नाहीं तर माझ्याशीं बोलणारी व्यक्ति तें माझ्या नीट लक्षांत यावें म्हणून अक्षराचे शब्द करून सांगायची. आपण जसें ' ब ' म्हणजे बगळ्यांतला असें म्हणूं त्याप्रमाणें. पण या समजवणुकीमुळें घोटाळा अधिकच व्हायचा. ' पेट ' मधला ' पी ' असें सांगायच्या ऐवजी ' फेठ ' मधला ' फी ' असें जर कोणी सांगितलें तर घोटाळ्याशिवाय दुसरें काय होणार ? भगळ्यांतला ' भ ' असें म्हणून ' ब ' समजावून देण्याचाच हा प्रकार होत असे. पण हळूहळू संवयीनें मला असल्या शब्दांचीहि फोड करतां येऊं लागली. कमाल म्हणजे एकदां आम्हांला कोणीतरी जेवायला बोलाविलें होतें, तेव्हां ' फाडी ' या शब्दाचा अर्थ ' पार्टी ' असा असूं शकतो हें माझ्या तावडतोब लक्षांत आलें. " असल्या शब्दांचे अर्थ तुमच्या लक्षांत येणारच, " असें जरी यावर माझी बायको मला खोचं[illegible]म्हणालीं तरीहि अमेरिकन इंग्रजीचें गुपित मी किती लवकर हस्तगत केलें हें सुज्ञांच्या सहजच लक्षांत यावें.

भारतीय गोमातेविषयींचें अमेरिकन कुतूहल हें फार जुनें आहे. त्याप्रमाणें माझ्या कांहीं मित्रांनाहि तें होतेंच. तरीहि ' होली कॅव 'ची इंडियांत कशी स्थिति आहे असें त्यांनीं मला जेव्हां पहिल्यांदाच विचारलें तेव्हां ' पवित्र गाईबद्दल ' ते विचारीत असतील हें प्रथम माझ्या लक्षांतच आलें नाहीं. गोमातेची भारतांत कशीहि स्थिति असो, नित्य प्रेमानें गोमांस भक्षण करणाऱ्या अमेरिकन माणसाच्या हृदयांत मात्र तिनें अढळ स्थान मिळविलें आहे यांत कांहींच संशय नाहीं. एखाद्या गोष्टीचें विलक्षण आश्चर्य वाटलें म्हणजे ते सहज म्हणतात, ' होली कॅब् ! '. ' अरे बाप रे ', या पितृतुल्य वचनाची जागा अमेरिकेंत गोमातेनें घेतली आहे हें वाचून कुठल्याहि गोरक्षकाची पेटी अधिकच उंच उचलली जाईल, हें निःसंशय.

इंग्रज साहेबाप्रमाणें आपली संवय अशी, कीं रस्त्यांत कोणी भेटलें तर ' हलो ' म्हणायचें. फार तर ' हल्लो ' किंवा ' हॅलो ' किंवा ' हलाव, ' ' हलॉव ' असे याचे पाठभेद होऊं शकतात. या माझ्या संवयीमुळें अमेरिकेंत

रस्त्यामध्यें कोणी भेटलें, किंवा कुणाचा फोन आला तर उदबत्तीचा चटका लागल्याप्रमाणें सगळे 'हाय्' असें कां म्हणायचें हें मला सुरुवातीला कळत नसे. पण हा चटकदार शब्द मला लवकरच आवडूंही लागला. पुण्याला जेव्हां मी तो आजकाल वापरतों तेव्हां भेटणारे लोक कधींकधीं चमकून आजूबाजूला पहायला लागतात. पण खरें म्हटलें तर त्यांत चमकण्यासारखें काय आहे? आपल्याला भेटणारे कित्येक लोक आपल्या मनाला (व कित्येकदां खिशालाहि) चटका लावून जात नाहींत काय?

'हाय्' इतका चटका न लावणारे दुसरे अमेरिकन शब्द म्हणजे 'जीऽ' किंवा 'सी या.' यांतल्या 'जी'चा पोवाड्याशीं कांहींच संबंध नाहीं. केवळ



होली खॅव!

आश्चर्य व्यक्त करण्यासाठीं 'जी'; वीररस निर्माण करण्याकरितां नव्हे. 'सी या' हीं दोन अक्षरें 'I will see you again' या लांबलचक वाक्याचा संक्षेप आहेत. तसेंच कुठल्याहि वाक्याची सुरुवात 'वॅल्' (well) या शब्दानें करणें अगदीं सोईचें. या शब्दानंतर जवळजवळ कांहींहि म्हणणें शक्य असतें. कांहीं म्हणायचें नसलें तरी आपलें 'वॅल्' म्हणायचें आणि शांत रहायचें. तुम्हांला कांहींच म्हणायचें नाहीं हें ऐकणाऱ्यांच्या लगेच लक्षांत येतें.

आपल्याला कोणी ‘ थँक् यू ’ म्हटलें तर सहसा आपण त्यावर कांहींच
हणत नाहीं, किंवा ‘ दॅट्स् ऑल राइट ’ असें म्हणून दुसऱ्याला ‘कुठून याचे
ाभार मानले ’ असें वाटायला लावतों. माझ्या माहितीचे एक सद्‌गृहस्थ तर
ोणी आभार मानले म्हणजे ‘ ते तर आहेच ’ किंवा ‘ डोंच्यू वरी ’ असेहि
हणतात. त्यामुळें आभार मानल्यावर अमेरिकन लोक ‘ यु ऑ वेकम् ’ असें कां
हणतात त्याचा अर्थंच मला कांहीं दिवस कळला नाहीं. नंतर मला असा शोध
ागला कीं या पंचाक्षरी मंत्राचा अर्थ ‘ You are welcome ’ असा
असतो. अशा शब्दांचे असें उच्चार फाउलरसाहेबाला तरी लिहितां आले असते




**उच्चार प्रात्यक्षिक !**

कीं नाहीं याची मला शंका आहे. श्रुति आणि स्मृतींप्रमाणेंच ते ऐकून लक्षांत ठेवणें याशिवाय दुसरा उपाय नसावा.

साहेबाच्या भाषेंत ‘ळ’ हा उच्चार नसल्यामूळें कित्येकदा खूप पंचाईत व्हायची. माझ्या ‘ बाळ ’ या नांवाचा उच्चार कसा करायचा हें सांगतांना मी तोंडाचें आणि अंगाचे जे विक्षेप केले असतील त्यांचें एक सबंध एकपात्री नाटक झालें नाहीं तरी त्याचा एखादा अंक तरी होऊं शकेल असा माझा अंदाज आहे. हा प्रवेश चालू असतांना माझा चेहरा भयंकर केविलवाणा झाला असला तरी माझ्या बायकोच्या डोळ्यांत सहानुभूति ओथंबलेली होती आणि ‘ ली ’ व ‘ कॅरॉल ’ या आमच्या स्नेह्यांच्या डोळ्यांतून कौतुक ओसंडत होतें. शेवटीं माझे हाल मलाच

पाहवेनात म्हणून मी थांबलों, आणि माझ्या प्रात्यक्षिकाचा आमच्या अमेरिकन श्रोत्यांवर काय परिणाम झाला आहे याचा अदमास घेतला. त्यावरून मला असें कळलें कीं, माझ्या नांवाचा उच्चार 'वार' असा होतो अशी कॅरॉलची खात्री झाली होती, तर याच नांवाचा उच्चार 'वाड' असा होतो असें 'ली'-ला खात्री-पूर्वक वाटत होतें. त्या दोघांपैकी बरोबर कोण हा वाद मी सोडवत बसलों नाहीं पण अमेरिकन भाषेत नसलेलीं 'ज्ञ', 'क्ष' आणि विशेषतः 'ङ' व 'ञ' सारखी अक्षरें मराठींत असल्यामुळे मराठी भाषा ही सर्वश्रेष्ठ भाषा कशी हें आमच्या अमेरिकन स्नेह्यांना कसें पटवून देतां येईल याचा विचार करूं लागलों.

अमेरिकेच्या दक्षिण-राज्यांतले लोक असे कांहीं विचित्र हेल काढून बोल-तात कीं त्यांच्या बोलण्याचा अर्थ एकालाहि समजूं शकत असता तरी मला त्याचें कौतुकच वाटलें असतें. 'थिऑलॉजी'वरचीं तीन लांबलचक भाषणें अशा एका 'हेलकरी' वक्त्याकडून ऐकण्याचा दुर्धर प्रसंग माझ्यावर ओढवला होता. आश्चर्य असें कीं, एवढ्या गहन विषयावर इतक्या गहन उच्चारांत हीं भाषणें चालू असतांनाहि श्रोत्यांपैकीं बरेच लोक अनेक वेळां हंसत आणि टाळ्या वाजवीत होते. आणि माझी खुर्ची दुर्दैवानें पहिल्याच रांगेंत असल्यामुळें मलाहि जागें राहून या दोन्ही गोष्टी करणें भाग पडत होतें. भाषणानंतर कांहीं अमेरिकन श्रोत्यांना मीं व्याख्यात्यांच्या वक्तव्याबद्दल विचारलें. 'कुणा लेकाला समजलंय ?'—त्यांतले बहुतेक म्हणाले. मग माझ्या लक्षांत आलें, कीं मुंबई-पुण्याला जेव्हां लोक इंग्रजी सिनेमा पहायला जातात तेव्हां पिकणारा हंशा हा जसा बहुधा एकदोन जाणकारांच्या हंसण्यामुळें सुरू झालेला असतो, तशाच हंशाचा हा प्रकार असावा. अनेक भाषा नसल्यामुळें जें भाषावैचित्र्याचें सुख अमेरिकन लोकांना अनुभवतां येत नाहीं, तें मिळविण्याचा हा एक प्रकार वाटला.

इंग्रज लोकसुद्धां ज्यामुळें बुचकळ्यांत पडूं शकतील असे अनेक शब्द अमेरिकन लोक नेहेमीं वापरतात. त्यामुळें इंग्रजी हें 'वाघिणीचें दूध' म्हणून तें केवळ चमचा चमचा प्राशन केलेल्या माझ्यासारख्याची अमेरिकन शब्दांनीं पंचाईत करावी, यांत आश्चर्य कसलें ? इतरत्र 'फ्लॅट' भाड्यानें घेणें सोपें असलें तरी अमेरिकेंत तें जवळजवळ अशक्य असतें. कारण तिथें या शब्दाचा अर्थ,

अनेक इमारतींनीं बनलेला रस्त्याचा एक लांबलचक भाग असा होतो. अमेरिकेंत ‘पोलिस’ हा पोलिस रहात नाहीं. त्याचा ‘कॉप’ (अमेरिकन उच्चार—‘खाप’) होतो. आणि अमेरिकन मुलें प्रेमानें पोलिसदादाला ‘खापर’ (कॉपर) म्हणतात. तेव्हां कशाचें खापर कोणाच्या माथ्यावर तीं फोडीत आहेत याचा पत्ता लागत नाहीं. तसेंच ‘रेल–रोड’ याचा अर्थ रेल्वे आणि रस्ता असा होत नाहीं. हा मुळीं द्वंद्वसमासच नव्हे. रेलरोड म्हणजे फक्त रेल्वेच. पण सगळ्यांत मौज ‘गॅस्’ या शब्दाची. ही नसती पीडा लोक विकत कां घेतात हें एकदम जरी ध्यानांत येत नसलें तरी लवकरच, ‘गॅस्’ हा केवळ माणसाच्या पोटाचा प्रश्न नसून मोटारी चालविण्यासाठींहि त्याची जरुरी असते हें कळून चुकतें.

‘नांवाविषयीं आजीबाई’ नांवाचा जो प्रकार आपल्याकडे रूढ आहे, त्याचा मागमूससुद्धां अमेरिकेंत मला कुठें आढळला नाहीं. खरें म्हणजे आपल्याला ‘आजी’ म्हटलेलें कुठल्याच अमेरिकन आजीला आवडल्याचें माझ्या ऐकिवांत नाहीं. सत्तर वर्षांच्या म्हातारीचें नांव ‘एलिझाबेथ’ असलें तरी तिलाहि ‘लिझ’ असेंच म्हणायचें, आणि एलिझाबेथ टेलरलाहि ‘लिझ’ असेंच म्हणायचें. ‘रॉबर्ट’ या नांवाचा मालक कितीहि म्हातारा आणि पोक्त असला तरी त्याला हांक मारायची ती ‘बाऽब्’ या नांवानेंच. तसेंच ‘विल्यम्’चा झटकन् ‘बिल्’ होऊन जातो, ‘थॉमस’चा ‘टॉम्’ होतो, ‘थिओडॉर’चा ‘टेड्’ होतो. ६२ वर्षें वयाच्या माझ्या एका प्रोफेसरला त्याची बायको ‘ब्लॅकी’ या सुटसुटीत नांवानें हांक मारायची; तर प्रोफेसर ‘पेष्किन्’ असें भारदस्त रशियन वाटणारें नांव असलेल्या माझ्या एका अमेरिकन मित्राला मी ‘बडी’ असें म्हणत नसें म्हणूनच माझा राग यायचा.

आमच्याकडे कित्येक लोक आपल्या बायकांना नांवानें हांक मारीत नाहींत असें मीं ‘बडी’ला सांगितलें तेव्हां त्याचा माझ्यावर विश्वासच बसेना.

“म्हंजे मग ते बायकांना हांका तरी कशा मारतात ?”

“नुसतंच ‘अग’ किंवा ‘ए’ असं म्हणतात.” मीं खरें तें सांगितलें.

“त्यापेक्षां शिट्टी वाजवलेली काय वाईट ?” बडी म्हणाला.

आतां बायकोचें लक्ष वेधण्याकरितां नवरेलोक शिट्ट्या कां वाजवीत नाहींत

याचें उत्तर मी काय देणार? मीं विषय थोडा आणखी मागें नेला आणि पूर्वी 'ऐकलं का?' अशी प्रस्तावना करून निरोप कसे सांगितले जात असत, तसेंच मुलाला उद्देशून केलेलें वक्तव्य बायकोला किंवा नवऱ्याला उद्देशून कसें असायचे, हें बडीला सांगितलें.

एकदां आमच्या घराशेजारच्या ईगन नांवाच्या म्हाताऱ्या गृहस्थाशीं मी बोलत उभा होतों. तो आपल्या मोटारींतून बसून बाहेर जाण्याच्या तयारींत होता.

"काय निघाला बाहेर?" मी सहज म्हणालों.

"हा काय निघालोंच! त्या 'पोरी' (girls) आल्या कीं निघणारच."

गंमत म्हणजे तेवढ्यांतच सत्तर ते पंचाहत्तर वर्षांच्या त्या दोन 'गर्ल्स' बाहेर आल्या आणि ईगन या सत्तर वर्षांच्या पोराबरोबर (boy) त्या फिरायला निघून गेल्या.

मोटार दिसेनाशी होईपर्यंत मी मग त्या लहानग्यांचें कौतुक करीत तिथेंच उभा राहिलों.

कांही लोकांना हा प्रकार अमेरिकन पोरकटपणाचा एक उत्तम नमुना वाटतो. मला मात्र तसें कधींच वाटलेलें नाहीं. माणसाचा जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन त्याच्या भाषेवरूनसुद्धां लक्षांत येतो. या माझ्या मित्रांच्या भाषेवरून मला त्यांचा दृष्टिकोन किती खेळकर आणि प्रसन्न आहे हें लक्षांत आलें.

एकाच नांवाची भाषा बोलणाऱ्या इंग्रज आणि अमेरिकन साहेबांतला फरक अटलांटिक महासागराइतका मोठा आहे. कोणीतरी ओळख करून दिल्याशिवाय दुसऱ्या माणसाशीं काय वाटेल तें झालें तरी बोलायचें नाहीं असा इंग्रजांचा बाणा. पण अमेरिकन माणूस असल्या औपचारिकपणाची वाट पाहात बसणार नाहीं. तुम्ही कुठें त्याला भेटला कीं तो हंसतमुखानें तुमच्याजवळ येईल, हस्तांदोलनासाठीं हात पुढें करील आणि म्हणेल,—

"आय् ॲम् बॉब्. ग्लॅड् ट सी या."

अशा वेळीं आपला संकोच सगळा नाहींसा होतो, आणि प्रसंगाला योग्य असे इंग्रजी शब्द मनांत जुळूं लागतात.

स्वभावांतल्या अनौपचारिकपणाचें भाषा हें कसें माध्यम होऊं शकतें याचें

एक उदाहरण मला आठवतें.

माझे वयोवृद्ध प्राध्यापक 'ब्लॅकी' आमच्याकडे जेवायला आले होते तेव्हां आम्ही गप्पा मारीत बसलों होतों. भाषेच्या गंमतींविषयीं बोलत असतांना या गृहस्थांनीं 'ओः बॉय' (oh boy) हे दोनच शब्द आश्चर्य, भीति, समाधान, खेद, कारुण्य इत्यादि वेगवेगळे भाव व्यक्त करण्यासाठीं कसे वापरतां येतील हें (साभिनय) म्हणून दाखविलें. त्या ठिकाणीं एखादा इंग्रज साहेब हजर असता तर केवळ आमच्याशीं ओळख करून दिलेली नसल्यामुळेंच तो हंसला नसता. नाहींतर त्यालाहि हंसणें आवरणें कठीण झालें असतें.

अमेरिकन लोकांच्या अनौपचारिक भाषेची, मिकेश या आमच्या एका समव्यावसायिकानें खूपच टिंगल केली आहे. अल्बर्ट आइन्स्टीन एखाद्या क्लबचा पाहुणा म्हणून गेला असता तर 'हाय ॲल्बी ! व्हाट अबाउट रिलेटिव्हिटी ?' असें म्हणून त्यांचें स्वागत झालें असतें, 'द ग्रेट मॅथेमॅटिकल गाय्' म्हणून त्याची ओळख करून देण्यांत आली असती, असा मिकेशचा दावा आहे. पण मला मात्र असें वाटतें कीं, आइन्स्टीनची अशी ओळख करून दिली नसती तर त्यालाच संकोचल्यासारखें झालें असतें. आपल्याशीं थोडासाच परिचय झालेला असला तरी आपले अमेरिकन मित्र जेव्हां आपल्याला घरच्या नांवानें हांक मारायला लागतात, तेव्हां मनांतली एक वेगळीच तार छेडली जाते हें खोटें नाहीं.

उच्चारांच्या बाबतींत अमेरिकन लोकांनीं जसें स्वातंत्र्य मिळविलें आहे, तसेंच स्पेलिंगच्या बाबतींतसुद्धां. अवघड शब्दांची स्पेलिंग्ज लक्षांत ठेवून मास्तरांची शाबासकी मिळविणें हें तेथें एकंदरींत कठीणच. कारण अनावश्यक अक्षरें आल्यामुळें अवघड वाटणाऱ्या शब्दांतून अशा उडाणटप्पू अक्षरांची अमेरिकन लोकांनीं मुळीं उचलबांगडीच केली आहे. तरीही Psychology मधला 'P' किंवा Knowledge मधला 'K' हे अजून शिल्लक आहेतच. आपल्या एका नायकाचें नांव Psmith (P अनुच्चारित) असें ठेवून पी. जी. वोडहाउसनें असल्या अनुच्चारित अक्षरें लिहिण्याच्या पद्धतीची खूप टिंगल उडवली आहे.

लोकांची नेहमींच्या व्यवहारातली भाषा कितीहि बदलली तरी कायद्याची भाषा बदलणें हें कर्म कठिण असतें. मराठींत कितीहि क्रांतिकारक बदल झाले,

नवें शुद्धलेखन आलें, अनुच्चारित अनुस्वारांना पूर्णविराम मिळाला, तरी आपल्या कायद्याच्या भाषेंतील 'भ्रतारा 'चा अजून 'नवरा' झालेला नाहीं, कीं 'कळविणेंस येतें कीं' याचें 'कळविण्यांत येतें कीं' असेंहि झालें नाहीं. अमेरिकन इंग्रजींत कितीहि क्रांतिकारक बदल झाले असले तरी अजूनहि 'नॉट् विथस्टँडिंग', 'व्हेअरॲज', 'व्हेअरफर' यासारखे भयानक शब्द कायद्याच्या भाषेंत उजळ माथ्यानें वावरत असतात हें नवल आहे.



अमेरिकन 'गर्ल' !

अनौपचारिकपणा सगळ्या पातळ्यांवर असूनहि त्यांत उद्धटपणाचा गंधहि आढळूं नये हें विशेष वाटतें. अमेरिकेंतल्या एखाद्या दुकानांत, बँकेंत, पोस्टांत, हॉटेलांत किंवा आणखी कुठेंहि गेलों तरी आपल्यापाशीं बोलतांना इतकी मृदु आणि मुलायम भाषा वापरली जाते कीं 'मूर्तिमंत भीति उभी' याप्रमाणें मूर्तिमंत सौजन्य आपल्यापुढें उभें असल्याचा भास होतो. तेथील मदतनीसांशीं बोललें म्हणजे आपल्याला मदत करण्यासाठीं त्यांनीं आपलें जीवनसर्वस्व वाहिलें आहे काय असें वाटायला लागतें. 'कसं काय, ठीक आहे ना!' असें आपल्याला विचारायची बँकेंतल्या मुलीला जरूरच काय? किंवा 'आज हवा छान आहे. ऊन किती सुंदर पडलं आहे, नाहीं?' असें सुपरमार्केटमधल्या बाईला पैसे घेतां घेतां मधेंच थांबून म्हणायचें कारण काय? पण असेंच अगदीं सहजपणें हे लोक सौजन्य उधळीत जात असतात.

अशा बोलण्यांतून व्यक्त होणारी भावना वरवरची असेना, पण तिचें महत्त्व आपल्याकडे जे अनुभव येतात ते पाहिले म्हणजे तीव्रतेनें जाणवतें. अमेरिकेहून

परत आल्यावर परवां मी आपल्या बँकेत ( पैसे ठेवण्यासाठीं ) गेलों होतों. असे प्रसंग माझ्या आयुष्यांत क्वचितच येत असल्यामुळें मी खुषींत होतों. परंतु बँकेतल्या क्लार्कसाहेबांना माझा बहुधा रागच आला असावा. सकाळींच उठून हे लोक बँकेंत पैसे भरायला येतात म्हणजे काय ? ' साहेब ' बोलण्याच्या मनःस्थितींतच नव्हते. समोरचें लेजर उचलतांना त्यांना इतके कष्ट झाले कीं, कांहीं बोलण्याचा त्रास मीं दिला असतां तर त्यांना बहुधा रडूंच कोसळलें असतें. पैसे भरायला मी बँकेंत गेलों याबद्दल त्या दिवशीं मला अत्यंत दुःख झालें, आणि त्या बिचाऱ्या कष्टी जिवाला माझ्यामुळें दुःख झालें म्हणून अपराधी अंतःकरणानेंच मी घरीं परतलों. ' आज पाण्याला प्रेशर आहे कीं नाहीं ? ' किंवा ' काय, पैसे बँकेंत टाकतांय्. घरबिर बांधायचा विचार दिसतोय ! ' असे प्रश्न सदरहू इसमानें मला बिचारायलाच पाहिजे होते असा माझ्या म्हणण्याचा अर्थ नाहीं. पण समजा विचारले असतेच तरी त्याच्यावर कांहीं आकाश कोसळलें नसतें. आजकाल सगळ्याच वस्तूंची फार महागाई झाली आहे हें मी ऐकून होतों परंतु बँकेच्या कारकुनांची इतकी ' भाव '—वाढ झाली असेल अशी मला कल्पना नव्हती.

आशय व्यक्त करण्यापेक्षां आशय लपविण्यासाठीं भाषेचा उपयोग करणें हेंच जास्त सुसंस्कृतपणाचें लक्षण आहे, असें कित्येकांना वाटतें. अमेरिकन लोकांची धडपड मला या उलट वाटली. विशेषतः आडपडदा न ठेवतां किंवा साखरपेरणी न करतां जेव्हां ते बोलतात तेव्हां तें आपल्या ' सुसंस्कृत ' मनाला खटकत असलें तरी त्या बोलण्यांतला निर्मळपणा, प्रामाणिकपणा हा आपल्याला नाकारतां येत नाहीं.

अमेरिकन इंग्रजीला इंग्रजी कां म्हणतात, या अवघड प्रश्नाचें उत्तर जरी यक्षाला देतां आलें नसतें, तरी माझी टाळी मागीत तो मला नक्कीच म्हणाला असता,—" पण कांहींहि म्हणा देवा, या अमेरिकन माणसांची भाषा फारच फक्कड आणि दिलखुलास ! अगदीं नंबर वन् ! "

ठाणे ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ................ दि: ................
क्रमांक ................ नों दि ................

# ६ : माझी अमेरिकन शाळा

माझी शाळा म्हणजे एक प्रचंड कारखाना आहे. ‘ बालबोध वाचन-पुस्तक पाहिलें ’मधील नाना, जर आपल्या मनी नांवाच्या बहिणीला माझी शाळा दाखवायला घेऊन आला, तर हा कारखाना दाखवितांना नानाचे पाय दुखतील आणि मनी रडकुंडीला येईल. ‘ ही पहा आमची शाळा ’ असें म्हणून त्याला एखादें कौलारू घर दाखवितां येणार नाहीं. नाना जर शहाणा असेल तर तो एक मोटार विकत घेईल. ( यांत कांहीं अवघड नाहीं. बऱ्यापैकीं मोटार इथें ५०० रुपयांना विकत मिळतें ! ) आणि शनिवार, रविवार किंवा सुट्टीचा एखादा दिवस पसंत करून तो शाळा दाखवायला येईल. शाळा चालू असतांना आवारांत मोटारी आणण्याची ‘ सक्त मनाई ’ आहे.

पण माझी शाळा म्हणजे एक चक्रव्यूहसुद्धां आहे. तिच्यांतून बाहेर येणें (आपल्याला पाहिजे तिथें) हें जितकें अवघड तितकेंच आंत शिरणेंहि कठीण. अशा ठिकाणीं मग मोटारचा उपयोग नाहीं. तरीहि परिस्थिति तितकीशी कठीण नाहीं. कारण ‘ वाटाड्या ’ च्या ऑफिसांत गेलें कीं तो लागेल ती माहिती आणि नकाशाहि देतो. मात्र कित्येक वेळां हें ‘ चौकशी खातें ’कुठें आहे याचीच चौकशी करावी लागते हे वेगळे !

चारपांच मजली अशा पंचवीसतीस इमारतींत माझी शाळा आहे. इथें मॅडिसन्मध्यें २३ हजार आणि इतर ठिकठिकाणचे मिळून ३५ हजार आम्ही शाळकरी विद्यार्थी आहोंत. ३।४ हजार विद्यार्थ्यांची राहण्याची सोय आहे.

मुख्य ग्रंथालयांत ८ लाखांच्यावर, विषयांच्या ग्रंथालयांत ३ लाख आणि लाखों इतर पुस्तकांच्या राशी आहेत. शाळेची ' फी ' सहामाहीला ( फक्त ) ११२५ रुपये आहे. ( पण ही फी कमीच आहे; कारण आमची शाळा सरकारी आहे. खाजगी शाळांत सुमारे ३००० रुपये फी सहामाहीला असते. )

पण या अवाढव्य कारभारालाहि मी ' शाळा ' च म्हणतो. कारण तात्या पंतोजींच्या जुन्या शाळेंतली छमछम विद्या देणारी छडी सोडली तर एरवी आमची शाळा तशीच आहे. छडीला हात न लावतां आणि मानेवर खडा न ठेवतां पोरांबाळांकडून अभ्यास करून घेण्याचें कसब आमच्या पंतोजींना चांगलेंच अवगत आहे. ते दर आठवड्याला किंवा कधीहि छापील कागदांचे गठ्ठे वर्गांत आणून वाटतात. ' मुलांनो, हें होमवर्क आहे. तें घरीं करून आणा. नाहींतर तुम्हांला आंगठे धरून उभे करीन. ' अशा प्रकारच्या धमक्या ते देत नाहींत. पण ' होमवर्क ' केलें नाहीं तर परीक्षेलाच बसतां येत नाहीं, किंवा बसून उपयोग नसतो. म्हणजे आली का पंचाईत ! अंगठे धरण्यापेक्षांसुद्धां वाईट शिक्षा आहे कीं हो ही. शिवाय या गृहपाठाचीं उत्तरें ' गाईड ' नांवाच्या महान् ग्रंथांत किंवा पुस्तकाच्या शेवटीं ' उत्तरें ' नांवाचा प्रत्येक क्रमिक पुस्तकाचा जो सर्वांत महत्त्वाचा भाग असतो त्यांत दिलेली नसतात. एकूण काय, गुरुजींनीं मानेवर खडा ठेवला नाहीं, तरी स्वतःलाच तो ठेवून घ्यावा लागतो. खडा कोणी ठेवायचा हा फक्त तपशीलांतलाच फरक.

दर सहा आठवड्यांनीं गुरुजी आमच्या परीक्षा घेतात. दर आठवड्याला वाचायचीं पुस्तकें, लेख इ. नेमून दिलेले असतात. तें सर्व वाचन आपल्या गुणी विद्यार्थ्यांनीं घरीं केलेलें आहे असें गृहीत धरण्यांत येतें. माझ्या अर्थशास्त्राच्या प्राध्यापकांनीं १०० पुस्तकें व २०० ते २५० आर्टिकल्सची यादी आम्हांला सहामाहीच्या सुरुवातीलाच दिली आणि बजावलें, " बाबांनो, हें सगळें वाचण्याची जबाबदारी तुमची आहे. हां, तसें मी तुम्हांला मार्गदर्शन वगैरे करीन, पण १८ आठवड्यांत मीं पामर काय करणार ? " परीक्षा आणि नेमून दिलेला अभ्यास, शिवाय त्यावर वर्गांत चर्चेची जबाबदारी. पण ११२५ते ३००० रुपये फी दर सहामाहीला द्यायची असेल तर प्रत्येकजण हेंच म्हणतो, " या देशांत लोकशाही आणि मतस्वातंत्र्य असतांनासुद्धां गुरुजींनीं आपल्यावर

असा भयंकर अन्याय करावा अं...पण काय करणार!'' आणि मुकाट्यानें पुस्तकांची पडशी खांद्यावर टाकून लाखांवारी पुस्तकें असलेल्या मेमोरियल लायब्ररीच्या दिशेनें तो चालायला लागतो.

कांहीं प्राध्यापकांचें आपल्या विद्यार्थ्यांवर अधिक प्रेम असतें. एवढा अभ्यास कदाचित् त्यांना अपुरा पडेल असें वाटून प्राध्यापक महाशय एखाद्या दिवशीं सकाळीं वर्गांत येतांना प्रश्न आणि उत्तरपत्रिका घेऊनच वर्गांत येतात. रात्री उशिरापर्यंत अभ्यास केल्यामुळें अर्धवट झोपेंत असलेला विद्यार्थी डोळे चोळीत पाहतो तेहा त्याला लगेच लिहिण्याची प्रश्नपत्रिका दितते आणि जरा वेळ डोळ्यांपुढें काजवे चमकले तरी टेबलावरच्या उत्तरें लिहायच्या निळ्या वहीकडे त्याला दुर्लक्ष करतां येत नाहीं. गुरुजींच्या या प्रेमळ वागणुकीचा अनुभव ( सुदैवानें ) आम्हाला मिळूं शकत नाहीं. अंडरग्रॅज्युएट्सनाच हा खास प्रेमळ अनुभव मिळतो.

तात्यापंतोजीप्रमाणेंच आमच्या गुरुजींनाहि 'कर्तुमकर्तुम्–' सत्ता असते. 'शेवटच्या' परीक्षेची प्रश्नपत्रिका ते स्वतःच काढतात आणि तपासतात. साहजिकच गुरुजींना 'भिऊन' वागणें हें ओघानेंच आलें. त्यांनीं नेमून दिलेला अभ्यास करायला हवा, ते प्रश्न विचारतील तेव्हां 'जागे' असायला हवे. आणि झोपेंत उत्तर दिलें तरी तें बरोबरच्या आसपास असायला हवें. शिवाय वर्गांत चालणाऱ्या चर्चेंत आपलें 'अस्तित्व' निदान अधूनमधून जाणवायला हवे. हें अर्थात् वर्गांत सिगरेट ओढून किंवा कावळा-चिमणीचें आवाज करून किंवा डुलकी घेऊन नव्हे, तर बरोबरच्या बऱ्याच जवळचें उत्तर देऊन. गाइड उशाला घेऊन झोपणें किंवा 'क्लासवाल्या' गुरुजींच्या पायावर डोकें ठेवणें असले जादूचे प्रयोग करून इथें परीक्षेच्या किनारा गांठतां येत नाहीं. 'बी. ए. इंग्लिश इन् वन् डे' 'बी. एस्‌सी. फिजिक्स इन् दि ईझीचेअर' अशा थोर ग्रंथांचा इथें रद्दीइतकाहि उपयोग होत नाहीं.

अर्थात्, शिक्षणक्रमांत गुरुजींना इतकें महत्त्व देण्याचा शाळेचा जो हट्ट आहे त्यामुळें या देशाचें थोडेंफार नुकसान होतें हें खरें. तें म्हणजे अमेरिकेसारख्या एवढ्या मोठ्या उद्योगप्रधान देशांत 'गाइड्स' 'दीपिका' इ. तयार करण्याचा धंदा आणि परीक्षेंतील यशाची हमखास खात्री देणारा ( गुण न

आल्यास पैसे परत!) क्लासचा धंदा–या दोन महान उद्योगधंद्यांना मुळींच स्थान नाहीं. माझ्या मॅट्रिकच्या परीक्षेच्या वेळीं 'मॅट्रिक मराठीची तडक वाट' (मुखपृष्ठावर मराठीच्या यशोमंदिराकडे बोट दाखविणाऱ्या हाताच्या चित्रासह किंमत फक्त १२ आणे) नांवाचें एक पुस्तक बाजारांत आलें होतें. परीक्षेंत पास होण्याच्या अशा तडक वाटा इथें सांपडत नाहींत. गुरुजी दाखवितील ती एकच वाट आणि ही तर बहुधा 'बिकट' असते. धोपटमार्गानें जाऊन चालतच नाहीं.

याचें कारण काय तें मला माहीत नाहीं. पण आपल्याकडे अजून अमेरिकन डिग्रीला विशेष महत्त्व दिलें जात नाहीं. पुष्कळांचा असा समज असतो कीं, अमेरिकन शिक्षण अत्यंत उथळ असतें. कित्येकांचा असा गोड गैरसमज असतो कीं, अमेरिकेंत डिग्री मिळविणें हा केवळ पैशाचा प्रश्न आहे. म्हणजे फक्त पैसे घेऊन युनिव्हर्सिटींत जायचे, तिथल्या साहेबाला भेटून डिग्र्या वगैरे कुठें मिळतात हें विचारायचें, आपल्याला हवी असेल त्या डिग्रीचे पैसे साहेबाला द्यायचे. साहेब मग बहुधा आपल्या प्रकृतीची चौकशी करतो, नेहरू ठीक आहेत ना असें विचारतो, डॉलर्सच्या नोटा उजव्या ड्रॉवरमध्यें ठेवतो, मोड आणि डिग्री डाव्या ड्रॉवरमधून काढून आपल्या हातांत देतो. आणि शेकहँड करून म्हणतो 'बाऽऽ...यू'

इथें आल्यावर मी चौकशी केली पण 'चौकशी' खात्यांतला माणूसहि मला हा डिग्र्या देणारा साहेब आणि त्याचें टेबल यांचा पत्ता देऊं शकला नाहीं. साहेब सांपडेना आणि जवळ पैसेहि फार नाहींत, यावरून सुविचार सुचून मग डिग्रीच्या शोधार्थ आलेले विद्यार्थी बहुधा पुस्तकें आणि पुस्तकांची पडशी विकत घेतात आणि मानेवर खडा ठेवतात.

अभ्यास आणि परीक्षांची ही स्थिति लक्षांत घेऊनहि येथील गुरुजी म्हणजे कोणी अरेरावी 'हुकुमशहा' असें दिसत नाहीं. म्हणजे त्यांच्यांत कमालीचें सौजन्य, मदत करण्याची इच्छा, तयारी, दुसऱ्याला समजून घेण्याची धडपड–यांसारखे दुर्मिळ गुण असतात. वर्गामध्यें विद्यार्थ्यांना सर्व प्रकारचें स्वातंत्र्य असतें. वर्गांत गुरुजींसमोर सिगरेट ओढतां येणें, किंवा उशीरा येतां येणें, किंवा आपसांत बोलतां येणें हें मला फारसें महत्त्वाचें वाटत नाहीं; पण विद्यार्थ्याला

आपल्या जागीं बसून, आपल्या मोडक्यातोडक्या भाषेंत वर्ग चालू असतांना कधींहि, आपले विचार सांगतां येतात किंवा प्रश्न विचारतां येतात हें मला महत्त्वाचे वाटतें. आणि हा व्यत्यय मानला जात नाहीं. माझ्या वर्गांत एक तरतरीत अमेरिकन तरुण आहे. तो दर तासाला एकंदर दहा मिनिटें तरी स्वतः बोलल्याशिवाय राहात नाहीं. त्याला कांहींतरी म्हणायचें असतेंच. पण तो बोलायला सुरुवात कशी करतो माहीत आहे? "वॉऽऽल् (well चा उच्चार तो असा करतो) आय् डोन्ट नो..." आणि मग त्याला जें काय म्हणायचें असेल तें तो म्हणतो...या पद्धतीनें बोलणें आपल्याकडे शिष्टाचाराला धरून होणार नाहीं. बहुधा त्याला "If you don't know, why don't you shut up?" असें सांगण्यांत येईल.

मला दुसरा एक प्रसंग आठवतो. आमच्या सोशल सायन्सेसच्या इमारतींत आतां धूम्रपान करण्यास मनाई झाली आहे. त्याबद्दल आमच्या डीननें आम्हांला घरीं पत्रें पाठवून कळवलें होतेंच, नंतर वर्गांत सगळीकडे 'No Smoking'च्या सूचना रंगविण्यांत आल्याच. यानंतर एका तासाच्या आधीं माझा अमेरिकन मित्र वर्गांत सिगरेट् ओढत होता. तेवढ्यांत तासाची घंटा झाली आणि आमचे गुरुजी वर्गांत आले. माझा मित्र अजूनहि सिगरेट ओढत उभाच होता. थोडा वेळ तसाच जाऊं देऊन गुरुजींनीं सांगितलें "I am sorry Mr. Cassidy, but I have to call your attention to the notice on the wall" कॅसिडीनें सिगरेट विझवून टाकली. नंतर गुरुजी म्हणतात "माझ्या सेमिनारच्या वर्गांत मी स्वतःच तीनचार ॲश ट्रेज घेऊन जात असें. तसें खरें म्हणजे आणायला हवेत...पण सगळ्यांच्या पुरेसे माझ्याजवळ नाहींत...अर्थात् मीसुद्धां हा नियम मोडतों म्हणा कित्येकदां. पण सिगरेट फरशीवर विझविली म्हणजे तिचा काळा डाग पडतो म्हणून ही नवी सूचना केलेली आहे." यावर एक विद्यार्थी हंसत म्हणाला, "प्रत्येक डेस्कच्या बाजूला जर ॲशट्रेज लावून घेतले तर बरं होईल." आम्हीं हंसलों. कॅसिडी परत म्हणाला, "फोर्ड फाऊंडेशन्कडून या ॲशट्रेजसाठीं देणगी मिळवायचा प्रयत्न आपण कां करूं नये?" यावर आम्हीं सर्व परत एकदां हंसलों.

हा प्रसंग विस्तारानें सांगण्याचा हेतु आपल्याकडे वर्गांतून सिगरेट्स ओढा-

यला मोकळिक द्यावी किंवा बंदी करावी असें सुचविण्याचा नाहीं. अभ्यासाची एक शिस्त सोडून इतर बाबतींत विद्यार्थ्यांना किती स्वातंत्र्य इथें असतें एवढेंच मला सांगायचें आहे. सिगरेट ओढायची नाहीं तीसुद्धां तात्त्विक कारणाकरितां नव्हे तर नव्या फरशांवर डाग पडूं नयेत, किंवा लांकडी इमारतीला आगी लागूं नयेत या व्यावहारिक कारणाकरितां. वर्गांच्या बाहेर लॅबीज् आहेत, तसेंच ग्रंथालयाच्या इमारतींतहि कांहीं जागा अशा आहेत कीं, जेथें विद्यार्थ्यांना ( आणि अर्थात् विद्यार्थिनींनाहि ) धूम्रपान करतां येतें.

बाहेरून आलेल्या माझ्यासारख्या विद्यार्थ्याला स्वातंत्र्याचा हा प्रकार पाहून आश्चर्य वाटतें आणि यूनियन बिल्डिंगमध्यें जेव्हां लहानमोठे विद्यार्थी सर्रासपणें बिअर पितांना दिसतात तेव्हां तर धक्कासुद्धां बसतो. पण १८ वर्षांवरच्या मुलामुलींना बिअर प्यायची इथें मुभा आहे. कांहीं दिवसांपूर्वीं एका फूटबॉल सामन्यानंतर इथल्या मुलांनीं इतका दंगा केला कीं शेवटीं पोलिसांना गोळीबार करावा लागला. याविषयीं लिहितांना एका वर्तमानपत्रानें लिहिलें होतें कीं, २१ वर्षांपर्यंत मुलांना बिअर पिण्याची परवानगी नसावी. याबरोबर या वार्ताहरानें असेंहि लिहिलें होते कीं, मॅडिसनमधली जास्तींतजास्त बिअरचीं दुकानें युनिव्हर्सिटीजवळच आहेत आणि त्यामुळें विद्यार्थ्यांना बिअर घ्यायला ( आणि दंगा करायला ) उत्तेजन मिळतें. दुसरी एक गमतीची गोष्ट अशी कीं, युनिव्हर्सिटीपासून एक फर्लांग अंतरांत रम्, व्हिस्की इत्यादी हार्ड ड्रिंक्स मिळत नाहींत. पण जरा पुढें गेलें कीं, मद्याचे सर्व प्रकार भरपूर प्रमाणावर मिळतात.

अशीं प्रलोभनें आसपास असलीं तरी विद्यार्थ्यांची 'धुंदी' उतरवायला त्यांच्यावर टाकण्यांत आलेली अभ्यास करायची जबाबदारी पुरेशी आहे असें दिसतें. शाळा सुरू झाल्यावर पहिल्याच आठवड्यांत मी ग्रंथालयांत गेलों होतों तेव्हां शेंकडों विद्यार्थी-विद्यार्थिनी रीडिंग हॉलसमध्यें वाचत बसल्या होत्या. अशी गर्दी नेहमींच म्हणजे रात्रीं १० वाजतां ग्रंथालय बंद होईपर्यंत असते आणि परीक्षा जवळ आल्यावर तर बसायला जागासुद्धां सांपडत नाहीं. एकदां रविवारीं मी लायब्ररी उघडायच्या आधींच तिथें पोंचलों तेव्हां साठसत्तर विद्यार्थी भयानक थंडींत कुडकुडत दारापाशीं उभे होते. त्यादिवशीं उणें पंधरा फॅरनहाइट उष्णतामान (!) होतें!

पीएच. डी. नांवाची जी नामांकित वस्तु आहे ती अमेरिकेंत कुठल्याहि चांगल्या दर्जाच्या शाळेंत दुर्मिळ असते. तीन साडेतीन वर्षांत पीएच. डी. मिळविणें हीसुद्धां फार अवघड गोष्ट. अहोरात्र तीन तीन, चार चार वर्षे इथें अभ्यास करीत असलेले विद्यार्थी मला माहीत आहेत. 'काय, पीएच. डी. कुठपर्यंत आली?' मी त्यांना विचारतों. 'छे हो, कसली पीएच. डी. अन् कसचं काय? तीन वर्षं झालीं पण अजून किनारासुद्धां दिसत नाहीं'... मग त्या दिवसभर अभ्यास करून प्रयोगशाळेंत काम करून दमल्याभागलेल्या जिवाला मी म्हणतों, "हाउ अबाउट सम् टी ॲट माय प्लेस?..." दुसरें काय म्हणणार? हे सर्व विद्यार्थी भारतामध्यें पहिला वर्ग मिळवून वरच्या परीक्षा पास झालेले असतात हे आणखी.

थँक्स गिव्हिंगचे दोन दिवस आणि क्रिसमसचे १४ दिवस सोडले तर आमच्या शाळेला सुट्या म्हणून नाहींत. गॅदरिंग वगैरे 'करमणुकीचे कार्यक्रम' नाहींत. म्हणजे शाळा त्यांत लक्ष घालत नाहीं. विद्यार्थ्यांनीं आपापले अभ्यास संभाळून कितीहि करमणूक करावी. कितीजणांना त्यांत भाग घेतां येतो मला माहीत नाहीं. मला वेळ होत नाहीं आणि झाला तर मी तो (माझ्या मतें) इतर चांगल्या उद्योगांत खर्च करतों. अमेरिकन लोकांना भेटणें आणि त्यांच्याशीं बोलणें हा माझा एक छंद आहे. याचा अर्थ मी मधमाशीसारखी सारखी माहिती गोळा करीत असतों असें नव्हे. पण यांतूनच अमेरिकन लोक म्हणजे काय, हें मला जास्त चांगलें समजेल असें वाटतें. इथल्या विद्यार्थ्यांना एवढाहि वेळ नसतो. सतत अभ्यासाचें ओझें वाहणाऱ्या या मुलांना पाहिलें म्हणजे तीं अगदीं व्रतस्थ असल्यासारखें वाटतें.

त्यांतून बरींच मुलें-मुली नोकऱ्या करीत असतात. बहुतेकांना बाबा फीचे पैसे देत नाहींत किंवा मनिऑर्डरी पाठवीत नाहींत. नवरा किंवा बायको किंवा दोघेहि नोकऱ्या करतात. शाळेंत जाऊन शिकतात. कितीकदां दांपत्यांतील एक भागीदार नोकरी करतो, एक शिकतो. मुलांना सांभाळणें ही आणखी एक जबाबदारी असते. कारण आजी नांवाची प्रेमळ, सगळें सहन करणारी आणि शिवाय बट-व्यांत औषधें बाळगणारी संस्था इकडे नसते. म्हणजे असली तरी तिला नात-वंडांचें कौतुक करायला वेळ नसतो. तिला स्वतःचें घर, स्वतःचीं कामें असतात.

सत्तर वर्षांची एखादी आजी व्होकेशनल स्कूलमध्यें पेंटिंग शिकायला जाते. आतां या आजीबाईंना नातू संभाळायला कसें फावणार? मग 'बेबीसिटर' शोधायची. ती सांपडली आणि यायला तयार झाली तरी मूल संभाळायला तासाचे ५ ते ६। रुपये ( १ ते १·२५ डॉलर्स ) घेते. एकंदरीत काम कठीण आणि खर्चाचें असतें. कांहीं दिवस नोकरी करायची, कांहीं दिवस शाळेंत जायचें अशी तडजोड कांहीं विद्यार्थी करतात.

माझ्यासारख्या सरकारी शाळेंत येणारीं मुलें मुख्यतः मध्यमवर्गीय असतात. कारण सरकारी शाळांत फी कमी असते. 'हारवर्ड' 'येल'सारख्या पब्लिक स्कूल्समध्यें ही फी दुप्पट, अडीचपट असते. तिथे श्रीमंत मुलें जातात. कपड्यांची किंवा इतर कसलीच फारशी ऐट माझ्या शाळेंतल्या मुलांना परवडत नाहीं. परकीय देशांतून आलेले विद्यार्थीच इथें चटकन् ओळखतां येतात. याचें मुख्य कारण म्हणजे त्यांचा पोशाख पुण्याच्या भाषेंत सांगायचें तर 'कडक' असतो. माझा एक अमेरिकन मित्र आहे तो व्हॅक्युम् क्लीनर्स विकून पैसे मिळवतो. एका सुट्टींत तर त्यानें ५०,००० कपबशा विसळल्या. ( यंत्राचें साहाय्य न घेतां.) दुसरा एक मित्र येत्या सहामाहींत टॅक्सी डॉयव्हर बनणार आहे. अशा लोकांना 'कडक' कपडे वापरणें कसें परवडावे! पुण्याला ज्याप्रमाणें मी गॅदरिंगच्या दिवशींच फक्त कोट घालीत असे त्याप्रमाणें माझे मित्र खास प्रसंगीं टाय आणि सूट वापरूं शकतात.

बॅस्कम् हिलवर एब् लिंकनच्या भव्य पुतळ्यासमोर असलेली माझी शाळा फार सुंदर दिसते. पलीकडच्या बाजूला 'बॅस्कम् वूड्स्' आहेत. तिथून खालीं उतरलें की निळेभोर मॅन्डोटा तळें आहे. फर्गसन् कॉलेजच्या कॅंपसइतके हें कॅंपस सुंदर आहे. सर्व सुखसोयींनीं सज्ज अशा प्रयोगशाळा, ग्रंथालयें इथें आहेत. पण तरीहि मला ही शाळा आपल्या कॉलेजइतकी आवडत नाहीं. कारण असें आहे कीं कारखाना कितीहि प्रचंड आणि भव्य असला तरी कारखान्यावर कोणी प्रेम करूं शकत नाहीं. माझी इथली शाळा ही एखाद्या कारखान्यासारखी आहे. ती सारखी विस्तारत आहे. नव्या नव्या टोलेजंग इमारती इथें सारख्या उभारल्या जात आहेत. लाखों डॉलर्स खर्ची पडत आहेत, नव्या जागा सारख्या विकत घेतल्या जात आहेत, तिथें इमारती बांधायच्या योजना तयार होत आहेत.

पूर्वी फक्त बॅस्कम् हिलच्या एका टोंकावर असलेली शाळा आतां टेकडी उतरून शहरांत जिकडेतिकडे पसरत चालली आहे. तेवीस हजार या संख्येवर आमच्या शाळेच्या अध्यक्षांचें समाधान नाहीं. त्यांना ती आणखी वाढवायची आहे. विस्ताराच्या नव्यानव्या योजना ते तयार करीत आहेत.

इथल्या बहुतेक विद्यार्थ्यांना हें मानवत असेल पण कांहींना मानवत नाहीं हें मला माहीत आहे. माझा मित्र कॅसिडी एकदां वर्गाच्या खिडकींतून बाहेर बोट दाखवीत मला म्हणाला, ' ते इंजिनिअर्स पहा. बॅस्कम् वूड्ची कत्तल करण्याचा कट रचीत आहेत. ' आणि हेंच खरें आहे असें मला वाटतें. इंजिनिअर्स लोक आमच्या शाळेचा ताबा घेत आहेत. आमची सोशल सायन्सेसची नवी इमारत सुद्धां या वेड्यांनीं अशी बांधली आहे कीं ती तळ्याकडे पाठ करून उभी आहे.

इंजिनिअर्सच्या वाढत्या सत्तेचें हें एक बाह्य प्रतीक आहे. पण मला बेचैन करते ती गोष्ट ही कीं, इथें वावरणाऱ्या माणसांच्या संबंधांत सुद्धां हा यांत्रिकपणा आला आहे. अवघ्या पांच दिवसांत तेवीस हजार विद्यार्थ्यांचें रजिस्ट्रेशन होते हीं थक्क करून सोडणारी गोष्ट आहे, आणि नाहींही. आमच्या कॉलेजांत कसें वेगळें असतें ! एखाद्या विद्यार्थ्याला किंवा विद्यार्थिनीला अभ्यासांतलीच नव्हे तर कसलीहि अडचण असली तर तो किंवा ती प्रा. प्रधानांच्या खोलींत जातात. ' सरांना ' आपल्या अडचणी सांगतात. पुढें या सर्वच अडचणीतून मार्ग निघतो कीं नाहीं हें महत्त्वाचें नाहीं, पण प्रधानांना कळतें हें महत्त्वाचें आहे. आपल्या कॉलेजांत प्रिन्सिपलना भेटणें किती सोपें असतें ! इथें आमच्या शाळेचे जे प्रेसिडेंट आहेत त्यांना मी आजपर्यंत फक्त फोटोंतच पाहिलें आहे. अर्थात् त्यांच्याबिषयीं आणखीही एक गोष्ट मला माहीत आहे. ती म्हणजे त्यांच्या ऑफिससमोर ' No parking at any time ' अशी पाटी लावलेली आहे. आपल्याकडे प्रिन्सिपल ज्याप्रमाणें विद्यार्थ्यांसमोर पहिल्याच दिवशीं भाषण करतात तसला प्रकार इथें झाल्याचें ऐकिवांत नाहीं. तें व्यवहार्य आहे किंवा नाहीं हें मला माहीत नाहीं, पण तसें झालेलें मी ऐकलें नाहीं हें मात्र खरें.

या प्रकाराविषयीं मी एका अमेरिकन मित्राजवळ तक्रार करीत होतों. तेव्हां तो म्हणाला, " ओऽ मिस्टर गॅडगिल्, धिस युनिव्हर्सिटी इज् अ वेबी कंपॅरेटिव्हली. दि युनिव्हर्सिटी ऑफ् कॅलेफोर्निया हॅज् सिक्स्टी थावजंड्..." " अब्रब ! फारच

मोठी शाळा आहे कीं हो ती ?" मी म्हणालों. पण साहेबाजवळ माझ्या प्रश्नाला उत्तर नव्हतें हें माझ्या लक्षांत आल्याशिवाय राहिलें नाहीं.

माझ्या अमेरिकन शाळेचा हा महत्त्वाचा दोष सोडला तरीहि इतर लहान-सहान बऱ्याच गोष्टी खटकतात. त्यांचा त्राससुद्धां होतो. एक म्हणजे इतकीं पुस्तकें असलेल्या आमच्या ग्रंथालयांतसुद्धां पुस्तक (आपल्याला हवें तें) मिळेल कीं नाहीं याची शंका असते. माझ्या एका मित्राला मी म्हटलें; "ही तुमची लायब्ररीची पद्धत आपल्याला फार पसंत आहे बुवा ?"

"How come ?" त्यानें विचारलें.

"म्हणजे काय आहे, हवें तें पुस्तक मला इथें अजून कधींच मिळालेलें नाहीं. आणि नाहीं म्हटलें तरी त्याचा एक फायदा असा कीं, पुस्तकें वाचण्याची माझी जबाबदारी परस्पर मिटते ना !"

आणि मग आम्हीं दोघेहि खूप हंसलों.

शाळेच्या एवढ्या अफाट पसाऱ्यामुळें इथें पुरेशी वसतिगृहें नाहींत. मी इथें जागेसाठीं अर्ज केला होता. त्याचें मला त्यांनीं लांबलचक उत्तर दिलें. पत्राचा सारांश एवढाच की, "एक वर्षभर जागेबद्दल अगदीं कांहीं बोलूं नका. तोंपर्यंत जागा बिलकूल शिल्लक नाहींत." मी त्यांना उत्तर लिहिणार होतों कीं "एक वर्षानंतर मी बहुधा पुण्याला जाईन आणि सुदैवानें माझी तिथें राहण्याची बऱ्यापैकीं सोय आहे. कृपया माझें नांव वेटिंग लिस्टवर ठेवूं नका." सध्या मला जागा मिळाली आहे खरी, पण ती मिळवायला माझी बायको आणि मी सुमारें पंचवीसतीस मैल पायीं हिंडलों तेव्हां. पण जागेचा इथें इतका तुटवडा आहे कीं आम्हांला मिळालेली जागा आमच्या प्रयत्नानें मिळाली असा माझा मुळींच गैरसमज नाहीं. माझ्या पत्रिकेंत गुरु योग्य ठिकाणीं पडल्यामुळेंच ती मिळाली अशी माझी जवळजवळ खात्री आहे.

आणखी एक अडचण अशी आहे कीं, मोटारवाल्या विद्यार्थ्यांना गाड्या पार्क करायला जागा मिळणें जवळजवळ अशक्य असतें. म्हणजे एक वेळ मनासारखी मुलगी मिळेल पण पार्किंगसाठीं जागा मिळणें अवघड. त्यामुळें गाडी घरीं किंवा शाळेपासून मैल दीड मैल लांब ठेवून पायीं शाळेंत यावें लागतें. माझी गाडी नाहीं याबद्दल मला फार आनंद वाटतो तो या माझ्या

मित्रांच्या तक्रारी ऐकून.

माझ्याजवळ गाडी नाहीं ही खरें म्हणजे माझी सध्यांची अडचण नाहीं. सध्यांची अडचण एवढीच कीं मी राहतों तें घर पुढेंमागें शाळा विकत घेण्याचा विचार करीत आहे. (अर्थातच नवी इमारत बांधण्याकरितां!) आणि जर कां ही जागा आम्हांला सोडावी लागली तर मग नवी जागा शोधतांना माझे सगळे ग्रह आपापल्या ठिकाणींच निमूटपणें बसून राहतील कीं नाहीं याविषयीं मला धाकधूक वाटते. सध्यां मला अभ्यासापेक्षां याच काळजीचा अधिक त्रास होत असतो.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थ
अनुक्रम .................... वि: ........
क्रमांक .................... नों. दि. .....

# ७ : माझा दोस्त व्हिक्टर

माझा दोस्त व्हिक्टर कॅसिडी हा बिलक्षण चळवळ्या, अस्वस्थ मनाचा, चौकस आणि चलाख तरुण मुलगा आहे. त्याच्या निळ्या डोळ्यांत त्याच्या मनाचा अस्वस्थपणा, चळवळेपणा सदैव चमकत असतो. या वीस वर्षें वयाच्या मुलाचा चौकसपणा असामान्य असला तरी त्याला बालिशपणाचा गंधहि नाहीं. दाढीच्या लांबीवरून माणसाची अक्कल ठरत असेल तर या बेट्याची मिसरूड-सुद्धा कोवळी आहे. पण त्याच्याइतका तरतरीत, चलाख मुलगा मला अजून भेटलेला नाहीं. त्याचे अस्ताव्यस्त केस आणि त्याच्या चालण्यांतली ऐट, त्याचा जगाविषयींचा बेफिकीरपणा दर्शवितात. पण त्याची बेफिकिरी उर्मट नाही. समंजस आहे.

शाळेची शेवटची परीक्षा झाल्यावर व्हिक्टर मॅडिसनहून न्यूयॉर्कला गेला. कोलंबिया युनिव्हर्सिटींत अभ्यास करण्यासाठीं. वास्तविक त्याला घरून इतक्या दूर जाण्याचें कारण नव्हतें. कारण त्याचे आई-वडील दोघेहि इथल्या युनिव्ह-र्सिटींत प्रोफेसर्स आहेत. त्यांचें मॅडिसनला प्रशस्त घर आहे. त्यांच्याजवळ पैसाहि भरपूर आहे. पण व्हिक्टरला इथे राहायचें नव्हतें. त्याला यापेक्षां खूप मोठ्या शहरांत जायचें होतें. अमेरिका पाहायची होती. अनुभव घ्यायचे होते. न्यूयॉर्कमध्यें राहून व्हिक्टरनें खूपच वेगवेगळे अनुभव घेतले. न्यूयॉर्कच्या सुप्रसिद्ध स्लम्समध्येंसुद्धां तो राहिला. लहानसहान नोकऱ्या केल्या. शेवटीं कोलंबियाची बी. ए. सुद्धा मिळविली.

बरेच दिवस तो एका डॉक्टरच्या मेहेरबानीने त्याच्या दवाखान्यांत राहात होता. राहात होता म्हणजे रात्रीं झोपण्यापुरतें त्याला दवाखान्यांत येतां येई पण त्याऐवजी त्याला दवाखाना झाडून स्वच्छ करण्याचें कामहि करावें लागायचें. "हा माझा कार्यक्रम व्यवस्थित चालला होता, पण मग एके दिवशीं माझं त्या डॉक्टरच्या बायकोशीं कडाक्याच भांडण झालं. तिचं एक पाळलेलं कुत्रं होतं तें सारखं येऊन सगळया वस्तु पार उलट्यासुलट्या करून टाकायचं, खोली पार खराब करून टाकायचं. मी एकदा भयंकर संतापलो आणि माझं त्या कुत्र्याबद्दलचं खरंखरं मत तिला सांगितल!...परिणाम एवढाच झाला, की त्या रात्रीं मी त्या दवाखान्यांत झोपूं शकलों काही. रातोरात बयानं मला बाहेर काढलं. मला वाटतं त्या दिवशीं मी तापानं फणफणलेला असतों तरीहि त्या दवाखान्यांत तिनं मला थारा दिला नसता...मी त्या डॉक्टरला, त्यांच्या बायकोला आणि अर्थातच त्या कुत्र्यालाहि शिव्या देत बाहेर पडलों...आणि मग मला आठवलं, न्यूयॉर्कमधल्या एका श्रीमंत वस्तींत माझ्या वडिलांची कोणीतरी दूरची मावशी की आत्या राहात असे. साहजिकच मीं आजीचं घर शोधून काढलं आणि दुसरी जागा मिळेपर्यंत चार-पाच दिवस तिच्या अलिशान बंगल्यात मुक्काम टाकला!"

न्यूयॉर्कला असतांना व्हिक्टरनें लग्नहि करून टाकलें. "ही मुलगी मला मागं एकदां भेटली होती. पण मला तिच्याविषयीं कांहींच वाटलं नव्हतं. पुढं आम्ही कधीं भेटलोंहि नव्हतों. मग मला ती एकदां अचानक भेटली आणि कांहीं दिवसांनीं तिचा मला फोन आला. ती कुठल्यातरी भयंकर संकटांत सांपडली होती आणि कसंहि करून मीं तिचं संरक्षण करणं आवश्यक होतं. वेळ रात्रींची होती म्हणून मलाहि काळजी वाटली. मी तिच्या घरापर्यंत गेलों तेव्हां ती बाहेरच उभी होती. फार घाबरलेली दिसत होती. मीं तिला म्हटलं, "काय ग इन्ग्रिड, कसली एवढी आपत्ति कोसळली आहे तुझ्यावर?"

"व्हिक्टऽऽऽर म...म... मला व...व...वांचव रे लाडक्या!..." ती थरथरा कांपत म्हणाली.

व्हिक्टर हसायलाच लागला. त्याला माहीत होतें बायका घाबरून घाबरणार कशाला? फार तर हिच्या स्वप्नांत एखादा चोर आला असेल! "अग पण

सुंदरी, मी तुला कुणापासून वांचवूं? या न्यूयॉर्क शहरांत या क्षणाला तुझ्या आणि माझ्याखेरीज पंचाहत्तर लाख उणे दोन लोक राहतात."

"नाहीं रे व्हिक्टर, मला लोकांची मुळींच भीति वाटत नाहीं. लोक मला काय करणार? मी त्यांना पुरून उरेन. पण...प...प...पण!" व्हिक्टर आणखीच हंसायला लागला. सर्व वीरांगनांप्रमाणे इन्ग्रिड एखाद्या मिशीवाल्या झुरळाला घाबरली असणार, दुसरें काय! आणि त्याचा अंदाज अगदीं अचूक होता. कारण ती झुरळाला नाही पण त्याहीपेक्षां एका भयंकर प्राण्याला घाबरली होती. अगदीं डोळ्यांवर झोप आलेली असतांना तिनें खोलींत धावणारें एक उंदराचें पिल्लूं पाहिलें होतें आणि त्याच क्षणाला तिची झोप पार उडाली होती. धावत धावत जाऊन तिनें पहिला टेलिफोन गांठला होता आणि व्हिक्टरचा धावा केला होता!

"एकूण काय भुंगा आणि उंदीर एवढाच फरक आहे, पण अशीच गोष्ट कांहीं हजार वर्षांपूर्वीं आमच्याकडेही घडली होती." मी व्हिक्टरला म्हणालों आणि नंतर अर्थातच दुष्यंत-शकुंतलेची गोष्ट सांगणें ओघानें आलें. "मीं त्या दिवशीं इन्ग्रिडची व्यवस्था दुसरीकडे केली. पण सांगायचा मुद्दा हा की त्या क्षुल्लक उंदराच्या पोरामुळें हें महाभारत निर्माण झालं. पॅरिसमध्यें असतांना मला बिलकुल न आवडलेली ही मुलगीच काय ती मला आतां सुखी करूं शकेल असं मला वाटायला लागलं.'

लवकरच व्हिक्टरनें इन्ग्रिडशीं लग्न लावलें. "माझ्यापुढें सर्वांत महत्त्वाचा प्रश्न बायकोसाठीं अंगठी कुठून पैदा करायची हा होता. शेवटीं एका पॉन् शॉप्मध्ये गेलों, कुणीतरी तिथें गहाण ठेवलेली अंगठी पांच डॉलर्स देऊन विकत घेऊन आलों आणि वडिलांना फोन करून कळवलें, 'आजपासून मी माझ्या स्वातंत्र्याला कायमचा मुकत आहें!'"

चतुर्भुज झाल्यानंतर व्हिक्टर सहकुटुंब मॅडिसनला आला. त्या वेळीं त्याच्याजवळ पैसे नव्हतेच, पण राहायला जागाहि नव्हती. "आपल्या आई-वडिलांकडे कां नाहीं राहिलास?" मीं त्याला सहजच विचारलें.

"त्याचं असं आहे की माझे आईवडील फार भराभर जेवतात आणि आम्ही दोघे शांतपणें सावकाश जेवतों. आमचं कसं पटणार?"– व्हिक्टर

म्हणाला, आणि मग माझ्या लक्षांत आलें की हा प्रश्न आपण याला विचारायला नको होता.

मॅडिसनला आल्यावर व्हिक्टरने खूप पैसे मिळवायचें ठरवलें. पण नोकरींत इतके पैसे कुठें मिळणार? नोकरी म्हटली म्हणजे स्वातंत्र्य नाहींसे होतें तें वेगळेंच! म्हणून शेवटी त्यानें व्हॅक्यूम क्लीनर्सचा विक्रेता व्हायचें ठरविलें.

"आठवड्याला दोन व्हॅक्यूम क्लीनर्स लोकांच्या गळ्यांत बांधले कीं माझी बेगमी होते. प्रत्येक क्लीनरमागं मला चाळीस डॉलर्स कमिशन मिळतं."

"अरे, तें ठीक आहे. पण विकत कोण घेतो तुझे क्लीनर्स?" माझी शुद्ध मराठमोळी शंका.

"विकत कोण घेतात म्हणजे काय? मूर्ख लोक! तुला सांगू का, या मॅडिसन शहरालाहि जगांतल्या मूर्ख लोकांचा वांटा भरपूर प्रमाणांत मिळाला आहे. आणि आपल्याला कुठं त्यांतले सगळे हवे आहेत! आठवड्याला दोन गाठले म्हणजे झालं!"

तरीहि माझें समाधान झालेंच नाहीं. व्हिक्टरमधल्या विक्रेत्यानें हें ताबडतोब ओळखलें.

"त्याचं एक गुपित आहे. पहिलं म्हणजे घरांत पुरुष माणसं असतील अशा वेळा टाळूनच मुळीं मी विक्रीसाठीं बाहेर पडतों. घरांतल्या बाईसाहेबांना गाठलं की अर्धं काम फत्ते. पुरुष स्वतः पैसे मिळवत असल्यामुळं या बाबतींत कुचकामी असतात. व्हॅक्युम क्लीनर्ससाठीं १२० डॉलर्स खर्च करायचे हा त्यांच्या दृष्टीनं मूर्खपणा असतो. इतक्या शहाण्या लोकांना भेटण्यांत अर्थ नाही. बाईसाहेब त्यापेक्षां खूप बऱ्या. अर्थात् या सगळ्यांनाच बनवितां येतं असं नाहीं. पण कोण आपला माल घेईल आणि कोण नाहीं हें कळायला आतां मला फारसा वेळ लागत नाही. आपली डाळ शिजणार नाही असं एकदां कळलं की फारसा वेळ फुकट न घालवितां मी आपला गाशा गुंडाळतों. पण जर गिऱ्हाइकाच्या मनाचा एखादा भुसभुशीत कोपरा सांपडला तर मी तिथं भलंमोटं खिंडार पाडायच्या तयारींतच असतों."

"घ्यायचा कीं नाहीं हें तुम्ही एकदम ठरवूं नका. आधीं माझं प्रात्यक्षिक पहा. आणि मग काय तें बोला, बाईसाहेब. छेः छेः प्रात्यक्षिकाला कांहीं पैसे

नाहींत. हं, आता असं करा. तुमचा जुना व्हॅक्यूम क्लीनर आणा पाहूं...अरेरे! काय म्हणतां; या व्हॅक्यूम क्लीनरनं तुम्ही आपला हा इतका सुंदर, उंची गालिचा साफ करतां? च्...च्...आतां आमचं प्रात्यक्षिक. हें पाहा. आतां हा कचरा मी तुमच्या या गालिचावर टाकतों. प्रथम तुमच्या क्लीनरनं पाहूं काय होतं?...पाहिलंत. हा एवढा कचरा अजून शिल्लक आहे तुमच्या या सुंदर गालिचावर. आता हा आमचा क्लीनर!...पाहा. एक कण तरी राहिला आहे का! तुमच्या या उंची गालिचाचं सौंदर्य असं घालवूं नका बाईसाहेब. काश्मीरमध्यें घेतलात का इंडियाला गेलां होतांत तेव्हां? नक्कीच. दुसरीकडे कुठं इतका मूल्यवान गालिचा मिळायला! हां; आता तसं म्हणाल तर किंमतींत थोडा फरक आहे, पण माल तशी किंमत बाईसाहेब...हां, उगाच कमी किंमत घेऊन फालतू वस्तु तुमच्यासारख्या चांगलं-वाईट कळणाऱ्या, चोखंदळ गिऱ्हाइकाच्या गळ्यांत घालण्याचं पाप माझ्या हातून व्हायचं नाहीं. ...पैशाची बिल्कुल काळजी नको. कांहीं म्हणजे कांहीं घाई नाहीं. सावकाश द्या. पण तुमच्या फायद्याच्या दृष्टीनंच सांगतों. आता रोख दिलेत तर माझ्या अधिकारांत मी दहा डॉलर्स कमी करूं शकेन. अगदी आनंदानं. आतां तुम्ही म्हणाल, त्यांत मला फायदा काय? फायदा नाहींच. पण आनंद आहे की नाहीं बाईसाहेब. अहो, गिऱ्हाइकांचा संतोष हाच आमचा फायदा. मीं हा धंदा नव्यानंच सुरू केला आहे आणि माझा मुख्य हेतु सध्यां तुमच्यासारखं चोखंदळ, रसिक गिऱ्हाईक शोधून काढणं. पैसे मिळतील मागें पुढें. सध्यां पैशाची पर्वा नाहीं करायची. पहिलं गिऱ्हाइकाचं समाधान. काय?... किंमत तशी बिलकुल जास्त नाही हो. फक्त एकशेंवीस बक्स्. चुटकीसरसे देऊन टाकाल तुम्ही. आहे काय न् नाहीं काय...हो, आणखी एक सांगायचं राहिलंच बरं का. माफ करा हं. घाईत बिसरायला होतं. आमच्या कंपनीची गोल्डन ज्युबिली आहे. धंद्याचं म्हणजे ग्राहकांच्या सेवेचं हें एकावन्नावं वर्ष म्हणून आम्ही खास मालाच्या किंमती मुद्दाम कमी केल्या आहेत. असा सेल आतां पन्नास निदान पंचवीस वर्षे तरी नाहीं. अहो, हाच क्लीनर आम्हीं गेल्या वर्षी एकशेपन्नासला विकला. आतां तुम्हीच पहा; एकशें पन्नास डॉलर्स कुठं आणि अवघे एकशेवीस बक्स् कुठं!"

" एव्हाना बहुधा किल्ला सर झालेलाहि असतो. नसल्यास या शेवटच्या वाक्यानं तो होतोच. तीस अधिक दहा, एकंदर चाळीस डॉलर्स वांचवायची संधि ही सुगृहिणी फुकट कशी घालवील ? अर्थात् पुरुषांना यातलं कांहीं म्हणजे कांहींच कळत नसतं. पैसे कसे मिळवावे हें त्यांनीं पाहावं, पण ते हुशारीनं खर्च कसे करावे ही जबाबदारी बायकांचीच. हां, आतां कधींकधीं एखादे नवरोजी मधेंच उपटतात आणि आपल्या शिल्कीला एवढा खड्डा पडणार असं पाहून त्यांच्या काळजाचं पाणीपाणी होतं. पण बाईसाहेबांना यावेळीं नवऱ्यापेक्षां कोऱ्याकरकरीत व्हॅक्यूम क्लीनरची किंमत अधिक वाटत असते. एकदां एका ( उतावळ्या आणि अविचारी ) नवऱ्यानं असाच विरोध केला. पण बाईसाहेब ऐकेनात. तेव्हां त्यानं सांगितलं, ' खबरदार. माझ्या पाकिटांतून एक सेंटहि घेऊं देणार नाहीं तुला ! ' पण बाईसाहेब काय डरतात ? त्यांचं प्रत्युत्तर ठेवलेलंच होतं ! "

" अस्सं...ही माझी या घरांतली किंमत काय जॉन ? तें कांहीं नाहीं. तुला नको असला तर नको पैसे देऊस. गेल्या उन्हाळ्यांत मी स्वतः घाम गाळून पैसे मिळविले आहेत. माझे पैसे देऊन मी हा क्लीनर विकत घेणार. तुला माझ्या काश्मीरी गालिचाची किंमत नसली तरी मला आहे, आणि शिवाय तू कधीं काम केलं असशील तर तुला कळणार ना ! घर साफ करावं लागतं. असें म्हणून तरातरा बाईसाहेब घरांत चालत्या झाल्या आणि पांच मिनिटांत एकशेंदहा डॉलर्सचा चेक माझ्या हातांत पडला. जळजळीत नजरेनं पाहणाऱ्या त्या गरीब बिचाऱ्या नवऱ्याकडे पाहून मी येतांयेतां म्हणालों ' दोन दिवसांत हा सगळा राग विसरून-जाल तुम्हीं साहेब. तो क्लीनर एकदां काम करायला लागला की तब्येत खूष होऊन जाईल तुमची. ' पण निदान त्या वेळीं साहेबांची तब्येत गरम होती. म्हणून मी आपला मुकाट्यानं चेकची घडी नीट कोटाच्या आंतल्या खिशांत ठेवून तिथून सटकलोंच. "

मीं सहजच व्हिक्टरला म्हटलें, " अरे, तूं त्या गोल्डन ज्युबिलीविषयीं म्हणतोस खरा. पण ती किती वर्षं चालणार ? बोलूनचालून एक वर्षभरच ? "

" छेः रे ! आमची गोल्डन ज्युबिली चालूच राहणार. गेलीं कांहीं वर्षं ती चालू आहे आणि पुढंहि राहीलच. आणि ही ज्युबिली संपली की डायमंड ज्युबिली आहेच. तेव्हां आम्ही बहुधा एकशेसाठ डॉलर्सचा क्लीनर एकशें-

विसालाच विकूं...” अणि व्हिक्टर हंसायला लागला.

व्हिक्टरनें मिळाल्या त्या सर्व प्रकारच्या नोकऱ्या केल्या आहेत. एका सुट्टींत कुठल्याशा कँपमध्यें त्यानें कपबशा विसळण्याचें काम केलें होतें. “पन्नास-साठ हजार कपबशा मी सहज विसळल्या असतील. दुर्दैवाची गोष्ट म्हणजे त्या कँपमध्यें कपबशा विसळण्याचं किंवा त्या कोरड्या करण्याचं यंत्र नव्हतं. दोन्ही कामं मीच यंत्रवत् करीत होतों.” कांहीं दिवस त्यानें हॉटेलांतूनहि कामं केलीं त्यामुळें त्याला ऑम्लेट झकास बनवितां येतें आणि अंड्यांचे वेगवेगळे अनेक प्रकार करतां येतात.

सध्यां पुढच्या सहामाहीच्या फीचे पैसे जमविण्यासाठीं तो जॅनिटरची नोकरी करतो. एका स्थानिक बँकेची इमारत आहे. ती साफ ठेवण्याचें त्याचें काम असतें. कचऱ्याच्या टोपल्या टाकणें, ॲश ट्रेज स्वच्छ करणें, फरशी पुसून स्वच्छ करणें, रद्दी गोळा करून टाकणें, फर्निचर जागच्या जागीं लावणें— हें सगळें त्याला करावें लागतें. हें काम घेण्याचा मुख्य फायदा असा की त्यांत वेळाचें बंधन नाहीं. काम संपलें की घरीं जाऊन वाचायला, अभ्यास करायला किंवा इतर उद्योग करायला मोकळीक. पहिले कांहीं दिवस सर्व कामें संपवायला व्हिक्टरला बराच वेळ लागला. पण आतां सवयीनें सगळीं कामें तो झटपट करूं शकतो. “मुख्य म्हणजे मी बँकेच्या व्हॉइस प्रेसिडेंटचं टेबल अगदीं घासून-पुसून स्वच्छ ठेवतों. साहेबाला टेबलावरच्या काचेंत आपलं तोंड दिसलं म्हणजे इतरत्र कचरा पडला असला तरी तो त्याच्या लक्षांत यायला वेळ लागतो.”

“मी पहिल्या दिवशीं बँकेंत गेलों तेव्हां गंमतच झाली. गेलों तेव्हा सुटा-बुटांत होतों, त्यामुळं बँकेंतल्या पोरींनीं माझ्याकडे पाहून हस्तिदंती केली. आम्हीं गप्पासुद्धां मारल्या. पण नंतर जेव्हां का मी आंत जाऊन मळकी पॅंट, एप्रन घालून आणि झाडू घेऊन बाहेर आलों तेव्हां त्या पोरींचे चेहरे पाहण्यासारखे झाले. तेव्हांपासून त्या पोरींनीं माझ्याशीं बोलणं टाकलं. मला नुसतं ‘हाय्’ सुद्धां म्हणेनाशा झाल्या. मीं म्हटलं, “ओ के. मी जेव्हां बँकेचा व्हाइस प्रेसिडेंट होईन तेव्हां तुम्हालाहि मी ‘हाय्’ म्हणणार नाहीं. तुम्ही काय समजलांत ग भवान्यांनो!”

व्हिक्टर हीं असलीं कामें करतो म्हणून त्याच्या श्रीमंत आईवडिलांना कमी-

पणा वाटत नाहीं किंवा त्याच्या सासऱ्यालाहि ‘मुलगी देऊन फसलों; जॅनिटरचा सासरा झालों’ असें वाटत नाहीं. उलट परवां मला जेव्हां इन्ग्रिडचे आईवडील भेटले तेव्हां गमतीनें आणि खेळीमेळीनें सगळ्या गप्पा चालल्या होत्या. जॅनिटरचा व्हाइस प्रेसिडेंट होण्याची शक्यता कितपत आहे यावर विनोदी चर्चा चालली होती. आपला एक मुलगा तिकिट कलेक्टर आहे हें सांगतांना माझ्या ओळखीच्या एका गृहस्थाची मान शरमेनें खालीं गेली होती. परंतु मिस्टर हॅमर्सच्या हें ध्यानींमनींहि नव्हतें. जांवईबापू मुलीच्या आणि नातवाच्या पोटापाण्यासाठीं पुरेसें मिळवितात ना ? मग कांहीं का करेनात. (आपल्याकडे पैसे मागत नाहींत तोंपर्यंत सगळें कांहीं ठीक आहे.)

परवां मला व्हिक्टर रस्त्यांत भेटला. दुपारच्या उन्हांत घामाघूम झाला होता, चेहरा लालबुंद झाला होता, हातांत कसलेतरी कागदांचे गठ्ठे होते आणि स्वारी नेहमींच्या ऐटींत कुठंतरी चालली होती. “ हें काय नवीन काम काढलं आहेस बाबा तूं ? ” मीं व्हिक्टरला विचारलें.

अरे त्याचं असं आहे की तो जॅनिटरचा पगार आम्ही तिघांना मिळून पुरायला पाहिजे ना ? म्हणून उरलेले पैसे मिळविण्यासाठीं बॅंकेतच हें नवीन काम घेतलं आहे. कांहीं अवघड नाहीं. पत्ते टाईप करायचे या कार्डांवर.”

इतक्या खटपटी–लटपटी करून व्हिक्टर जेमतेम आपले भागवतो, तरी त्याच्यापेक्षां जास्त अडचणींत असलेल्या लोकांच्याबद्दल कांहींतरी करायची त्याची धडपड चालूच असते. सध्यां त्यानें पॉल नांवाच्या एका जपानी मुलाला आपल्या घरीं आणलें आहे. इथें आल्यावर वर्षानें जपान सरकारनें पॉलची स्कॉलरशिप बंद केली. नोकरी मिळविण्याची त्याची खटपट चालू आहे. पण अजून तरी लक्षण कांहीं ठीक दिसत नाहीं. व्हिक्टरला हें कळल्याबरोबर तो पॉलला आपल्या घरीं राहायला घेऊन गेला. “ अरे, त्याची खोली तूं पाहायला हवी होतीस. इतकी कोंदट आणि गैरसोईची! अशा ठिकाणीं राहायचं आणि रेनेबॉमकडे वेचव हॅंबर्गर किंवा सॅंड्‌विच् चघळायचा. मी पॉलला म्हटलें, तुला नोकरी मिळेपर्यंत चल माझ्याकडे. तुला काय जमेल तें मला दे ! ”

पॉल हा एकटाच व्हिक्टरचा दोस्त नाहीं, इजिप्त, नायजिरिया, लायबेरिया, इराण, इराक, पाकिस्तान, ब्रह्मदेश, इंडोनेशिया, थायलॅंड–सगळी-

करून इथे आलेल्या विद्यार्थ्यांशी त्याची जानपछान आहे. नवीन कोणी चेहरा दिसला की व्हिक्टरने त्याला गाठलेच. हा त्यांच्याकडे जाईल. त्यांना कॉफी प्यायला बोलावील, त्यांना बोलायला लावील आणि हजार वेगवेगळे प्रश्न त्यांना विचारून भंडावून सोडील. विशेष असा की त्याचे कुतूहल 'इंडियांत अजून गाईला पवित्र मानतात का?' असे प्रश्न विचारण्याइतकें भाबडें नाहीं. भारतामध्यें शेतीचें उत्पन्न आणखी वाढविण्याचा प्रयत्न कां करीत नाहींत? गोवा काबीज करणं हें नेहरूंच्या शांततेच्या मार्गाला धरून कसं? असले कित्येकदा अडचणींत टाकणारे पण नेहमीच विचार करायला लावणारे प्रश्न तो विचारीत असतो. नव्या नव्या लोकांना भेटणे आणि त्यांच्याशीं गप्पा मारणें हा त्याचा एक छंदच आहे.

"हीं इजिप्शियन पोरं मला मुळींच आवडत नाहींत बुवा! तीं आपलीं सारखीं आपला कळप करून राहतात. आपलीच भाषा सतत बोलतात. आणि सदैव कुणाला तरी घाबरल्यासारखी दबून असतात. यांना मोकळेपणानं इतराशीं बोलायला झालं काय?" हें तो मला सांगून थांबला नाहीं. त्या मुलांनाहि एके दिवशीं सुनावायला त्यानें कमी केलें नाहीं. मैत्री अशा बोलण्यानें संपण्याइतकी लेचीपेची असतां कामा नये असें त्याला वाटतें आणि कमालीच्या स्पष्टवक्तेपणानें तो सगळ्यांशीं बोलत असतो. एखादा प्रोफेसरसुद्धां त्याला आवडला म्हणजे तो खरोखरीच त्याला आवडलेला असतो आणि एखादा त्याच्या मतें मठ्ठ असला तर खरोखरच तो तसा असतो. आमच्या एका वर्गातली लेक्चर्स अतिशय गचाळ होतात असें व्हिक्टरला वाटलें. मग ही स्वारी त्या बासष्ट वर्षे वयाच्या प्रोफेसरकडे गेली. तासभर त्याच्याशीं वादविवाद करून शिकण्यांत कायकाय सुधारणा पाहिजेत हें व्हिक्टरनें त्या म्हाताऱ्याला पटवून दिलें. आमच्या कोर्समध्यें पुढें सुधारणा झाली नाहीं हें वेगळें. पण या बाबतींत व्हिक्टरच्या म्हणण्याप्रमाणे कांहींतरी करायला हवें हें मात्र आमच्या प्रोफेसरनें जाहीरपणें कबूल केलें. दुसरा एक प्रोफेसर हुशार होता, पण भलताच आळशी. त्याला सारखें ढोसत राहिल्याशिवाय तो मुळीं कांहीं ऐकून घेण्यासारखें बोलायचाच नाहीं. मी या वर्गात नेहमीं अमृतांजनची बाटली घेऊन जात असें आणि कंटाळा येऊन डोकें दुखायला लागलें की तें डोक्याला चोळत असे. व्हिक्टरचें

डोकें दुखायला लागल्यावर तो एवढ्यावरच थांबला नाहीं. त्यानें प्रश्न विचारून आणि शंकांची सरबत्ती करून त्या प्राध्यापकमहाशयांना इतकें सतावलें की ते वर्गांत बोलतांना नंतर बरेच वेळां जागे असायचे.

आधींच अमेरिकन असल्यामुळें व्हिक्टर फारच मनमोकळा आहे. त्यांत त्याच्या आईच्या फ्रेंच मनस्वीपणाची भर पडली आहे. एकदां आम्ही लायब्ररींत अभ्यास करीत बसलों होतों. व्हिक्टरला अभ्यासाचा कंटाळा आला होता म्हणून आम्ही दोघें कॉफी प्यायला बाहेर पडलों. त्या दिवशीं हॉटेलांत बसलों असतांना स्वारी रंगांत आली. आपल्या एक–दोन–तीन प्रेमप्रकरणांच्या हकीगती त्यानें मला सहजसहज सांगितल्या. लपवाछपवी नाहीं. सूचकतेमुळें अधिक अश्लील होणारें बोलणें नाहीं. पण आजूबाजूला,हॉटेलांत काम करणाऱ्या वेट्रेसेस् फिरत होत्या; त्याचें बोलणें आणि हसणें ऐकत होत्या. त्याकडेहि बिलकूल लक्ष नाहीं. त्याच्या ओळखीची एक फार सुंदर मुलगी होती. "तिचं काय वर्णन करूं ? फारच सुरेख होती. पण तिच्याशीं लग्न शेवटीं मी नाहींच केलं. सुंदर खरी पण तिला स्वैंपाकाशिवाय दुसऱ्या कशाची आवडच नव्हती मुळीं. छानदार बंगला नसला तरी उत्तम स्वैंपाकघर असणं आणि त्यांत निरनिराळे पदार्थ करतां येणं हें तिला स्वर्गसुखापेक्षांहि प्रिय होतं. पण मला कांहीं बट्लरशीं लग्न करायचं नव्हतं. मला हवी होती बायको. म्हणून शेवटीं मीं तिला भेटेनासा झालों.... पण तिचं लावण्य ! ... जाऊं दे झालं. आतां तिच्या सौंदर्याविषयीं चर्चा करण्यांत काय अर्थ आहे ? कुणातरी माणसाशीं केव्हांच तिनं लग्न लावलं असेल आणि दररोज चांगलं चांगलं त्याला खायला घालून त्याला गलेलठ्ठ बोका बनवलं असेल असं आपण समजूंया..."

"...एकदां मोठीच आफत आली होती. माझं नुकतंच लग्न झालं होतं आणि मी न्यूयॉर्कमधें इन्ग्रिडबरोबर राहात होतों; तेव्हां ही बया मला भेटायला आली. आधी मला विचारलं नाहीं की कांही नाहीं. ती जिन्यावरून 'व्हिक्टर व्हिक्टर' म्हणून ओरडत यायला लागली आणि माझा सगळा भूतकाळ माझ्यावर चालून येतो आहे असं वाटायला लागलं मला. मी भांबावून जागच्या जागींच उभा राहिलों. काय करावें हेंच मला सुचेना. आमचं बोलणं 'हिला' ऐकायला जाणार आणि ती माझा खिमा केल्याशिवाय राहणार नाहीं. अंगांत

फक्त नाईट सूट असूनसुद्धां मी तसाच धांवत जिना उतरलों आणि कुठली सबब सांगून तिला कसंबसं घालवलं हें आतां मला आठवत नाहीं..."

हें सगळें चाललें असतांना माझ्या भारतीय संकोचानें मी अर्धमेला झालों होतों. पण व्हिक्टरचें तिकडे मुळींच लक्ष नव्हतें. त्याची गाडी आपल्या संथ अमेरिकन इंग्रजींत चाललीच होती.

व्हिक्टर हसायला लागला की अगदीं खळखळून हसतो. त्याचें हास्य निर्मळ आणि पारदर्शक आहे. त्याच्या स्पष्टवक्तेपणामुळें त्याचा विनोद क्वचित् प्रखर वाटत असला तरी मनमोकळ्या हास्यामुळें त्याची प्रखरता जाणवत नाहीं. इंडियांतल्या बायकांना खरेंखुरें स्वातंत्र्य अजूनहि कसें मिळालेलें नाहीं हें एकदां माझी बायको त्याला सांगत होती आणि पटवून देत होती. तें सगळे ऐकून घेतल्यावर व्हिक्टर हसतहसत म्हणाला, "आमच्या बायका तरी कुठं स्वतंत्र आहेत हो ? आतां पाहा, तुमच्याशीं गप्पा मारतांमारतां माझा वेळ गेला आणि आतां घरीं जायला मला उशीर होईल. पण बायको कसली माझ्यावर रागावते ! मीच तिच्यावर संतापणार आणि मला आवडणारा स्वयंपाक तिनं केलेला नसला तर कडाडकन माझा चाबूक वाजवून तिला विचारणार, 'काय ग, तुला आतां चाबूकच मारूं का आपली वेताची छडी पुरे ?' अहो मिसेस गॅडगिल, असं केल्याशिवाय या शेफारलेल्या अमेरिकन बायका सुधारणार कशा ? तुम्हीच बोला." लग्न केल्यावर हुंडा मिळतो आणि पाकिस्तानांत प्रत्येकाला चार बायका करतां येतात हें ऐकून त्याला इतकी गंमत वाटली की एके दिवशीं तो मला म्हणालासुद्धा, "आतां आपण इंडियांत येणार, तिथें एक इंडियन बायको करणार. पूर्व पाकिस्तानांत चार आणि पश्चिम पाकिस्तानांत चार. मग हुंड्याची काय भलतीच रेलचेल होईल. माझा मुक्काम मध्यावर कुठंतरी ठेवला म्हणजे झालं, नऊ बायकांच्यावर लक्ष ठेवतां आलं की संपलं." ही आपली गंमत झाली पण एकदां पीएच. डी. पुरी झाली की आशियांत किंवा आफ्रिकेंत कुठेंतरी जायचे आणि तिथल्या लोकांचा, परिस्थितीचा अभ्यास करायचा अशी व्हिक्टरची महत्वाकांक्षा आहे. आपल्या खोलींत आशिया आफ्रिकेचे दोन प्रचंड नकाशे त्यानें लावले आहेत. रेघा आणि खुणा यांच्या जाळ्यांत लपलेलें 'पूना' त्यानें मला एके दिवशीं दाखवलें होतें.

त्याची बायको इन्ग्रिड उर्फ इंगी हीसुद्धा त्याच्यासारखीच विनोदी आहे. तिची उंदरांची भीति अजून गेलेली नाहीं. परवा तिने आपल्या बेडरूममध्यें उंदरांचें एक पोर पाहिलें आणि ती इतकी घाबरली की 'तू घरांतल्या सगळ्या उंदरांचा नायनाट केल्याशिवाय मी इथं क्षणभरसुद्धा राहणार नाहीं' अशी तिनें नवऱ्याला धमकी दिली. तो काय करतो बिचारा! रातोरात त्यानें आईला फोन केला आणि विचारलें, 'सुनेला घरांत घेशील का?' आईनें 'हो' म्हट-ल्यावर त्यानें टॅक्सी बोलावली आणि रात्रीं सुमारें ११॥ वाजतां या सूनबाई आपल्या चिरंजिवासकट सासूबाईकडे राहावयास गेल्या.

कोणी पाहुणे जेवायला यायचे म्हणजे ही मुलगी इतकी घाबरते, की काय करावें आणि कसें करावें हें तिला सुचत नाहीं. शिवाय करायचेंच झालें तर आपल्या आईइतका चांगला स्वैंपाक जगांत दुसऱ्या कोणालाहि येत नाहीं अशी तिची खात्री आहे. आतां तिची आई न्यूयॉर्कला असते हें खरें. पण त्यांत काय अवघड आहे? दरवेळीं ही न्यूयॉर्कला टेलिफोन करते आणि आई सांगेल त्याप्रमाणें 'पाकक्रिया' लिहून घेते. पण तरीहि तिला पाहुण्यांचें अगत्य आहेच. व्हिक्टरचे नाना देशांतील नाना मित्र तिलाहि आवडतात आणि त्यांच्याशीं गप्पा मारण्यांत तिलाहि खूपच उत्साह वाटतो. व्हिक्टरचा वाढदिवस असतो तेव्हां किंवा क्रिसमस, थॅंक्स गिव्हिंग अशा दिवशीं ती बाजारांत जाते आणि व्हिक्टरच्या आवडीच्या छानछान वस्तु आणून त्याला बक्षीस देते. तो खूष होतो पण नंतर लवकरच त्या दुकानामधला त्याचा हिशेब लिहून येतो. आणि बक्षिसाच्या किंमतींच्या सगळ्या रकमा त्याच्या खात्यावर लिहिलेल्या असतात तें पाहून त्याला घेरी येते. "पण अशा गंमती ती मधूनमधून करीत असली तरी ती स्वतःकरितां फारसा खर्च मात्र करीत नाहीं. सध्या माझ्याकडून तिच्या फारशा अपेक्षाहि नाहीत. बाजारांतून मी तिच्याकरितां आणलेला ॲपल् पाय किंवा आइस्क्रीम एवढ्यावरसुद्धां ती खूष असते."

आपल्या मुलाचें नांव त्यांनीं अलेक्झांडर असें ठेवलें आहे. "तो व्हायच्या वेळीं माझं कुतूहल इतकं ताणलं गेलं होतं, की माझी गुदमरून जायची वेळ आली होती. खरं सांगायचं म्हणजे त्या अस्वस्थपणें घातलेल्या येरझारा आणि मनावरचा तो ताण लक्षांत घेतला तर इंगीपेक्षां मलाच मुलाच्या वेळीं जास्त

त्रास झाला अशी माझी खात्री आहे...आणि प्रत्यक्ष जेव्हां त्या नर्सनं मुलाला आणून माझ्यासमोर धरलं तेव्हां मी म्हणालों, शिव शिव ! हा लिबलिबीत आणि विशविशीत मांसाचा गोळा म्हणजे का माझा मुलगा ! हा भयंकर प्राणी मी माझ्या हातांत तरी कसा धरूं ? कॅलेंडर्सवर आणि जाहिरातींतून दिसणारीं तीं छोटीं, गोजिरवाणीं मुलं कुठं गेलीं ? "...पण अलेक्झांडर जन्मल्याबरोबर जरी बापाच्या अपेक्षेप्रमाणें नव्हता तरी आतां मात्र आहे.

मुलाचें कौतुक करतांना एक दिवशीं हे 'बाबा' मला म्हणतात,

"आतां अलेक्झांडरकरितां एक झकास पाळणा घ्यायचा आहे."

"भले ! म्हणजे इतके दिवस कुठं ठेवत होतात आपण त्याला ?"

"कुठं म्हणजे काय ! ड्रॉवरमध्यें. ड्रेसिंग टेबलचा वरचा ड्रॉवर आहे त्यामध्ये."

मला इतकें आश्चर्य वाटलें की मी थोडा वेळ कांहीं बोललोंच नाहीं. मुलाला ड्रॉवरमध्ये ठेवणाऱ्या त्या विचित्र बाबाकडे नुसता पाहातच राहिलों.

"अरे, त्यांत घाबरण्यासारखं कांहीं नाहीं. ड्रॉवरमध्यें अलेक्झांडर सहज मावतो. तिथं आंत उबदारहि असतं आणि मुख्य म्हणजे पडण्याची भीति नाहीं मुळींच."

"तें सगळं कबूल आहे मेहेरबान. पण एखाददिवशीं चुकून अलेक्झांडरचा ड्रॉवर पुस्तकाचा असं समजून बंद कराल आणि किल्ली धांदरटपणें कुठंतरी टाकाल."

"त्याची तुला बिलकुल काळजी नको. ड्रॉवरची किल्ली धुवावयाच्या कपड्यांबरोबर लॉंड्रींत गेली आणि सुदैवान केव्हांच हरवली." व्हिक्टरनें सांगितलें आणि मीं सुटकेचा एक मोठा निःश्वास टाकला.

ड्रॉवरमधून बिचाऱ्या अलेक्झांडरची बदली झाल्यानंतर तो बाथरूममध्यें राहायला गेला. एकदां मी व्हिक्टरच्या घरीं गेलों होतों तेव्हां तें माझ्या लक्षांत आलें.

"हें काय नवीन लचांड आहे बाबासाहेब ? मुलाला तुम्हीं चक्क बाथरूममध्यें ठेवला आहेत की ?"

"आमच्या घरांत बाथरूमइतकि उबदार जागा नाहीं हें एक, आणि

घरांत झोपायची खोली एकच आहे हें दुसरं. ”

“ अरे, पण म्हणून काय तुम्ही त्या चार महिन्यांच्या पोराला बाथरूम-मध्यें टेवणार ? ”

“ त्याचं आणखी एक कारण असं, की अलेक्झांडर आपल्या स्वातंत्र्याचा वेळीं-अवेळीं उपयोग करतो. रात्रीं कधींहि झोपेंतून उठतो आणि किंचाळायला लागतो. आतां तो अमेरिकेचा नागरिक असल्यामुळं त्याला कधींहि रडण्याचं स्वातंत्र्य जरूर आहे. पण कधींहि शांतपणें झोपण्याचं स्वातंत्र्य त्याच्या आई-बापांनाहि आहे त्याचं काय ? ”

“ सारांश काय, की बाबांची पीएच. डी. होऊन, त्यांना मोठी नोकरी मिळून ते मोठी जागा घेईपर्यंत अलेक्झांडरनं बाथरूमवर निभावून नेलं पाहिजे. ”

“ सारांश अगदीं बरोबर आहे. ”

पण छोट्याची एवढी एक गैरसोय सोडली तर त्याला कांहीं कमी नाही. संध्याकाळीं त्याला कंटाळा आला की फेरफटका करून आणण्यासाठीं बाबांनीं बाबागाडी घेतली आहे. आणि तींत चिरंजिवांना घालून ते कुठेंहि भटकत असतात. शिवाय खेळणीं, कपडे आहेतच. मुलाला मोठेपणीं एखादा चांगला छंद असावा म्हणून बाबांनीं देशोदेशींची पोस्टाचीं तिकिटेंहि गोळा करायला सुरवात केली आहे. वेड्यानें छंद नाहीं केला तरी अडीअडचणीला जुनीं तिकिटें विकून पांचपन्नास डॉलर्स तरी तो मिळवूं शकेल हें कांहीं कमी नाही. “ हो, कदाचित लग्नाची अंगठी विकत घ्यायला त्याचा उपयोग होऊं शकेल. बाबां-सारखी जुनी अंगठी तरी विकत घ्यावी लागणार नाही. ” मी म्हणालों.

“ ओऽओऽ. तूं त्याबद्दल म्हणतो आहेस होय ? ” असें म्हणून बाबासाहेब पोटभर हंसले.

व्हिक्टरला जशीं माणसें आवडतात तसे निरनिराळ्या देशांतले पदार्थ खाय-लाहि फार आवडतें. पाकिस्तानी लोकांच्याकडे जाऊन त्यानें शमी कबाब आणि बिर्याणी खाल्ली. तसाच आमच्या घरी पिठलें-भात, पुरी आणि बटाट्याची भाजी, मसालेभात यांच्यावर ताव मारला. एकदां तर त्यानें आमचें जेवण आमच्या पद्धतीने जेवायचा आग्रह धरला. मी त्याला सोवळें नेसवूनच पाटावर बसवणार होतों पण म्हटलें तेवढें नको. हा काट्या-चमच्याशिवाय कसा जेवतो तें पाहूंया.

पण हातानें जेवतांना वेस्याची अशी कांहीं तारांबळ उडाली की जशी केवळ काट्यानें ' स्पगेत्ती ' खातांना माझीच उडाली होती. माझा घास असलेला हात नेमका तोंडांत जातो याचें त्याला फारच कौतुक वाटत होतें आणि आपला हात बरोबर तोंडाकडे न्यायला त्याला बरेच भलतेच प्रयास पडत होते. त्या जेवणानंतर हातानें जेवणाचा आग्रह त्यानें कधींच धरला नाहीं. यावरून त्या दिवशीं हा अमेरिकन ब्राह्मण आमच्याकडून उपाशी पोटींच परत गेला असावा असा माझा अंदाज आहे.

एकदां सहज बोलतांना कधींतरी व्हिक्टरला आमच्या लग्नाचा वाढदिवस कधीं आहे हें कळलें. त्या दिवशीं बरोबर संध्याकाळीं स्वारी आमच्या घरीं हजर झाली—हातांत फुलांचा गुच्छ, बायकोच्या हातांत वाढदिवसाचा केक या सरंजा-मासह. त्या दिवशीं आम्हांला त्यानें ' नाइन अवर्स टु राम ' हा चित्रपट पाहा-यलाहि नेलें. आणि अमेरिकन पद्धतीप्रमाणें जेव्हां मी माझें टॅक्सीचे किंवा तिकिटाचे पैसे देऊं लागलों तेव्हां ते त्यानें मला देऊं दिले नाहींत. तुमच्या लग्नाचा वाढदिवस साजरा करूंया असें व्हिक्टर जेव्हां मला म्हणाला तेव्हां मीं त्याला सांगितलें, " व्हिक्टर, असं करूंया. आपण दोघे बाहेरच भेटूं आणि कुठंतरी निवांतपणें गप्पा मारीत बसूं. "

" छे, तूं एकटाच येऊन काय उपयोग ? तुझी बायकोहि बरोबर हवी—आणि माझीहि अर्थातच. "

" झालं ! म्हणजे आमच्या निवांतपणें करायच्या गप्पागोष्टींचा निकालच लागला म्हणायचा! "

" तूं काय म्हणतोस तें आलं माझ्या लक्षांत. पण तसं पाहिलं तर माझी बायको त्या मानानं खूपच शांत आहे बरं का ! तूं माझी सासू पाहिली नाहींस अजून बच्चंजी. "

त्यानंतर आमचा बराच वेळ अर्थातच सासू या संस्थेची टिंगल करण्यांत गेला. दुसरें लग्न करण्याचा महत्त्वाचा तोटा म्हणजे एकीऐवजी दोन सास्वांना तोंड द्यावें लागतें, ही डॉक्टर जॉन्सनची जोक मीं त्याला सांगितली. तिच्यावर तो इतका खूष झाला की आपल्या सासूबाई भेटल्यावर पहिल्या प्रथम दुसरें कांहीं न करतां तिला ही जोक ऐकवायाची असें त्यानें ठरवून टाकलें.

सप्टेंबरमधल्या एका संध्याकाळीं व्हिक्टर मला प्रथम भेटला तेव्हांपासून माझें त्याच्याविषयींचें कुतूहल सारखें वाढतेंच आहे. दोनदोन महिने डोक्या-वरचे केस वाढूं देणारा आणि तशा स्थितींत ते अस्ताव्यस्त राहूं देणारा, गरज म्हणून मोठ्या भावाचे किंवा सासऱ्याचे जुने ढगळ होणारे कपडे वापरणारा, कपबशा विसळण्यापासून झाडूवाल्यापर्यंत सर्व प्रकारच्या नोकऱ्या करणारा, विसाव्या वर्षींच लग्न करून मोकळा होणारा हा तरुण बहुतेकांना उनाड किंवा निदान चक्रम वाटत असेल. पण मला तसें कधींच वाटलें नाहीं. मला त्याची सदैव चालणारी जगण्याची धडपड आवडते. जें जें नवें आणि वेगळे त्याविषयींचें मुक्त, गोल डोळ्यांचें कुतहूल आवडतें. लोकांविषयीं त्याला वाटणारी समंजस सहानुभूति आवडते. बुद्धीला क्वचित् न पेलणाऱ्या विषयांशीं झगडायची जिद्द आवडते, ढोंगीपणाविषयींचा तिरस्कार आवडतो.

एकदां मी त्याला म्हटलें, " दुसरीकडे कुठंहि न जातां मी मॅडिसनला आलों तें फार चांगलं केलं. निदान एक महत्त्वाचा फायदा तरी झाला. तुझ्यासारखा दोस्त मला इथं मिळाला. "

" माझाहि तो फायदा झालाच. पण आणखीहि एक झाला. " हें म्हणत असतांना त्याच्या डोळ्यांत तें नेहमीचें मिस्किल हास्य चमकायला लागलें. " हा महत्त्वाचा फायदा असा की त्या रंगीबेरंगी कपडे घालणाऱ्या फक्कड पाकिस्तानी मुलीशीं ओळख झाली. तशी मुलगी काय मला कोलंबियांत भेटणार होती ? "

नेहमींप्रमाणें त्याने आपली हद्द गाठली होती.

मी मात्र यावर कांहींच बोलो नाहीं. गंभीर आणि मिस्किल बोलण्याचें व्हिक्टर असें कांहीं बेमालूम मिश्रण करतो की त्यामुळें अशा वेळीं त्याच्यावर रागावणेंहि अशक्य होऊन जातें.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप
अनुक्रम ...३७६८८... दि: ...
क्रमांक ...३६७... नों दि ...


# ८ : अमेरिकन ‘ अबला ’ ( ! )

आगरकर जर आज हयात असते तर आपल्या स्त्रीची आजची अवस्था पाहून ते पुरुषांकरितां हळहळले असते. आणि त्यांना आपल्या पूर्वीच्या जीवितकार्याबद्दल पश्चात्ताप झाला असता कीं नाहीं हें सांगतां येत नसलें तरी त्यांनीं लगेच ‘ पुनश्च हरिः ॐ ’ म्हणून पुरुषांच्या दास्यविमोचनासाठी आपली कंबर कसली असती. हरिभाऊ आज असते तर त्यांनीं बहुधा ‘ पण लक्षांत किती घेणार ? ’ या नांवाची कादंबरी लिहून पुरुषांचीं दुःखें वेशीवर टांगलीं असतीं. निमूटपणें दुःख सोसणाऱ्या त्यांच्या यमाग्रज ( किंवा-दामू ) नांवाच्या नायकानें कदाचित् ‘ आम्ही पुरुष मुकीं जनावरें ’ असें हृदयाला घरें पाडणारे आर्त उद्गार काढले असते. महाराष्ट्रांतल्या ( माजी ) अबलांची आज जर ही स्थिति आहे, तर तुलनेनें अमेरिकन ‘ अबलां ’ची स्थिति काय असेल याचा अंदाज घेण्यासाठीं एखाद्या कल्पनाचतुर पुरुषालासुद्धा आपलें सगळें चातुर्य पणाला लावावें लागेल.

अमेरिकेंत नोकरी करणाऱ्या प्रत्येक तीन व्यक्तींपैकीं एक स्त्री असते. म्हणजे ती केवळ चूल आणि मूल संभाळणारी अबला नसते; तर त्याबरोबर बाबा लोक, नवरा, ऑफिसांतला साहेब, मोटारचें चक्र, बँकबुक इत्यादि गोष्टी एकदम संभाळणारी अष्टभुजा असते. यांतली नवरा संभाळण्याची क्षुल्लक गोष्ट सोडली तर बाकीचीं कामें एकदम करूं शकणाऱ्या बाईला ‘ अबला ’ मानणें हें कृत्य कोणताहि पुरुष आपल्या बायकोच्या धाकाशिवाय करणें शक्य नाहीं. केवळ

संख्येच्या दृष्टीनें पाहिलें तरी स्त्रियांची संख्याच अमेरिकेंत पुरुषांपेक्षां जास्त आहे म्हणजे लोकशाहीच्या तत्त्वावरसुद्धां स्त्रीराज्यापुढें मान तुकवून (वाटल्यास-हंसत-हंसत) गुलामगिरी पत्करण्याशिवाय गरीब बिचाऱ्या पुरुषांना तेथें गत्यंतर नाहीं.

अण्णासाहेब कर्व्यांनीं अमेरिकन गाय पाहिली होती कीं नाहीं हें कुठें नमूद केलें असल्यास मला माहीत नाहीं. पण तिला जर त्यांनीं कधीं पाहिलेलें असतें तर त्यांनींसुद्धां स्त्रीची गाईशीं तुलना करण्याचें धाष्टर्य केलें नसतें. कारण या गाई इतक्या बाळसेदार आणि गुटगुटीत असतात, कीं आपल्या मालका-प्रमाणें त्याही 'बॅलन्स्ड डायट्'वर असल्या पाहिजेत याविषयीं योणाला संशय रहात नाहीं. वेब स्प्रेकर या माझ्या अमेरिकन मित्राच्या शेतावरच्या गाई जेव्हां मीं पाहिल्या तेव्हां मला वाटलें कीं एखाद्या भारतीय गोमातेला त्यांतली एक गायसुद्धां एका दृष्टिक्षेपांत पाहतां येणें शक्य होणार नाहीं. तिला सबंध पाहण्यासाठीं आपल्या गोमातेला खरोखरचे डोळे फिरवावे लागतील आणि नंतर ती घेरी येऊन बेशुद्ध पडेल, असा माझा कयास आहे. अशी ही अमेरिकन गाय! स्त्रीची तिच्याशीं तुलना करणेंच असेल तर 'गरीब' गाय म्हणून करणें कठीण आहे. त्यांत अशी गाय 'पंकांत रुतली' असल्या-मुळें तिचा उद्धार करणें वगैरे सुधारकी प्रकार कुठल्याहि काडीपैलवान पुरुषाला अशक्यच. त्यासाठीं दारासिंगसारखा एखादा 'फ्री-ष्टाइल'वालाच पाहिजे.



गुटगुटित आणि बाळसेदार

अमेरिकन बायका काय करूं शकतात हें विचारण्यापेक्षां काय करूं शकत नाहींत याचें उत्तर शोधणें अधिक सोपें असावें. कारण त्या वकिली करतात, त्या

न्यायदान करतात, त्या वैद्यकी करतात, ( वैद्यकी म्हणजे नुसतींच दुर्वाच्या अक्षरांत औषधें लिहिणें एवढेंच नव्हे, तर दंतोत्पाटनाचें सत्कार्यहि त्यांत येतें, ) त्या खाजगी आणि सरकारी ऑफिसांत, बँकांत, पोस्टांत, हॉटेलांत नोकऱ्या करतात. त्या निवडणुकींना उभ्या रहातात; सैन्यांत, नौकादलांत, हवाई दलांतसुद्धां जातात. रस्त्यांतून जातांना धूम्रपान करतात. बारमध्यें उभ्या राहून मद्यपान करतात. त्या मोटारी चालवितात यांत नवल नाहीं. मोटार-सायकली आणि बसेससुद्धा त्या चालवितात. यांतील बहुतेक गोष्टी भारतीय स्त्रिया करीत असतील; पण निदान बुलफायटिंग करणाऱ्या, कुत्र्याचे केंस कापणाऱ्या, बेवारशी कुत्र्यांना पकडण्याचें काम करणाऱ्या, घोड्यांना नाल ठोकणाऱ्या, स्टंट विमानाच्या पंखावरून उड्डाण करणाऱ्या ‘ अबला ’ भारतांत झाल्याचें अजून तरी ऐकिवांत नाहीं. अशा स्त्रिया मीं अमेरिकेंत मात्र पाहिल्या आहेत.

पुरुषांनीं बांगड्या भरणें किंवा झगे घालणें हें अवघड असलें तरी स्त्रियांनीं पँट्स् चढविणें यांत तेथें कसलीच नवलाई नाहीं. ‘ तुमच्या कुटुंबांत प्रमुख कोण असें विचारणें आणि तुमच्या घरीं पँट कोण घालतें ? ’ असें विचारणें हें सारखेंच. आमच्या शाळेंतल्या इतक्या मुली पँट्स् घालीत असत कीं बहुधा मुलें लवकरच फ्रॉक्स घालूं लागतील असें मला वाटूं लागलें होतें.

त्या पँट–प्रकरणावरून एका अमेरिकन मासिकांत वाचलेली एक मजेदार गोष्ट मला आठवते. एका समारंभाच्या वेळीं एक धर्मोपदेशक सहजच शेजारीं उभ्या असलेल्या एका सद्‌गृहस्थांशीं बोलत होते.

“ हल्लींच्या पोरींपुढं अगदीं कमाल आहे बुवा ! नाहीं—म्हणजे कपडे असे कांहीं घालतात कीं ही मुलगी आहे का मुलगा, हेंसुद्धां कळूं नये ! ”

“ खरं आहे तुम्ही म्हणतां तें. ”

“ आतां हीच मुलगी पहा ना ! ती पलिकडे उभी आहे ती. दिसतो कीं नाहीं पटाण ! ”

“ माफ करा हं ! पण ती माझी मुलगी आहे. ” त्या सद्‌गृहस्थानें सांगितलें.

“ छे छे ! आपणच मला माफ करायला पाहिजे. मला कल्पना नव्हती, आपण त्या मुलीचे वडील असाल ! व्हेरी सॉरी ! ” धर्मोपदेशक क्षमायाचना करते झाले.

" ती माझी मुलगी आहे हें खरं; पण मी तिचा बाप नाहीं. मी तिची आई आहे ! "

—हें उत्तर मिळाल्यावर पाद्रीसाहेबांचें काय झालें हें त्या गोष्टींत अर्थातच लिहिलेलें नव्हतें. बहुधा त्यांची शुद्ध तत्काळ गेली असावी.

एक वेळ पॅन्ट चढविली तरी हरकत नाहीं. पण त्याबरोबर मर्दानी संचारहि या 'पॅन्ट पहेननीवालींत' होत असेल याची मला कल्पना नव्हती. तसेंहि होऊं शकतें हें एकदां वर्तमानपत्रांतली एक बातमी वाचून माझ्या ध्यानांत आलें. बातमी अशी होती :—

## बाईसाहेब नवरोजींस धडा शिकवितात !

**साउथ प्लेन फिल्ड** ( न्यू जर्सी )—सुवर्णकेशा आणि निळ्या डोळ्यांच्या एका आईसाहेबांनीं—यांना तीन मुलें आहेत—सोमवारीं रात्रीं घरीं येऊन आपल्या पतिराजाजवळ कबूल केले,—

" मी तुम्हांला मुद्दाम चोवीस तास टाकून गेले होते. मला तुम्हांला एक धडाच शिकवायचा होता ! "

आणि हा खरोखरच एक छानसा धडा होता.

मेरी टॉथ या एकवीस वर्षांच्या सुंदरीनें चोवीस वर्षें वयाच्या आपल्या नवऱ्यापुढें एक कठीण समस्या उभी केली. ज्यूलियसला ती म्हणाली, " चल, तुला एक दोरीची जादू दाखवते. टेलिव्हिजन्वर पाहिलेली. "

आणि त्याचे हातपाय तिनें करकचून एका खुर्चीला बांधले.

" तुला सुटतां येतय का बघ पाहूं ! " तिनें खात्री करून घेण्यासाठीं म्हटलें.

" छे छे ! हल्तोय कसचा मेहेरबान ! थट्टा आहे क्काय ! चांगले करकचून बांधलं आहेस कीं तूं हें ! आतां कसली जादू आहे सांग पाहूं ! "

मग त्याच्याजवळच्या गाडीच्या किल्ल्या आणि पैशाचें पाकिट घेत, तसेंच आपल्या ३ वर्षं ते ४ महिने वयाच्या तिन्ही मुलांना बखोटीला मारून त्यांना बाहेर घेऊन जात ती म्हणाली.—

" बच्चंजी ! मीं तुम्हांला इथंच सोडणार आहे. गाडीच्या किल्ल्या आणि मुलं यांना मात्र बरोबर घेऊन जातें. "

नंतर थोड्या वेळानें बाईसाहेबांनीं पाकिट परत पाठविलें— फक्त त्यांतले सहा डॉलर्स काढून घेऊन.

पोलिसांनीं जेव्हां त्याला सोडविलें तेव्हां मोटार–मेकॅनिक टॉथ् त्यांना म्हणाला,—

" मला असं बांधून ठेवण्यांत तिची तशी कांहीं चूक नाहीं. मलाहि ती परत यायला हवीय् असं नाहीं म्हणा ! पण त्याचं असं आहे, कीं माझ्यासारख्या माणसाला निदान गाडीची तरी नितांत आवश्यकता आहे हें नक्कीच. "

दोरीच्या जादूविषयीं वर्तमानपत्रांत छापून आलेलें हें एकच उदाहरण मीं वाचलें असलें तरी मेरी टॉथ्सारख्या अनेक स्त्री–जादुगार अमेरिकेंत असाव्यात असा माझा अंदाज आहे. अमेरिकन पुरुषाचें वर्णनच मुळीं असें केलें जातें कीं, प्रथम तो आपल्या आईच्या हुकमांत असतो, नंतर त्याची बायको त्याचा ताबा घेऊन त्याच्यावर अनियंत्रित सत्ता चालविते, आणि या दोन प्रसंगांतून जे निम्मेशिम्मे बाबा उरतात त्यांना त्यांचीं कन्यारत्नें आपल्या शिंगांवर घेत असतात. गंमत अशी कीं, ही गुलामगिरी संवयी संवयीनें बाबांच्या अंगवळणीं पडते. एवढेंच नव्हे, तर त्यांना ती आवडूंहि लागते.

एकदां एका बाबांनीं जाहीरपणें लिहिलें होतें कीं, पुरुषानें कोणकोणत्या प्रकारचीं घरकामें करावीं याविषयीं ज्या कोणाला शंका असेल त्याला मी असें ठणकावून सांगूं इच्छितों कीं, मी घरांत कपबश्या, डिशेस् विसळतों, त्या कोरड्या करतों, जेवणाच्या वेळीं टेबल लावतों, फरश्या घासून त्यांना पॉलिश करतों, व्हॅक्यूम् क्लीनरनें घर स्वच्छ करतों, अंथरुणें घालतों, कपडे धुतों, वाळवतों, त्यांना इस्त्री करतों, मुलांना अंघोळी घालतों, खायला देतों, एवढेंच नव्हे, तर छोट्यांचीं दुपटींसुद्धां बदलतों. हें सर्व करणें मला आवडतें. मी सहा फूट दोन इंच उंचीचा आणि २१५ पौंड वजनाचा मालक आहें. आणि मला सहा गोजिरवाणी मुलें आहेत, बोला ! आमचें व्यक्तित्व मर्दानी आहे कीं नाहीं ?

या लेखकमहाशयांची आणि माझी भेट झाली असती तर मी त्यांना म्हटलें असतें, " आपलें व्यक्तित्व मर्दानी आहे, याविषयीं मला शंका नाहीं; पण आपल्यापेक्षांहि आपल्या बाईसाहेबांचें व्यक्तित्व किती अधिक मर्दानी असेल याची चांगलीच कल्पना आपल्या लेखावरून येते. "

विशाल महिलांचा सुळसुळाट अमेरिकेंत अर्थातच फार मोठा आहे. वर उल्लेख केलेले बाबा अशाच एखाद्या विशाल महिलेच्या हातांत हात देऊन 'चुकले' असावेत. पण त्यांनीं आपली चूक कबूल केली नसली तरी इतर अनेक असे असतात कीं जे आपला तीव्र मनस्ताप शब्दांत व्यक्त करतात. एका पांच मुलांच्या वडिलांनीं लिहिलें,—

"जी सदैव आपल्या समाजाचे फंड गोळा करण्यांत, पालक-अध्यापक संघाच्या सभांत, चर्चमधील जेवणांत आणि स्काउटच्या कामांत बुडून गेलेली असते अशा बाईला तुम्ही काय म्हणाल? आमच्या बाईसाहेब अशा बाजारच्या भाकऱ्या भाजण्यांत इतक्या गुंग झालेल्या असतात, कीं आमच्या घराचा पांजरपोळ बनला आहे आणि आमच्या नशिबीं आठवड्यांतले पांच दिवस शिळेंपाकें खाणें येतें. एवंगुणविशिष्ट असें आमचें कुटुंब लोकांच्याकरितां खस्ता खात दिवसभर वणवण करतें आणि संध्याकाळीं जेव्हां यांचें पुनरागमन होतें तेव्हां बाईसाहेब इतक्या दमल्याभागलेल्या आणि कावलेल्या असतात, कीं त्या क्षणकालच्यासुद्धां पत्नी किंवा माता नसतात. घरांत आमचीच स्थिति सदैव 'त्वमेव माता पिता त्वमेव' अशी असते. संबंधित लोक इकडे लक्ष देतील काय?"

पण अशा वर्तमानपत्री आव्हानांकडे 'जनता' किंवा सरकार कोणीच लक्ष देत नाहीं याची खात्री असल्यामुळें एका वैतागलेल्या नवऱ्यानें कडक उपाय-योजना करण्याचें ठरविलें.

अमेरिकन तुरुंगातील जीवनाचीं वर्णनें त्यानें वाचलीं होतीं. आणि 'गृहसौख्या'ला तो इतका कंटाळला होता, कीं त्या वर्णनांनीं त्याच्या तोंडाला अगदीं पाणी सुटूं लागलें. कधीं एकदां आपण तुरुंगाच्या त्या प्रशांत, निरागस वातावरणांत जाऊन पडूं, असा त्यानें ध्यास घेतला. पण तुरुंगांत जाणार कसें? हा माणूस बिचारा अगदीं पापभीरु होता. पोलिसांनीं पकडायला निदान कांहींतरी साधेंसुधें तरी कारण हवें! त्यानें खूप विचार केला. शेजारच्यांच्या घराच्या खिडकीचें तावदान एक मोठा थोरला दगड त्यावर भिरकावून फोडावें, कीं पोलिसदादाला दुरुत्तरें करावीं, कीं आपली सरळ घरफोडीच करावी, म्हणजे वऱ्याच दिवसांची काळजी मिटली, असें त्याला होऊन गेलें. 'चौकीवर चला! तुम्हांला कैद केलें

आहे, '— हे पोलिसाचे अमृततुल्य शब्द ऐकण्यासाठीं त्यानें आपल्या जिवाचे कान केले असते.

सदरहू गृहस्थाला तुरुंगसौख्य मिळालें कीं नाहीं कुणास ठाऊक! पण तें मिळविण्याची त्याची अमानुष तळमळ पाहतां, आतांपर्यंत त्यानें तें बहुधा मिळविलें असणार.

अमेरिकेंत शेंकडा वीस टक्के विवाहित लोक घटस्फोट घेतात असें मी ऐकून होतों. आतां इतक्या घाऊक प्रमाणावर काड्या मोडायच्या म्हणजे दरवेळीं तींच तींच कारणें कशीं चालणार?

एका बाईला मोठ्या मनोरंजक कारणासाठीं घटस्फोट मिळून गेला. तिच्या नवऱ्याचा आपला नेहमींचा उद्योग हा कीं तो गळफांस लावून घ्यायचा प्रयत्न करायचा. हेतु—बायकोला चिडविणें. बाईनीं सुरुवातीसुरुवातीला ऐकून घेतलें; पण पुढें दर वेळीं त्याला वाचविणें हें इतकें कंटाळवाणें झालें कीं त्यांनीं घट-स्फोटासाठीं अर्ज केला.

हा घटस्फोट देतांना जज्जसाहेबांनीं जरी बायकोला दिला असला तरी तिच्यापेक्षां नवऱ्याच्या सहानुभूतीमुळेंच त्यांनीं तो दिला असावा असा माझा नम्र अंदाज आहे.

दुसऱ्या एका खटल्यांत मात्र नवऱ्यालाच सरळसरळ घटस्फोट देण्यांत आला आणि या बाबतींत तरी न्यायमूर्तींची सहानुभूति कोणाकडे होती याविषयीं तर्क बांधण्याचें कारण पडलें नाहीं.

या खटल्यांतील बाई ( वजन ९६ पौंड ) आपला २१० पौंडी नवरा फक्त झोंपी जायचीच वाट पहात. मग एकदां का स्वारी घोरूं लागली कीं या बाईसाहेब पलंगपोसाच्या साहाय्यानें नवरोजींना पलंगालाच करकचून बांधीत आणि नंतर त्याला खराट्याच्या मुटीनें भरपूर चोप देत.

आमच्या मॅडिसनजवळच असलेल्या मिलवॉकी शहरांतल्या एका माणसानें मोटी चलाखी करून घटस्फोट मिळविला. त्यानें जज्जसाहेबांना सांगतलें, " साहेब, ही माझी बायको झोंपेत ' हर्बर्ट ' या नांवाचा सारखा जप करीत असते. "

" फार आनंदाची गोष्ट आहे. झोंपेंतहि नवऱ्याच्या नांवाचा जप करणाऱ्या या बाईचें तुमच्यावर निःसीम प्रेम असलें पाहिजे. " जज्जसाहेब म्हणाले.

" अहो पण न्यायाधीशमहाराज, दुर्दैवानं माझं नांव ' हर्बर्ट ' नसून ' लिओ-नार्ड ' आहे, त्याला काय करणार ? "

कांहीं अबला मात्र फारच शहाण्या आणि व्यवहारी असतात. घटस्फोट वगैरे घेणें त्यांना नामंजूर असतें. कारण, आपल्या मैत्रिणींच्या अनुभवांवरून त्यांना हें कळून चुकलेलें असतें कीं, याला सोडून दुसऱ्याला आपला म्हणायचें म्हणजे आगींतून सुटून फुफाट्यांत पडण्यासारखें आहे; तेव्हां दुर्दैवानें जें सोंग आपल्या गळ्यांत पडलेलें आहे त्यालाच ठाकूनठोकून सरळ करणें बरें.

एका बाईनीं आपल्या नवऱ्याला खूप समजावून सांगितलें कीं, ' बाबा रे, तूं कांहीं ऑफिसांतल्या क्रिसमस–पार्टीला जाऊं नकोस. मला तें मुळीच आवडत नाहीं. ' पण बाबा कसचे ऐकतात ? ते आपले पार्टीला गेले. इतकेंच नव्हे, तर ते जेव्हां परत आले तेव्हां त्यांनीं बरीच ' घेतली ' आहे हें बाईच्या ध्यानांत आलें. त्यांत आणखी नवऱ्याच्या मुख-कमलावर सगळीकडे लिपस्टिकचे डाग ! झालें ! बाईचा असा कांहीं भडका उडाला, कीं त्यांनीं जवळच पडलेली ( लहानशीच ) बादली उचलली आणि त्याच्या शिरकमलावर आदळली. ' तरी बरं, बादली रिकामी होती ! आणि तसं कांऽहीं लागलं नाहीं. एक लहानशी खोक पडली असेल डोक्याला फार तर. एवढा कांगावा करायला नको होता एवढसं खरचटलं त्याचा ! '



' सोंगा ' चा कपाळमोक्ष

याच्या पुढच्या क्रिसमस–पार्टीला जाण्याची ' सोंगा'ची काय बिशाद आहे ? कारण त्याला काय माहीत नाहीं, कीं घरांत मोठ्या बादल्याहि असूं शकतात आणि, शिवाय त्या नेहमींच रिकाम्या असल्या पाहिजेत असेंहि नाहीं.

इतक्या भयानक ठेचा पुढच्यांना लागत असतांनाहि मागचे लोक शहाणे होत नाहींत हें कसें ?—असा कांहींसा भोळसर आणि बराचसा अडाणी प्रश्न एखाद्याला पडण्याचा संभव आहे. या प्रश्नाचें सोपें उत्तर असें कीं, लग्न करणें, न करणें ही गोष्ट कुठल्याहि अमेरिकन माणसाच्या बहुधा हातांत नसते. म्हणजे त्यानें लग्न करावें हे त्याचे आई-बाबा ठरवीत नसले तरी त्याची भावी बायको तें ठरवून टाकीत असते. 'सांगून जाणें,' 'पहायला येणें' इत्यादि प्रकार तिकडे नसल्यामुळें आपलें सावज शोधण्याची जबाबदारी प्रत्येक चिरंजीव सौभाग्यकांक्षिणीवर असते. या विषयावर मी जें वाचलें आणि पाहिलें त्यावरून माझी अशी समजूत झाली कीं, बहुतेक तरुण मुली पुरुषांची शिकार करण्यांत मग्न असतात. 'डेटिंग'ची पद्धत तिकडे इतकी सर्वमान्य आहे, कीं ज्या मुलीला 'डेट्स्' मिळत नाहींत अशा मुलीचे आईवडील 'पोरीचें आतां कसें होणार ?' म्हणून हवालदील होत असतात.

आश्चर्य असें कीं, 'पुरुषांची शिकार कशी करावी' या विषयावरचें एक 'गाइड'सुद्धां मी एका सुप्रसिद्ध अमेरिकन स्त्री—मासिकांत वाचलें. 'तुझ्यासारख्या सुंदर मुलीचं अजून लग्न होऊं नये, अं ?' असेंच मुळीं त्या मार्गदर्शिकेचें नांव होतें. पंचविशी लागूनहि एकाकीच असलेल्या प्रत्येक मुलीनें करायची ही 'सप्तपदी-योजना' होती. उमेदवारांसाठीं पहिली सूचना ही कीं, त्यांनीं वाळसें फार घेतलें असल्यास तें जरा कमी करावें. त्यासाठीं जिभेवर ताबा ठेवावा. दुसरी सूचनाः तुम्हीं अगदींच 'हाडबंडले' असाल तर तेंहि चांगलें नाहीं. खा, प्या आणि आकार घ्या. तिसरी : तुमचा मेक्अप् योग्य असतो ना ? नसल्यास स्पेशॅलिस्टाला गांठा. खेड्यापाड्यांत रहात असल्यास शहरांत जाऊन त्याला किंवा तिला भेटा. चौथी : तुमचें व्यक्तिमत्व कसें आहे ? पुरुष तुम्हांला टेलिफोन करून तारखा मागत नसेल तर तुमचा टेलिफोन बिघडला आहे असें समजूं नका. अंतर्मुख होऊन आपल्या व्यक्तिमत्वाचा विचार करा. तुमच्या डोक्यांत प्रकाश पडत नसेल तर एखाद्या मैत्रिणीला आणि शक्य तर एखाद्या शत्रूला विचारा. आपण आपल्या पुरुष-मित्रांशीं बरोबर वागतों कीं नाहीं याचा विचार करा. इतर बायका काय करतात ? त्यांचें बोलणें आणि चालणें कसें असतें ? त्या अरेरावी आहेत कीं शामळू; आक्रमक आहेत कीं

सत्तेची हांव बाळगणाऱ्या आहेत; बडबड्या आहेत कीं कटकऱ्या आहेत? आणि नंतरचा प्रश्न म्हणजे, तुम्ही कशा आहांत? एखादा पुरुष बडबड्या असला कीं त्याला शांतपणें श्रवणभक्ति करणारा श्रोता हवा असतो. तो शांत स्वभावाचा असला तर त्याला चुरचुरीत बोलणारी पोरगी हवी असते. कित्येक बायकांना चमत्कार संभाषण आणि वादविवाद यांतला फरक माहीत नसतो. म्हणून बायांनों, राजकारण, धर्म यांसारखे वादविषय टाळा. कित्येक 'उत्तरा' —छाप बायकांचें काय होतें कीं त्या वाद जिंकतात, पण नवरा गमावतात. आपले पैसे खर्च करून पुरुष तुम्हांला बोलावतात तें तुमची करमणूक करण्याकरितां नाहीं; त्यांची करमणूक तुम्हीं करावी म्हणून.

पांचवी (आणि महत्त्वाची) सूचना ही कीं, जिथें मासे असतात तिथें आपलें जाळें टाका. मैत्रिणींच्यातर्फे पुरुषांच्या ओळखी करून घ्या. ज्या ठिकाणीं तुम्ही नोकरी करतां तिथें आपलें बायकांचेंच राज्य असलें तर नोकरी सोडा. जिथें बरेच नवे चेहेरे दिसतील अशा ठिकाणीं जा. हवेच्या ठिकाणीं तुम्हांला एकाकी पुरुष आढळणें कठीण. नुसतीच हवा खाण्याचा प्रसंग येईल अशानें. पण अशा ठिकाणीं जायचें ठरविलेंच, तर जिथें सावज मिळण्याचा संभव आहे अशा ठिकाणीं जा. आणि बरोबर पोरीबाळींचा घोळका नको. अशा तांडयांत तुम्ही असला तर कोणीहि पुरुष तुमच्या वाटेला जाणार नाहीं. तुम्ही एकट्या भटकत असलांत तरच सावज तुम्हांला बुजणार नाहीं. सहावें पाऊल हें कीं, तुम्ही एकट्या राहून पुरुषांना मोहजालांत पकडा. आजी किंवा आईकडे रहाण्यांत कांहीं अर्थ नाहीं. या दोघींच्या पहाऱ्यांत तुम्ही राहिलांत कीं संपलेंच! त्यापेक्षां स्वतंत्रपणें रहाणें चांगलें. अशाच मुली पुरुषांना पसंत पडतात. शिवाय आपल्या स्वतंत्र घरांत जेव्हां तुम्हीं एखाद्या पुरुषाला बोलवाल तेव्हां वाढलेला स्वैंपाक हा तुम्हींच बनविलेला असतो हें त्याच्या लक्षांत येतें. पुरुष कांहींहि म्हणत असले तरी अशी अन्नपूर्णाच त्यांना शेवटीं पसंत पडते.

शेवटचा सल्ला असा कीं, अनेक ठिकाणीं खडे मारून ठेवा. नेहमींचा कार्यक्रम बदला. ऑफिस सुटलें कीं, घरीं—असें नको. वाटेंत रेंगाळा. स्वयंसेविका बना. चर्चमध्यें जा, समाजसेवा करा. कुठल्यातरी पक्षांत जा. अशा ठिकाणीं तुमच्या गळाला कोणीतरी लागेल. स्वयंसेविका व्हायचें नसेल तर खेळांत भाग

घ्या, कुठलातरी छंद सुरू करा. जरा डोळे उघडे ठेवून आजूबाजूला पहा. तुम्हांला असें आढळेल कीं ज्यांना चांगलेचांगले 'बकरे' मिळाले त्या सगळ्याच कांहीं ३६"–२४"–३६" या मापाच्या नाहींत, कीं अप्सराहि नाहींत. तुमच्यांत आणि त्यांच्यांत तसा कांहींहि फरक नाहीं. म्हणून सारांश हाच कीं, संधीचा फायदा घ्या. संधि पुढच्या दाराशीं आणि तुम्ही मागच्या दारीं असें नको. लक्षांत ठेवा, तुमच्या स्पर्धक असलेल्या दुसऱ्या मुली आपलीं पावलें टाकीत आहेत. आपलीं जाळी विणींत आहेत.

तुमच्यासारख्या मुलीनें अजूनहि एकाकी असावें याचें खरें कारण हेंच कीं तुम्ही अजून त्या दृष्टीनें कामालासुद्धां लागलेलां नाहींत.



अमेरिकन 'मच्छीमारी' !

हें 'गाइड' वाचलें असतां हमखास यशाची खात्री कितपत असते कुणास ठाऊक! पण 'जाळीं विणणें', 'मासे पकडणें', 'सावज', 'गळ' या भाषाविलासावरून पुरुषांची शिकार अमेरिकेंत किती पद्धतशीरपणें होत असते हें इतर देशांतल्या पोरीबाळींना ( आणि पोराबाळांना ) कळावें.

वरील निरनिराळ्या कल्पना वापरून पुरुष एकदां जाळ्यांत सांपडला कीं कांहीं दिवसांनीं त्याचा 'नवरा' व्हायला वेळ लागत नाहीं. आणि तो जाळ्यांत सांपडलेला आहे हें कळण्यासाठीं कांहीं त्याच्या हातांत अंगठीच असावी लागते असें नाहीं. कारण तो कमालीचा भित्रा बनलेला

असतो, त्याचे खांदे सदैव पडलेले असतात, ‘ सांपडला ’ असूनहि तो सारखा ‘ हरवल्या ’ सारखा वागत असतो आणि त्याला कांहींहि विचारलें तरी ‘ हिला विचारून सांगतों ’ हें उत्तर तो तावडतोब देत असतो.

अनेक वर्षें घरांत अनियंत्रित सत्ता चालविल्यावर अधूनमधून या बायकांना सत्तेचा वीट येत असावा. यामुळें असो, किंवा ‘ चेंज ’ म्हणून गरीब बिचाऱ्या नवऱ्याबद्दल वाटणाऱ्या कणवेमुळें असो, घरमालकानें मालकी हक्क गाजविला पाहिजे असें आपलें बायकांना वाटूं लागतें. एका बाईच्या पुढें पडलेला सर्वांत महत्त्वाचा प्रश्न हा कीं, आपल्या नवऱ्याला मर्द गड्यासारखें कसें वागायला लावायचें ? “ म्हणजे यांनीं अगदीं हाणामारी करायला सुरुवात करावी असा माझ्या म्हणण्याचा अर्थ नाहीं. पण त्यांनीं नुसतं आपण ‘ मालक’ आहोंत एवढं दर्शविलं तरी पुरे. आतां मीं त्यांना सगळं माझ्या म्हणण्याप्रमाणं करायला भाग पाडतें हें वेगळं. पण मला मनांतल्या मनांत खोल कुठंतरी वाटत असतं, कीं त्यांचीच सरशी व्हावी. खरोखर सगळेच नवरे इतके मठ्ठ कसे ! त्यांच्या डोक्यांत प्रकाश म्हणून पडत नाहीं. घरांतल्या सगळ्या गोष्टी मींच ठरवायचा मला अलिकडे कंटाळा यायला लागला आहे. सत्तेचा वीट यायला लागला आहे. आतां ‘ आमचे हे ’ मालकी हक्क कधीं गाजवूं लागतील असं मला झालं आहे. दर वेळीं आमचे मतभेद झाले कीं मी मनांतल्या मनांत प्रार्थना करीत असतें,–‘ देवा, यावेळीं तरी यांचा जय होऊं दे ! ’ पण कसचं काय आणि कसचं काय ? ”

पुरुषांच्यापेक्षां आपण कुठल्याहि बाबतींत कशा माग नाहीं हें दाखविण्याची अमेरिकन बायकांची कोण धडपड ! विमान उड्डाणाचे निरनिराळे पुरुषी विक्रम ऐकून एका बाईला अशी कांहीं सुरसुरी आली, कीं तिनें एकटीनें कॅलिफोर्नियापासून ऑस्ट्रेलियापर्यंत विमानोड्डाण केलें. दुसरीनें स्टंट मोटारींतून आगींत उडी घेतली. तिसऱ्यात एका बाईनें भयंकर थंडींत जंगलांत जाऊन मुक्काम ठोकला. एकटीला वाहून नेतां येतील एवढ्याच वस्तू तिनें बरोबर घेतल्या होत्या आणि खाण्यापिण्याच्या वस्तूंबरोबर चाकू आणि पिस्तुल हीं आयुधेंहि बरोबर बाळगलीं होतीं.

असले ‘ स्टंट ’ करणें ज्यांना मानवत नाहीं अशा स्त्रिया आपल्याला परवडेल

असें दुसरें कांहीं करून पाहतात. सौ. पॅट्रिशिया नांवाच्या एकवीस वर्षांच्या एका बाईनीं आपल्या दंतवैद्यावर तीस हजार डॉलर्सचा नुकसानभरपाईचा दावा लावला. त्यांचें असें म्हणणें कीं, वैद्यबोवांनीं आपला एक दांत काढल्यापासून आपल्या जबड्यांतलें आणि हनुवटीतलें चैतन्य नाहींसें झालें. मुख्य म्हणजे या प्रकारांत आपली चुंबनानुभवाची शक्ति कमी झाली.

या सगळयाचा अर्थ असा मात्र नव्हे, कीं प्रत्येक अमेरिकन स्त्री ही वंडवाली असते. बहुतेक स्त्रियांना घरकाम चुकत नाहीं. त्यांत आणखी ‘ रामा गडी ’ किंवा ‘ सखू मोलकरीण ’ यांसारख्या संस्था अमेरिकेंत नसल्यामुळें त्यांच्या कामांत भर पडते. आधुनिक उपकरणांमुळें हें काम बरेंचसें सुकर होतें हें खरें असलें तरी, मेरी लुईज नॉर्थसारख्या आमच्या श्रीमंत यजमानीणबाईनासुद्धां या कामाच्या रगाड्यांतून उठून शांतपणें एखादी सिगरेट ओढायलाहि उसंत मिळत नसे. अर्थात् ‘ हनी ’, ‘ डार्लिंग ’, ‘ स्वीटहार्ट ’ इत्यादि उत्तमोत्तम शब्द सुमनांचा वर्षाव करून ती जॅकलाहि मदतीला हाताशीं धरीत असे हें वेगळें. रविवारची सुट्टी असली तरी गरीब बिचारा जॅक खालच्या मानेनें घरामागची हिरवळ कापण्यांत, डिशेस् विसळण्यांत किंवा कपडे वाळत घालण्यांत बुडलेला असे. शिवाय मोटार चालविण्याचें काम तो स्वतःच्या सुरक्षिततेच्या दृष्टीनें कां होईना, पण स्वतःच करीत असे तें वेगळेंच.

—पण अमेरिकन गृहिणी ही घरकामानें वांकलेली असते ही सबब कोणत्याहि सुधारकास कार्यप्रवृत्त करण्याला पुरेशी नाहीं. कारण कसेंहि असलें तरी घरकाम हें बाहेरील कामांपेक्षां खूपच बरें, असें कळून चुकल्यामुळेंच अमेरिकन गृहिणीनें तें पत्करलें असावें, असा माझा कयास आहे. ज्या क्षणीं राजकारणासारखे पुरुषी उद्योग करणें हेंच अधिक सुखाचें आहे असें तिला वाटेल तेव्हां पाळण्याची दोरी आणि एप्रनच्या नाड्या नवऱ्याच्या गळयांत अडकवून, इब्सेनच्या नोराप्रमाणें घराचीं दारें आपटीत ती घराबाहेर पडेल याबद्दल शंका बाळगायला नको. आणि जेव्हां असें खरोखरच होईल तेव्हां अमेरिकन लोकांच्याबद्दल आपल्याला कितीहि सहानुभूति वाटली तरी तो सर्वच प्रकार एकंदरींत फार मनोरंजक होईल अशी मला खात्री आहे.

# ९ : बिचारा अमेरिकन नवरा

त्या दिवशीं मी आमच्या स्वैपाकघरांत कपबश्या आणि भांडीं विसळत होतों. तेवढ्यांत आमच्या घराच्या मालकीणबाई तिथें आल्या. माझ्याकडे पहात थोडा वेळ उभ्या राहिल्या आणि मग त्या हंसायला लागल्या.

" अरे वा ! तुम्ही एवढ्यांत किचन–पोलिस झालांत कीं ! "

" काय करणार मग ? माझ्या बायकोनं इतक्या अमेरिकन नवऱ्यांना घरांतलीं कामं करतांना पाहिलं आहे कीं माझी यांतून सुटका होईल असं वाटेना. तेव्हां म्हटलं, आपण आपलं वेळेवरच सुरू केलेलं बरं ! " मी म्हणालों आणि धुऊन झालेल्या कपबश्या फडक्यानं पुसून कोरड्या करायला लागलों. मालकीणबाई परत एकदां आल्या होत्या तेव्हांहि मी याच कामांत गुंतलों होतों.

" अरेरे ! काय ही तुझी दशा ? इंडियांत तुला असलीं कामं करावीं लागत नसतील, नाहीं ? "

" इतके दिवस करावीं लागत नव्हतीं. यापुढं कठीण दिसतंय्. " मला कोणाचीतरी सहानुभूति त्या वेळीं आवश्यक वाटत होती.

" तशी तुला आतां या कामाची चांगलीच संवय झाली आहे बरं का ! आणखी कांहीं दिवसांनीं अधिकच चांगलं काम करायला लागशील. " या वेळीं मी विसळत असलेला कप हातांतून निसटतो कीं काय असें मला वाटायला लागलें होतें.

" नाहीं, पण मला आँशा आहे कीं थोड्याच दिवसांत मला बढती मिळेल

आणि या कटकटींतून मी वांचेन. "


" काय म्हणालास ? बढती ? तुला ? या कामांतून ? " बाईनीं चार प्रश्न एकदम विचारले. आणि मी भलताच भांबावून गेलों.

" कां बुवा ? बढती मिळायला काय हरकत आहे ? पहिल्या दिवसापासून हें काम मी मन लावून करतो आहें. मला बढती मिळायलाच पाहिजे ! "

बाई प्रथम मोठ्यांदां हंसल्या. आणि मग हंसतांहंसतांच म्हणाल्या,—

" बढतीची बात सोड बाबा ! म्हणजे त्याचं असं आहे कीं, पुरुष एकदां किचन-पोलिस झाला, कीं कायमचाच किचन-पोलिस रहातो. बढती नाहीं अन् कुछ नाहीं ! "

या वेळीं मात्र मी धूत असलेला कप माझ्या हातांत राहिला नाहीं. तो माझ्या हातांतून सुटला, आणि माझ्या लक्षांत यायच्या आंतच त्याचे दोन कप झाले.



प्रमोशन !

—पण सुदैवानें (!) या स्वैपाकघरांतल्या नोकरीवर फार दिवस रहावें लागलें नाहीं. लवकरच आपल्या घरांतल्या कपबश्यांची संख्या झपाट्यानें कमी होत आहे हें बायकोच्या लक्षांत आलें असावें.

एकदां मी फार आनंदांत होतों आणि सुखानें बाहेरच्या खोलींत बसलों होतों तेवढ्यांत ती म्हणाली, " आज पाहुणे जेवायला यायचे आहेत. लक्षांत आहे ना ? "

" वाः ! अशा गोष्टी आम्हीं कधीं विसरतों काय ? आज आम्हांला त्याच्या बरोबर कांहींतरी चांगलंचुंगलं खायला मिळणार म्हणून तर तें आमच्या चांगलंच लक्षांत आहे. "

" तें ठीक आहे. पण या खोलीकडे पहा जरा. "

मीं खोलीकडे नीट पाहिलें. तिथें पण नवीन पहाण्यासारखें मला कांहींच दिसलें नाहीं. नेहमींप्रमाणें माझी पुस्तकें सगळीकडे अस्ताव्यस्त पडलीं होतीं. दोनचार वर्तमानपत्रें जरा विस्कटून पसरलीं होतीं. कागदाचे कपटे आणि नांवाला एखादें सिगरेटचे थोटुक एवढेंच काय तें गालिच्यावर दिसत होतें. आतां अगदीं कोपऱ्यांत थोडासा कचरा होता; पण तो कांहीं मला त्रास देत नव्हता बिचारा. आपला जागच्या जागीं निमूटपणे पडून होता.

" कांहीं नवीन दिसत नाहीं बुवा मला ! का मला चकित करण्यासाठीं तूं नवीन कांहीं आणलं आहेस आणि लपवून ठेवलं आहेस मला दिसेल म्हणून ? " तिनें दोनच दिवसांपूर्वीं साफ केलेली खोली मीं इतक्या सहज अव्यवस्थित केली होती की तिला काय म्हणायचें होतें हें माझ्या लक्षांतहि आलें नाहीं.

" मी तुम्हांला चकित करणार आहें. पण तुम्हांला आवडायचं नाहीं तें. हा व्हॅक्यूम क्लीनर आणलाय मीं. तो घ्यायचा, बटन दाबायचं, आणि ही खोली दोन दिवसांपूर्वीं होती तशी करायची. "

" अग पण त्या कपबश्या—? "

" कपबश्या राहूं देत ! त्या आजपासून मीच धुणार आहें. दर आठवड्याला नव्या कपबश्या आणायला आपल्याजवळ पैसे नाहींत. "

अशा रीतीनें माझी स्वैंपाकघरांतून बाहेरच्या बसायच्या खोलींत बदली झाली. आशा एवढीच होती कीं, निदान पुण्याला गेल्यावर तरी मला हीं कामें उपसावीं लागणार नाहींत.

—पण बहुतेक अमेरिकन नवऱ्यांची या किंवा असल्या कामांतून सुटका नसते. आणि त्यामुळें या कामांत ते बहुधा तरबेज होतात. ऑफिसांतली नोकरी आवडली नाहीं तर माणूस ती सोडून दुसरी बघतो त्याप्रमाणें ही घरची नोकरी आवडली नाहीं तर इथें तो दुसरें घर बघूं शकतो. पण अनुभव असा आहे कीं तिथें तो फार दिवस एकटा रहात नाहीं. लवकरच दुसरें लग्न करून बिचारा परत दुःखी होतो.

असे लोक एकंदरींत कमीच. ' आलीया भोगासी असावें सादर ' हा देहूच्या तुकारामबोवांचा संदेश पार अमेरिकन नवऱ्यापर्यंत येऊन पोंचलेला दिसतो.

म्हणून त्यांनीं कधीं अस्तन्या सांवरल्या तरी त्या कपबश्या विसळण्याकरितां. अर्थात् माझे स्नेही जॅक नॉर्थ यांच्यासारखे कांहीं अनुभवी लोक चुकारपणा करूं शकतात आणि पचवूंहि शकतात.

नॉर्थ यांच्या घरच्या पहिल्या जेवणाचा तो प्रसंग मला अजून आठवतो.

त्या दिवशीं भुकाहि चांगल्याच लागल्या होत्या आणि मेरी लुइज नॉर्थ यांनीं स्वैंपाकहि रुचकर केला होता. जेवण मीं एखाद्या सामान्य नवऱ्याप्रमाणें घेतलें. त्या प्रेमळ जोडप्याचा आग्रह लक्षांत घेऊन, अभक्ष्य होतें तरी भरपूर जेवलों. जेवण झाल्यानंतर बाहेर जाऊन आरामखुर्चीत बसावें असें एरवीप्रमाणें केलेंहि असतें; पण तेवढ्यांत 'अमेरिकेत कसें वागावें?' नांवाचा जो महान् ग्रंथ मीं वाचला होता त्याची मला आठवण झाली. त्यांत असें लिहिलें होतें कीं, अमेरिकेंत जेव्हां तुम्ही कुठें जेवायला जाल तेव्हां जेवणानंतर लगेच कपबश्या एकत्र करायला आणि आंवरायला यजमानीणबाईंना मदत करा. तशी तुमच्याकडून अपेक्षा असते. म्हणून आपला मी उठलों आणि कांटे–चमचे गोळा करायला लागलों. पहिला हप्ता आंत ठवून आलों. पण नॉर्थबाईनी मला 'थँक्स. तूं हें काम केलें नाहींस तरी चालेल' असें न म्हटल्यामुळें अ. क. वा. या ग्रंथाप्रमाणें मीं दुसऱ्या हप्त्याला हात घातला. तेवढ्यांत जॅक नॉर्थनीं माझ्याकडे पाहिलें आणि डोळे मिचकावून ते म्हणाले, "बस रे तूं. आपण जरा गप्पाच मारूं या. मुलींना करूं दे तें काम!" मी तरी काय करणार? मी आपला जागच्या जागींच खुर्चीवर बसलों आणि गप्पा मारूं लागलो. अ. क. वा. मध्यें यजमानांचें ऐकूं नये असें कांहीं लिहिलेलें नव्हतें.


'अमेरिकेंत कसें वागावें?'

जॅक नॉर्थ नंतर एकटे होते. तेव्हां बाईनीं त्यांचें काय केलें हें मला माहीत नाहीं. पण माझ्यादेखत तरी ती माउली कांहींच बोलली नाहीं. कदाचित् म्हातारपणीं नवरेलोकांना देण्यांत येणारी ही एक छोटीशी सवलत असावी.

पण कांहीं नाहीं तरी मिस्टर नॉर्थ यांनीं जेवण चालू असतां वाढण्याचें काम स्वतःच केलें होतें. नंतर गप्पा मारतांना मी एकटाच आहें असें पाहून त्यांनीं मला सांगितलेंहि, " तूं इथं आहेस तोंपर्यंत ठीक आहे. आम्ही अमेरिकन नवरे फार बिघडलेलों आहोंत. त्यामुळं आम्ही हीं असलीं कामं करतों तूं मात्र इंडियांत याचा फैलाव करूं नकोस. जेवण झाल्यावर म्हंजे कशा पुरुषांनीं मस्त गप्पाटप्पा कराव्या, झकासपैकीं एखादी विडी ओढावी आणि आराम करावा..." पण तेवढ्यांत नॉर्थबाई आल्या आणि आमचें बोलणें थांबलें.

जॅक नॉर्थसारखे भाग्यवान लोक एकंदर थोडेच. मला माहीत असलेल्यापैकीं बहुतेकांना निरनिराळ्या प्रकारचीं कामें नेहमीं करावीं लागतात. मोटार सगळेच वापरत असले तरी मोटार चालविण्यापासून, तों तिची साफसफाई आणि इतर कामें सगळीं मुलांच्या वडिलांनाच करावीं लागतात. घरांत कंटाळा आला म्हणजे बायको जेव्हां फिरायला बाहेर पडते तेव्हां माझा मित्र व्हिक्टर मुलाला घरीं संभाळत बसतो, किंवा त्यालाहि कंटाळा आला तर मुलाला बाबागाडींत टाकून तो फिरायला जातो. आमचा घरमालक घराला रंग देण्यापासून तों भिंतीला कागद चिकटविणें, खिडक्यांना पडदे लावणें, तावदानें बसविणें, नळ दुरुस्त करणें येथपर्यंत सर्व कामें करतो. बाहेरच्या अंगणांतली हिरवळ तोच कापतो, आणि तिथें पाणीहि तोच घालतो. थंडींत जमणारे बर्फाचे थर तोच वाकवाकून खरडून काढीत असतो. आणि इतकेंहि करून बाईसाहेब जेव्हां शॉपिंगला जातात तेव्हां मोटार चालवायला तो हंसतमुखानें हजर असतोच. नंतर परत आल्यावरसुद्धां तो जरी 'जी बाईसाहेब' म्हणाला नाहीं तरी बायकोनें आणलेलें हाराभर सामान घरांत आणायला धांवतो. बायका मोटारींत बसल्यानंतर त्या बिचाऱ्या इतक्या दमतात कीं त्यांच्या बाजूचें दार लावून घ्यायलाहि त्यांच्या अंगांत शक्ति नसते. नवरा तें दार स्वतः बंद करतो पलिकडच्या बाजूला जाऊन आंत बसतो, आणि मोटार चालू करतो. घरांतून बाहेर पडतांना किंवा आंत शिरतांना किंवा इतरत्र कुठेंहि बुवा आधीं पुढें

होऊन दार उघडतो आणि नंतर बाईसाहेब आंत जातात किंवा बाहेर पडतात. रस्त्यांतून चालतांना बाईसाहेबांचा हळूच हात धरून त्यांना चालविलें तर त्या खुषींत असतात. त्या कुठेंहि गेल्या तरी त्यांचा कोट काढायला किंवा घालायला त्यांना मदत करणें हा शिष्टाचाराचा भाग असतो. त्यांतले बहुतेक प्रकार मी जाणूनबुजून किंवा विसरल्यामुळें करीत नाहीं तेव्हां मी एक ' नरपशु ' आहें असें इथल्या बायकांना बहुधा वाटत असावें.

आपल्या शेजारीं असलेली स्त्री बसण्याआधीं आपण बसूं नये, तिच्यासाठीं खुर्ची मागें ओढावी आणि ती बसल्यानंतर तिची खुर्ची पुढें सरकवून नंतर आपण बसावें. तसेंच ती उठतांनाहि आपण तिला मदत करावी, असा इथला अलिखित नियमच आहे. पण मी असें करायला अजून धजलेलों नाहीं. एखाद्या बाई बसतांना मीं खुर्ची थोडीशीच मागें ओढण्याऐवजी जर जास्त मागे ओढली तर पुढें जो भयानक नाट्यपूर्ण प्रसंग ओढवेल त्याचें चित्र माझ्या डोळ्यापुढें उभें रहातें आणि खुर्चीकडे गेलेला माझा हात परत येतो.



' रामा '

माझ्या मोठ्या बहिणीचा लग्नानंतरचा एक जुना फोटो आहे. त्यांत आमचे मेहुणे खुर्चीवर बसलेले आहेत आणि बहीण अदबीनें बाजूला उभी आहे. हा जोडा कसा छान शोभतो. आतां आमचें असें म्हणणें नाहीं कीं खुर्ची अगदीं नवरोजींकरितांच पाहिजे. वाटल्यास बाईसाहेबांनीं खुर्चीवर बसावें आणि ' साहेबांनीं ' अदबीनें बाजूला उभे रहावें. आमचा मुद्दा एवढाच कीं, खुर्ची एक असावी. म्हणजे ती पुढें किंवा मागें सरकविण्याचा शिष्टाचार पाळतांना शक्य असलेले अपघात टळतील.

माझ्या एका मित्राला हे असले शिष्टाचार आवडत नाहींत. तो म्हणतो, ' ही निव्वळ गुलामगिरी आहे. बायकांना जर समान हक्क पाहिजे असले तर अशा

खास वागणुकीची त्यांनी पुरुषांकडून अपेक्षा कां करावी ?' वास्तविक हें मत मलाहि मान्य आहे. पण तें अमेरिकेंत तरी कुठेंहि मोठ्यानें बोलायची माझी छाती नाहीं. 'समता', 'समान' असले ज्वालाग्राही शब्द जर माझ्या तोंडून बाहेर पडलेले कोणी ऐकले तर मी कम्युनिस्ट आहें अशी त्यांची खात्री होईल आणि मजवर अनवस्था प्रसंग ओढवेल अशी मला भीति वाटते.

स्वैंपाकघरांतलीं आणि घरांतलीं कामें नवरेलोकांना करावीं लागत असलीं तरी 'खास' कामांना त्यांना हातहि लावतां येत नाहीं. उदाहरणार्थ, एखाद्या नवऱ्यानें घरांत जर स्वतः स्वैंपाक करायचा ठरविला तर तेवढी 'स्वायत्तता' त्याला नसते. ॲलिस नांवाच्या माझ्या ओळखीच्या बाई म्हणाल्या, "काय म्हणालास ? रॉल्फला—आणि माझ्या स्वैंपाकघरांत ? अंहं ! तेवढं नाहीं रे बुवा. म्हंजे तो मला इतर मदत करतो. पण प्रत्यक्ष स्वैंपाक ? मी कधींच त्याला करूं देत नाहीं. जर एखाद्या वेळी मीं त्याला सांगितलंच तर तो इतका गोंधळ करून ठेवील कीं मग माझा उरलेला दिवस सगळं निस्तरण्यांत जाईल." असें असलें तरी अमेरिकन बायका एकंदरींत इंग्रज राज्यकर्त्यांप्रमाणें कमालीच्या धूर्त असतात. इंग्रजांनीं ज्याप्रमाणें महत्त्वाच्या सगळ्या सोडून इतर बाबतींत आपल्याला प्रथम स्वातंत्र्य दिलें होतें, तसेंच या अमेरिकन बायकांचें आहे. म्हणजे जेव्हां त्या मुलाबाळांना आणि यजमानांना घेऊन सहलीला किंवा 'पिक्निक्'ला जातात तेव्हां नेहमींचे नियम बरेच सैल केले जातात. खरें म्हणजे इथें असा जवळजवळ नियम आहे की सहलीला बाहेर गेल्यावर सगळा स्वैंपाक पुरुषांनीं करायचा. विस्तव पेटवण्यापासून तों अगदीं पानें मांडून वाढण्यापर्यंत. 'पुरुषांनीं स्वैंपाक कसा करावा' या विषयावर मुळीं इथें स्वतंत्र पुस्तकेंच आहेत. 'न्यूयॉर्क टाइम्स'मध्यें मीं कांहीं दिवसांपूर्वी अशा एका पुस्तकाचें परीक्षण वाचलें. नंतर अखिल अमेरिकेंत झालेल्या 'घराबाहेरील स्वैंपाक–स्पर्धेत' दहा हजार डॉलर्सचें बक्षिस मिळविणाऱ्या एका गृहस्थाला टेलिव्हिजनवर पाहिलें. सहलीप्रमाणेंच घराच्या मागच्या अंगणांत जेव्हां स्वैंपाक करावयाचा असेल तेव्हां तिथेंहि स्वैंपाक्याचीं वस्त्रें पुरुषाला चढवितां येतात. रॉल्फ जेव्हां अशीं वस्त्रें घालून विस्तवावर फुंकर मारीत होता, तेव्हां 'अमेरिकन पुरुषांची सद्यःस्थिति' या विषयावर चर्चा करून मी आगींत तेल ओतीत होतों.

" काय म्हणतोस ? इंडियांत पुरुषांना हीं कामं करावीं लागत नाहींत ? "

" छट् ! तुला काय वाटलं, आम्ही कामाच्या ओझ्याखालीं वांकून जात असलों पाहिजे म्हणून ! मुळींच नाहीं ! "

" अरेरे ! मग तुमच्या बायकांचा सगळा दिवस खस्ता काढण्यांत जात असणार ? "

" कसल्या खस्ता अन् कसलं काय मेहेरबान ! आमच्याकडे जरी कपडे धुवायचीं आणि भांडीं घांसायचीं यंत्रं नसलीं तरी नोकर हीं कामं करतात. "

" म्हणजे तुमच्या बायकांचा कैवार मी घेणं रास्त नाहीं तर ! "

" कोणत्याच बायकांचा कैवार पुरुषांनीं घेणं रास्त नाहीं. तें राहूं द्या. पण तुझा तो हॅंबर्गर जळायला लागला. ॲलिस बाहेर येते आहे, तिकडे तुझं लक्ष आहे ना ? "

त्याबरोबर रॉल्फनें विस्तव परत सारखा केला आणि कपडे खराब होऊं नयेत म्हणून जें फडकें त्यानें गळ्याभोंवतीं अडकवलें होतें तें नीट करण्यांत आपण गुंतलो आहोंत असें दाखविलें.

कांहीं दिवसांपूर्वीं मीं टेलिव्हिजनवर एक कार्यक्रम पाहिला. निरनिराळ्या क्षेत्रांत काम करणाऱ्या पुरुषांची कार्यक्रमाचे संयोजक मुलाखत घेत होते. त्यांतल्या सहांपैकीं पांच पुरुषांनीं कबूल केलें कीं आमच्या घरांत स्त्रिया याच स्वामिनी असतात. खरें म्हणजे सहाव्यालाहि तसेंच सांगायचें होतें. पण कार्यक्रमाला येतांना त्याच्या बायकोनें त्याला बजावलें होतें,— " लक्षांत ठेव बरं का जिमी, तुझा हा कार्यक्रम मी पहाणार आहें. एवढंच नव्हे, तर तुझी आईसुद्धां पहाणार आहे. तिचा आत्तांच कांहीं वेळापूर्वी फोन आला होता मला. " अशी धमकी मिळाली असल्यावर कोणता नवरा आपला भाषणस्वातंत्र्याचा हक्क बजावूं शकेल ?

" तुमच्या घरांत पैसे खर्च कोण करतो ? " संयोजकानें विचारलें.

" आम्ही पैसे मिळवितों. " सर्वांनीं एकमुखानें उत्तर दिलें.

" हा चांगला श्रमविभाग आहे कीं ! " संयोजक हंसला.

पण यावर ते सहाजण कांहींच बोलले नाहींत. त्यांनीं फक्त खांदे उडवले. आर्ट लिंकलेटर नांवाचा हा संयोजक मोठा मिस्किल गृहस्थ आहे. कार्यक्रमाच्या

सुरुवातीला त्यानें एक मजेदार चुटका ऐकवला.

नुकत्याच मरण पावलेल्या एका मित्राच्या थडग्यावर फुलें वाहण्यासाठीं एक गृहस्थ स्मशानभूमींत गेले होते. पण खूप प्रयत्न करूनहि त्यांना आपल्या मित्राची शवपेटी कुठें पुरली होती ती सांपडली नाहीं. नंतर मृताच्या पत्नीशीं बोलतांना त्या गृहस्थांनीं याचा उल्लेख केला.

" तुम्हांला ती जागा कां सांपडली नाहीं हें लक्षांत आलं माझ्या. " ती शांतपणें म्हणाली, " कारण त्या थडग्यावर माझंच नांव आहे. "

" तुमचं नांव ? जॉनच्या थडग्यावर ? "

" त्याचं असं आहे, या घरांतली प्रत्येक गोष्ट माझ्या नांवावर असल्यामुळं माझाहि नाइलाज झाला. काय करणार ? "

वास्तविक स्थिति अशी असली तरी ज्यांना आपला माल खपवायचा असतो असें जाहिरातदार मात्र ' गरीब बिचाऱ्या ' अमेरिकन बायकांची खूपच तरफदारी करीत असतात आणि त्यांच्याकरितां सहानुभूतीचे अश्रू सारखे ढाळीत असतात

उदाहरणार्थ, ' लक्स ' नांवाचा भांडीं स्वच्छ करण्याचा जो साबण आहे तो ' ज्या स्त्रियांना घरकामांत मदत मिळत नाहीं ' अशा असहाय्य स्त्रियांकरितां खास तयार केलेला असतो. या स्त्रियांना जाहिरातदार मोठ्या कळवळ्यानें ' सोप अँड वॉटर गर्ल्स ' असें म्हणतात; आणि भांडीं स्वच्छ करण्यात, कपडे धुण्यांत, फरशी साफ करण्यात, फर्निचरला पॉलिश करण्यांत—ज्या ज्या बाबतींत शक्य आहे त्या त्या बाबतीत त्यांचीं कामें हल्कीं करण्याचा यांचा धडपडाट चालू असतो. पण खरें म्हणजे या सगळ्यांत स्त्रियांचा त्रास वांचविण्याची जाणीव दिसण्यापेक्षां आपला माल खपविण्याची तळमळच अधिक असते हें वेगळें.

आणि खरें म्हणजे बहुतेक जाहिराती स्त्रियांकरितांच असतात ही गोष्ट तरी काय दर्शविते ? पावडरी, तेलें, सेंट्स्, कपडे, बूट यांच्या बहुतेक जाहिराती स्त्रियांकरितांच. त्यांचे केंस अधिक मुलायम कसे होतील, अधिक चमकदार कसे दिसतील, कायम तसेंच कसे राहतील. स्त्रिया अधिक सुंदर, अधिक आकर्षक, अधिक सुखी कशा होतील यासाठीं तयार केलेल्या नवीननवीन वस्तूंची जाहिरात सारखी होत असते. आणि त्या मानानें पुरुषांचें पाहिलें तर एखादें केंसाचें

तेल, एखादा दाढीचा साबण—बस्स् ! आणखी कांहीं नाहीं. याचें उघडउघड कारण असें आहे कीं ज्याच्याजवळ पैशाचें पाकिट असतें त्याचीच आराधना करण्यांत तथ्य असतें. आणि अमेरिकन स्त्रीच्या हातांत जरी पाळण्याची दोरी नसली तरी पैशाच्या पर्सचा पट्टा नक्कीच असतो, हें लबाड व्यपाऱ्यांना कधीच माहीत झालेलें असतें.

तसें पाहिलें तर अमेरिकन बायका या अतिशय कर्तबगार आहेत. पण इतकें कर्तृत्व अंगांत असूनहि त्या विशेष प्रमाणांत राज्यकारणाध्यें पडत नाहींत आणि 'चूल आणि मूल' यांतच समाधान मानतात, याचें कारण काय असेल ? कदाचित् पुरुषांनीं राजकारणांत अगोदरच पुरेसा गोंधळ केला आहे, त्यांत आपली भर नको, असें त्यांना वाटत असेल. खरें कारण माझ्या मतें असें असावें कीं, राजकारणाची दगदग आणि कटकट त्यांना नको वाटत असावी. त्यापेक्षां 'चूल आणि मूल' संभाळणें हें अधिक सोईचें आणि आरामाचें असतें. सारांश बायका राजकारणांत पडत नाहींत याचें कारण त्या भोळ्या किंवा अडाणी आहेत असे नसून त्या अतिशय धूर्त आणि हुशार आहेत हेंच असलें पाहिजे.

शिवाय पुरुष राजकारणांत खूप मोठे झाले तरी घरी काय ? अगदीं अमेरिकेच्या अध्यक्षांचीच गोष्ट घेतली तरी त्याच्या घरातल्या सत्ताधीश म्हणजे सौ. केनेडीच नव्हेत काय ? राजकारणाबद्दल जो दोष द्यायचा असेल तो बिचाऱ्या केनेडींना मिळतो, आणि 'अमेरिकेंतली पहिली स्त्री' म्हणून केनेडीबाईंचें मात्र सतत कौतुकच होत असतें. मिस्टर केनेडींच्या निरनिराळ्या संवयी आणि लकबी याबद्दल त्यांची सतत टिंगल होत असते; पण सौ. केनेडींच्या बाबतींत अगदींच वेगळें आहे. त्या आपले केंस कसे कापतात, त्यांच्या कपड्याच्या फॅशन्स काय असतात, याबद्दल सगळ्यांना कुतूहल असतें. मिस्टर केनेडी जेव्हां फ्रान्समध्यें गेले होते तेव्हां आपल्या पत्नीची लोकप्रियता लक्षांत घेऊन त्यांनीं मुकाट्यानें सांगितलें, "सौ. केनेडींबरोबर मी आपल्या भेटीसाठी आलों आहें." आपण अमेरिकेचे निवडले गेलेले अध्यक्ष असलो तरी अमेरिकेचे खरे अध्यक्ष कोण हे एकंदरीत केनेडींनाहि माहीत आहे.

अमेरिकेंतला प्रियाराधनाचा प्रकार पाहिला तर लग्नाच्या आधींहि इथले पुरुष किती 'गरीब बिचारे' असतात हें समजतें. अमेरिकेंत ज्याप्रमाणें कोर्टाच्या

तारखा असतात त्याचप्रमाणें प्रेम करण्याच्याहि तारखा असतात. मुलींनाहि 'तारखेवर' जायचें असतें हें खरें; पण सर्व कामें पुरुषानेंच करावयाची असतात. त्यानेच बाईसाहेबांच्या घरी यायचें आणि त्यानेंच तिच्या आईवडिलांना सांगायचें. तारीख ठरल्यानंतर मुलीला न्यायला जेव्हां तिचा मित्र येतो तेव्हां त्याचें स्वागतकरण्यासांठी दार उघडायचें तें सुद्धां मुलीनें नाहीं; तिच्या आईनें किंवा बापानें. कोर्टातला खर्च दोन्ही बाजू करतात, पण 'कोर्टिंग' चा खर्च फक्त पुरुषानेंच करायचा. हां; आतां 'कुठला सिनेमा पाहायचा' किंवा 'कुठल्या हॉटेलमध्यें जेवायचें', 'खायला काय मागवायचें'—हे प्रश्न त्यानें तिला नियमाप्रमाणें विचारल्यावर तिनें आपल्याला काय हवें तेवढें सांगायचें कष्ट मात्र घ्यायचे असतात. टॅक्सीचे, सिनेमाचे, हॉटेलमधील जेवणाचे, पेयांचें —सगळे पैसे अर्थातच पुरुषानें द्यायचे असतात. तारीख संपल्यानंतर मुलीला घरीं आणून पोचविण्याचें कामहि त्यानें करायचें, आणि शेवटीं लग्न ठरलें कीं वाङ्निश्चयाची अंगठीहि त्यानेंच तिला द्यायची. वर्तमानपत्रांत जेव्हां हें प्रसिद्ध होतें, तेव्हां तिथें अर्थातच फक्त मुलीचाच फोटो असतो हें वेगळें सांगण्याची आवश्यकता नाहीं.

माझा मित्र ली मला एकदां म्हणाला होता कीं, पुरुष त्यांना माळ घालीपर्यंत इकडच्या मुली त्यांचा पाठलाग करीत असतात. –A woman pursues a man until he catches her. हें मला तितकेंसें बरोबर वाटत नाहीं. कारण वर दिलेली माहिती पहातां पुरुषांनाच हा पाठलाग करावा लागतो, एवढेंच नव्हे, तर पाठलागाचा खर्चहि त्यांना द्यावा लागतो, हें अमेरिकेंत 'कोर्टिंग' ची पायरीहि न चढलेल्या माझ्यासारख्या अनभिज्ञ माणसाच्यासुद्धां लक्षांत यायला वेळ लागत नाहीं.

लग्नाच्या आधीं प्रेयसीच्या इतक्या आहारीं गेलेला पुरुष जेव्हां नवरा होतो तेव्हां तो आपलें सगळें स्वातंत्र्य हळूहळू गमावून बसतो याबद्दल मला त्याच्याविषयीं सहानुभूति वाटली तरी आश्चर्य मात्र मुळींच वाटत नाहीं. नवऱ्याचें स्वातंत्र्य त्याच्यापासून हिरावून घेतांना इथल्या बायका 'नवरा मानसशास्त्रा'चा फार काळजीपूर्वक उपयोग करतात हें मी स्वतः पाहिलें आहे. 'मुलांचें मानसशास्त्र' त्यांना कितपत अवगत असतें हें मला माहीत नाहीं; पण नवऱ्याचें मात्र

त्यांना संपूर्णपणें माहीत असतें.

त्याच्या अंगावर वसकन् ओरडून, "तेवढ्या कपबश्या विसळायला मदत केलीस तर कांहीं तुझे हातपाय मोडायचे नाहींत" असें म्हटलें तर जॅक् काम तर करणार नाहींच, उलट कुठें बाहेर निघून जाईल, हें जिल्ला माहीत असतें. म्हणून त्याच्याजवळ जाऊन ती हळूच गुणगुणते,—

"हनी, तेवढ्या कपबशा धुऊन टाकायला नाहीं का मदत करणार तूं आपल्या लाडक्या बायकोला ?"

असें म्हटल्यावर जॅक उठतो पण उठून बाहेर जात नाहीं. घरांत येतो आणि मुकाट्यानें कपबश्या विसळायला लागतो. 'हनी' 'डिअर' 'स्वीटी' या प्रेमळ शब्दांचा इतका अभिषेक बिचाऱ्या जॅकवर होत असतो कीं दिवसभर बाहेर काम आणि नंतर घरांतल्या कपबश्या आणि इतर कामें एवढें सोडलें तर स्वर्गापासून आपण फक्त दोन बोटेंच दूर आहोंत असें त्याला सारखें वाटत राहातें.

'चूल आणि मूल' सांभाळणें यांत कांहीं भयंकर गैरसोईचें किंवा त्रासदायक राहिलेलें नाहीं. चूल फुंकून पेटवितांना दमछाक होण्याचा किंवा डोळ्यांत धूर जाण्याचा प्रश्नच नाहीं. बटण दाबलें की चूल पेटते. स्वैंपाक करण्यासाठीं लागणारे सर्व पदार्थ तयार, डब्यांतून मिळतात. तांदूळ निवडावे लागत नाहींत किंवा उडदामाजी काळे कीं गोरे अशी समस्याहि गृहिणीपुढें उभी राहात नाहीं. एका मिनिटांत भात तयार होतो. बटण दाबल्यावर डब्याचें झाकण निघतें, भांजी चिरली जाते. निरनिराळे पदार्थ एकत्र केले जातात. एक बटण दाबल्यावर कपडे धुऊन निघतात आणि दुसरे दाबल्यावर ते वाळून बाहेर पडतात. स्वैंपाकघरांत 'बटण—दाबलें— कीं — स्वर्ग' निर्माण करण्याचा मुळीं इथल्या व्यापाऱ्यांनीं आणि कारखानदारांनीं चंगच बांधला आहे. चुलीपासून स्त्रियांनीं जसें स्वातंत्र्य मिळविलें आहे तसेंच मुलांपासूनसुद्धां. 'जॅक्बरोबर बाहेर सिनेमाला, किंवा पोहायला किंवा मित्रमैत्रिणीना भेटायला गेलें असतें हो, पण काय करणार, हा पोरवाडा कोणी संभाळायचा ?' असें वैतागानें म्हणण्याचा अमेरिकन गृहिणीवर प्रसंग येत नाहीं. तिला बाहेर जावेंसें वाटलें आणि मुलें लहान असलीं म्हणजे एक तर 'जॅक्' घरीं असतोच किंवा तो मोटार चालविण्यासाठी बरोबर हवा असला तर फोन केला म्हणजे 'बेबी सिटर' धांवत येते.

गोऱ्या लोकांनीं बळकावलेलें आपलें स्वातंत्र्य परत मिळविण्यासाठीं इथल्या काळ्या लोकांनीं जो लढा चालविला आहे त्याबद्दल माझ्या एका गोऱ्या अमेरिकन मित्राशीं मी बोलत बसलों होतों. हा गृहस्थ तरुण आहे. समान हक्कांचा पुरस्कर्ता आहे, आणि निग्रोंचा कैवारी आहे. त्यानें दक्षिणेंतल्या बुरसटलेल्या मताच्या अमेरिकन लोकांवर कडाडून हल्ला केला आणि ते लोक करीत असलेल्या निग्रोंच्या गुलामगिरीविषयीं तीव्र नापसंती व्यक्त केली. चर्चा अगदीं रंगांत आली होती. पण तेवढ्यांत कोणीतरी म्हणालें, "साडेपांच वाजले."

—त्याबरोबर माझा हा मित्र भयंकर दचकला, आणि ताडकन् उठून चालायलाच लागला.

मी म्हटलें, "का रे बुवा? इतकं दचकायला काय झालं? आं?"

"नाही—म्हणजे—साडेपांच वाजले ना. मग मला गेलंच पाहिजे!"

"अरे, पण जाशील. परत एकदां चहा वगैरे घेऊं या फक्कडसा. अगदीं इंडियन टी बरं का! स्ट्रॉंग!"

"कसला चहा न् कसलं काय! मला गेलंच पाहिजे? साडेपांचला मी घरीं नसलों तर बायको घर डोक्यावर घेते मेहेरबान!"

"घेऊं दे रे बुवा! थोड्या वेळानं ठेवील खालीं. बस जरा, उद्यां तर रविवार आहे!" मीं असें म्हटल्यावर तर माझा मित्र जागच्या जागीं अगदीं डामरी फटाक्यासारखा उडाला. म्हणजे अगदीं मिरासदारांच्या गोष्टींतला गांवठी शाळामास्तर ज्याप्रमाणें तीन फूट उडाला होता त्याप्रमाणें.

"अर्रर्र! आतां तर माझीं शंभर वर्षेंच भरलीं! मुलांना संभाळायची जबाबदारी आज माझ्यावर आहे तें मीं पार विसरलोंच!"

यानंतर एक क्षणभरहि थांबून राहणें त्याला अशक्यच होतें. जवळजवळ पळतच जाऊन त्यानें मोटार गांठली आणि अर्ध्या मिनिटांत तिच्यासकट तो दिसेनासा झाला.

उदार, नवमतवादी, निग्रोंचा पुरस्कर्ता आणि स्वातंत्र्याचा चहाता असलेला माझा हा मित्र विवाहितहि होता हें त्याच्या बायकोमुलांचा उल्लेख न करतांहि लक्षांत येण्यासारखें आहे.

रात्रीं घरीं यायला उशीर झाल्यामुळें घाबरून जाऊन वाघाच्या पिंजऱ्यांत

लपून बसलेल्या त्या ‘ भ्याड ’ रिंगमास्टरची मला या वेळीं आठवण झाली.

त्यानंतर माझा हा मित्र मला अजून भेटलेला नाहीं. पण जेव्हां भेटेल तेव्हां ‘ अमेरिकन नवऱ्यांच्या स्वातंत्र्याचा प्रश्न ’ या विषयावर त्याच्याशीं चर्चा करण्याची माझी इच्छा आहे.

कांहीं दिवसांपूर्वी आम्ही वीकएंडसाठीं एका गांवाला गेलों होतों. तिथें चर्च-मध्यें बरेच लोक आमच्या भेटीसाठीं जमले होते. जेवण झाल्यानंतर पाहुण्यांचा परिचय करून देण्याचा कार्यक्रम चालला होता.

माझ्या बायकोनें जेव्हां स्वतःचा परिचय करून दिला तेव्हां अमेरिकेंत सर्वत्र विचारण्यांत आलेला प्रश्न तिला तिथेंहि कोणीतरी विचारलाच.

“ तुम्ही कपाळावर जो तांबडा ठिपका लावला आहे तो कसला, आणि ती काळ्या मण्यांची माळ घातली आहे ती कशाकरितां ? ”

या नेहेमींच्या प्रश्नाला नेहमींचेंच उत्तर मिळालें.

“ स्त्रीचं लग्न झालं असल्याच्या खुणा आहेत. त्या सौभाग्य दर्शवितात ”— इत्यादी.

माझा परिचय करून देतांना मीं सांगितलें कीं, “ लग्न झालेल्या पुरुषांना अशा तऱ्हेचीं ‘ चिन्हें’ जवळ बाळगावी लागत नाहींत. ”

“ कां बुवा ? हें आश्चर्य आहे ! पुरुषांना कां म्हणून नाहीं ? ” मला कोणी तरी विचारलें.

“ म्हणजे त्याचं असं आहे, कीं आम्हांला वेगळी कांहीं खूण वापरावी लागत नाहीं. लग्न झालें असल्याचें ‘ चिन्ह’ आमच्या चेहऱ्यावर सर्वत्र दिसत असतें. चेहरा अन् शिवाय पडलेले खांदे, खोल गेलेला आवाज. ”

या वेळीं सर्वच हंसले. पण पुरुषांच्या डोळ्यांत जी सहानुभूतीची छटा मला जाणवली ती स्त्रियांच्या डोळ्यांत मात्र दिसली नाहीं.

अमेरिकन निग्रोंच्या स्वातंत्र्याचा प्रश्न आतां चांगलाच धसास लागला आहे आणि तो कधीं ना कधींतरी सुटेल अशी आशाहि वाटते आहे. पण गरीब बिचाऱ्या अमेरिकन नवऱ्यांचें स्वातंत्र्य त्यांना परत कधीं मिळणार कुणास ठाऊक !

# ११ : चोरी कशी करतात ?

मीं अमेरिकेंत एक वर्षभर राहून नुकताच परत आलों, असें माझ्यासंबंधीं लिहितांना अंतरकरांनीं लिहिलें आहे.

पण अमेरिकेंतील मुक्कामांत मी काय करीत होतों याचा उल्लेख मात्र त्यांनीं केलेला नाहीं. या लेखाच्या शीर्षकावरून, मी अमेरिकेंत कशाकरिता गेलों व काय शिकलों याविषयी कोणाच्या (संपादकांसह) मनांत कांहीं विकल्प येण्याचा संभव आहे. त्यांच्या माहितीकरितां ( आणि समाधानाकरितांहि ) हें सांगणें आवश्यक आहे कीं, ' तसें ' कांहीं शिकण्यासाठीं मी अमेरिकेस गेलों नव्हतों. माझें ' उच्च ' शिक्षण कशासंबंधीं होतें याबद्दल कांहींहि मला या लेखाच्या शीर्षकावरून सुचवावयाचें नाहीं.

तसें पाहिलें तर अमेरिकन चोरांचा माझ्याशीं किंवा माझा त्यांच्याशीं (सुदैवानें) कधीच संबंध आला नाहीं. त्यांना मीं पाहिलें तेंसुद्धां चांगले चार हात अंतर ठेवून—टेलिव्हिजनच्या पडद्यावर! त्रिखंड गाजलेल्या थोर थोर चोरांची कर्मभूमि असलेल्या शिकागो शहराच्या अनेक वाऱ्या मीं केल्या तरी चोर या विभूतीनें मला कधींच दर्शन दिलें नाहीं. दिलें असल्यास म्या पापी माणसानें तें ओळखलें नाहीं. चोर–दरोडेखोरांकरितां कुप्रसिद्ध असलेल्या शिकागो शहरांत मीं दचकतदचकत, खिशापाकिटावर घट्ट हात ठेवीत प्रवेश केला पण माझें नशीब असें कीं, मला तिथें चोर भेटण्याऐवजी चक्क देव भेटला; प्रथम सुधाकर देव. नंतर त्यांचे बंधु सुरेश देव. मोठ्या भक्तिभावानें चोराच्या

आळंदीला जावें आणि निघावी आळंदी देवाची, तशीच माझी स्थिति झाली. आणि या दोन देवांची भेट होणें हें कमी होतें म्हणून कीं काय, नंतर लगेच शरद् आणि रमेश या ' गोडबोले ' बंधूंची भेट झाली. देव तर अक्षरश: मला शोधीतच आले आणि एकदा भेटल्यापासून सदैव माझे पाठीराखे राहिले. एवढ्या कडेकोट बंदोबस्तांत मी असल्यावर कोणत्या चोराची माझ्या आसपास-सुद्धां फिरकायची काय प्राज्ञा होती? मग तो चोराचें जें अगदीं ' ऑक्सफर्ड ' त्या शिकागोचा असला म्हणून काय झालें!

असें असलें तरी चोर या जमातीविषयीं माझ्या मनांत मोठेंच कुतूहल होतें. तें पुरें करतांना मीं तिथें जें वाचलें, ऐकलें आणि पाहिलें त्यावरून माझी अशी खात्री झाली कीं, या मौलिक प्रश्नाकडे आम्ही भारतीयांनीं दुर्लक्ष केलें आहे. वास्तविक हा केवढा जिव्हा-ळ्याचा प्रश्न! — म्हणजे दोघां-च्याहि दृष्टीनें. कारण आपल्या पैशाबद्दल, दागदागिन्यांबद्दल आप-ल्याला जेवढा जिव्हाळा, तेवढाच चोरांनाहि. शिवाय आपल्याला चोरांबद्दल नसला तरी दागिने आपले असल्यामुळें चोरांना आपल्याबद्दलहि दागिन्यांइतकाच जिव्हाळा. तसें पाहिलें तर आपल्याकडे चोऱ्या कांहीं कमी होत नाहींत. इतर सर्व प्रकारच्या होतातच; शिवाय वाङ्मयचौर्यसुद्धां होतें. पण या कसल्या चोऱ्या! यांना ना तंत्र ना मंत्र. त्यामुळें आज चौर्य झालें कीं उद्यां मुद्देमालासकट लेखक सांपडतो. आतां आपले विनोदी लेखक ' चोरी ' या विषयावर लिहितात हें खरें; पण चोरी हा कांहीं हंसण्यावारी नेण्यासारखा विषय नाहीं तो अत्यंत गहन,



शिकागोंतील ' स्वागत '

गंभीर असा विषय आहे. चोरीचें प्रेम — प्रेमाची चोरी असल्या को ( लां ) त्यांनीं तो संपत नाहीं.

अमेरिका या बाबतींतसुद्धां आपल्या फार फार पुढें गेली आहे. तिथें चोरी हा नुसताच हात्चलाखीचा खेळ मानला जात नाहीं. एक थोर शास्त्र आणि श्रेष्ठ कला म्हणून अमेरिकेंत चोरीला मोठा मान आहे. अमेरिकन लेखकांनीं चोरी या विषयावर लिहिलें आहे यांत कांहींच आश्चर्य नाहीं. अमेरिकन चोरांनींसुद्धां या विषयावर ग्रंथरचना केली आहे. विद्वानांनीं लिहिलेल्या ग्रंथांची आणि लेखांची तर मोजदाद करणेंसुद्धां कठीण, म्हणून त्यांच्याकडे जरी दुर्लक्ष केलें तरी 'आधीं केलें, मग सांगितलें' या समर्थोक्तीप्रमाणें प्रत्यक्ष चोर-साहेबांनीं सुद्धां कुणालाहि हेवा वाटावा असें लेखन केलें आहे. 'रॉजर, आतां तूं कुठं जाशील ?' हें रॉजर बेंटनचें पुस्तक, 'उभें आयुष्य चोरींत' हें अर्नेस्ट बूथचें पुस्तक, 'तुमचे पैसे : माझी चलाखी' हा जॉर्ज राइसचा वृत्तांत, आणि 'एका माजी चोराचीं स्मृतिचित्रें', 'मी चोर होतों', 'चोराच्या भाषेंत चोराचें आत्मवृत्त', 'माझें दर्दभरें जीवन' ही आत्मचरित्रें. यांत विशेष लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट अशी कीं, जें जें आपणासि ठावें तें सकळ जनांना सांगून त्यांना शहाणे करण्याची या थोर शर्विलकांची जागरूकता नवी नाहीं. 'एका चोराचें आत्मचरित्र' हें हॅप्गुडचें गाजलेलें पुस्तक १९०३ सालीं न्यूयॉर्कमध्यें प्रसिद्ध झालें — पण हेंहि विशेष नाहीं. कारण आर्थर हेवर्डचा 'चोर आणि चोऱ्या यांचा संपूर्ण इतिहास' अडीचशें वर्षांपूर्वी प्रसिद्ध झाला आणि १७१९ सालीं या ग्रंथाची पांचवी आवृत्ति प्रसिद्ध झाली. तेव्हांपासून हा लेखनप्रवाह अखंड वाहत असून, त्यांत केवळ विद्वानांनीं आणि समाज-शास्त्रज्ञांनींच नव्हे, तर चोरांनींहि पुन्हापुन्हा बुचकळ्या मारलेल्या आहेत. आपलीं अधिक महत्त्वाचीं कामें बाजूला सारून निःस्पृहपणें अमेरिकन चोरांनीं जी समाजसेवा केली, ज्ञानगंगेच्या कावडी वाहिल्या, समाजहितासाठीं बंदुक मोडून लेखणी हातांत घेतली, त्यापासून भारतीय चोरांनासुद्धां किती शिकण्या-सारखें आहे !

मी अमेरिकेंत असतांना 'ज्यो वालाची' हा एक सुप्रसिद्ध गुंड आणि दरोडेखोर आपल्या टोळीविरुद्ध सरकारला फितुर झाला होता. या गृहस्थाची

सेनेट–कमिटीपुढें झालेली साक्ष फार सनसनाटी ठरली. अनेक दिवस तासन्तास ती चालली होती. टेलेव्हिजन कंपन्यांनीं आपले त्यावेळचे सगळे कार्यक्रम बंद ठेवून ती प्रक्षेपित केली होती. वर्तमानपत्रें रकानेच्या रकाने भरून ही रोमांच-कारी हकीकत दररोज प्रसिद्ध करीत होतीं. त्या कांहीं दिवसांत प्रेसिडेंट केनेडी आणि क्रुश्चॉव्ह या दोघांपेक्षांहि वालाची या गुंडांच्या दादाचें नांव अधिक ऐकूं येत होतें.

साक्षीसाठीं वालाचीसाहेब सकाळची जोरदार न्याहारी आटपून येत. त्यांच्या भोंवतीं पोलिसाचा कडेकोट बंदोबस्त असे. बातमीदार, टी. व्ही. वाले आणि इतर अनेक लोक स्वागतासाठीं सज्ज असत. ते भराभरा त्यांचे फोटो काढीत. सेनेटर्सच्या प्रश्नांना हा गृहस्थ शांतपणें उत्तरें देई. सूट, बूट, टाय—अशा टेचदार पोषाखांत असलेला आणि शांत गंभीर चेहऱ्याचा हा गुंड एखाद्या बड्या बँकेच्या डायरेक्टराप्रमाणें दिसायचा. फार काय, त्याच्या आसपास बस-लेल्या सेनेटर्सपासून या माणसाला वेगळा ओळखून काढणें हीहि सोपी गोष्ट नव्हती. बोलतां बोलतां तो शांतपणें सिगरेट ओढी आणि एखाद्या सभेंतील वक्त्याप्रमाणें पाणी पिऊन कोरडा पडलेला घसा ओला करी. 'तुम्ही बसला आहांत तिथें मी, आणि तुमच्या शेजारीं बसलेल्या सेनेटरच्या तिथें आम्हां दादांचा दादा बसलेला आहे असें आपण समजूं '—असें एकदां सेनेट-कमि-टीच्या अध्यक्षाला म्हणून वालाचीनें त्याला हैराण केलें होतें आणि सर्वत्र हंशा पिकविला होता. त्याला मिळालेल्या विलक्षण प्रसिद्धीमुळें वालाची त्या आठवड्यांतला महापुरुष ठरला. पण लवकरच या सर्व प्रकारावर टीकेचा एवढा भडिमार झाला कीं, वालाचीभोंवतींचें प्रकाशवलय नाहींसें झालें आणि त्याची माहिती टेलेव्हिजनवर येईनाशी झाली.

आपण घातलेल्या तिरनिराळ्या दरोड्यांच्या कित्येक सुरस आणि चमत्कारिक हकीकती वालाचीनें सांगितल्या. आपल्या गँगच्या बैठकींचें त्यानें जें वर्णन केलें त्यावरून त्या एखाद्या डायरेक्टर–बोर्डाच्या सभाच असाव्यात असा माझा समज झाला. सभासदांचे शपथविधि कसे होत, 'श्रम' विभागणी कशी होई, 'कामें' कशीं योजनाबद्ध चालत, याविषयींचे त्याचे किस्से ऐकण्यासारखे होते.

या वालाची–प्रकरणांतून जें वाङ्मय प्रसिद्ध झालें त्यामुळें अमेरिकन शर्विल-

कांच्या दुनियेचें आगळें दर्शन सर्वांना घडलें. रॉजर बेंटन, अर्नेस्ट बूथ, हॅपगुड-चा चोर, या चोरीच्या जगतांतील विभूतींचीं चरित्रें परत एकदां उजेडांत आलीं. या आपापल्या कारकीर्दी गाजवून गेलेल्या लोकांच्या गर्दींत मला 'चिक कॉन्वेल' भेटला. म्हणजे 'धंदेवाईक चोर' हें चिक कॉन्वेल या धंदेवाईक चोरानें लिहिलेलें पुस्तक एका प्रचंड पुस्तकाच्या दुकानांतल्या जुन्या मालाच्या राशींत मला सांपडलें. पुस्तकाच्या आठव्या आवृत्तींतील ती एक प्रत होती. यावरून हें पुस्तक चांगलेंच लोकप्रिय ठरलेलें असावें हें निःसंशय. कॉन्वेल्च्या आणि इतर वृत्तांतांच्या उजेडांत चोरांच्या पाताळी दुनियेंतल्या कांहीं चोरवाटा मला दिसल्या. आणि धडधडत्या छातीवर हात ठेवीत, खिसापाकिट संभाळीत मीं या अजब दुनियेंत प्रवेश केला.

चिक् कॉन्वेल् हा आपल्या धंद्यांत अत्यंत वाकबगार असलेला इसम होता. आपल्या हयातींतलीं वीस वर्षें त्यानें या जीवितकार्यांत वेंचलीं. अमेरिकेंतल्या सर्व प्रसिद्ध शहरांत आणि युरोपांतहि ठिकठिकाणीं त्यानें चोऱ्या केल्या. मग इंडियाना युनिव्हर्सिटींतल्या एड्विन् सदरलँड या नाणावलेल्या समाजशास्त्रज्ञानें कॉन्वेल्ला गांठलें आणि 'धंदेवाईक चोर' हा मौलिक ग्रंथ त्याच्याकडून लिहून घेतला. आठवड्याला सात तास याप्रमाणें बारा आठवडे प्राध्यापक महाराजांनीं लेखकमहाशयांशीं चर्चा केल्या. यांतून 'धंदेवाईक चोर — लेखक, धंदेवाईक चोर' हा ग्रंथ निर्माण झाला. प्राध्यापकांनीं केलेली मल्लिनाथी चोरसाहेबांनीं स्वतः वाचून काढली आणि तींत जागोजाग दुरुस्त्या केल्या. प्राध्यापकांनींहि त्या नम्रपणें स्वीकारल्या.

सदरलँड यांनीं अशी ग्वाही दिली आहे कीं, हें पुस्तक जरी एका व्यक्तीनें लिहिलेलें असलें तरी त्याचा आशय तितका संकुचित नाहीं. कारण पुस्तकाचें हस्तलिखित हें चार वेगवेगळ्या धंदेवाईक चोरांनीं वाचलें होतें. दोन माजी गुप्त पोलिसांनींहि वाचलें होतें. आणि या तज्ञांचेंहि मत हेंच पडलें कीं, पुस्तकाचा आशय आणि अनुभव संकुचित नाहींत. शिवाय हें हस्तलिखित जरी इतरांना प्रत्यक्ष वाचायला दिलें नसलें तरी त्याच्या मुख्यार्थाविषयीं अनेक चोरांशीं सदरलँड यांनीं चर्चा केली होती. त्यामुळें 'एका चोराचीं स्मृतिचित्रें' यापेक्षां अधिक व्यापक असा अर्थ या ग्रंथाला प्राप्त झाला होता. अर्थात्

प्राध्यापकमहाशयांनीं असें नम्रपणें म्हटलें आहे कीं, ' तरीहि हें पुस्तक म्हणजे चोरी या विषयावरील ब्रह्मवाक्य नव्हे. या विषयाचा अधिक सखोल, सर्वांगीण अभ्यास होणें आवश्यक आहे. '

अनभिज्ञांकरितां येथें एक गोष्ट स्पष्ट केलेली बरी कीं, ' चोर ' आणि ' धंदेवाईक चोर ' या संज्ञांमध्यें जमीन–अस्मानाचा फरक आहे. हौसेमौजेकरितां चोरी करणें वेगळें, आणि धंदा, पोटापाण्याचा नित्याचा व्यवसाय म्हणून चोरी करणें फार वेगळें. यांत केवळ सातत्याचें महत्त्व आहे एवढेंच नव्हे, तर उपजीविकेच्या धंद्याविषयीं पावित्र्याची भावना, निष्ठा हींसुद्धां त्यांत येतात. त्यामुळें सर्वच नामवंत, धंदेवाईक चोरांच्या लेखनांत सामान्य चोरांविषयीं कमालीची अलिप्तता आणि दुजाभाव दिसतो. या नामवंतांची मनःपूर्वक क्षमा मागून हें सांगितलें पाहिजे कीं, प्रस्तुत लेखांत त्यांना ठिकठिकाणीं नुसतेंच ' चोर ' असें म्हटलें असलें तरी त्यांत त्यांचा अधिक्षेप करण्याचा मुळींच हेतु नाहीं. वाचकांनींहि ' चोर ' याचा अर्थ ' धंदेवाईक चोर ' असाच कृपया समजावा.

एका दृष्टीनें पाहिलें तर राजकारणी लोक आणि धंदेवाईक चोर यांच्यांत कमालीचें साम्य आढळतें. राजकारणी लोक ज्याप्रमाणें वर्षाचे तीनशेंपासष्ट दिवस राजकीय डावपेंच करण्यांत गढून गेलेले असतात, त्याचप्रमाणें धंदेवाईक चोरहि तनमनधनेंकरून अहोरात्र सगळा वेळ आपल्या जीवितकार्यासाठीं वेंचतात. अर्थात् यांतलें ' धन ' दुसऱ्यांचें असतें हें वेगळें! पण राजकारणीं पुरुष तरी काय स्वतःचे धन वापरीत असतात थोडेंच ! या दोन धंदेवाईकांतलें आणखी एक साम्यस्थळ म्हणजे त्यांच्या सर्व हालचाली संपूर्णपणें योजनाबद्ध असतात. चोरांच्यापुरतेंच पहायचें झालें तर, कामाची जागा निवडणें, माल हस्तगत करणें, त्याची पुढील तरतूद करणें, करतांना स्वतःच्या स्वातंत्र्यावर गदा आल्यास ती दूर करण्याची व्यवस्था करणें—या सर्व गोष्टी पूर्णपणें सूत्रबद्ध असतात. धंदेवाईक चोराच्या दृष्टीनें हातचलाखीलाहि महत्त्व असतेंच; पण त्याशिवाय ' गिऱ्हाइकां'ना हाताळण्याचें कौशल्य हें कधींहि अधिक महत्त्वाचें असतें, यासाठीं तो आपलें व्यक्तिमत्व, अक्कल, आणि विशेषतः वाक्चातुर्य पणाला लावतो. पिस्तुलवाल्या दरोडेखोराप्रमाणें त्याचा हिंसात्मक मार्गावर विश्वास नसतो. अगदीं नाइलाजानें एकदां हिंसेचा अवलंब करावा लागल्याबद्दल

कांच्या दुनियेचें आगळें दर्शन सर्वांना घडलें. रॉजर बेंटन, अर्नेस्ट बूथ, हॅपगुड-चा चोर, या चोरीच्या जगतांतील विभूतींचीं चरित्रें परत एकदां उजेडांत आलीं. या आपापल्या कारकीर्दी गाजवून गेलेल्या लोकांच्या गर्दींत मला ' चिक कॉन्वेल ' भेटला. म्हणजे ' धंदेवाईक चोर ' हें चिक कॉन्वेल या धंदेवाईक चोरानें लिहिलेलें पुस्तक एका प्रचंड पुस्तकाच्या दुकानांतल्या जुन्या मालाच्या राशींत मला सांपडलें. पुस्तकाच्या आठव्या आवृत्तींतील ती एक प्रत होती. यावरून हें पुस्तक चांगलेंच लोकप्रिय ठरलेलें असावें हें निःसंशय. कॉन्वेल्च्या आणि इतर वृत्तांतांच्या उजेडांत चोरांच्या पाताळीं दुनियेंतल्या कांहीं चोरवाटा मला दिसल्या. आणि धडधडत्या छातीवर हात ठेवीत, खिसापाकिट संभाळीत मीं या अजब दुनियेंत प्रवेश केला.

चिक् कॉन्वेल् हा आपल्या धंद्यांत अत्यंत वाकबगार असलेला इसम होता. आपल्या हयातींतलीं वीस वर्षें त्यानें या जीवितकार्यांत वेंचलीं. अमेरिकेंतल्या सर्व प्रसिद्ध शहरांत आणि युरोपांतहि ठिकठिकाणीं त्यानें चोऱ्या केल्या. मग इंडियाना युनिव्हर्सिटींतल्या एड्विन् सदरलॅंड या नाणावलेल्या समाजशास्त्रज्ञानें कॉन्वेल्ला गांठलें आणि ' धंदेवाईक चोर ' हा मौलिक ग्रंथ त्याच्याकडून लिहून घेतला. आठवड्याला सात तास याप्रमाणें बारा आठवडे प्राध्यापक महाराजांनीं लेखकमहाशयांशीं चर्चा केल्या. यांतून ' धंदेवाईक चोर — लेखक, धंदेवाईक चोर ' हा ग्रंथ निर्माण झाला. प्राध्यापकांनीं केलेली मल्लिनाथी चोरसाहेबांनीं स्वतः वाचून काढली आणि तींत जागोजाग दुरुस्त्या केल्या. प्राध्यापकांनींहि त्या नम्रपणें स्वीकारल्या.

सदरलॅंड यांनीं अशी ग्वाही दिली आहे कीं, हें पुस्तक जरी एका व्यक्तीनें लिहिलेलें असलें तरी त्याचा आशय तितका संकुचित नाहीं. कारण पुस्तकाचें हस्तलिखित हें चार वेगवेगळ्या धंदेवाईक चोरांनीं वाचलें होतें. दोन माजी गुप्त पोलिसांनींहि वाचलें होतें. आणि या तज्ज्ञांचेंहि मत हेंच पडलें कीं, पुस्तकाचा आशय आणि अनुभव संकुचित नाहींत. शिवाय हें हस्तलिखित जरी इतरांना प्रत्यक्ष वाचायला दिलें नसलें तरी त्याच्या मुख्यार्थाविषयीं अनेक चोरांशीं सदरलॅंड यांनीं चर्चा केली होती. त्यामुळें ' एका चोराचीं स्मृतिचित्रें ' यापेक्षां अधिक व्यापक असा अर्थ या ग्रंथाला प्राप्त झाला होता. अर्थात्

प्राध्यापकमहाशयांनीं असें नम्रपणें म्हटलें आहे कीं, ' तरीहि हें पुस्तक म्हणजे चोरी या विषयावरील ब्रह्मवाक्य नव्हे. या विषयाचा अधिक सखोल, सर्वांगीण अभ्यास होणें आवश्यक आहे. '

अनभिज्ञांकरितां येथें एक गोष्ट स्पष्ट केलेली बरी कीं, ' चोर ' आणि ' धंदेवाईक चोर ' या संज्ञांमध्यें जमीन–अस्मानाचा फरक आहे. हौसेमौजेकरितां चोरी करणें वेगळें, आणि धंदा, पोटापाण्याचा नित्याचा व्यवसाय म्हणून चोरी करणें फार वेगळें. यांत केवळ सातत्याचें महत्त्व आहे एवढेंच नव्हे, तर उपजीविकेच्या धंद्याविषयीं पावित्र्याची भावना, निष्ठा हींसुद्धां त्यांत येतात. त्यामुळें सर्वच नामवंत, धंदेवाईक चोरांच्या लेखनांत सामान्य चोरांविषयीं कमालीची अलिप्तता आणि दुजाभाव दिसतो. या नामवंतांची मनःपूर्वक क्षमा मागून हें सांगितलें पाहिजे कीं, प्रस्तुत लेखांत त्यांना ठिकठिकाणीं नुसतेंच ' चोर ' असें म्हटलें असलें तरी त्यांत त्यांचा अधिक्षेप करण्याचा मुळींच हेतु नाहीं. वाचकांनींहि ' चोर ' याचा अर्थ ' धंदेवाईक चोर ' असाच कृपया समजावा.

एका दृष्टीनें पाहिलें तर राजकारणी लोक आणि धंदेवाईक चोर यांच्यांत कमालीचें साम्य आढळतें. राजकारणी लोक ज्याप्रमाणें वर्षाचे तीनशेंपासष्ट दिवस राजकीय डावपेंच करण्यांत गढून गेलेले असतात, त्याचप्रमाणें धंदेवाईक चोरहि तनमनधनेंकरून अहोरात्र सगळा वेळ आपल्या जीवितकार्यासाठीं वेंचतात. अर्थात् यांतलें ' धन ' दुसऱ्यांचें असतें हें वेगळें! पण राजकारणी पुरुष तरी काय स्वतःचे धन वापरीत असतात थोडेंच ! या दोन धंदेवाईकांतलें आणखी एक साम्यस्थळ म्हणजे त्यांच्या सर्व हालचाली संपूर्णपणें योजनाबद्ध असतात. चोरांच्यापुरतेंच पहायचें झालें तर, कामाची जागा निवडणें, माल हस्तगत करणें, त्याची पुढील तरतूद करणें, करतांना स्वतःच्या स्वातंत्र्यावर गदा आल्यास ती दूर करण्याची व्यवस्था करणें—या सर्व गोष्टी पूर्णपणें सूत्रबद्ध असतात. धंदेवाईक चोराऱ्या दृष्टीनें हातचलाखीलाहि महत्त्व असतेंच; पण त्याशिवाय ' गिऱ्हाइकां'ना हाताळण्याचें कौशल्य हें कधींहि अधिक महत्त्वाचें असतें, यासाठीं तो आपलें व्यक्तिमत्व, अक्कल, आणि विशेषतः वाक्चातुर्य पणाला लावतो. पिस्तुलवाल्या दरोडेखोराप्रमाणें त्याचा हिंसात्मक मार्गावर विश्वास नसतो. अगदीं नाइलाजानें एकदां हिंसेचा अवलंब करावा लागल्याबद्दल

आपण शरमेनें कसे अर्धमेले झालों आहोंत, याची कबुली एका चोरानें आपल्या आत्मचरित्रात दिली आहे. इतर चोर किंवा चोरांच्या टोळया यांबाबत त्यांचें एक ' पंचशील'च असतें म्हणा ना! सहानुभूति, दुसऱ्याच्या हक्कांची जाणीव, विश्वास, नियमांप्रमाणें सक्त वागण्याची तत्परता आणि धंद्याची एक भाषा या तत्त्वांवर त्यांची अनन्यभावानें श्रद्धा असते. चोरांना शील आणि चारित्र्य नसतें असें कोण म्हणतो?

' चोर तेवढा एक ' ही भावना सर्व चोरांच्यांत जाज्वल्य असते; मग तो कुठल्याहि टोळीचा असो. तिथें आपपरभावाला जागा नाहीं. पोलिसवाले लोक त्या सगळ्यांचे कायमचे शत्रू असतात, या एकाच व्यावहारिक कारणावर हा बंधुभाव आधारलेला नाहीं. पोलिसांच्या जाळ्यांत सांपडलेल्या भाईबंदाला सोडविण्याकरितां, जामीन भरण्याकरितां, वशिले लावण्याकरितां, स्वतःच्या टोळीवाल्याइतकीच मदत आपुलकीनें करण्यांत येते. तिथें मग खाजगी बाबतींत कांहीं वैमनस्य असलें तरी तिकडे दुर्लक्ष करण्यांत येतें. संकटाची चाहूल आपल्याला लागली तर व्यवसायबंधूंना धोक्याची सूचना देणें हेंहि यांत येतेंच. अशा वेळीं सूचना देणाऱ्या मित्रांचें स्वातंत्र्यहि धोक्यांत येण्याचा संभव असतो; पण त्याची कदर कोणी करीत नाहीं. तसेंच आपल्यामुळें दुसऱ्याला उपसर्ग पोंचेल असें कर्म करण्यास कोणताच धंदेवाईक चोर धजणें शक्य नाहीं.

अडचणींत सांपडलेल्या बांधवांना मदत करणें हें तर प्रत्येक चोराचें ब्रीद असतें. दुसऱ्या चोराला तुरुंगांतून सोडविण्याकरितां चोरांनीं स्वार्थत्याग केल्याचीं अनेक उदाहरणें आहेत. एखादा मित्रच काय, पण तात्पुरता शत्रु असलेला चोर जरी तुरुंगांत अडकला असला आणि त्याला सोडविण्यापुरते पैसे आपल्याला देतां आले नाहींत तर कुठल्याहि सच्च्या दिलाच्या चोराला मनापासून दुःख होतें. ( अर्थात् दोन अटी मात्र या कीं, त्या चोरानें पोलिसदादाला फितुर झालेलें असतां कामा नये आणि चोरीचा माल दुसऱ्यांपासून लपवून ठेवलेला असतां कामा नये. )

कित्येकदां एखाद्या चोरावर अशी तोहमत आलेली असते कीं, त्याच्या स्वातंत्र्यप्राप्तीसाठीं बराच मोठा ' निधि ' उभा करण्याची आवश्यकता असते. अशा वेळीं निरनिराळ्या अड्ड्यांवर पत्रक फिरविण्यांत येतें आणि त्या वेळीं

अगदींच बेकार नसलेला प्रत्येक चोर या निधीला आपापल्या कुवतीप्रमाणें हातभार लावीत असतो. महत्त्वाची गोष्ट अशी कीं, हे पैसे देणाऱ्यानें परत घ्यावयाचे नसतात. मात्र जेव्हां पैसे असे सगळ्यांच्याकडून गोळा केलेले नसतात तेव्हां ते कर्जाऊ असें समजून ज्याचे त्याला परत करावयाचे असतात.

तुरुंगांत खितपत पडलेल्या कोणत्याहि समव्यावसायिकासाठीं चोरमंडळी उदार अंतःकरणानें मदत करतात. दररोजच्या मिळकतीची वांटणी करतांना ' न्याय–ग्रस्तां 'साठीं कांहीं भाग वेगळा काढून तो त्यांना पाठविण्याचीहि प्रथा असते. पण ही मदत सर्वच प्रकारच्या अडचणींसाठीं नाहीं बरें का! फक्त पोलिसांच्या कैदेंत किंवा तुरुंगांत असलेल्यांनाच. नुसताच आपला एखादा चोर बेकार असेल तर त्याला पैशाची अडचण पडली तरीहि कोणी मदतीचा हात पुढें करणार नाहीं. कारण साधें आहे. हा चांगला धडधाकट आहे, याचे हातपाय, डोकें, सर्व शाबूत आहेत मुख्य म्हणजे हा तुरुंगाबाहेर आहे; याला ' काम ' करून पोट भरायला झालें काय? पोटापुरते पैसे मिळविण्याचीं साधनें जवळ असतांनाहि कफल्लक राहणे ही कुठल्याही चोराच्या दृष्टीनें कमीपणाची आणि नामुष्कीची गोष्ट आहे.



चोरांकडून, चोरांकरितां—

मिळकतीच्या दृष्टीनें कुठलें ' स्थळ ' चांगलें किंवा वाईट याविषयींच्या

माहितीची चोरलोक मुक्त कंठानें देवघेव करतात. त्यांना स्पर्धा फारशी आवडत नाहीं. पण ती असलीच तर त्या बाबतींत ते सोशिक असतात. 'सर्वे सुखिनः सन्तु' असें सर्वसाधारणपणें त्यांचें मत असतें. स्पर्धा फार झाली तर जास्तींत जास्त ते एवढेंच म्हणतील,—"बायली! आजकाल माणसांच्यापेक्षां चोरच जास्त झालेत!"

चोरांच्या कडक नीतिनियमांविषयीं वाचलें म्हणजे आपल्या नीतीबद्दल शेखी मिरविणारे सगळे प्रामाणिक व्यापारीसुद्धां तोंडांत बोटें घालतील. चोरांचा एक अलिखित नियम असा असतो कीं, जर दुसऱ्या कोणी एखादें चांगलें 'स्थळ' सुचविलें तर त्याबद्दल मिळकतीचे दहा टक्के तें सुचविणाऱ्याला दिले जातात. पण गंमत अशी कीं, 'हा तुम्हांला दहा टक्केच देतो काय, आम्ही तुम्हांला पंधरा देतों. स्थळांची यादी आम्हांला द्या' असें म्हणणारी चोरांची दुसरी टोळी कधींहि पुढें सरसावत नाहीं. व्यापाऱ्यांच्या कैवाऱ्यांनीं येथें हें लक्षांत ठेवलेलें बरें कीं, अशा परिस्थितींत त्यांच्या दुसऱ्या अनेक पेढ्या 'कांपिटिशन्'साठीं पुढें आल्याशिवाय राहणार नाहींत.

'शर्विलक–नीती'चे नियम येथेंच संपत नाहींत. आपण न केलेल्या श्रमांचें 'श्रेय' कुठलाहि प्रामाणिक चोर घेणार नाहीं. कांहीं निष्पाप चोरांना त्यांनीं केल्या नसलेल्या चोरीबद्दल पकडण्यांत आलें आणि त्यांच्याकडे नसलेला मुद्देमाल त्यांच्याकडून वसूल करण्यांत आला. ही बातमी जेव्हां खऱ्या चोरांना कळली, तेव्हां मोठ्या तत्परतेनें त्यांनीं ती रक्कम आपल्या मित्रांना परत केली. दुसऱ्याबद्दल माहिती देणें हें तर कोणत्याहि सच्चा चोराच्या स्वप्नांतसुद्धां येणार नाहीं. जो फक्त चोऱ्याच करतो आणि दुसरें कांहींहि करीत नाहीं, अशा माणसाच्या हातून हें कृष्णकृत्य होणें अशक्य आहे असें एका नामवंत बँकचोराचें वचन आहे. तसेंच एखाद्या ठिकाणीं समव्यवसायी मित्र द्रव्यार्जनाचें-काम अगोदरच येऊन करीत असतील तर नंतर येणारे चोर तेथें क्षणभरहि थांबत नाहींत. 'विपुलाच पृथ्वी' या न्यायाप्रमाणें ते लगेच दुसरा रस्ता पकडतात.

पैसा आणि धंद्यांतली वाकबगारी या दोन गोष्टी मिळविण्यासाठीं प्रत्येकाची तळमळ असते. कामामध्यें नालायक ठरणें आणि दारिद्र्य पत्करणें यापेक्षां

मरण बरें असें त्यांना वाटतें. एखाद्या माजी चोरानें किंवा कैद्यानें आपल्या 'आठवणी' लिहिल्या कीं तो चेष्टेचा विषय बनतो. 'हाः हाः! तुम्ही काय म्हणे लेखकू झालांत आजकाल! आत्मचरित्र तर झालें! आतां कविता कधीं हाणणार?'—अशासारख्या शब्दांत त्यांची संभावना होते. एखादा माजी चोर व्याख्यानबाजी करूं लागला म्हणजेहि त्याची अशीच टिंगल होते. परंतु चेष्टा खूप झाली तरी हे लेखकमहाशय, कविवर्य किंवा प्रोफेसरसाहेब अविश्वासास पात्र होतात असें नव्हे. कारण या टीकाखोर लोकांना हें नक्कीच माहीत असतें कीं, हा जर हाडाचा चोर असेल तर ज्यामुळें कोणी दुखावणें शक्य आहे असें लिखाण तो कधींहि करणार नाहीं. आणि तो जर मुळीं सच्चा चोरच नसेल तर कोणालाहि दुखावण्यासारखें लिहिणें मनांत आणूनसुद्धां त्याला जमणें शक्य नाहीं. कसेंहि असलें तरी पुस्तकें लिहून किंवा भाषणें ठोकून हे माजी चोर लोकांच्याकडून पैसे उकळतात याचें त्यांच्या टीकाकार-मित्रांना समाधानच असतें. लोकांना लुबाडण्याची एक नवीन शक्कल लढविल्या-बद्दल माजी चोरांना शाबासकीच मिळते.

चोरमंडळींची भाषा आगळी आणि शैलीदार असते. तीनशें वर्षांपूर्वीचे पूर्वज ज्या शैलींत बोलत, त्याच ढंगांत आज त्यांचे वंशज संभाषण करतात. १५८५ सालीं इंग्लंडांत प्रसिद्ध झायेल्या शर्विल्की भाषेच्या शब्दकोषांतील शब्द आजहि त्याच अर्थानें वापरले जातात. अर्थात् ही भाषा कोणी पुस्तका-वरून शिकत अगर शिकवीत नाहीं. श्रुतिस्मृतींप्रमाणें वाडवडिलांची आणि थोरामोठ्यांची वाणी ऐकायची आणि लक्षांत ठेवायची, असाच हा आर्ष प्रकार आहे. आपल्याला कोणी ओळखूं नये म्हणून चोरलोक ही भाषा जनता-संपर्काच्या वेळीं वापरतात असें जर कोणी सांगत असेल तर तें एक बंडल आहे. कारण चारचौघां अपरिचित लोकांसमक्ष ही भाषा बोलणें म्हणजे जवळ-जवळ तुरुंगाचें तिकिट मिळविण्यासारखें आहे. पोलिसदादा आजूबाजूला असतांना ही भाषा बोलणें हें महामूर्खपणाचें असतें. 'इथं फार उकडतंय नाहीं? जरा बाहेर जाऊन बसूं या. कसं?'—या अर्थाचेंच बोलणें अशा प्रसंगीं शहाणपणाचें असतें.

धंदेवाईक चोर हे आपल्या कार्याकरितां नवीन रंगरूटांची भरती करण्याचा

फंदांत पडत नाहींत. असे उमेदवार शोधण्यापेक्षां धंद्यात वाकबगार असलेल्या अनुभवी इसमांनाच भागीदार करून घेणें सोपें असतें. उगाचच एखाद्या हौशी माणसानें उचल्या किंवा पाकीटमार चोर व्हायचें ठरविणें म्हणजे स्वतःची क्रूर थट्टा करून घेण्यासारखें आहे. गुरुविना ही विद्या प्राप्त करून घेण्याची आशा करणें हे व्यर्थ आहे. 'ग्रंथ हेच आपले गुरु होत' यासारखे बोधवाचन येथें कुचकामी ठरतें. औटघटकेंत माणसाचा चोर झाला असें होणें अशक्य आहे. लहानशा प्रमाणावर सुरुवात करून गुरूच्या मार्गदर्शनाखालीं चढत चढत प्रगति करणें हेंच खरें. सतत अनुभव घेत राहणें हीच उज्ज्वल यशाची गुरुकिल्ली आहे.



ग्रंथ हे गुरू नव्हत.

व्यवसाय म्हणून पाहिलें तर चोरी हा इतर धंद्यांप्रमाणेंच एक धंदा आहे. चार धंदेवाले लोक ज्या प्रकारें बोलत असतात त्याच भाषेंत चोरांचींहि संभाषणें चाललेलीं असतात. 'गिऱ्हाईक कमी आहे,' 'प्राफिट बिलकुल नाहीं,' 'सरकार हरामखोर आहे,' 'पोलिसवाले माजले आहेत'— अशा स्वरूपाचींच हीं संभाषणें असणार. धंदेवाईक चोरांना घाम गाळून काम करावें लागतें. पोटाची खळगी भरण्यासाठीं हाडाचीं काडें करावीं लागतात. चोरीमध्यें 'थ्रिल' आहे. असें फक्त महामूर्ख रहस्यकथाकारांना आणि कादंबरीकारांनाच वाटत असतें; चोरांना कधींहि नाहीं. कारण तसें त्यात कांहीं नसतेंच. चोरीचा मामला सुरू करूनतो पुरा करणें हें रेसकोर्सवर घोडे खेळण्याइतकें सोपें काम नाहीं. हा सर्व प्रकार चालू असतांना संशयाची तलवार त्याच्या डोक्यावर टांगलेली असते, सगळेंच गाडें फसण्याची भीति

असते, योग्य वेळीं योग्य तेंच बोलण्याची खबरदारी घ्यायला लागते, जोडीदार कांहीं गोलमाल करणार नाहीं ना या विषयींची शंका मनाला छळत असते. चेहेरा निर्विकार ठेवावा लागत असतो, मेंदू तरतरीत ठेवावा लागतो, प्रसंगावधान कमालीचें लागतें. आणि इतकें करूनहि सारें मुसळ केरांत जाण्याचा संभव असतो. यांत कसलें आलें आहे कपाळाचें थ्रिल! या लेखक लोकांना! भलभलतें बोलायला काय झालें! उचलली जीभ की लावली टाळ्याला! दिवस— किंवा रात्रभरीची कामगिरी आटोपून गरीब बिचारा, दमलाभागलेला चोर घरीं येतो तेव्हां एखादा सामान्य गिरणी कामगार आणि तो यांत कांहीच फरक नसतो. दोघेहि श्रमजीवी आणि पिळले जाणारेसुद्धां.

चोरांचें उत्पन्न शोधून काढणें कठीण. हिशेबठिशेबाच्या वह्या ते कधींच ठेवीत नाहींत. (आणि खरे हिशेब कोण ठेवतो म्हणा!) त्यांच्या उत्पन्नांत इतके वांटे-करी असतात कीं कित्येकदां कामाचा मोबदला म्हणून निव्वळ तोटाच उरतो. श्रीशिल्लक शून्यच! पोलिसवाले, वकील, दलाल— आणि कित्येक वेळां न्यायमूर्तिसुद्धा— यांचे 'पर्सेंटेज्' देतां देतां पैसेच उरत नाहींत. त्यामुळें शिमगा व दिवाळी यांचा पाटशिवणीचा खेळ त्यांच्या जीवनांत सदैव चाललेला असतो. पण भरल्यापोटीं ते सहसा चोरीच्या वाटेला जात नाहींत. थंडीच्या दिवसांची वेगमी असेल तर ते दिवस आपल्या घरीं बसून मुलाबाळांत काढणेंच त्यांना आवडतें.


चोर दोन अर्थांनीं 'साम्यवादी' असतात. एक तर गिऱ्हाईक जितकें पैसे-वाले तितकी कमाई अधिक, म्हणून त्यांची वक्रदृष्टि भांडवलवाल्यांकडेच वळ-लेली असते. दुसरें असें कीं, त्यांच्या मिळकतीची वांटणी ही अगदीं कांटेकोर-पणें समप्रमाणावर केली जाते. कोणाला कमी नाहीं, कोणाला जास्त नाहीं. मात्र धंदा करीत असतांना गरीब, श्रीमंत, फाटका, गब्रू असा फरक केला जात नाहीं; करण्यांत अर्थ नसतो. कारण झाडूवाले, रंगारी यांसारख्या वरवर गरीब दिसणाऱ्या लोकांच्या खिशांतून बरीच माया सांपडल्याचीं उदाहरणें आहेत. भावनेच्या आहारीं जाणें हें चोराला परवडण्यासारखें नसतें. धंद्यांतले सवाल नेहमींच रोकडे असतात. 'जनते'चा सतत उत्कर्ष व्हावा असेंच इतरांप्रमाणें चोरांनाहि वाटत असतें. कारण जनतेचा उत्कर्ष हाच पर्यायानें त्यांचाहि फायदा

असतो. बनल्या जाणाऱ्या गिऱ्हाइकांबद्दल त्यांना तुच्छताही नसते--आणि सहानुभूतीहि नसते. ज्याला आपले पैसे संभाळतां येत नाहींत त्यानें ते गमावलेलेच बरे, असें त्यांचें साधेंभोळें तर्कशास्त्र असतें. चोरी करण्यांत चोरांना कुठल्याहि प्रकारचा कमीपणा वाटत नाहीं. उत्कृष्ट चोर म्हणून (चोर) समाजांत आपल्या कीर्तीचा सुगंध दरवळला पाहिजे असें प्रत्येकाचें सुखस्वप्न असतें. चोरी करण्यांत चोरी कसली ? एका चोरानें बँकेंत काम करणाऱ्या कॅशिअरला एकदा विचारलें, " बाबा रे, तूं एवढे पैसे दररोज हाताळतोस. तुला कधीं चोरी करावी असें वाटत नाहीं काय ? " यावर त्या प्रामाणिक कॅशिअरनें असें उत्तर दिलें कीं, " सर्व बँकांतल्या प्रत्येक कॅशिअरला प्रत्येक क्षणाला असें वाटत असतें कीं, आपण झक्कपैकीं डल्ला मारावा. आतां कल्पना नामी आहे, पण... डल्ला मारणार कसा, हा खरा महत्त्वाचा प्रश्न आहे ? "

पकडले जाण्याच्या भीतीनें धंदेवाईक चोर आपल्या व्यवसायाकडे कधींच पाठ फिरवीत नाहींत. त्यांत भ्यायचें कशाला ? पावसाळीं दिवस असला म्हणून कांहीं कोणी कारकून ऑफिसला जायला भीत नाहीं. किंवा बंदुकींतून धूर येतो म्हणून सैनिक बंदुकीला भीत नाहीं. चोरी करणाऱ्या माणसाला काय पद्मश्री वगैरे बनवावें अशी तुमची अपेक्षा आहे काय ? पण एकंदरींत धंदेवाईक चोर क्वचितच शिक्षा भोगतात. चिक कॉन्वेल्साहेब स्वानुभवाचे असे बोल सांगतात कीं, अमेरिकेंत चोर अनेकदां पकडले जातात, अधूनमधून त्यांच्यावर आरोप ठेवले जातात आणि क्वचितच ते तुरुंगाची हवा खाण्यास जातात. पैसे मिळण्याची आशा नसेल तर पोलिसवाले लोक मुळीं त्यांना पकडण्याच्या फंदांतच पडत नाहींत. दाम नसेल तर गरीब बिचाऱ्या पोलिसदादानें तरी काम कां बरें करावें ? हायूंडल्साहेबाचें म्हणणें असें कीं, पाकिटमारांच्या पांचशें गुन्ह्यांपैकीं फार तर एखाद्याला शिक्षा होते. शिवाय शिक्षा झालेल्या लोकांचें प्रमाण अननुभवी, हौशी चोरांमुळें वाढतें. एका दुकानांत दर आठवड्याला सरासरी तीस लोक पकडले जात; पण त्यांतले अवघे दोन धंदेवाईक; बाकीचे हौशी. अनुभव नाहीं काडीचा, पण हीं दीडशहाणीं पोट्टीं धंदेवाईकांचीं अब्रू घालवितात. खरें पहायचें तर केलेल्या गुन्ह्याबद्दल शिक्षा भोगायला धंदेवाईक चोर आनंदानें तयार असतो. कारण गुन्ह्याची सगळी माहिती असल्यामुळें निरनिराळ्या

गुंड्या चालवून त्यांतून सुटणें शक्य असतें. याउलट दुसऱ्याच्या गुन्ह्याबद्दल आपण पकडलें जाणें यासारखी खेदाची गोष्ट नाहीं. तिथें गुन्ह्याच्या स्वरूपाबद्दल अज्ञान असल्यामुळें सुटण्याची शक्यता नसते. न केलेली चोरी पचविणार तरी कशी ?

चोरांचें खाजगी जीवन अगदीं एकाकी असतें. मुख्य कामाकरितां जरी त्यांना जनतासंपर्क करावा लागत असला, तरी कार्यभाग साधल्यावर त्यांना ' गर्दीपासून दूर दूर ' जावें लागतें. पण चोरहि माणूसच असतो आणि आपण माणसांप्रमाणें जगावें असें त्याला वाटतें. प्रेम करायला बायको असावी, वंशाचा दिवा तेवत ठेवणारीं कुलदीपक अशीं चार कच्चींबच्चीं असावींत, अशी त्यांनाहि हौस असते. चोरांनाहि मित्र असतात, आणि आपले मित्रवर्य चोर आहेत हेंहि त्यांना माहीत असतें. चोरांना मुळीं खऱ्या मित्रांशिवाय मित्रच नसतात. जे आपले मित्र नाहींत ते आपल्या विरुद्ध बाजूचें आहेत याची खूणगांठ त्यांनीं आपल्या मनाशीं मारलेली असते. चोर लोकसुद्धां वस्तू विकत घेतात, एवढेंच नव्हे, तर आपलीं बिलेंहि वेळेवर भागवतात. विश्वासाला ते इतके पात्र असतात कीं, एका जज्जसाहेबानींच आपल्या घरांत एका चोर भाडेकरूला जागा दिली असल्याचें कॉन्वेल्नें आपल्या आठवणींत नमूद करून ठेवलें आहे. पण एकंदरींत हें जीवन म्हणजे सुळावरची पोळीच. भरल्या ताटावरून कधीं उठावें लागेल, एकाएकीं शहर सोडून कुठेंकुठें भटकावें लागेल आणि गुन्हा केलेला असो वा नसो,—कायद्याचा मजबूत पोलादी पंजा खांद्यावर कधीं पकड घेईल, हें मुळींच सांगतां येत नाहीं.



' एकाकी '

पण अशा रीतीनें चोर जरी संशयानें सारखा पछाडलेला असला तरी त्याला

या प्रकाराची संवय होते. शिवाय चोराचें ( हि ) एक तत्त्वज्ञान असतच. पकडलें जायचेंच असेल तर त्यांतून आपल्याला कोणीहि वांचवूं शकणार नाहीं आणि पकडले गेलों तरी आपला स्वातंत्र्याचा मार्गहि कोणी फार काळ अडवून ठेवूं शकणार नाही, अशी त्याची श्रद्धा असते.

● ● ●

कॉन्वेल् आणि इतर भाष्यकारसाहेबांना वाट पुशीत चोरांच्या काळोख्या दुनियेंत आपण येथवर प्रवास केला. या बाबतींत स्वानुभव घेणेंहि कठीण आणि घेतला असल्यास सांगणेंहि कठीण. एवढी कथा झाल्यावरहि कोणी जिज्ञासू असें विचारण्याची शक्यता आहे कीं, 'चोरी कशी करतात ?' — याविषयीं प्रत्यक्ष मार्गदर्शक असें यांत फारच थोडें आहें. याचें एक कारण असें कीं, कोणताहि सच्चा चोर आपले भाऊबंद दुखावले जातील असें कांहीं कागदावर उतरविणें अशक्य आहे. ( इति कॉन्वेल्साहेब. ) लेखक बनलेल्या त्याच्यासारख्या चोराकडूनहि यापेक्षां अधिक लाभाची अपेक्षा करणें हें भाबडेपणाचें ठरलें असतें. शिवाय 'जावें त्याच्या वंशा तेव्हां कळे' ( इति संत तुकाराम ) हें आणखी. मोठमोठे ग्रंथ लिहून जी विद्या शिकवितां येत नाहीं ती थोर विद्या चारसहा पानांत सांगूं धजणारा मी कोण ?

— पण तें कसेंहि असलें तरी जातांजातां एक उपयुक्त सूचना देण्यास हरकत नाहीं. 'खिसेकापूंपासून सावध रहा', 'खिसापाकिट संभाळा' — अशा पाट्या तुम्ही जेव्हां वाचाल तेव्हां लगेच पाकिटासाठीं खिसे चांचपायला लागूं नका. कारण त्या पाटीच्या बरोबर खालींच उभा असलेला एखादा चिक् कॉन्वेल् अशा संधीची वाटच पहात असणार. तुमचा हात पाकिटाकडे गेला कीं त्या माणसाच्या चेहेऱ्यावर स्मिताची रेषा उमटलीच म्हणून समजा. !

— त्यापेक्षां निदान एवढें करा मेहेरबान, कीं पाकिटाच्या खिशाकडे हात गेला तरी जाऊं द्या. निदान पैसे तरी पाकिटाच्या बाहेर ठेवायला विसरूं नका !

## १० : अमेरिकेंत ‘ उषावहिनी ’

संग्रहालय, ठाणे. स्थळ
दि: ..........
.......... दि: ..........

‘ प्रिय ॲबी,—

आमच्या ‘ ह्यांचं ’ नांव विल्बर आहे हें माहीत असतांनाहि माझ्या शेजारणीनं आपल्या कुत्र्याचं नांव विल्बरच ठेवलं. हा उपद्व्याप करण्याचं कारण मनाच्या क्षुद्रपणाशिवाय दुसरं काय असणार ? रात्रीच्या वेळीं जेव्हां या बाईसाहेब आपल्या कुत्र्याला हांका मारतात तेव्हां ‘ हे ’ खिडकीपाशीं जातात आणि तिला खिजविण्याकरतां कुत्र्यासारखं भुंकतात. कित्येकदां ‘ हे ’ खालीं उभे असतात आणि मी वरून त्यांना हांका मारतें, तेव्हां शेजारणीचा कुत्रा धांवत येतो. आतां आपला नवरा आणि कुत्रा यांच्यांत असा घोटाळा होणं ही राग आणण्यासारखी गोष्ट नाहीं का हो ? मला तुम्हाला विचारायचं तें हेंच कीं, शांतताभंग केल्याबद्दल किंवा आमच्या साहेबांची बदनामी केल्याबद्दल मी या बाईला कोर्टांत खेचूं शकतें का ?

आपली
विल्बरची बायको. ’

आमच्या अमेरिकन उषावहिनींना आलेलें हें पत्र मीं वाचलें आणि स्वतःशीच बराच वेळ हंसत राहिलों. आपल्याला येणाऱ्या पत्रांना ॲबी अतिशय चुरचुरीत आणि खमंग उत्तरें देते असें मी ऐकलें होतें. म्हणून या पत्राला तिनें दिलेलें

उत्तर वाचायला मी फार उत्सुक होतों. पण म्हणूनच मी ॲब्रीचें उत्तर आधीं वाचलें नाहीं. या पत्राला असें उत्तर देतां आलें असतें का ? :—

' सौ. विल्बर यांस,

तुम्ही असं करा, या शेजारीणबाईचं नांव शोधून काढा आणि तेंच नांव आपल्या कुत्रीचं ठेवा. ( तुमच्या घरीं कुत्री नसल्यास तावडतोब एखादी विकत घ्या. ) मग सारखं आपल्यां कुत्रीला हांका मारण्याशिवाय तुम्ही कांहींहि करूं नका. पहा, शेजारणीच्या नाकाला कशा मिरच्या झोंब-तात तें ! नाहीं मात्रा लागू पडली, तर खुश्शाल तुम्ही माझंहि नांव बदलूं शकतां.

कळावे,
आपली...'

कदाचित् यापेक्षां आणखीहि एक उत्तर देतां आलें असतें :—

' प्रिय विल्बरीणबाई,

तुम्ही म्हणतां तें मला अगदीं पटतं. पण मला वाटतं, आपण विल्बरच्या ( शेजारीणबाईंचा ) दृष्टीनंहि या प्रश्नाचा करायला नको का ? समजा, तुमच्या यजमानांचं नांवहि विल्बर आहे हें त्याला कधीं कळलं तर त्याच्या भावना दुखावणार नाहींत का ? तसं झालं तर अब्रुनुकसानीची फिर्याद तुमच्यावरच होण्याचा संभव आहे अशी मला भीति वाटते. म्हणून योग्य विचार करूनच तुम्हीं पुढचीं पावलं टाकावीं आणि विल्बरला ( आपल्या ) आवरावं. असा माझा तुम्हांला प्रेमळ आणि कळकळीचा सल्ला आहे.

आपली स्नेहांकित......'

पण ॲब्रीनें प्रत्यक्ष दिलेलें उत्तर जेव्हां मीं पाहिलें तेव्हां तें मला बरेंच मिळमिळीत वाटलें. तिनें एवढेंच लिहिलें होतें,—

' प्रिय बायकोस,

तुमच्या शेजारीणबाई जेव्हां आपल्या कुत्र्याला हांक मारतात तेव्हां खिडकीपाशीं जाऊन जर तुमचे यजमान भुंकत असतील तर तुमच्यापेक्षां

शेजारच्यांनाच तक्रार करायला जास्त जागा आहे. तुम्हांला शेजारणींशीं भांडण करायचं असल्यास तें कोर्टांत न करतां बाहेरच उकरून काढावें, असा माझा सल्ला आहे.

आपली,
ॲबी.'

ॲबीचें हें उत्तर पुरेसा 'चावा' घेणारें नसलें तरी मूळ पत्र करमणूक करणारें होतें. त्यामुळें त्या दिवसापासून मी ॲबीचा पत्रव्यवहार न चुकतां दररोज वाचू लागलों. पुढेंपुढें तर शुक्रवारीं ॲबीचीं पत्रें नसत तेव्हां मी वर्तमानपत्र फार वेळ हातांतहि धरीत नसें.

ॲबी ही अखिल अमेरिकन कीर्तीची पत्रलेखिका आहे. तिचीं पत्रोत्तरें दररोज जवळजवळ नऊशे वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध होत असतात. आपल्याला वाचकांची लाखांनीं पत्रें आलेलीं आहेत आणि हजारांनीं नेहमीं येत असतात, असें ॲबीनें टेलिव्हिजनवरील मुलाखतींत सांगितलेलें मीं ऐकलें आहे. यांत अतिशयोक्तीचा कांहीं भाग असेल असें मला वाटत नाहीं. कारण मीं ज्यांना-ज्यांना विचारलें त्या सर्वांना ॲबीचें नांव माहीत होतें आणि ते ॲबीचीं पत्रें नेमानें वाचीत असत.

ॲबीला येणारीं बहुसंख्य पत्रें स्त्रियांची असतात. बायकाबायकांच्या या गलबल्यांत लांबोडे बनणारे कांहीं पुरुषहि असतात हें खरें; पण एकंदरीत पुरुष पत्रलेखकांची संख्या कमीच. ॲबीच्या साहाय्यानें ज्या बायका आपलीं दुःखें 'वेशीवर टांगतात' त्यांना आपापलीं पत्रें छापून यायला हवीं असतात हें खरें; पण पत्रांवर खरीं नांवें असण्याऐवजीं नांवाचें टोपणच असतें. बहुतेक पत्रलेखिका फसविल्या गेलेल्या, गोंधळलेल्या, दुखावलेल्या, वैतागलेल्या, आश्चर्यचकित, हृदयभग्न किंवा घाबरलेल्या असतात. मधूनच एखादी 'पंधरा वर्षांची पण दुःखी', एखादी 'सडपातळ आणि सुखी', तर एखादी 'अधिक सडपातळ झाल्यामुळें अधिक चिडलेली' बाई असते. कांहीं 'प्रामाणिक पण एकट्या,' तर कांहीं 'तृप्त पण संतप्त.' कांहीं 'तुकडे तुकडे होत असलेल्या,' तर कांहीं 'जवळ जवळ खलास' झालेल्या. कांहीं 'वेड्यांच्या इस्पितळाच्या मार्गावर.' एका पत्रांत

‘ कंजुष माणसाच्या बायकोची ’ करुण कहाणी होती. दुसऱ्यांत ‘ दुसऱ्या नंब-रच्या बायको ’ची कैफियत होती. ‘ अजूनहि प्रयत्नांत ’ असलेल्या एका तरु-णीला डोळे पुसण्यासाठीं ॲबीचा रुमाल हवा होता, तर एका ‘ आंबटगोड षोडषवर्षे ’ला ॲबीच्या खांद्यावर आधारासाठीं डोकें टेकायचें होतें. या गर्दीत एक ‘ घोरणारी ’ बाई होती, तर एक ‘ शर्विलक–पत्नी ’ सुद्धां तिथें उजळ माथ्यानें वावरत होती. एकीनें ‘ नांव नाहीं हं ’ या टोपणनांवाचा बुरखा घेत-लेला होता, तर आणखी एक ‘ आपल्या दोघांतच हं गडे ’ असें लाडिकपणें ॲबीला सांगत होती.

अश्रुविमोचनामुळें ‘ ओल्याचिंब झालेल्या एका उशीचें ’ ( Wet Pillow ) पत्र मीं पाहिलें आणि क्षणभर ( फार तर दोन क्षण असेल ) विरघळलों. बाईंनीं लिहिलें होतें,—

‘ प्रिय ॲबी,

मातृदिनाच्या दिवशीं ( Mother ’s day ) मला ‘ हे ’ म्हणाले, ‘ लाडके, आज तुला भेट म्हणून काय द्यावं मला अगदीं सुचत नाहीं. तूं असं कर, हे वीस डॉलर्स घे आणि घेऊन ये कांहींतरी तुझ्यासाठीं. ’

ॲबी, असं म्हणणाऱ्या नवऱ्याविषयीं तुला काय वाटलं असतं ? मला कित्तीकित्ती वाईट वाटलं. रात्रभर मी रडत होतें.

तुझी,
ओली उशी. ’

ॲबीनें या पत्राला योग्य तेंच उत्तर दिलें :—

‘ प्रिय ओलेतीस,

तुझ्या नवरोजींना फारसं डोकं नाहीं असं हवं तर तूं म्हण. पण निदान त्या दिवशीं ‘ मातृदिन ’ आहे एवढी तरी शुद्ध त्याला होती. तोंडानं जें सांगतां आलं नाहीं तें त्यानं पैशानं सांगायचा प्रयत्न केला. मला आशा आहे कीं, यापेक्षां एखाद्या गंभीर कारणामुळं अश्रू ढाळण्याचा प्रसंग तुझ्यावर येणार नाहीं. ’

पण हा पत्रव्यवहार एवढ्यावरच थांबला नाहीं. नंतरच्याच आठ वड्यांत दुसऱ्या एका 'मातोश्री'चें पत्र येऊन थडकलें :—

'वीस डॉलर्स देऊन नवऱ्यानं मातृदिनाचं बक्षीस आणायला सांगितलं म्हणून रडलेल्या 'ओली उशी' बाईसाहेबांना म्हणावं, तुम्हीं किती भाग्यवान् आहांत याची तुम्हांला कल्पना नाहीं. या वर्षी मातृदिन माझ्या वाढदिवसाच्या तारखेलाच आला. माझं लग्न होऊन अकरा वर्षं झालीं आणि मला तीन सुंदर मुलं आहेत. तुझा विश्वास बसणार नाहीं ॲबी, पण मुलांच्या वडिलांनीं मला त्या दिवशीं नुसतं फुकटचं 'हॅपी मदर्स डे' किंवा 'हॅपी बर्थ डे,' असंसुद्धां म्हटलं नाहीं उलट 'मातृदिन' आणि इतर सगळ्याच सुट्ट्यांच्या बाबतींत बाजारीपणा कसा बोकाळला आहे या विषयावर माझ्यापुढं एक लेक्चर ठोकलं !

तुझी,
गंगायमुनांची नदी.'

आणि हें पत्र प्रसिद्ध होऊन आमचा वर्तमानपत्राचा अंक रद्दींत जायच्या आंतच आणखी एक 'आईसाहेब' लिहित्या झाल्या :—

'प्रिय ॲबी,

त्या वीस डॉलरवाल्या नवऱ्याच्या बायकोला म्हणावं कीं, डॉक्टरकडे जाऊन तुझा मेंदू तपासून आण. खरं सांगतें तुला ॲबी, या बयेची आमच्या सोंगाशीं गांठ पडायला पाहिजे होती. म्हणजे दिसलीं असतीं सूर्याचीं पिल्लं ! आमच्याकडे मातृदिनाच्या दिवशीं माझं अभिनंदनाचं कार्ड मलाच विकत घ्यावं लागतं आणि त्यावर आमच्या नवरोजींनीं सही करावी म्हणून वर पदर पसरून ( फ्रॉकचा ) गयावया करावी लागते. ॲबी, माझ्या वतीनं तूं ओल्या उशी'ला जरूर विचार कीं, तिला थोडा जुना झालेला नवा नवरा चालेल का ? तसा आमच्या यांच्यांत कांहीं दोष नाहीं, फक्त त्यांना सारखं पडसं होत असतं, एवढंच.

तुझी,
पिळवटलेली.'

हा करुणरम्य पत्रव्यवहार वाचल्यानंतर 'वेट पिलो'च्या पहिल्या पत्रामुळें मी फार तर दोन क्षणच कां विरघळलों, हें समजायला चाणाक्ष वाचकांची आवश्यकता नाहीं.

'नवरा वागवीत नाहीं', 'सासू छळते,' किंवा फार तर 'घरून प्रेमाला विरोध आहे' असल्या सामान्य दुःखांमुळें आपल्या उपावहिनींचीं पात्रें दुःखी झालेलीं असतात. अमेरिकन उपावहिनींचें आगळें वैशिष्ट्य हें कीं, त्यांच्या पात्रांचीं दुःखे 'असामान्य' असतात. तोचतोचपणा नसल्यामुळें त्या दुःखानाहि आणखी एक कलात्मक टोंक असतें तें वेगळेंच.

ॲबीला येणारीं पत्रें वाचीपर्यंत दुःख म्हणजे काय असूं शकतें हें मला जवळ जवळ माहीत नव्हतें. माझी आपली भोळीभावडी समजूत कीं, दुःख हें गडद, काळेंकुट्ट आणि भयानक असतें आणि तें आपल्या तीक्ष्ण नख्यांनीं गरीब बिचाऱ्या माणसाला ओरबाडून रक्तबंबाळ करीत असतें. पण ॲबी आणि ॲन् लॅंडर्स (ही दुसरी एक पत्रपंडिता!) यांना आलेलीं पत्रें मीं वाचलीं आणि दुःखाचें रंग हलकेफुलकें असूं शकतात, त्या रंगांचें सुंदर इंद्रधनुष्यसुद्धां बनूं शकतें, हें माझ्या लक्षांत आलें. आणखी असें वाटलें कीं, हें बहुरंगी दुःख माणसाला आपलें सारखें ओरबाडींतच बसत नाहीं; तर त्याला गुदगुल्या देखील करतें. अर्थात् अशा वर्तमानपत्री प्रदर्शनावरून मी कांहीं सर्वसाधारण अनुमानें काढूं लागलों तर आमचे सोशिऑलॉजिस्ट मित्र सोटे परजीत माझ्यामागें लागतील हें खरें; परंतु त्या सोट्यांबद्दल योग्य आदर बाळगूनहि मला हेंच म्हणायचें आहे कीं, निदान कांहीं प्रकारची अमेरिकन दुःखे हीं दुःखे नसतातच; माणसाला कधींकधीं सुखहि खुपूं लागतें म्हणतात त्याप्रमाणें खुपणारीं हीं सुखे असावीत. (शिवाय खांडेकरांनीं बहुधा कुठेंतरी म्हटलेलें असेलच, कीं सुख आणि दुःख हीं जुळीं भावंडें आहेत म्हणून!)

ॲबीला आलेलें एक मासलेवाईक पत्र असें होतें :—

'प्रिय ॲबी,

माझा सध्यांचा नवरा आणि मी अशा आम्हां दोघांचींहि पूर्वी लग्नं झालेलीं होतीं. आमचं नवं लग्न झाल्याला आतां तीन वर्षं झालीं आणि

आम्ही ( सध्या तरी ) फार सुखांत आहोंत. मीं एकदां सहज माझ्या नवऱ्याला सांगितलं· कीं, इथच पीटसबर्गमध्यें माझे थडग्यासाठीं विकत घेतलेले दोन प्लॉटस आहेत, आणि त्यांचे पैसेहि मीं केव्हांच चुकते केले आहेत. पण माझ्या नवऱ्याचं म्हणणं आपलं हें कीं, (मृत्यूनंतर ) त्याला त्याच्या वेस्ट व्हर्जिनिया मध्येंच पुरलं पाहिजे. आतां या शहाण्याला व्हर्जिनिया आवडत नसे, म्हणून तो इथं पीटसबर्गला अडमडला. मग त्याला तिथंच परत मरायला जायचं कारण काय ? मला पीटसबर्गमध्येंच पुरलं जावं अशी माझी फार फार इच्छा आहे. मी सदतीस वर्षांची आहे आणि तो एकोणचाळीसचा आहे. खरं म्हणजे आतांच आम्हीं हा थडग्याचा प्रश्न उकरून काढणें योग्य नाहीं. पण तरीसुद्धां मला एकदां या प्रकाराची शहानिशा करून घ्यायची आहे. ॲबी, तुला काय वाटतं ग आमच्या या समस्येबद्दल ?

तुझी,

थडगें समस्या.'

ॲबीनें या प्रश्नाला चोख, व्यवहार्य उत्तर दिलें होतें. तिनें आपलें लिहिलें कीं, 'तुझ्या नवऱ्यानें व्हर्जिनियांत अगोदर प्लॉटस् विकत घेतलेले नसतील तर त्या वेड्यालाहि इथेंच मरायला काय धाड भरलीय ? '

दुसऱ्या एका 'पतिव्रते'पुढें अशाच तऱ्हेची एक भयानक समस्या उभी होती. तिनें लिहिलें होतें :—

'प्रिय ॲबी,

माझा नवरा एक वर्षभर आजारी आहे. डॉक्टर म्हणतात कीं तो तीन किंवा फार तर चार महिन्यांचा सोबती आहे. माझ्यापुढें आतां मोठा प्रश्न उभा राहिला आहे. त्याच्या प्रेतयात्रेला मी कोणते कपडे घालणें प्रसंगाला शोभून दिसेल ? मोठी, काळ्या रंगाची आणि रुंद काठांची हॅट आणि काळ्या रंगाची ओढणी घालणं चांगलं दिसेल का ? माझ्या मैत्रिणींचं म्हणणं असं कीं, ओढणी घ्यायची तर हॅट लहानच असायला

पाहिजे. दुसरी अडचण अशी कीं, मी अंगानं जरा थोराड असल्यामुळं मला बाई छोट्या हॅटस् कांहीं शोभून दिसत नाहींत. तुला तिसरं एक विचारायचं तें असं कीं, काळा सूट आणि त्यावर हिरव्या – निळ्या फुलांचा पोल्का घालणं बरं दिसेल कीं तोहि काळाच घालूं? आणखी एकच. तें म्हणजे, हे सगळे कपडे जर काळेच केले तर त्यावर एक मोठासा ठसठशीत दागिना घातला तर कसं दिसेल?

तुझी,
दूरदृष्टि.'

या पत्राला काय उत्तर देणार? कपाळ? पण ॲबीनें थंड, मोजक्या शब्दांत तिला उत्तर दिलेंच.

'प्रिय दूरदृष्टीस,—

तूं काळे कपडेच आणि तेहि नजरेंत भरणार नाहींत असे घाल. दफनविधि म्हणजे 'फॅशन शो' नव्हे. शिवाय त्यावेळीं नट्टापट्टा कसा करावा या विवंचनेंत तूं इतकी चूर झालेली दिसतेस कीं, तुझ्यावर लवकरच कोसळणाऱ्या या प्रसंगाची तूं अधिऱ्या मनानं वाटच पहात आहेस असं मला वाटतं.'

नवव्या नवऱ्याची नववी बायको असणें हें फार मोठ्या भाग्याचें लक्षण असल्याचें हॉलिवुडमध्यें मानतात असें मीं ऐकलें होतें. ॲबीच्या एका पत्रलेखिकेनें हॉलिवुडमध्यें न राहतांच हें भाग्य बऱ्याच अंशीं संपादन केलें होतें. पण अशा भाग्यवती स्त्रीपुढेंसुद्धां एक जटिल समस्य उभी असल्याचें वाचून मी चाटच पडलों. सप्तपदीच्यीं बेचाळीस पावलें टाकलेल्या या बाईनें लिहिलें होतें:

'मी २९ वर्षांची आहें आणि माझी आजतागायत सहा लग्नं झालेलीं आहेत! यावरून मी कोणीएक भयानक स्त्री असेन असं तुला वाटेल; पण मी खरोखरच तशी नाहीं. (मीं माझ्या तिसऱ्या नवऱ्याशींच दोनदां लग्न केलं, ही लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट आहे.) सध्या माझ्यापुढं प्रश्न असा कीं, माझा चालू नवरा सहावा असूनहि माझं प्रेम मात्र अजून

पांचव्या नवऱ्यावरच आहे. त्याच्याबरोबर मी इतर सर्वांपेक्षां जास्त—सबंध चार—वर्षं राहिलें. त्याच्यावर अगदीं मनापासून प्रेम केलं. माझं खरं प्रेम माझ्या आधींच्या नवऱ्यावरच होतं, असा आरोप हा पांचवा माझ्यावर सारखा करायचा. मला तें सहन करवेना. आणि मीं शेवटीं त्यालाहि सोडचिठ्ठी दिली. ज्या दिवशीं मी त्याच्या कचाट्यांतून मोकळीं झालें त्याच दिवशीं ज्या वकिलानं मला हा घटस्फोट मिळवून दिला त्याच्याशींच मी लग्न करून टाकलं. पण ॲबी, खरं सांगूं का ? माझं या नव्या नवऱ्यावर मुळींच प्रेम नाहीं. एकटीदुकटीनं रहायला मला भीति वाटते म्हणून खरं म्हणजे मीं त्याच्याशीं लग्न केलं, आणि फसलें. आतां माझा पांचवा नवरा मला परत कसा मिळवतां येईल ग, ॲबी ? तो हल्लीं माझ्या धाकट्या बहिणीबरोबर हिंडतो. परंतु तेंसुद्धां केवळ तिच्यामुळं त्याला माझी आठवण होते म्हणून, हें मला चांगलं ठाऊक आहे.

— कात्रींत सांपडलेली. '

कात्रींत सांपडलेल्या या भाग्यवतीला ॲबीनें असा संदेश धाडला :

'सहादां बोहल्याची आणि पांच वेळां घटस्फोटासाठीं कोर्टाची पायरी चढल्यावर तूं माझ्या सल्ल्याप्रमाणं वागशील असं कांहीं मला वाटत नाहीं. त्यामुळं खरं म्हणजे तुला सल्ला द्यायला माझं मनच घेत नाहीं. पण मलां वाटतं कीं तूं आतां ही आंकड्यांची मौज सोडून दे आणि सहाव्या नंबरालाच जन्मभर पहिल्या नंबरच्या ठिकाणीं समज. '

'नवरा' या संस्थेविषयींचा आपला संताप कांहीं बायका घटस्फोट घेऊन व्यक्त करूं शकतात. पण ज्यांना तेवढें जमत नाहीं त्या बायका कमींत कमी ॲबी किंवा ॲन् लँडर्स यांना पत्रें लिहून तो निदान जाहीर करीत असाव्यात. पण असें करतांना कांहीं बायकांना थोडासा कां होईना, संकोच वाटत असतो. ( याबद्दल ते ते नवरे अभिनंदनास पात्र ठरावेत. )

एका बाईसाहेबांनीं लिहिलें होतें :

'आपल्या नवऱ्याविषयीं तक्रार करणाऱ्या ज्या महामूर्ख बायका असतात त्यांतलीच मी एक, असं तूं समजण्याचा संभव आहे. परंतु माझी अडचणहि तशीच आहे. माझा नवरा गेलीं दहा वर्षं खोटे दांत वापरतो. मला हा प्रकार मुळींच आवडत नाहीं. विशेषतः तो जेव्हां बाहेर बाग-काम करीत असतो तेव्हां कपाटावर ठेवलेली त्याची कवळी माझ्याकडे दांत विचकून हंसत असते. त्यामुळं माझा संताप अनावर होतो. एकेकदां वाटतं कीं त्यानं तरी आपले दांत योग्य जागीं म्हणजे तोंडांत ठेवायला काय झालं ?'

ही हकिगत म्हणजे दंतकथा नाहीं. ती एक साधी 'दंत–कथा' आहे.

या आजीबाईंचा आजोबांच्या कवळीवर दांत, तर दुसऱ्या एका बाईचा नवऱ्याच्या एका विचित्र संवयीमुळें नाकावर राग ! या गृहस्थांची खोड अशी कीं, कांहींहि खायचें झालें कीं ते प्रथम त्याचा वास घेतात. आणि हें कुठेंहि बरं का ! मग ते हॉटेलांत जेवत असोत, किंवा कोणाकडे जेवायला गेलेले असोत. त्यांच्या या संवयीचा एक वाईट परिणाम असा कीं, त्यांचीं मुलेंहि आतां नेमकें तसेंच करायला लागलीं आहेत. बाईचा दावा असा कीं, 'आपल्याला स्वैपाक उत्तम करतां येतो तरीहि यांचा खाक्या बदलत नाहीं. बरें, यांना विचारावें तर ते कांहीं बोलत नाहींत, नुसते हंसतात. आतां काय करणार बाई हे नेहमीं असें करायला लागले म्हणजे ?' स्वैपाकांत तरबेज असलेल्या दुसऱ्या एका अन्नपूर्णाबाईची तक्रार अशी कीं, त्यांचें नवरोजी तिन्हीत्रिकाळ चांगलें टमटमावून जेवतात खरे; पण त्यांना नुसतें विचारावें, 'कसा झालाय् स्वैपाक ?' तर त्यांचें उत्तर ठरलेलें : 'कांहीं वाईट नाहीं.' मग तें थँक्सगिव्हिंगचे जेवण असो कीं नाताळांतलें असो. या सद्गृहस्थाचें 'कांहीं वाईट नाहीं' हें पालुपद ठरलेलेंच. पण यांच्याहि वरताण तिसऱ्या एका प्राण्यानें केली होती. या माणसाला बायकोनें केलेला कोणताहि पदार्थ आवडत नसे. बरें, कुठें काय चुकलें, किंवा आपल्याला काय करून पाहिजे हेंहि वेटा कधीं तिला सांगायचा नाहीं. ती बिचारी साध्वी स्वतः होऊनच पाकशाळेंत गेली, समतोल आहार कसा बनवावा हें शिकली. पण हिनें कांहींहि वाढून ठेवलें तरी 'अंबोण' यापलीकडे कुठलाहि अभिप्राय मिळत नसे. या बाईला ॲबीनें लिहिलें होतें :—

'तूं असं कर, तुझा नवरा आतां जेव्हां जेवायला घरीं येईल तेव्हां त्याला सामोरी जा आणि म्हण, ' लडक्या, कपडे वगैरे बदलूं नकोस हं ! अगदीं हॅट् सुद्धां काढू नकोस डोक्यावरची. आपण आज बाहेर जेवायला जाऊं या. मात्र एक हं ! हॉटेलातलं अन्नसुद्धां ' अंवोण' वाटलं तर तक्रार माझ्याकडे नाहीं— मॅनेजरकडे करायची. समजलं ? '

एका सुग्रण बाईनीं एकदां मोठाच विनोद केला. म्हणजे त्यांनी मांजरांच्याकरितां जें वेगळें अन्न बाजारांत मिळतें तें विकत आणलें, आणि तेंच आपल्याकडे आलेल्या पाहुण्यांना जेवावयास घातलें. तिनें म्हणे नवऱ्याशी पैज मारली होती कीं, आपण कांहींहि केलें तरी पाहुणे तें वाखाणल्याशिवाय राहाणार नाहींत. गंमत अशी कीं तिनें पैज जिंकली. पाहुण्यांना त्या दिवशीचें जेवण फार फार आवडलें. आतां इतका विनोद केल्यानंतर तरी थांबावें कीं नाहीं ? पण आपण पाहुण्यांना कसें बनविलें हें तिनें ॲबीलाहि कळवून टाकलें. या पत्राला उलट-टपालींच एक उत्तर आलें. पत्राखालीं ' नांव सांगा' अशी सही होती. या बाईचा दावा असा कीं, गेल्याच आठवड्यांत ती जिथें जेवायला गेली होती तिथें त्यांना मार्जार-खाद्य घालण्यांत आलें असावें. कारण तें जेवण तिला अगदीं 'क्लिओपात्रा'च्या खाण्यासारखें वाटलें होतें. विशेष म्हणजे क्लिओपात्रा मांजरीला आपण घाल्तों तसाच हा प्रकार असावा, असा संशयहि तिनें नवऱ्याजवळ व्यक्त केला होता. या पत्राला ( सुज्ञपणें ) ॲबीनें असें उत्तर लिहिलें की पत्रलेखिकांचीं नांवें ' गुप्त' असतात.

दुसऱ्या एका बाईनीं संतापून लिहिलें कीं, ' मांजराचें अन्न पाहुण्यांना घालणाऱ्या या बाईनें कांहींच सिद्ध केलें नाहीं. कांहीं केलेंच असेल तर आपल्यावर विश्वास ठेवणाऱ्यांचा सफाई विश्वासघात आपण कसा करूं शकतों एवढेंच तिनें दाखविलें. विश्वासघातकी बाईनीं जो प्रकार केला तो विनोदी नसून ' इनोदी ' मात्र वाटतो. या दुसऱ्या बाई इतक्या संतापल्या त्या कीं, त्यांनींच तें मार्जार-खाद्य मिटक्या मारीत खाल्लें असलें पाहिजे अशी माझी खात्री झाली.

प्रेम करणें ही एकंदरीत सोपी गोष्ट नाहीं, प्रेममार्गात खांचखळगे, कांटेकुटे इ. इ. असतात, ही माहिती बहुतेकांना असते. परंतु आर्थरच्या प्रियेचा अनुभव जगावेगळा होता. तिचें आर्थरवर प्रेम होतें हें खरें; पण गंमत अशी कीं,

तो जेव्हां तिचें चुंबन घेई तेव्हां त्याचा चेहरा चमत्कारिक होई. नाकपुड्या स्फुरण पावत आणि तो बरोबर एखाद्या घोड्यासारखा दिसायला लागे. मग कसलें प्रेम आणि कसलें काय ? तिला आपलें हंसूंच कोसळायचें. हें पत्र प्रसिद्ध झाल्या-नंतर थोड्याच दिवसांत 'तितकीच मूर्ख' या नांवानें एक पत्र आलें. आर्थरच्या प्रियेइतकाच मूर्खपणा आपणहि करूं शकतों, असा या बाईचा दावा होता. ही बाई आपल्या एका जवळच्या आणि प्रिय माणसाच्या दफनविधीसाठीं गेली होती. धर्मोपदेशक प्रार्थना करीत होता, सगळे लोक गंभीरपणें उभे होते. आणि एकाएकी ही बाई खो खो हंसायला लागली. सगळे लोक तिरस्कारानें तिच्याकडे बघायला लागले. तिलाहि आपल्याला हंसूं आल्याबद्दल वाईट वाटलें. पण ती तरी काय करणार म्हणा ! प्रार्थना चालू असतांना तिचें सहजच त्या धर्मोपदे-शकाकडे लक्ष गेलें होते, आणि तिला तो थेट एखाद्या वेडकासारखा दिसला होता !

मला सारखें वाटायचें तें समस्त अमेरिकन जनतेच्या ॲबी आणि ॲन् लँडर्स या वहिन्यांवर असलेल्या दृढ विश्वासाचें. मग ती घोरणाऱ्या ( आणि घर डोक्यावर घेणाऱ्या ) नवऱ्याविषयींची तक्रार असो, किंवा झोंपेंत ( दुसऱ्या बायकांचीं नांवें ) बडबडणाऱ्या नवऱ्याविषयींची फिर्याद असो. आणि या दोन वहिन्याहि जवळजवळ सर्वज्ञच. त्यांना प्रत्येक प्रश्नाचें उत्तर माहित. प्रत्येक अडचणीवर त्यांच्याजवळ रामबाणांचा अक्षय भाता तयार. या दोघींच्या पत्रव्यवहाराबरोबरच त्यांच्या इतर लेखनाच्या जाहिराती असायच्या. त्या वाचल्या म्हणजे वहिनीसाहेबांना माहीत नाहीं अशी एखादी गोष्ट जगांत असूं शकेल हें मलाच खरेंच वाटेना. 'लग्नसमारंभ उत्तम कसा करावा' म्हणूं नका, कीं 'आईबापांबरोबर सुखानें कसें रहायचें' म्हणूं नका, फक्त वीस सेंटस् आणि पत्ता असलेलें पाकिट पाठविलें कीं माहितीपुस्तक टपालानें रवाना. याशिवाय 'आपापल्या प्रियकरांना ताब्यांत कसें ठेवावें ?', 'दारूपासून स्वतःचा बचाव कसा करावा ?',...'उत्तम वेळ कसा घालवावा ?', 'थांबा, लग्न करणार तें प्रेमाकरितां का ?','सगळे लोक ओढतात म्हणून तुम्हीहि सिगरेटस् ओढतां का ?'—इत्यादि प्रश्नांचीं 'रेडिमेड्' उत्तरें अवघ्या रुपया किमतींत केव्हांहि मिळवून आयुष्य सार्थकीं लावण्याची संधि ! कुणाला असें

वाटेल, ' वहिनींच्याकडून आपल्याला कांहीं मागवायचें झालें तर एक पत्र तरी लिहायला हवें. तें कुणा लेकाला येतंय् ?' पण वहिनी डगमगणार नाहींत. पत्रें न लिहितां येणाऱ्या लोकांसाठीं ' सर्व प्रसंगीं पत्रें कशीं लिहावींत ? ' यावर वहिनींचा ग्रंथ तयार ! किंमत थोडी जास्त. अवघी पांचच रुपये. पण कांहीं म्हटलें तरी या एका गुरुकिल्लीनें असंख्य कुलुपें धडाधड उघडतां येतील हेंहि महत्त्वाचें नाहीं काय ? शिवाय तुम्हांला हवा असलेला सल्ला जगजाहीर व्हायला नको असला तरी वहिनींची हरकत नाहीं. तुमच्यापुरता स्वतंत्र ( पण मनपसंत ) सल्लाहि तुम्हांला मिळेल. ॲबीचा ' विवाहाविषयीं ॲबी ' आणि ॲन्‌चा ' तुम्ही विचारलंत म्हणून —' हे ग्रंथ आणखी आहेतच. ॲन्‌च्या पत्रांचा मीं इथें नुसता उल्लेखच केला असला तरी कोणत्याहि बाबतींत ती ॲबीपेक्षां कमी नाहीं. तिचीं पत्रें दररोज ४५० वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध होतात आणि दोन कोटी वाचक तीं अधाशीपणें वाचीत असतात.

अमेरिकेंत बहुसंख्य असलेल्या केवळ स्त्रियांच्याच पत्रांना आणि प्रश्नांना उत्तरें देण्याइतक्या कांहीं या वहिनी पक्षपाती नाहींत. ' भावोजींचीं ' पत्रें आलीं तरी त्यांची दखल दोघीहि घेत असतात.

' बायकोपुढें हात टेकलेल्या ' एका भावोजींनीं वहिनींना लिहिलें —

' आमच्या घरीं एक छोटासा पोपट आहे, आणि त्याच्यामुळं माझं डोकं फिरण्याची पाळी आली आहे. हे व्यतिपात प्लॅस्टरला भोंकं पाडतात, भिंतीवरच्या रंगाचे टवके उडवतात आणि आम्हीं जेवत असतों तेव्हां ही स्वारी टेबलावरून घिरट्या मारीत असते. खरं सांगायचं म्हणजे, या सगळ्याला माझा मूर्खपणाच कारण आहे. मींच तो पोपट विकत घेतला हें खरं; परंतु मीं त्याबरोबरच एक पिंजराहि विकत घेतला हेंहि तितकंच महत्त्वाचं आहे. मात्र आमच्या बाईसाहेबांना पोपटाला पिंजऱ्यांत ठेवणं बिलकुल पसंत नाहीं. त्यांचं मत असं कीं, ' या पक्ष्याला सर्वत्र उडण्याचं स्वातंत्र्य हवं. नाहींतर तो ' दिवाणा ' होण्याची भीति आहे. ' मीं अनेक पोपट पिंजऱ्यांत ठेवलेले पाहिले आहेत; पण ते पागल झाल्याचं कांहीं माझ्या ऐकिवांत नाहीं. उलट आमच्या पोपटाचं डोकं फिरलं आहे असं

माझं मत आहे. याविषयीं आम्हांला योग्य तो सल्ला मिळेल काय ? '

या वादांत ॲबीनें भावोजींच्या बाजूचा कौल दिला आणि पोपटाला पिंज-ऱ्यांतच डांबून ठेवलें पाहिजे असें बजावलें.

तेवढ्यांत अल्बनीहून फ्रेड नांवाच्या सद्‌गृस्थाचें पत्र आलें—

' वहिनीसाहेब, तुमचं परवांचं उत्तर वाचलं, आणि आश्चर्य वाटलं. तुमचं सामान्यज्ञान उदंड आहे असं आम्ही ऐकून होतों. पण पक्ष्यांना घालायच्या चड्डया बाजारांत विकत मिळतात हें तुम्हांला माहीत नाहीं काय ? या चड्डया कधीहि धुवतां येणाऱ्या जर्सी कापडाच्या केलेल्या असतात आणि लहान, मध्यम आणि मोठ्या —तीन प्रकारच्या मापांत मिळतात. या चड्डया घातल्या असता पक्ष्यांना उडण्यांत कांहींच व्यत्यय येत नाहीं. शिवाय त्यांचे गळे असे केलेले असतात कीं, त्या गळूनहि पडत नाहींत, त्यामुळं हरवत नाहींत. वहिनी, ही थाप नव्हे. असल्या चड्डयांची माझी एजन्सी नाहीं; पण मीं तशा विकत मात्र घेतल्या आहेत. '

खुद्द ॲबीलाहि माहीत नसलेल्या वस्तू जगांत असूं शकतात हें वाचून मला अचंबा वाटला.

एका तरुण गृहस्थापुढें यापेक्षांहि नाजुक असा प्रश्न उभा होता. त्याचे कान सर्वसामान्य पुरुषांपेक्षां बरेच लांब होते अणि ते डोक्यापासून बरेच बाजूला उभे रहात असल्यामुळें फार डोळ्यांत भरत असत. ' तज्ञ डॉक्टरशिवाय कोणाला आपल्या कानाला हातहि लावूं देऊं नकोस ' असा प्रेमळ पण माफक सल्ला ॲबीनें त्याला दिला आणि आपल्या कानांवर हात ठेवले. ७१ वर्षें वयाच्या एका आजोबांची स्वतःविषयीं कांहीं अडचण नव्हती. पण त्यांची बहीण म्हणे अशा कांहीं कडाक्कड जांभया सारख्या द्यायची कीं हिचा जबडा आतां मोडून पडतो कीं काय अशी आजोबांना भीति वाटत होती. एका हलक्या झोपेच्या मालकानें तारस्वरांत घोरणाऱ्या आपल्या सहधर्मचारिणीविरुद्ध तक्रार केली, तेव्हां ॲबीनें ताबडतोब त्याच्या बायकोला धोक्याचा लाल कंदील दाखविला. तिनें लिहिलें, ' अघोरी स्त्रिये, लक्षांत ठेव कीं या अमेरिका खंडांत जे घटस्फोट

घेतले जातात त्यांत अनैतिक आचरणापेक्षांहि घोरण्याच्या भयानक संवयीमुळें घेतले गेलेलेच जास्त असतात.'

उग्र ब्रह्मचर्याचें व्रत घेतलेल्या दोन तेजस्वी पुरुषांनीं ॲबीपुढें आपल्या कैफियती मांडल्या होत्या. एकाचा दावा असा कीं, आसपासच्या बायकांना त्याचें सुख सहन होत नव्हतें. त्याच्या एका शेजारणीचें म्हणणें असें कीं, त्यानें ( तिच्यासारख्या ) एखाद्या सुंदर स्त्रीशीं ताबडतोब लग्न करायला हवें.—निदान तिच्या एखाद्या मैत्रिणीशीं तरी. 'कशाला ? जन्मभर हिच्या खस्ता काढायला ? कीं हिच्या दिवट्या, हट्टी, उनाड, किंचाळणाऱ्या ( इ. इ. ) पोरांचा बाप म्हणून मिरवायला ? या भवान्या मुळीं आमच्यासारख्या निष्पाप, सुखी जीवांच्या वाटेलाच कां जातात ?'

'बंधो, हेंच वक्तव्य तूं जर त्या बायकांना वेळोवेळीं ऐकवशील तर तुझा प्रश्न सुटेल, असा आशीर्वाद ॲबीनें या तरुणाला दिला होता.

दुसऱ्या एका ब्रह्मचाऱ्याची तक्रार अशी कीं, त्याच्या दोन्ही बाजूच्या घरांत राहणाऱ्या तरुण विधवा त्याच्या कुंपणावर डोकीं ठेवून त्याच्यांकरिता अश्रू ढाळतात आणि त्यामुळें त्याचें मागचें अंगण सगळें त्या बिचाऱ्यांच्या अश्रूंनीं तुडुंब भरून गेलें आहे. 'यावर आम्ही काय करावें ?' ॲबीनें या प्राण्याला असें झकास आणि टोकदार उत्तर दिलें कीं बोलून सोय नाहीं. तिनें दोनच शब्दांत सांगितलें : 'तांदूळ पिकव.'

एखाद्या माणसाला मधूनच ॲबीची थट्टा करायची लहर येते. एक म्हणतो, 'तुला माहीत आहे ना ॲबी, कीं सॉक्रेटिस हा फार चांगला माणूस होता. तो लोकांना उपदेश करीत असे. आणि लोकांनी त्याला विष चारलें. आणि तूहि लोकांना उपदेश करीत असतेस !'

दुसऱ्या एकानें लिहिलें :—

'परवां गाडींत मीं एका माणसाला पाहिलं. तो 'प्रिय ॲबी' हें तुझं पुस्तक वाचीत होता. पुस्तक त्याला खूप आवडलं असावं. असं कां नाहीं करीत ? तें तुझं पुस्तक तूं मला पाठव आणि जर बरं वाटलं तर मी तुला

माझा चेक पाठवून देईन. —हॅरॉल्ड.'

ॲब्बीनें तितकेंच मिस्किल उत्तर हॅरॉल्डला पाठविलें :—

'असं कर, तूच तुझा चेक आधीं पाठव. तो बरा 'वटला' तर मी लगेच माझं पुस्तक तुला पाठवीन.'

ॲब्बीला देशभक्त वगैरे जातीचे लोक पत्र पाठविण्याची तसदी घेत असतील असें मला वाटत नव्हतें. पण एकदां तसेंहि एक पत्र तिला आलें होतेंच. जाज्वल्य देशभिमानानें ओथंबणारें तें पत्र पाहून कोणाहि पुरुषाचें हृदय हेलावून गेलें असतें याबद्दल मला तरी तिळमात्र संशय नाहीं.

'माझ्या लग्नाला पंचवीस वर्षे झाली असून आतां मी माझ्या मायदेशाकरितां एक मोठा स्वार्थत्याग करण्यास उद्युक्त झालों आहें. चंद्रावर पाठविण्यासाठीं सरकारला जर एखाद्या स्त्रीची जरुरी असेल तर माझ्या बायकोला मी त्या कामासाठीं आनंदानं पाठवायला तयार आहें. एवढा नेत्रदीपक स्वार्थत्याग करण्याची संधि मला मिळण्याची आशा आहे काय ?'

आपला, देशभक्त.'

दे. भ. चें हें पत्र माझ्याइतकेंच ॲब्बीलाहि आवडलें असावें. कारण आपल्या नव्या पुस्तकाच्या मुखपृष्ठावरच तें तिनें छापलें आहे.


... ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम .................. वि: ..................
क्रमांक ...................... नों दि ..................

# १२ : अमेरिकन कुत्रीं आणि मांजरें

मांजर या प्राण्याचें आणि माझें प्रेम कधींच नव्हतें. म्हणजे दूध पीत असणाऱ्या मांजराला पिटाळून लावण्यापलिकडे माझा आणि या प्राण्याचा कधींच संबंध आलेला नाहीं. आपल्या हातून मांजर मेलें असतां काशीला जावें लागतें या भीतीमुळेंच नव्हे केवळ, पण माझा नेम उभ्या आयुष्यांत कधींच बरोबर न लागल्यामुळें मनांत हिंसा असूनहि माझ्या हातून कोणत्याहि सोकावलेल्या मांजरालाहि नुसती दुखापतसुद्धां झालेली नाहीं. कुत्र्यांविषयीं मला प्रेम वाटतें; पण त्यांना माझ्याविषयीं वाटत नाहीं, असा अनुभव. निदान त्यांना वेळोवेळीं आपल्याविषयीं नेमकें काय वाटत असेल याचा अंदाज नसल्यामुळें, 'कुत्र्यापासून सावध रहा' ही पाटी नसल्याची खात्री झाल्याशिवाय मी कोणाच्याच दरवाज्यांत पाऊल ठेवीत नाहीं. 'टायगर' किंवा 'पाशा' नांवाचीं उमदीं कुत्रीं कादंबऱ्यांतून असतात; पण रस्त्यावरच्या 'टायगर' मध्यें हा उमदेपणा कुठून येणार ? भुंकणारीं कुत्रीं चावत नाहींत असें म्हणतात; पण चावणारीं भुंकत नाहींत असें कुणीच कुठेंहि म्हटलेलें नाहीं. यामुळें कुत्रा या संबंध जमातीलाच मी भिऊन असतों. शिवाय कुत्रा चावला म्हणजे चौदा इंजेक्शन्स घ्यावीं लागतात हें मीं प्रत्यक्ष पाहिलेलेंच होतें. आणि कुत्रा स्वामिभक्त वगैरे असतो हें ठीक. पण त्याची भक्ति आपल्या स्वामीवर. उगाच आपल्या स्वामीकडे येणाजाणाऱ्या इसमावर त्यानें भक्ति काय म्हणून करावी ?

सारांश काय कीं, मांजरें मला आवडत नाहींत, आणि कुत्र्यांची मला भीति वाटते.

पण असें असूनहि अमेरिकन कुत्र्यामांजरांनीं माझें लक्ष वेधून घेतलेंच. याचा अर्थ यूनोनें हस्तक्षेप केल्यामुळें अमेरिकन कुत्र्यामांजरांच्या शिष्टमंडळानें माझ्याशीं कांहीं वाटाघाटी केल्या आणि आमच्यांत सलोख्याचे संबंध निर्माण करण्याच्या प्रयत्नांत त्यांना यश आलें, असा होत नाहीं. अमेरिकेंत माणसांच्या खालोखाल कुत्र्यामांजरांची वस्ती आहे. आर्ट लिंकलेटर यांच्या एका टेलेव्हिजन कार्यक्रमांत मीं असें ऐकलें होतें कीं, तेथें साडेतीन कोटी मांजरें आणि अडीच कोटी कुत्रीं आहेत. हीं म्हणजे अगदीं कोणाच्यातरी मालकीचीं कुटुंबवत्सल अशीं. बेवारशीं, कलंदर कुत्रीं आणि विशेषत: मांजरें कितीतरी! त्यांची मोजदादसुद्धां नाहीं. पण तरी कां होईना, नुसत्या घरंदाज कुत्र्यामांजरांचें प्रमाणच प्रत्येक तीन माणसांगणिक एक असें पडतें. म्हणून च्यकेवळ संख्यो दृष्टीनें पाहिलें तरी या चतुष्पादांच्याकडे दुर्लक्ष करून चालण्यासारखें नव्हतें. शिवाय माणसांच्या मानानें ही जमात अल्पसंख्यच. आतां अल्पसंख्य लोकांचें महत्त्व कुठल्याहि लोकशाहींत एकंदरींत जास्तच. तेव्हां नुसतें 'हाड् हाड् करून कुत्र्यामांजरांचा प्रश्न सहज धुडकावून लावणें हें अमेरिकेंत कधींहि' अवघडच झालें असतें.



नुसते हाड् हाड् करून कुत्र्या–मांजरांचा प्रश्न धुडकावून लावणे अवघड होतें.

अमेरिकेंत गेल्यावर आमचा पहिलाच मुक्काम ज्यांच्याकडे होता त्या जॅक् नॉर्थ यांच्या कुटुंबांत एकंदर चौघेजण होते. जॅक्, त्यांची पत्नी मेरी लुइज्, पिक्‌विक् नांवाची मांजरी आणि डॅफ्ने नांवाची कुत्री. जॅक्‌च्याकडे कामाची विभागणी नमुनेदार होती. म्हणजे सकाळीं तांबडें फुटायच्या आधींच जॅक् गाडीनें न्यूयॉर्कमधल्या आपल्या ऑफिसांत जाई, तो दिवसभर काम करून सूर्य बुडाल्यावर दिवेलागणीला घरीं येऊन पोहोंचे. बिचारी मेरी लुइज् दिवसभर घरकामांत बुडून गेलेली असे. एवढ्या मोठ्या घरांत तिला काय करायचें नसे? अगदीं घर स्वच्छ करण्यापासून तों स्वैंपाकपाणी, धुणींभांडीं, बाजारहाट वगैरे सगळें करण्यापर्यंत. इतकीं कामें या नवरा-बायकोंतच्च संपायचीं आणि पिक्‌विक्, डॅफ्ने यांना कांहीं कामच उरायचें नाहीं. तसें पाहिलें तर या दोघींना कांहीं काम नसावें हें योग्यच्च होतें. कारण पिक्‌विक् ही पडली मेरी लुइज्‌ची नणंद आणि डॅफ्ने ही सासू! त्यामुळें या दोघींनीं कसलेंहि काम असलें तरी त्याला हातसुद्धां लावूं नये हें कायद्याच्या दृष्टीनेंसुद्धां बरोबरच्च होतें. आतां एक गोष्ट खरी. जेवणाची वेळ झाली कीं ही सासू-नणंद जोडी स्वैंपाकघराच्या आसपास घोटाळूं लागायची. पण एरवीं पिक्‌विक् वन्सं गांवभर भटकत असत आणि डॅफ्ने आपल्या सूनबाईवर मधूनमधून लक्ष ठेवीत बाहेरच्या दिवाणखान्यांत बसून राहत. सकाळच्या प्रहरीं या दोघीहि बाहेरच्या हिरवळींवर उन्हांत अंगें शेकून घेत. डॅफ्ने बागेंतून फेरफटकाहि करी. पण पिक्‌विक्‌ला एकंदरींत तिथल्यातिथें हिंडायचाहि कंटाळाच. त्यामुळें तिनें मुलुखगिरी करीत हिंडायचें आणि डॅफ्नेनें दिवाणखान्यांतल्या मऊ, रुबाबदार खुर्चींत बसायचें, फार तर मधेंच स्वैंपाकघरापर्यंत जाऊन आंत डोकवायचें आणि 'पोर' कामच करीत आहे अशी खात्री करून घ्यायची. डॅफ्नेबाई अत्यंत विरक्त वाटायच्या. त्यांना जीवनांत कसली आसक्तीच उरली नव्हती. म्हणजे अगदीं चोर घरांत शिरला तरी त्या आरामखुर्चीतून उठून पलंगाखालीं आडोशाला पडून राहिल्या असत्या. याउलट कुमारी पिक्‌विक् ही खुशालचेंडू. जीवनाविषयीं विरक्ति आणि आसक्ति असलेले हे दोन प्राणी श्री. आणि सौ. नॉर्थ यांच्या घरांत सुखेनैव रहात होते. आणि त्यांच्याकडे पाहून मला सारखें वाटायचें कीं, 'प्राणि-क्लेश-निवारण-संस्थे'ची खरी

आवश्यकता कोणाला ? डॅफ्ने आणि पिक्विक् या सुखी जोडीला कीं जॅक् आणि त्याची वायको या कष्टाळू जोडप्याला ?

आणि कुत्र्यामांजरांची ही चैन केवळ जॅकच्याच घरीं चालली होती असें नाहीं. मी ज्या ज्या अमेरिकन घरांत गेलों ( आणि मी खूपच ठिकाणीं गेलों होतों ) तिथेंतिथें कुत्र्यामांजरांचा आरामच होता. 'आराम हराम है' हें वाक्य माणसांकरितां; कुत्र्यामांजरांकरितां नव्हे.

'कुत्र्याचें आयुष्य' हे शब्द आपण ज्या अर्थानें वापरतों त्या अर्थानें ते अमेरिकेंत वापरणें हें त्या गरीब सिनेमानटीच्या वर्णनाप्रमाणें होईल. ही सिनेतारका म्हणे इतकी गरीब होती कीं बोलून सोय नाहीं ! म्हणजे नुसती तीच गरीब होती असें नव्हे, तर तिचे दोन ड्रायव्हर्स गरीब होते, स्वैंपाकी गरीब होते. फार काय तिच्याकडे कामाला असलेले दोघे दरवानही गरीब होते. अमेरिकन कुत्र्यांना केवळ याच अर्थानें 'गरीब' म्हणतां येईल.

कुत्र्यांच्या खाण्यापिण्याची काळजी माणसानें किती करावी ? कुत्र्यांना द्यावयाच्या खाण्याबद्दलच्या ज्या जाहिराती मीं वाचल्या किंवा टेलेव्हिजनवर पाहिल्या, त्यांवरून माझी अशी जवळजवळ खात्रीच झाली कीं, इथें माणसें आपल्या स्वतःपेक्षां कुत्र्यामांजरांचीच काळजी जास्त करतात. निदान त्यांनीं ती तशी केली पाहिजे असें त्यांना सारखें बजावण्यांत येत असतें. श्वानांच्या एका कैवाऱ्याचें असें कळकळीचें सांगणें कीं, 'लोक हो ! कुत्र्यांच्या जेवणांतला तोच–तोपणा घालवा. त्यांच्या जेवणांत नावीन्य असूं द्या. हें सगळें करण्याचा शहाणपणाचा एकच मार्ग म्हणजे आमच्या कारखान्यांत तयार झालेलीं बिस्किटें वापरा. ( वापरा म्हणजे काय, तुमच्या आवडत्या कुत्र्यांसाठीं. ) आम्हीं हीं बिस्किटें मुद्दाम हाडांच्या आकाराचीं बनविलेलीं आहेत. आमचीं हीं 'देखणीं' बिस्किटें सहा निरनिराळ्या रंगांत मिळतात. आणि खास तुमच्या ( कुत्र्यां ) साठीं केलेली आणखी एक आकर्षक गोष्ट म्हणजे, या बिस्किटांच्या चवीसुद्धां सहा वेगवेगळ्या प्रकारच्या आहेत. एकवार घेऊन खात्री करा. आम्हांला विश्वास आहे कीं, एकदां आमचीं बिस्किटें तुम्ही कुत्र्यांसाठीं वापरूं लागलांत कीं कायमच आमचीं वापरणार !' ( नाहींतर बहुधा तुमच्या कुत्र्याचें पानच

काय, एरवीं सदैव हलत असणारी शेपटीसुद्धां हलणें कठीण आहे ! )

'केनेल् रेशन' ( Ken–L–Ration ) हे 'श्वानामृत'कार अशी ग्वाही देतात कीं, 'आमच्या अमृताच्या एकेका चमच्यांत तुमच्या कुत्र्याला नवजीवन देण्याची ताकद आहे. आमच्या रेशनच्या केवळ नवटांक भागांत जिभेला मुलायम भासणारे असे उपयुक्त घटक तर असतातच; पण त्याशिवाय अनेक शुद्ध, नैसर्गिक अशीं तेलेंसुद्धां.' आतां या लोकांना जर आपण विचारलें कीं, 'बाबांनों, आमच्या कुत्र्यांसाठीं तुमचा एवढा खटाटोप कां ?' तर त्यावर हे 'तैलबुद्धि' लोक ताबडतोब उत्तर देतील,— 'म्हंजे काय ? अहो, एवढें कसें लक्षांत येत नाहीं तुमच्या ? हीं तेलें अशाकरितां कीं त्यामुळें तुमच्या कुत्र्यांची त्वचा निरोगी होते आणि त्यांच्या अंगावरील केंसांचें आवरणहि नैसर्गिक, आकर्षक असें दिसतें. केनेल् रेशनच्या अमृतानुभवामुळें तुमच्या कुत्र्याचें तारुण्य चिरकाल टिकतें. आपला कुत्रा नवज्वान रहावा असें जर तुम्हांला प्रामाणिकपणें वाटत असेल तर केनेल् रेशनच्या खुराकाशिवाय तुम्हांला तरणोपायच नाहीं. सारांश काय कीं, कुत्र्याच्या कातडीची आणि केसांची 'समस्या' कायमची निकालांत काढण्यासाठीं केनेल् रेशन आजच्या आज विकत घ्या,' ( नाहींतर पस्तावाल ! ) आणखी एका श्वानोत्तेजक संस्थेनें कुत्र्यांनाहि 'समतोल' आहाराची किती आवश्यकता आहे हें अत्यंत कळकळीनें कुत्र्यांच्या मालकांना पटवून द्यायचा प्रयत्न केला आहे.

कुत्र्यांच्या तैनातीविषयीं एवढें लिहूनहि कोणाकोणाला असें वाटण्याचा संभव आहे कीं, माणसें आणि कुत्रीं यांना एकाच वर्गात टाकण्याचा हा प्रकार म्हणजे श्वा-युवा-मघवा या तिघांना एकाच सूत्रांत गोंवणाऱ्या पाणिनीसारखाच प्रमाद आहे. पण खरें म्हणजे तसें मी करीत नाहीं. कारण कुत्र्याचें 'राहणीमान' हें माणसाच्यापेक्षांहि थोडेंसें वरचढच आहे हें उघड दिसतें. उदाहरणार्थ, सहा निरनिराळ्या रंगांचीं आणि चवींचीं हाडकें कोणत्याहि अमेरिकन माणसाला चघळायला मिळाल्याचें माझ्या ऐकिवांत किंवा वाचनांतहि नाहीं. शिवाय कुत्र्यांच्या नखांना लावायचे रंगसुद्धां अमेरिकेंत मिळतात. एकदोन नाहीं तर चांगलें आठ रंगांचें पॉलिश विकत मिळतें ! त्यांच्या डोळ्यांत घालण्यासाठीं फक्कडसा सुर्मा विकत मिळतो. अशा प्रकारचीं सौंदर्यप्रसाधनें कुणा

लेका पुरुषाला मिळालीं आहेत ? आतां एवढे सगळे सोपस्कार ज्या कुत्र्यांसाठीं करण्याची व्यवस्था आहे त्यांच्यासाठीं निरनिराळ्या प्रकारचीं सेंट्स्, त्यांचे केंस तजेलदार आणि मृदु राहण्यासाठीं वेगवेगळ्या प्रकारचे शँपू इत्यादि द्रव्यें उपलब्ध असतात, हें वेगळें सांगावयास पाहिजेच असें नाहीं. पण अमेरिकन कुत्र्यांचा खरा हेवा मला केव्हां वाटला असेल तर ज्यावेळीं 'पूडल्' जातीच्या कुत्र्यांचें केशकर्तन करणाऱ्या एका लावण्यवतीला मीं टेलेव्हिजनवर पाहिलें तेव्हां. इतक्या सुंदर नापिताच्या हातांत आपली सबंध मान देऊन 'तूं टाक चिरून ही !' असें म्हणायलासुद्धां कोणत्या कुत्र्याला आवडणार नाहीं बरें ?



अशीं सौंदर्यप्रसाधनें कुणा लेका पुरुषाला मिळाली आहेत ?

अमेरिकेंतल्या निराधार म्हाताऱ्या स्त्रीपुरुषांचा प्रश्न सोडविण्यांत त्यांचे नातलग किंवा अमेरिकन सरकारहि फारसें यशस्वी झालेलें नाहीं. पण सुदैवानें अमेरिकेंतल्या कांहीं कुत्र्यांची तरी तशी स्थिति नाहीं. आम्हांला एक वल्ली अशी भेटली कीं, जिनें 'लेझी डेज्' या नांवाची एक संस्थाच वृद्धापकाळ आलेल्या कुत्र्यांच्याकरितां सुरू केली होती. माणसांच्या कुटुंबांत, चारचौघांत राहणें मानवत नाहींसें झालें कीं मुकाट्यानें या 'श्वानप्रस्थाश्रमांत' जायचें आणि समवयस्क जातभाईबरोबर राहून जवानींतल्या सुखदुःखांच्या गप्पागोष्टी करीत उरलेलें आयुष्य काढायचें. 'अनेक लोक आपल्या नातलग कुत्र्यांना आमच्या आश्रमांत पाठवितात आणि या स्थित्यंतराबद्दल कसलाहि कडवटपणा न मानतां सुखानें अनेक

म्हातारीं स्त्रीपुरुष कुत्रीं तिथें राहतात,' असें 'लेझी डेज्'च्या चालकमहाशयांनीं साभिमान सांगितलें.


या श्वानप्रस्थाश्रमांतलें जीवन किती सुखाचें असावें याविषयींचे विचार माझ्या मनांत येत असत. कधींहि उठावें अगर उठूं नये, नुसतें लोळतच रहावें. वाटेल तेव्हा भुंकावें अगर अगदीं चोर आला तरी अजिबात भुंकूं नये. भुंकून चावूं नये अगर ती प्रसिद्ध म्हण खोटी पाडण्यासाठीं भुंकून शिवाय चावण्याची हौस करून घ्यावी. जेवण्याखाण्यासाठीं 'लांगूलचालन' करूं नये, फार तर नुसतीच शेपटी हलवावी. वाटेल तिथें पाय वर करावा अगर वात्रटपणें मुद्दाम करूं नये. उगाच जीभ बाहेर काढून ल्हाल्हा करीत न बसतां मुकाट्यानें देवासारखें बसून रहावें. स्वतःच्या शेंपटीभोंवतीं गरगरां फिरावें. बायाबापड्यांकडे वांकडा डोळा करून पाहूं नये. अखिल मांजर–समाजाकडे उदार दृष्टीनें पहावें. इंडियांतल्या अखिल कुत्र्यांच्या जमातीनें मार्जारजमातीशीं सलोख्याचे संबंध निर्माण करण्याच्या दृष्टीनें त्यांच्याशी वाटाघाटी कराव्या, असें परोपदेशे पांडित्य करावें. कम्युनिस्ट देशांतील कुत्र्यांच्या सद्यःस्थितीबद्दल चिंता व्यक्त करावी आणि त्यांचा प्रश्न यूनोंत आणतां येईल काय याबद्दल खल करावा....

अमेरिकन लोकांच्यापुढें सुखी लोकांसमोर उभ्या असतात त्या जातीच्या अनेक नाजुक समस्या असतातच. उदाहरणार्थ, डिक् हा अलिकडे भ्रमिष्टासारखा वागतो, उगाचच कुठेंतरी खिन्न दृष्टि लावून विमनस्क बसतो. टेड्चें डोकेंच वारंवार दुखतें. हॅरी एकदम तिरसटासारखा वागतो, त्याच्या भावना त्याला अनावर होऊं लागतात. यांतील डिक्, टेड्, हॅरी हीं अर्थातच कुत्र्यांचीं नांवें आहेत. एका बाईनीं तर प्रत्यक्षच तक्रार केलेली मीं ऐकली, — "माझ्यापुढें सध्यां अगदीं मोठा प्रश्न पडला आहे बाई! म्हणजे गंमत म्हणून मीं आमच्या बॉब्ला उड्या मारायला शिकविलें आणि बै बै बै! आतां इतक्या उड्या मारीत असतो सारखा, कीं त्याला थांबवायचा कसा हाच प्रश्न माझ्यापुढें उभा राहिलाय्!" अलिकडे भुंकतांना टॉम्चा स्वर नेहमींपेक्षां खालच्या पट्टींत लागतो किंवा त्याची शेंपटी पूर्वींइतक्या सातत्यानें किंवा वेगानें हलत नाहीं असेहि आणखी प्रश्न असूं शकतील. मात्र या सगळ्या प्रश्नांना, समस्यांना उत्तरें असतातच. श्वान–रोग–तज्ञाचा सल्ला घेतला कीं

झालें. ' पेशंट 'वर सर्व तऱ्हेचे उपाय करण्यांत येतातच. श्वानमानसाविषयीं सखोल आणि सुदूर विचारहि असतो. डोकें चढलें तर आराम वाटावा म्हणून पित्तशामक गोळ्याहि मिळतात. ' डोकें चढणें ' हा प्रकार अर्थात् दोघांच्या बाबतींत होऊं शकतो. मालकामुळें कुत्र्याचें डोकें चढूं शकतें किंवा कुत्र्यामुळें मालकाचें. प्रस्तुत गोळ्या या साहजिकच कुत्र्याच्या डोक्याकरितां असतात हें सांगणें नलगे !

अमेरिकन कुटुंबांतील कुत्रीं आणि नवरे या प्राण्यांच्या स्थानांविषयीं तौलनिक चर्चा हा एक स्वतंत्र प्रबंधाचाच विषय आहे. मी त्याविषयींचा फक्त एक किस्सा येथें सांगणार आहें.

मॉंटेलोच्या रोटरी क्लबमधल्या लोकांनीं आम्हांला एकदां आमंत्रण दिलें होतें. व्याख्यानपूर्व असलेला भोजनाचा बेत उत्तमच होता. सुरापानोत्तर तो असल्यामुळें भोजनाची गोडी आगळी होती. कुक्कुटविशेष नामांकित व रसपूर्ण झाला होता. भोजनसमारंभ यथासांग पार पडला. पण आम्ही द्विजकुलोत्पन्न झालों म्हणून काय झालें ? आमच्या मर्यादा उघडच होत्या. त्यामुळें कुक्कुटविशेषावशेष आमच्या पानांतहि राहिलेच. सुदैवानें इतरांच्याहि पानांत ते राहिले होते ही त्यांतल्या त्यांत समाधानाची गोष्ट




मी आणि ' डॉग फूड '

आमच्या यजमानबाईनीं हें केव्हांच हेरलें होतें. भोजन संपण्याच्या सुमाराला त्यांनीं वाढप्यास पाचारण करून श्वानान्न ( Dog-food ) ठेवण्यासाठीं असलेल्या पिशव्या आणण्यास फर्माविलें. ही ' श्वानिका ' येतांच त्यांनीं आमिषयुक्त असे सर्व अवशेष तींत ठेवले आणि आमच्या कुटुंबांच्या स्वाधीन केले. पिशवीवर छापलेले शब्द पाहून हिनें भोळेपणानें ॲलिस्‌ला म्हटलें, " थँक्स ! पण मला याचा उपयोग नाहीं. आमच्या घरीं कुत्राबित्रा

कांहीं नाहींयेय्. ”

ॲलिस्नें डोळे मिचकावले आणि माझ्याकडे पहात ती म्हणाली,—“ पण हा आहे ना ? ”

आणि तिनें ताबडतोब याचें स्पष्टीकरणहि केलें. स्वतःबरोबर नेत असलेल्या पिशवींतले अवशेष तीहि रॉल्फलाच देणार होती ! ( रॉल्फ म्हणजे ॲलिस्चा नवरा हें येथें गैरसमज टाळण्यासाठीं सांगितलें पाहिजे ! ) गंमत अशी कीं, ( गंमत कसली त्यांत म्हणा ! ) इतर बायकांनीहि आपापल्या ‘ रॉल्फ ’करितां अशाच पिशव्या तयार करून घेतल्या होत्या.

“ बिलकुल खराब होणार नाहीं ग तें. तूं काळजी करूं नकोस. घरीं पोंचलीस कीं लगेच फ्रिज्‌मध्यें ठेवून दे कीं झालें ! उद्यांच्या लंचची कटकट मिटली ! ” ॲलिस्नें हिला सांगितलें. पण त्या वेळीं मी तिकडे पहात नव्हतों. कान आणि खांदे पाडून रॉल्फशीं बोलण्यांत दंग झालों होतों.

दुसऱ्या दिवशीं आमच्या घरीं लंचची ‘ कटकट ’ खरोखरच कांहीं झाली नाहीं. थोडीशी कुरबुर झाली असेल फार तर ! ॲलिस्च्या काटकसरी स्वभावाचें आणि पतिपरायणतेचें कौतुक करीत माझी ‘ लंच ’ मीं कधीं गिळली हें माझ्यासुद्धां लक्षांत आलें नाहीं.

या सगळ्या हकिकतींवरून असा गैरसमज होण्याचा संभव आहे कीं, अमेरिकेंत मांजरांचें कोडकौतुक कांहींच होत नसून त्यांच्या नशिबीं फक्त ‘ कुतरओढ ’च ठेवलेली असेल, पण हा अतिशय घोर गैरसमज होईल. कारण कुत्र्यांच्या मानानें पाहिलें तरीहि मांजरांच्या तैनातींत कुठल्याहि प्रकारचा उणेपणा आढळत नाहीं. त्यांची बडदास्तहि व्यवस्थित ठेवली जाते.

मांजरांचें अन्न बनविणारे कारखानदार स्पष्टपणें बजावतात कीं, ‘ मांजरांना काय, कांहींहि चालेल, असें समजून त्यांना कुत्र्यांचें अन्न खिलवूं नका. सब घोडे बारा टक्के असा प्रकार येथें फार घातक होईल. त्यामुळें तुमच्या लाडक्या मांजरांच्या प्रकृतीतरच अनिष्ट परिणाम होईल असें नव्हे, तर त्यांच्या मनावरही या गोष्टीचे खोल परिणाम झाल्याशिवाय राहणार नाहींत. तेव्हां संभाळा ! मांजरांना ‘ Puss in Boots ’ या आमच्या कंपनीनें तयार केलेल्या खास मालाशिवाय कांहींहि वाढूं नका. मांसाचा स्वाद असलेले, माशांचा स्वाद अस-

लेले असे वेगळे पदार्थ आम्हीं तुमच्या मांजरांच्या गरजा लक्षांत घेऊन बनवले आहेत. मांजरांना कुत्र्यांचें अन्न मुळींच आवडत नाहीं असें आम्हांला अनुभवाअंतीं आढळलें आहे. शिवाय 'Puss in Boots' खिलवलें असतां मांजरांचे डोळे अधिक चमकदार होतात आणि त्यांचे 'कोट्स्' वाढून तीं अधिकच गुबगुबीत होऊन 'कमनीय' दिसूं लागतात याची अनेकांनीं खात्री करून पाहिली आहे. मग तुम्हीच मागें कां राहतां?'

म्हणजे खाण्यापिण्याच्या बाबतींत मांजराचे चोचले अगदीं कुत्र्यासारखेच. त्यांत कांहींहि फरक नाहीं. मार्गरेट् गे या मार्जारतज्ञ बाईनीं तर मांजरांना काय काय 'मेन्यू' असावा त्याची एक यादीच दिली आहे. त्या म्हणतात कीं, मांजरांना मांस, मासे, अंडीं इत्यादि भरपूर खायला देत चला. हो! त्यांना 'मानवत असेल' तर दूधहि द्यायला हरकत नाहीं! शिवाय त्यांना खीर पण चालते. तसेंच कोंबडी किंवा ससा त्यांना खायला वाढला तर तीं फारच खूष होतात. मार्गरेट्बाईंची एक मैत्रीण आपल्या ऑस्कर नांवाच्या बोक्याकरित 'पॅते ऑस्कर' नांवाचा एक प्रकार नेहेमीं करीत असे, त्याची पाकक्रिया बाईनीं दिली आहे.

'पॅते ऑस्कर' बनविणें अगदीं सोपें आहे.

सामग्री : एक पौंड फुप्फुसाचें मांस घ्यावें. तें थोड्याशा पाण्यांत उकळावें. एक पौंड मासे घेऊन ते वेगळ्या भांड्यांत उकळावे. माशांचीं हाडें न विसरतां काढून टाकावीं. याशिवाय कुत्र्यांचीं बिस्किटें दोन कप कुस्करून घ्यावीं, अर्धा कप टोमॅटोचा रस घ्यावा. एक चहाचा चमचा कॉड्लिव्हर तेल घ्यावें.

कृति : शिजवलेले मासे आणि फुप्फुस एकत्र करून बारीक करावे. ज्या पाण्यांत मासे शिजविले तें पाणी कुत्र्यांच्या कुस्करलेल्या बिस्किटांवर ओतून त्यांचें मिश्रण करावें आणि मग तें थंड होऊं द्यावें. आतां या तिन्ही वस्तू एकत्र कराव्या, आणि त्यांत कॉडलिव्हर तेल, टोमॅटोचा रस हीं दोन्हीं घालावीं. मग सगळ्या वस्तू एकत्र ढवळाव्या आणि मिश्रण बरणींत घालून रेफ्रिजरेटरमध्यें (बोकोबांनीं खाऊन) संपेपर्यंत ठेवावें.

वि. सू. : 'पॅते' वेगवेगळ्या अनेक तऱ्हांनीं करतां येतो. कुत्र्यांच्या

बिस्किटांऐवजीं टोस्ट घेतां येतो. फुप्फुस किंवा मासे किंवा दोन्हींऐवजी किडनी, लिव्हर, कलिजा, झिंगे, भेजा, कोंबडी यांतलें कांहींहि वापरून पहावें. ( सर्व प्रकारचीं मांजरें, मन्या, भाड्या, बोके यांना 'पॅते' फार आवडतो आणि बहुधा तो परत परत मागितला जातो. )

मार्गरेट्बाईच्या अन्नपूर्णा मैत्रिणीनें शोधून काढलेल्या या मार्जारामृतामुळें कुठल्याहि बोकेसंन्याशाच्याच नव्हे, तर खऱ्याखुऱ्या संन्यासी बोक्याच्या तोंडालासुद्धां पाणी सुटल्याशिवाय राहणार नाहीं.

याचा सरळसरळ अर्थ असा कीं, अमेरिकेंतील खानदानी बोक्यांना सामान्य जनता खाते तसलें डबाबंद किंवा खाणावळींतल्यासारखें जेवण चालत नाहीं. त्यांची शान राखण्याकरितां खानसामा किंवा स्वैंपाकीणकाकू यांना 'पेशल्' काळजी घ्यावी लागते.

याशिवाय मांजराला फार गरमगरम किंवा अगदीं थंड असें खायला घालू नये. उष्णतामान मध्यम असावें. आजारी किंवा वृद्ध मांजरांना अंड्याचा पिवळा भागच फक्त खायला घालावा, गर्भारशिणींच्या खाण्याची विशेष काळजी घ्यावी, इत्यादि मांजराच्याहि दृष्टीनें बऱ्याच मनोरंजक असलेल्या गोष्टी बाईनीं सांगितल्या आहेत.

बाबा ( मांजर ) लोकांकरितां त्यांनीं अर्थातच एक स्वतंत्र प्रकरण लिहिलें आहे. छोटयांना म्हणे, दिवसांतून सहा वेळां जेवायला घातलें पाहिजे. न्याहारी, मधली हजेरी, दुपारचें जेवण, चहाच्या वेळचें खाणें, रात्रीचें भोजन आणि अगदीं झोपण्यापूर्वीं थोडेंसें च्याऊमाऊ. जेवणावर प्रेम करणाऱ्या कोणत्याहि माणसाला असें वाटेल कीं, अमेरिकेंत मांजरांच्या जन्माला यावें आणि आपल्या शैशवाला इतकें जपावें कीं कधीं मोठेंच होऊं नये.

आम्ही रहात होतों त्या मॅडिसन् शहरांत मांजरमालकांचा एक क्लबच होता. घरमालक संघ, भाडेकरू संघ किंवा नुसताच आपला आपल्या मागच्या परसांत भाजीपाला लावणाऱ्या लोकांचा संघ असावा, तसा हा संघ. या संघांत अनेक सभासद होते. त्यांच्या नियमितपणें सभा होत आणि मांजरांच्या जिव्हाळ्याचे अनेक प्रश्न या सभांतून चर्चिले जात.

"काय, कसं काय ? राजा कसा आहे तुमचा ? तब्येत ठीक नव्हती ना

त्याची मधें ? "

" छेः हो ! उगाच्च थोडंसं पडसं झालं होतं त्याला. चांगला टणक्या आहे. झालंय् काय त्याला ! कुमीला मात्र बरं नाहीं आमच्या. मुळींच खातपीत नाहीं हो ! शिवतसुद्धां नाहीं अन्नाला. "

" अहो, असं होतंच. दिवस भरत आलेयृत ना तिचे ? शिवाय पहिलीच खेप ही तिची. त्या गोळ्या देऊन पहा पेटंट. नाहींतर डॉ. देशमुखांना दाखवा. चांगला गुण आहे हो त्यांच्या हाताला. आमच्या चंद्याचा किडनी ट्रबल किती झटकन् गेला त्यांच्या ट्रीट्‌मेंटनं ! " नांवें बदलून अशा तऱ्हेचे संवाद मॅडिसन्‌च्या ' केट्–क्लब 'मध्यें कधींहि ऐकूं येणें शक्य असतें. फक्त यांतील ' राजा ' आणि ' चंद्या ' हे बोके असतात, ' कुमी ' ही मांजरी असते आणि डॉ. देशमुख हे गुरांचे डॉक्टर असतात, एवढें लक्षांत ठेवलें म्हणजे झालें. अमेरिकन मांजरीचें नांव जर ' क्लिओपात्रा ' असूं शकतें, तर बोक्याचें ' राजा ' असायला काय हरकत आहे ?

अमेरिकन मांजरांना कशा तऱ्हेचे रोग होऊं शकतात हें वाचून तर माझी छाती दडपूनच गेली. म्हणजे त्यांना थंडीताप, खोकला, अपचन, इतकेंच काय, ब्रॉंकायटिस, न्यूमोनिया, क्षय यांसारखे रोग होऊं शकतात याचें मला आश्चर्य वाटलें नाहीं. त्यांना रिकेट्स आणि कॅटरॅक्टहि होऊं शकतो. एवढेंच नव्हे, तर कंजंक्टिव्हायटिस, केरॅटायटिस, कॉसिडायॉसिस अशा भयंकर नांवांचे रोग त्यांना होऊं शकतात आणि त्यांतून ती बरींहि होऊं शकतात, हें ऐकून मात्र मला धक्काच बसला. दांत खराब झाल्यामुळें मांजराची वाढ खुंटूं शकते. त्यांसाठीं त्याचे दांत दंतवैद्याकडून दर आठवड्याला तपासून घेतले पाहिजेत. आवश्यक तर काढून टाकले पाहिजेत आणि वर पेनिसिलीनचीं इंजेक्शनें द्यायला हवींत, हें बहुमोल सामान्य ज्ञान कित्येक मराठी डायजेस्टें वाचूनहि मला झालें नव्हतें. मांजरांना औषधाची गोळी कशी द्यावी, देतांना ( वाटली ) हलवून देण्याचें औषध कसें द्यावें, त्यांना खूष करण्यासाठीं गुदगुल्या कशा कराव्या, त्यांचें ' कुटुंबनियोजन ' कसें करावें, गर्भारशिणीची काळजी कशी घ्यावी, त्यांची भांडणें कशी मिटवावीं, त्यांना सन्मार्गाला कसें लावावें आणि छोट्यांच्या हातांत ( पायांत ! ) कोणतीं खेळणीं द्यावीं, हें असामान्य ज्ञानहि मला आतां

झालें आहे. अर्थातच मी हिंदी मांजरांवर याचा प्रयोग अजूनहि करून पाहिलेला नाहीं. कारण नसतीं साहेबी फॅडें म्हणून आपलीं सनातनी मांजरें त्याकडे दुर्लक्ष करण्याचा संभव आहे अशी मला भीति वाटते.

कुत्र्याकुत्र्यांत आणि विशेषतः मांजरामांजरांत आपण फारसा फरक करीत नाहीं. फार तर दामटी वळलेलें कुत्रें ' शिकारी ' असतें आणि इतर ' गांवठी ' असतात. आणि मांजरें तर काय, सगळींच सारखीं. त्यामुळें प्रत्येक मांजर दुसऱ्याहून वेगळें असतें, प्रत्येकाला स्वतःचें वेगळें व्यक्तिमत्व असतें आणि चोरून दूध पिणें किंवा खेळवूनखेळवून उंदरांना ठार मारणें एवढ्यांतच तें संपत नाहीं, हें अमेरिकन ज्ञान मला झाल्यावर खरें म्हणजे मी बराचसा शरमलों. लबाड आणि चोर अशा एखाद्या शेजाऱ्याचा आपण तिरस्कार करावा, त्याची कटकट अटळ म्हणून त्याच्याकडे दुर्लक्ष करावें आणि एखाद्या दिवशीं अलौकिक साहसाचें किंवा असामान्य स्वार्थत्यागाचें कृत्य करून त्यानें आपले डोळे दिपवून टाकावेत, तसेंच मला झालें.

मांजरांच्यांत म्हणे समतेची भावना जाज्वल्य असते. मालकानें त्याला आपल्या बरोबरीनें वागविलें नाहीं, त्याच्या स्वातंत्र्यावर गदा आणली, तर ऊबदार घर आणि छानदार अन्न यांचा धिक्कार करीत तें घराबाहेर पडून स्वातंत्र्य मिळवितें; अमीरीला लाथ मारून फकिरी स्वीकारतें. पैसे मोजून कोणी मांजरावर आपलें स्वामित्व प्रस्थापित करूं शकत नाहीं. मांजर हें कोणाच्याहि मालकीचें असूं शकत नाहीं. लांगूल-चालन आणि लाचारी हेंच जिचें खरें नांव अशी स्वामिभक्ती हीं कुत्र्यानें करायचीं कामें. मांजरांचें तसें नाहीं. आपल्याला त्यांचा सहवास आवडतो म्हणून आपण त्यांना बाळगायचें, आणि त्यांना आपली कंपनी आवडते म्हणून त्यांनीं आपल्याबरोबर रहायचें.

मांजरें जशीं मठ्ठ, अरसिक, मूर्ख, लुच्चीं, शिष्ट आणि बेदरकार असतात ( अशीं माणसेंहि कांहीं कमी नसतातच ! ) तशींच तीं सुंदर, चलाख, कलासक्त, हुशार, विचारी, सुसंस्कृत आणि प्रतिभावंतहि असूं शकतात. ( अशीं माणसेंहि कांहीं फार नसतात ! ) मांजरें मनानें बरींचशीं एकाकी आणि अलिप्त असतात. त्यांच्या स्वभावांत गूढ, गहन, पण आकर्षक असें कांहींतरी असतें.

अमेरिकन कुत्र्यामांजरांच्या निमित्तानें सगळयाच कुत्र्यामांजरांचा कैवार घेणें हा माझा येथें अर्थातच इरादा नाहीं. खरें म्हणजे, मला जरी तसें करायचें असलें तरी अलिप्त, तटस्थ दृष्टीनें माणसाकडे पाहूं शकणाऱ्या मांजरांना त्याचें काय ? आणि मांजरच काय, एखादा कुत्रासुद्धां अशा प्रयत्नाकडे ढुंकूनहि पाहणार नाहीं.

अमेरिकन कुत्रीं आणि मांजरें ' करिअरिस्ट ' असावींत याचें मला आश्चर्य वाटलें नाहीं; पण तीं ' श्रमजीवि ' असतात याचें मला कौतुकहि वाटलें. म्हणजे कुत्र्यांनीं घराची रखवाली करावी आणि मांजरांनीं उंदरांना मारावें, हा तर त्यांच्या श्रमजीवनाचा एक भाग आहेच. परंतु कॅडिलॅक् गाडी-प्रमाणेंच ' निळ्या रक्ता 'ची खानदानी कुत्रींमांजरें आपण बाळगून आहोंत असा तोरा, ऐटू श्रीमंतांना मिरवितां येतो तोहि त्यांच्यामुळेंच. आणि ' लॅसी ' या टेलेव्हिजन–मालिकेंतील कुत्रीं तर केवळ श्रमजीवनावरच आपल्या मालकांपेक्षांहि अधिक कमाई करतात. तशींच मांजरेंसुद्धां.

अमेरिकन जीवनांत कुत्र्यामांजरांचें स्थान इतकें स्थिर आहे कीं, टी. व्ही. किंवा सिनेमांतील कथानकेंहि त्यांच्याभोंवतीं गुंफलेलीं असतात. ' मिलिओ-नेअर ' या टी. व्ही.–कथेंतील दररोज दहा लाख डॉलर्सची खैरात करणारा लक्षाधीश 'कॅरॉल्' नांवाच्या एका मांजरीला दहा लाख डॉलर्स बहाल करतो आणि ' कॅरॉल् 'ची तैनात राखतांना तिच्या धन्याची तारांबळ उडते. हॉलिवुड-मधल्या एका चित्रपटकथा लेखकानें तर आपल्या नव्या रहस्यप्रधान कथेंत एका मांजरालाच प्रमुख स्थान दिलें आहे. वॉल्ट डिस्नेनें ही कथा पसंत केलीआहे.

नीग्रो लोकांना समान हक्क देण्याच्या बाबतींत गोऱ्या अमेरिकनांनीं कितीहि खळखळ केली असली तरी कुत्र्यामांजरांच्या बाबतींत मात्र त्यांचा दृष्टिकोन उदार आहे. एका कुत्र्याचे कान धरून त्याला उचलल्याबद्दल अमेरिकेचे साक्षात् अध्यक्ष जॉन्सन् यांना कसा पश्चात्ताप करावा लागला, हें नुकतेंच वर्तमानपत्रांत आलें होतें.

पण या समतेच्या आणि उदार दृष्टिकोनाच्या बाबतींत एकच गोष्ट सांगायची राहिली. नको असलेल्या मांजरांच्या पिलावळीबद्दल तज्ञ लोक काय म्हणतात पहा. जेव्हां अधिक मांजरें ठेवतां येणें शक्य नसेल किंवा जेव्हां एखाद-

दुसऱ्याचीच योग्य काळजी घेणें शक्य असेल तेव्हां उरलेल्यांना मारून टाकणें हा एकच दयाळूपणाचा उपाय उरतो ! आणि पिल्लें उपजतांच त्यांना मारून टाकणें म्हणजे अगदीं दयाळूपणाचा कळस झाला बरें का ! शिवाय यावेळीं पिल्लें अगदींच लोळागोळा असतात तेव्हांच त्यांना मारलें तर त्यांची आईसुद्धां हें लवकरच विसरून जाते,काय ? अर्थातच या पिल्लांना मारणें हें तितकें सुखद काम नाहीं हें कबूल ; पण त्यांना जितक्या लवकर निकालांत काढतां येईल तितका दयाळूपणा अधिक. आतां हें कर्म कसें करायचें हा प्रश्नच आहे. असें करायचें कीं, आपली गॅसची शेगडी सुरू करायची आणि पेटवायची मात्र नाहीं. फक्त गॅस सोडायचा. पिल्लें अगोदरच आंत ठेवलेलीं असतात. मात्र एक खबरदारी घ्यायला हवी हां ! खिडक्याबिडक्या उघड्या ठेवा.— स्वतःच्या सुरक्षिततेच्या दृष्टीनें. ही ' युक्ति ' पसंत नसेल तर मोटारीचा ' एक्झॉस्ट गॅस् ' वापरावा, किंवा पिल्लें एका लहानशा खोक्यांत ठेवून तिथें क्लोरोफॉर्मचा बोळा टाकावा. किंवा पाण्याच्या बादलींत घालून त्यांना बुडवावें. मात्र तीं पुरीं मेलीं आहेत अशी खात्री करून घ्यायला हवी दरवेळीं. पोहणें शक्य न होतां त्यांचे प्राण लवकर जायला हवेत !



दयाळूपणाचा कळस !

— ज्या हातानें ' पॅते ऑस्कर ' हें चवदार खाणें आपल्या लाडक्या मनीकरितां तयार करायचें त्याच हातानें तिच्या नको असलेल्या पिल्लांना गुदमरवून ठार मारण्यासाठीं गॅसच्या शेगडीचें बटन फिरवायचें. कल्पना फार क्रूर वाटते, नाहीं ? शिवाय त्या विषारी गॅस्पासून स्वतःचा बचाव करण्यासाठीं खिडक्या उघड्या ठेवण्याची खबरदारी घ्यायची, हें आणखी.

पण करतां काय ? विशिष्ट परिस्थितींत माणसालासुद्धां मारून टाकावें, असें जें आणखी कांहीं वर्षेंच—किंवा कदाचित् दिवसहि—जगणें शक्य असतें अशा दुसऱ्या माणसांनाहि आजकाल वाटत असतें, तिथें कुत्र्यामांजरांचें काय घेऊन बसलांत ?

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
... दि: ..................
... नों: दि: ..............

# अमेरिकेंत कसें मरावें ?

## १३

मॅडिसनला आमच्या घराशेजारीं ईगन नामक एक तरुण गृहस्थ राहात असे. वयानें फक्त चौऱ्याहत्तर वर्षें असल्या या तरुणांत तसें पाहिलेंले तर एकच कमतरता होती. त्याला हृदयाचा विकार होता. पण हा टुण-टुणीत गृहस्थ आपल्या हृदयाची बिलकुल पर्वा न करतां सदैव कांहींतरी उपद्-व्याप करीत हिंडत असे. पूर्वीच्या आयुष्यांतलीं पन्नास-पंचावन्न वर्षें त्यानें लोकांचीं ' डोकीं करण्यांत ' घालविलीं होतीं. तशा एखाद्या दिवशीं तो आतांहि मजेनें आपल्या नातवांची हजामत करी; पण एरवीं मोठ्या माणसांच्या डोक्याला तो हातहि लावीत नसे. एवढा ' शस्त्रसंन्यास ' सोडला, तर बेट्यानें हजारों व्यादी आपल्यामागें लावून घेतल्या होत्या. आमच्या घरासमोरच्या मोकळ्या जागेंत त्यानें एक लहानसा जमिनीचा तुकडा भाड्यानें घेतला होता. तिथें सतत मेहनत करून टोमॅटो, फ्लॉवर, कोबी, लेटस् इत्यादि प्रकार तो तयार करायचा. उरलेल्या वेळांत घराभोंवतीं बागकाम करायचा. स्वतःच्या मालकीच्या तीनमजली बंगल्याच्या तळघरांत ईगनची एक डार्करूम होती. तिथें फिल्म डेव्हलप् करणें, एन्लार्जमेन्ट्स् करणें इत्यादि उद्योग तो करीत असे. बायकोला घरकामांत मदत करणें आणि विद्यार्थ्यांना भाड्यानें दिलेल्या घराची व्यवस्था ठेवणें हीं नेहमींचीं कामें होतींच. हें सगळें करतां करतां तो एखाद्या दिवशीं मधेंच थांबायचा आणि आपली कोरी करकरीत ' शेव्ही ' बाहेर काढून फिरायला जायचा. बरें, गाडी तरी शांतपणें, सावकाश चालवील तर तो ईगन

कमला ? त्याच्याबरोबर कधीं गाडींतून जाण्याचा प्रसंग आला कीं त्याच्या नादुरुस्त हृदयाच्या काळजीपेक्षां माझ्या दुरुस्त असलेल्या देहाचीच मला अधिक काळजी वाटायची. वेगानें मोटारींतून जायचें, हा म्हातारबुवांचा आणखी एक शौक होता.

'च्यवनप्राशावलेह' न घेतांहि सदैव टुणटुणीत रहाणाऱ्या ईगनसारख्या वल्लीपुढें बिचारा हृदयविकार तरी काय करणार ?

आमची लायब्रेरिअन नॉर्मा हीसुद्धां अशीच. ती साठ वर्षांची सहज असेल. अंगानें ती चांगलीच स्थूल होती आणि त्यांत संधिवातामुळें तिचे पाय दुखत असत. चालतांना ती एका दांडग्या सोटयाचा आधार घेऊन चाले. पण एकदां ऑफिसांत आली कीं नॉर्मा वाघासारखें काम करी. इलेक्ट्रिक टाइपरायटरवर खरोखरच विजेच्या वेगानें ती टायपिंग करीत असे. सगळ्यांशींच ती इतक्या मृदु, नाजुक आवाजांत बोलायची, कीं सुनेशीं ती जर अशीच बोलत असेल तर सूनबाई तिच्या डोक्यावर चढून बसल्या असल्या पाहिजेत असें वाटत असे. लायब्ररींत सहज दिसेल अशा जागीं एका फुलदाणींत नॉर्मा नेहमीं कृत्रिम फुलांचा एक रंगीबेरंगी गुच्छ ठेवी आणि वारंवार ती तो बदलून नवा तिथें ठेवीत असे. नॉर्मा एकटीच रहात असे; पण आजीबाई स्वतःला कांहीं कमी म्हणून पडूं देत नसत. कंटाळा आला कीं मधूनच रजा काढून ती गांवाला जाऊन यायची. युनियनच्या नाटकांना हिची खुर्ची ठेवलेली. आणि हें सगळें चाललें होतें त्याबरोबरच आठवड्यांतून दोनदां डॉक्टरबरोबरच्या दोन अपॉइंटमेंट्स् चालूं होत्याच. नियमितपणें डॉक्टरचीं बिलें भरावीं अशीं व्याधि असूनसुद्धां नॉर्मा जीवनाला विटली नव्हती. एखादा मजेदार किस्सा ऐकवला, कीं ती एखाद्या लहान मुलासारखें खदखदून, गदगदून हंसत असे. वेळ मिळाला कीं ती आपल्या पर्समधून तो छोटासा आरसा काढायची आणि लिपस्टिक फिरवून ओठांची रंगरंगोटी ठाकठीक करून घ्यायची. मीं हें पहिल्यांदा पाहिलें तेव्हां साहजिकच मला खूप आश्चर्य वाटलें होतें. पण म्हाताऱ्या, लठ्ठ, विधवा बाईनेंसुद्धां सुंदर दिसायचा प्रयत्नहि करूं नये असें थोडेंच आहे ?

ईगन आणि नॉर्माप्रमाणेंच बहुतेक अमेरिकन माणसें जीवन इतकें सुंदर जगत असावींत, कीं मरण्याचें भानहि त्यांना रहात नसावें. या लोकांच्या दीर्घा-

युत्वाचे 'शास्त्रीय' रहस्य काय असेल तें असो; 'सुंदर जीवन जगण्याचा अट्टाहास' अशाच अर्थाचें पण अवघड स्पेलिंग असलेल्या आणि बऱ्याच जडजंबाल शब्दांत सांगितलें जाणारें हेंच तें रहस्य असावें असा मला संशय आहे.

इतकें छान जगणारे हे लोक मरणाविषयींचा विचार मुळींच करीत नसतील असें मात्र वाटत नाहीं. उलट करतात तेव्हां तो जीवनाच्या विचाराइतकाच सुंदर, हलकाफुलका आणि आवश्यक तितका गंभीरहि असतो. मृत्यूनंतरच्या व्यवस्थेविषयींचें बोलणें इतकें सहज असतें कीं त्यांतला व्यवहारीपणा ऐकणाऱ्याला जाणवत नाहीं. त्यांत उसासे, सुस्कारे, डोळ्यांच्या कडा ओलावणें असले प्रकार बिलकुल नसतात.

"मी अगदीं मोठ्या समस्येंतून मुक्त झालें बाई!" 'ली' या माझ्या मित्राची बहीण मला एकदां म्हणाली. आमच्या भोजनोत्तर गप्पा चालल्या होत्या आणि मी मजेंत पाईप ओढीत बसलों होतों.

या बाईसाहेब इतक्या श्रीमंत होत्या कीं त्यांच्यापुढें केशभूषा, पाकक्रिया इत्यादीपेक्षां अधिक गहन समस्या असूं शकतील हें मला पटलें नसतें. तिच्या यजमानांना लठ्ठ पगाराची नोकरी होती, अमेरिकेंत खऱ्या श्रीमंतीचें लक्षण समजली जाणारी कोरीकरकरीत 'कॅडिलॅक्' गाडी दिमतीला होती, छानदार घर होतें, दोन सुंदर मुली होत्या. हिच्यापुढें 'समस्या' 'समस्या' ती कोणती असणार?

"म्हणजे त्याचं काय आहे, कीं नुकतेच माझ्या नवऱ्याला आम्हां दोघांना (मृत्यूनंतर!) पुरण्यासाठीं छान लॉट्स् मिळून गेले. सुंदर लॉट्स् आणि ते-सुद्धां अगदीं शेजारीं शेजारीं. आहे कीं नाहीं?"

ती सुंदर, श्रीमंत, तरुण बाई आपल्या दफनभूमीविषयीं इतक्या शांतपणें आणि कांहींशा मिस्किलपणें मला सांगत होती कीं त्या 'वायु-अनुकूलित' वातावरणांतसुद्धां मी सर्द होऊन गेलों.

पण नंतर माझ्या लक्षांत आलें, कीं ज्या प्रचंड शिकागो शहरांत जिवंत माणसाला रहायला जागा मिळणेंसुद्धां कठीण आहे, तिथें मेलेल्या माणसांपुढें जागेची 'समस्या' उभी असावी यांत कांहींच आश्चर्य नाहीं. माणसाला

खरोखर किती कमी जमिनीची आवश्यकता आहे, या प्रश्नाचें उत्तर टॉल-स्टॉयनें दिलें आहे. पण तेवढी जमीन मिळविणें हेंसुद्धां विशेषतः मोठमोठ्या अमेरिकन शहरांत आजकाल फार कष्टाचें आणि खर्चाचें काम होऊन बसलें आहे.

'निजधामास जाणें' हें एकंदर सगळेंच प्रकरण अमेरिकेंत इतकें खर्चाचें झालें आहे कीं, कित्येक व्यवहारी लोक या खर्चाची तरतूद खूप आधींपासून करायला सुरुवात करतात. विमा उतरविणें या प्रकारानें आतां आयुर्मर्यादा ओलांडून मृत्यूलाहि गांठलें आहे. आयुर्विम्याप्रमाणें मृत्यूचाहि विमा उतरविण्याचें दुहेरी कार्य करणाऱ्या विमा–एजंटाला चकविणें ही गोष्ट तिथें एकंदरींत कठिण होत असावी. पण एकदां हा मृत्यु–विमा उतरविला म्हणजे निर्धास्तपणें जगतां येतें. एवढेंच नव्हे, तर मरतांनाहि जीव घोटाळण्याचें कारण उरत नाहीं. मृत्यूची अशी दुहेरी नाकेबंदी केली असल्यामुळेंच अमेरिकन माणसें इतरांपेक्षांहि अधिक जगत असावींत, असा माझा कयास आहे.

अमेरिकेंत उठल्यासुठल्या 'गिफ्ट्स्' देण्याची जी पद्धत आहे त्यामुळें असें होण्याचा संभव आहे कीं, एखादा आंग्लचौकी नवरा आपल्या बायकोला तिच्या वाढदिवशीं मृत्यु–विम्याची पॉलिसी 'नजर' करीत असेल. आणि तीहि त्याच्या गळ्यांत पडून प्रेमानें म्हणत असेल, "कित्ती रे माझ्यावर प्रेम करतोस तूं जॉन्!" किंवा आपल्या विसराळू नवऱ्याची खरडपट्टी काढली जात असतांना पतिपत्नींत असाहि प्रेमळ संवाद होण्याचा संभव आहे :—

ती :— जॅक्, अरे त्या आपल्या विम्याचा हप्ता भरलास कीं नाहीं? विसरलाच असशील सालाबादप्रमाणं!

तो :— लाडके, विम्याचा हप्ता कसा विसरेन मी?

ती :— शहाण्या, मी त्या आयुर्विम्याबद्दल विचारीत नाहींय्ये!

तो :— ओः डिअर! तूं त्या मृत्यु–विम्याबद्दल विचारत्यैस होय? मी अगदीं साफ विसरलों कीं ग!

ती :—— (रडत) विसरायचासच तूं! तुला कुठं पर्वा आहे बायकोची! बोलूनचालून तूं आधीं मरणार आणि रहातां रहाणार मी! मग माझे हाल कुत्रा कां न खाईना! (ओक्साबोक्शीं रडत) मेल्यांनों! जिवंतपणीं ही तऱ्हा,


तर मेल्यावर काय दिवे लावणार तूं! दिसतंच आहे!

( 'अग पण...अग पण...' असें म्हणत तो अजीजीनें तिला कांहींतरी सांगू पहातो पण त्यामुळें तिच्या रडण्याचा सूर आणखीच चढूं लागतो.

तो तोंड उघडून वेंधळ्यासारखा तिच्याकडे, आणि मुलें आश्चर्यचकित होऊन उत्सुकतामिश्रित कौतुकानें आपल्या प्रेमळ आईबापांकडे पहात असतांनाच, पडदा. )

'शेवटचा दिवस गोड' होण्यासाठीं अशासारखा 'अट्टाहास' अमेरिकन माउल्या खरोखरच करीत असल्या तर त्यांत नवल नाहीं.

न्यू हॉल्स्टीनला आम्ही गेलों होतों तेथें आम्हांला भेटलेला बॉब् दफनाचा व्यवसाय करीत असे. त्याच्या धंद्यांत त्याला 'दफन--दिग्दर्शक' ( फ्यूनरल डिरेक्टर ) असें ऐटबाज नांव आहे. गांवांतल्या आणि आसपासच्या अनेक स्त्रियांनीं या दिग्दर्शकमहाशयांकडे आपल्या निर्याणविधीसाठीं करावयाच्या खर्चाचे पैसे आगाऊच देऊन ठेवलेले होते. ( आपल्याकडे एखाद्या आगरकरांनाच असें जमतें! ) एवढेंच नव्हे, तर त्यांनीं आपापल्या बेताच्या शवपेट्या अगोदरच पसंत करून ठेवल्या होत्या. ज्या विमानांत बसून स्वर्गारोहण करायचें तें अगोदर पाहून ठेवावें, किंवा एष्टींतली 'शीट' आधींच हेरून ठेवलेली असावी तसला हा प्रकार.



सुखी माणसाचें स्वप्न

शिवाय यांत 'सब घोडे बारा टक्के' असला प्रकार नाहीं. प्रत्येक गिऱ्हाइकानें आपापल्या ऐपतीप्रमाणें आणि हौशीप्रमाणें 'माल' पसंत करावा.

मात्र अट एवढीच, कीं एकदां वापरलेली वस्तु ‘ कोणत्याहि सबबीवर परत घेण्यात येणार नाहीं. ’ पण परत करतां येत असती तरी काय उपयोग म्हणा! कारण जें नापसंती व्यक्त करणार ते ‘ गिऱ्हाइक’च मुळीं हवाबंद पेटींत अडकून बसलेलें असतें ना!

बॉब् हा मोटा उत्साही तरुण होता. त्यानें नुकताच आपल्या विषयांतील दोन वर्षांचा कोर्स पुरा केला होता आणि तो ‘ दफनशास्त्रविशारद ’ झाला होता. आपला ‘ स्टुडिओ ’ पाहण्यासाटीं हा दफनदिग्दर्शक मला मोठ्या उत्साहानें घेऊन गेला होता. — इतक्या, कीं त्याचा उत्साह जास्त कीं माझें कुतूहल अधिक, हें सांगणें कठिण होतें.

“ तुम्ही आलांत कीं प्रथम तुम्हांला या टेबलावर ठेवतात. नंतर तुमच्या अंगांतलं सगळं रक्त काढून घेतात आणि त्यांत एम्बामिंग फ्लुइड भरतात. ”

‘ तुम्ही — तुम्हांला — तुमच्या ’ या बॉबनें वापरलेल्या द्वितीयपुरुषी भाषेमुळें मी चांगलांच सर्द होऊन गेलों.

“ एम्बामिंग फ्लुइड ? ” मी म्हणालों.

“ हो ना! त्याशिवाय तुमची ‘ ममी ’ होणार कशी! चांगलं पांचसहा गॅलन फ्लुइड तुमच्या अंगांत भरावं लागतं! ”

‘ अरे बाप रे! ’ कपाळावर फुटलेला घाम रुमालानें पुशीत मी मनांतल्या मनांत म्हणालों. उघड एवढेंच म्हटलें, “ अस्सं अस्सं! ”

आणि बॉब्च्या या द्वितीयपुरुषानें माझी मान शेवटपर्यंत सोडली नाहीं.

“ तुमच्या पसंतीप्रमाणं कुठलीहि शवपेटिका तुम्ही घेऊं शकतां. आतां ही पहा किती आरामशीर आहे! गादींत उत्तम स्प्रिंग्ज आहेत. मटीरिअल फर्स्ट क्लास आहे. पण तसं कशाला? तुम्ही ही गादी हातानं दाबूनच पहा ना! — हां! आतां माल जरा किमती आहे; पण क्वालिटीहि तशीच. तुम्हांला एकदां का पेटींत सीलबंद केलं म्हणजे पाणी नाहींच, पण हवेचा एक टिपूस आंत आला तर पैसे परत! शिवाय या पेटीच्या झांकणावर आंतल्या बाजूनं किती झकास पिक्चर आहे पहा! या इथं ‘ रेंब्रॉं ’ चं पेंटिंग आहे. पण आमचा कांहीं आग्रह नाहीं. तुम्हाला अगदीं ‘ विंची ’ हवा असेल तर तोहि देऊं. पण विचार करा, एकदां तुमचं आवडतं पेंटिंग झांकणावर लावलं कीं

तुम्हीं कायम त्याच्याकडे पहात गादीवर रेलूं शकतां !"

एवंगुणविशिष्ट अशा ज्या शवपेटिकेचें हें रसभरित वर्णन चाललें होतें तिच्यापासून मी आधींच दोनतीन फूट दूर होतों. आतां आणखी दीडदोन फूट मागें सरकलों. 'आम्ही' आंत गेल्यानंतर हवाबंद होणारी ती पेटी उघडी पाहूनसुद्धां माझा जीव गुदमरायला लागला होता. तसें 'रेंब्राँ' काय किंवा 'विंची' काय, माझें कोणाशींच वैर नाहीं. पण 'शवासन' घातलें असतांना एवढ्या थोर कलावंतांच्या चित्रांचासुद्धां मी कितपत आस्वाद घेऊं शकेन या विषयीं मला शंका आहे.

बॉब्च्या त्या यमपुरींतील अंतःपुरांतून मी मग शक्य तितक्या लवकर बाहेर सटकलों. मोकळ्या हवेंत येऊन एक दीर्घ श्वास घेतला आणि सिगरेट शिलगावली, तेव्हां कुठें जिवांत जीव आला. 'आपुलें मरण' 'आपुल्या डोळां' पाहणें हा एकंदरींत कांहीं साधासुधा सोहळा नव्हे.

नंतर कांहीं वेळानें मी बॉब्च्या वडिलांशीं गप्पा मारीत होतों. धंद्यांत सध्या बिलकुल चलती नाहीं अशी तक्रार ते करीत होते.

"पाहिलींत ना तुम्हीं किती कॅस्केट्स् जमलीं आहेत तीं ? मालाला बिलकुल उठाव नाहीं हो आजकाल ! कॉंपिटिशन फार वाढली आहे हल्लीं. गिऱ्हाइकहि त्या मानानं कमीच झालं आहे."

बॉब्च्या वडिलांची ही तक्रार खरी आहे असें गृहीत धरूनहि 'धंद्यांत तुमची भरभराट होवो' अशी सदिच्छा व्यक्त करणें अवघड आहे हें माझ्या लक्षांत आलें. कारण त्या धंद्यांत नसलेले इतर कांहीं लोक आणि आम्ही ज्यांच्याकडे उतरलों होतों तें रॉल्फ डॉश्हि आमच्याबरोबर होते हें मला विसरून चाललें नसतें.

इतर सगळ्या प्रकारच्या धंद्यांना चांगलें गिऱ्हाईक असून बॉब्सारख्याच्या धंद्याला गिऱ्हाईक कमी असावें याला तशींच कारणें आहेत. एक तर अमेरिकन सरकार निरनिराळ्या योजना, सुधारणा करून अमेरिकन लोक जास्तींत जास्त कसे जगतील यासाठीं प्रयत्न करीत आहे. पण त्याहिपेक्षां महत्त्वाचें म्हणजे, अमेरिकेंत मरणाला द्यावें लागणारें असाधारण मोल हें गिऱ्हाइकी कमी होण्याचें खरें कारण असावें, असा माझा तर्क आहे. मृत्यूचे कंत्राटदार


आपले दर असे कांहीं वाढवीत आहेत कीं त्यामुळें मरणें हें जगण्यापेक्षां अधिक कठिण होत चाललें आहे.

मरणें ही गोष्ट तर सोडाच, पण अमेरिकेंत नुसतें आपलें चार दिवस रुचिपालट म्हणून आजारी पडणें हीसुद्धां भयंकर गोष्ट आहे. कारण मरणाविषयीं जरी मला 'स्वानुभवावारून' बोलणें अवघड असलें, तरी आजारी पडण्यांत 'मौज हीच वाटे भारी' असला कांहींच प्रकार नाहीं हें मात्र मी स्वानुभवावरून सांगू शकेन. पेशंटकडे नुसतें पाहण्यासाठींसुद्धां डॉक्टरलोक तिकडे पैसे घेत असतील अशी आमच्या डॉक्टरनें माझ्याकडे नुसतें पाहून त्याबद्दलचें पांच डॉलर्सचें (पंचवीस रुपये) बिल पाठवीपर्यंत मला कल्पना नव्हती. आठ दिवसांनंतर 'एकदां येऊन जा' असें प्रेमळपणें डॉक्टरसाहेबांच्या चिटणीसबाईनें सांगितल्यावरून मी जाऊन आलों. तेव्हांहि डॉक्टरांनीं माझ्याकडे त्याच दिव्य दृष्टीनें पाहिलें, आणि माझी पाठ वळतांच बाईनीं माझें बिल टाईप् करण्यासाठीं घेतलें असावें. कारण दुपारच्याच डाकेनें 'पांच डॉलर्स फक्त' पाठवावे अशी विनंती असलेलें तिचें पत्र आलेंच. पण माझ्या एक मित्राचा अनुभव यापेक्षां फारच 'आगळा' होता. त्यानें आपले पुढचे कांहीं दांत काढून ते बसवून घेतले त्याबद्दलचें बिल आलें तें इतकें प्रचंड होतें कीं एवढे पैसे जवळ नसल्यामुळें त्याला शेवटीं आपल्या कृत्रिम 'दांतीं तृण' धरून दंतवैद्याला शरण जावें लागलें. मेहेरबानी म्हणून त्याला हप्ते मिळाले आणि बिचारा अनेक दिवस दोनदोनशें रुपये महिना याप्रमाणें आपलें तीन हजार रुपयांचें बिल भरीत होता. 'बत्तिशी उतरवून देईन' असें आपल्याकडे कोणीही कुणाला म्हणूं शकतो. अमेरिकेंत ही गोष्ट तितकी सोपी नाहीं. कारण हें महत्कार्य करण्यासाठीं तेथें ३२ × २५ × ५ इतके रुपये लागतील. या गुणाकाराचें उत्तर काढण्याच्याहि मी भानगडींत पडलेलों नाहीं. कारण माझा एकंदर प्रॉव्हिडंट फंडहि तितका होईल कीं नाहीं याविषयीं मला शंका आहे. बरें. दांतावर मारण्यासाठीं तिकडे एवढे पैसे लागतात असें ऐकून कोणाची दांतखीळ बसावी तर त्याचीहि चोरीच! कारण दांतखीळ काढण्यासाठींहि असाच कांहीं प्रचंड खर्च येत असणार. माझ्या बाबतींत असा अडचणीचा प्रसंग सुदैवानें आला नाहीं. कारण माझ्या मित्राची दंतकथा ऐकण्याच्या सुरुवातीलाच

माझी दांतखीळ बसली होती ती पुढील खर्चाचे आंकडे ऐकून आपोआप सुटली. या प्रसंगानंतर पुण्याला परत येईपर्यंत मी माझ्या दातांना प्राणापेक्षांहि अधिक कां जपत होतों हें वेगळें सांगण्याची आवश्यकता नाहीं.

अशा महागड्या डॉक्टरांच्या औषधांमुळेंच कांहीं व बिलांमुळें उरलेले लोक दगावतात आणि स्वर्गारोहण--स्पेशॅलिस्टांच्या तावडींत सांपडतात. शिवाय औषधें आणि बिलें यांच्या तडाख्यांतून जे तात्पुरते बचावलेले असतात त्यांनाहि या स्पेशॅलिस्टांना शेवटीं चुकवितां येत नाहींच. कांहींहि केलें तरी ज्यांना चुकवितां येत नाहीं असे हे भूलोकीचे प्रति--परमेश्वरच.

या परमेश्वराच्या चरणीं अमेरिकन लोक प्रतिवर्षी अब्जावधि रुपयांची अल्पशी दक्षिणा ठेवतात. नेमकेंच सांगायचें तर १९६१ सालीं हा आंकडा १० अब्ज ( १००० कोटी ) रुपयांचा होता. म्हणजे सरासरी काढली तर दर माणशी हा खर्च ७२५० रुपये एवढा होतो. नुसत्या फुलांवर होणाऱ्या खर्चाचे




' जगावें, कीं मरावें ? '

आंकडे पाहिले तरी तेहि अंगावर कांटा आणायला समर्थ आहेत. अमेरिकेंत प्रतिवर्षी जवळजवळ २०७ कोटी रुपयांच्या फुलांचा व्यापार होतो. त्यांतले ६० ते ७० टक्के म्हणजे १२५ ते १४५ कोटी रुपये प्रेतयात्रेच्या फुलांसाठीं खर्च होतात. दर माणशीं हा खर्च सुमारें १२३० रुपये होतो. इतका खर्च केल्यावर सुतानें नाहीं तरी निदान फुलानें स्वर्ग गांठतां येईल अशी अमेरिकन माणसाची समजूत असावी.

कांहीं हिशेबी लोक अशी तक्रार करतात कीं, ही शुद्ध पिळणूक आहे.

जेसिका मिटफर्ड नांवाच्या एका बंडखोर लेखिकेनें तर या यमाच्या ठेकेदारांवर टीकेची भयंकर झोड उठविली आहे. गेल्या वर्षी तिचें The American way of death या शीर्षकाचे स्फोटक पुस्तक प्रसिद्ध झालें. हें मर्मग्राही पुस्तक इतकें लोकप्रिय झालें कीं, अवघ्या एका महिन्यांत त्याच्या चार आवृत्त्या हातोहात खपल्या. घरींदारीं (कदाचित् स्मशानांतसुद्धां) तेंच चर्चेचा एकमेव विषय होऊन बसलें. या ग्रंथामागें उभें असलेलें मिटफर्ड-बाईचें संशोधन दांडगें आहेच; पण त्यांची शैलीसुद्धां अशी कांहीं शिवरामपंती थाटाची आहे कीं या दोन्ही कारणांमुळें हें पुस्तक विलक्षण 'ज्वालाग्राही' ठरलें आहे.

अमेरिकन लोक जगण्याकरितां जेवढा खर्च करूं शकत नाहींत त्यापेक्षां जास्त मरण्यासाठीं करणें त्यांना भाग पडतें, असा बाईचा दावा आहे. १९४७--४८ ते १९६० या अवधींत अमेरिकन माणसाचा जीवनखर्च २६ टक्क्यांनीं वाढला तर मृत्युखर्चाचें प्रमाण मात्र ४८ टक्क्यांनीं वाढलें, असा पुरावा त्यांनीं मांडला आहे. 'दुःखोपचार', 'प्रिय (पण मृत) व्यक्तीचें स्मृतिचित्र चिरंजीव करणें' अशा गोड गोड नांवांखालीं दफनाच्या धंद्यांतले ठेकेदार अज्ञ अमेरिकन माणसाला कसे अक्षरशः लुबाडीत आहेत, हें विदारक सत्य डझनावारी उदाहरणें आणि आंकडेवारी देऊन बाईनीं वेशीवर टांगलें आहे.

बॉब्च्या व्यवसायबंधूंना तर बाईचा दावा मान्य होणें कधींच शक्य नाहीं. त्यांचा रोखठोक सवाल असा कीं, 'लोक हो! ज्या इतमामानें तुम्हीं जगतां त्याच थाटांत तुम्ही मरणेंहि योग्य नाहीं काय?' 'कॅडिलॅक् गाडीच्या मालकानें एखाद्या सामान्य शेवरोलेट खोक्याच्या मालकासारखेंच मरावें कां?' या लोकांचें म्हणणें असें कीं, कोणीहि केवळ खर्चाच्या आंकड्यांकडे बोट दाखवून त्यावर टीका करणें अन्यायाचें आहे.

"साहेब, ही नुसती पेटीची किंमत नाहीं. त्यांत तुमच्या प्रिय माणसाला घालायच्या कपड्यांचा खर्च आहे. धर्मोपदेशकांचा मुशाहिरा, दफनाच्या वेळच्या संगीताचा खर्च, दफनभूमींत करावयाचा खर्च—या सगळ्या गोष्टी त्यांत येतात. आणि या सगळ्यावर ताण म्हणजे आम्ही करीत असलेली 'दुःखित--जन--सेवा.' तिची किंमत काय साहेब तुम्ही पैशांत करणार? अं?

अहो, काय साहेब तुम्ही तरी ! ..''

जवळच्या माणसाच्या मृत्यूमुळें आधींच माणूस इतका दुःखीकष्टी झालेला असतो कीं तो त्यामुळें ( किंवा निदान जनलज्जेस्तव ) या बाबतींत घासाघीस करीत नाहीं. शिवाय, —

" साहेब, तुमच्या कपड्यांवरून, गाडीवरून आम्हीं ताडलंच कीं सामान्य माणसासारखं दफन इथं नाहीं चालायचं. (आणि कुठल्याहि सामान्य माणसाला आपण सामान्य नाहीं याची तीव्र जाणीव असतेच !) शिवाय साहेब, आपल्या वडिलांवरचं तुमचं अलौकिक प्रेम लक्षांत घेतां त्यांचं चिरंजीव, चिरंतन स्मारक आम्हीं न करणं हा आम्हांलाच कमीपणा आहे. नाहीं — म्हणजे मी म्हणतों कीं अशी गोष्ट आमच्या हातून होणार नाहीं ! " (शिवाय कोणाचेहि झाले तरी — प्रिय काय किंवा अप्रिय काय — वडील हे एकदांच मरत असतात हें आणखी ! )

या असल्या साखरपेरणीमुळें जो विरघळणार नाहीं तो माणूस कसचा ! कित्येकदां असेंहि असतें कीं, मृत व्यक्तीनें 'साहेबांच्या' नांवावर बरीच माया ठेवलेली असते आणि या दूरच्या नातलगाला कधीं एकदां पुरून मोकळा होतों असेंहि साहेबांना वाटत असण्याचा संभव असतोच.

अशांतहि एखादें चिकट किंवा हट्टी गिऱ्हाईक भेटतें. नाहीं असें नाहीं. तिथें 'साम' चालला नाहीं तरी निदान 'दाम' चालवायचा नसल्यामुळें 'दम' देऊन काम भागतें.

एका बाईनीं आपल्या मृत मेव्हण्याचें दफन करण्याविषयीं सूचना दिल्या. त्यांनीं रेडवूडची साधी, स्वस्त शवपेटिका पसंत करून टाकली आणि 'थोडक्यांत निभावलें' म्हणून निर्धास्त मनानें त्या घरीं आल्या. पण थोड्याच वेळांत त्यांच्या टेलेफोनची घंटा घणघणूं लागली.

" मी आपला दफन--दिग्दर्शक बोलतों आहें. अहो, त्या पेटीसाठीं तुम्हांला आणखी शंभर डॉलर्स द्यावे लागणार, बाईसाहेब "

" आतां हें काय बाई नवीन काढलंत तुम्हीं ? "

" म्हणजे —त्याचं असं आहे आहे, कीं तुमच्या मेव्हण्याची उंची (लांबी) पेटीपेक्षां जरा जास्त पडते त्याला मी काय करणार बाईसाहेब ? "

" पण तें तुम्हांला आधींच माहीत असायला हवं होतं ! आतां मी मुळींच जास्त पैसे देणार नाहीं ! "

" आमची हरकत नाहीं. फक्त आम्ही मेव्हणेसाहेबांचे पाय जरा छाटून टाकतों, म्हंजे झालं ! "

बाईसाहेब इतक्या घाबरल्या, इतक्या घाबरल्या, कीं त्यांनीं ताबडतोब आणखी द्यावयाचे शंभर डॉलर्स चुकते केले. एवढेंच नव्हे, तर त्यानंतर सबंध दोन वर्षं या प्रकाराबद्दल एक चकार शब्द कुणाजवळ काढण्याचें धैर्यहि त्यांना झालें नाहीं.



मेव्हणेसाहेबांचे पाय.

' व्यापार-नीति ' म्हणतात ती ही. या धंद्यांतल्या लोकांचीं ब्रीदवाक्येंच हीं आहेत मुळीं: ' लोकांच्या भावनावशतेवर भर द्या. मालकी हक्कांविषयीचा अभिमान त्यांच्यात जागृत करा. आपल्या कुटुंबावरील त्यांच्या प्रेमाचें भांडवल करा. त्यांच्या ठायीं असलेली जरूरीची जाणीव आणि भीति यांचा फायदा घेण्यास विसरूं नका. '

मृत्यूच्या या अमेरिकन मिरासदारांच्या अडचणीहि तशाच आहेत. एक तर जो धंदा दोन हजार लोकांना संभाळतां येणें सहज शक्य आहे, तो आज चोवीस हजार लोक करतात. चार माणसांनीं खांदा देण्याऐवजी जरा प्रेमानें चाळीस लोक पुढें सरसावले तर जें होण्याचा संभव आहे तेंच इथें होतें. त्यांत— निदान या धंदेवाल्याच्या दुर्दैवानें—अमेरिकेंतील मृत्यूचें प्रमाण अलिकडे

बरेंच घटलें आहे. आतां एवढ्या शहाण्या अमेरिकन लोकांना इतकी साधी गोष्ट कां कळूं नये ? कितीहि झालें तरी एखाद्याच्या पाठीवर पाय द्यावा; पोटावर देऊं नये.

पण परिस्थिति अशी असूनहि कुठल्याहि धंदेवाईकाप्रमाणें हे लोकहि अडचणीमुळें डगमगायला कच्च्या दिलाचे नाहींत. ( शवपेटीकेची ) 'रुपेरी कडा' ( दफनभूमीवरील ) 'कल्पना– विलास' यांसारख्या मोहक नांवांची अकरा मुखपत्रें हे लोक चालवितात. प्रचंड प्रमाणावर जाहिरात करतात, आणि प्रत्येकाची मृत्यु–यात्रा नेत्रदीपक, चिरस्मरणीय झगमगाटांत झाली पाहिजे ही कल्पना लोकांच्या गळीं उतरवितात. असें केलें म्हणजे ज्या कामाला फक्त सातशें रुपयांच्या आसपास खर्च पडतो त्याच्या दसपटीपेक्षां जास्त पैसे गिऱ्हाइकाकडून वसूल करता येतात. मला तर असें वाटतें कीं, या जाहिरातबाजीनें चकित होऊन लोक आपापलीं बोटें तोंडांत घालीत असावेत आणि त्यांचे हात तोंडांत गुंतले आहेत ही संधि साधून हे 'क्षणकालचे मित्र आणि अनंतकाळचे शत्रू' गिऱ्हाइकांच्या पैशाच्या खिशांचा ताबा घेत असावेत.

शवपेटिका, फुलें, इतकेंच काय, आणखी मृत व्यक्तीला घालावयाचे नुसते कपडेच नव्हे, तर तिच्याकरितां वापरायचीं 'कॉस्मेटिक्स,' पादत्राणें यांच्या जाहिरातीहि इतक्या चित्ताकर्षक असतात कीं त्या वाचणाऱ्याला ताबडतोब मरण्याचा मोह अनावर व्हावा. आणि तेवढें केलें नाहीं तरी निदान आपल्या प्रियजनांची अशी हौस लगेच करून घ्यावी असें तर खात्रीनें वाटावें.

शवपेटिकांच्या रंगांचे किती प्रकार पाहिजेत ? दोन चार नाहीं, चांगल्या साठ प्रकारच्या शेड्स् आहेत. 'मृत व्यक्तीच्या कर्तृत्वाला आदरांजलि' म्हणून फुलें हीं हवींतच. शिवाय दुःखी माणसाला फुलें देऊं शकतात इतका दिलासा कोणीहि देऊ शकत नाहीं, हें 'मानसशास्त्रीय' कारण आहेच. तसेंच यजमानीणबाईंना शोभतील असे देखणे 'गाउन्स', किंवा त्या जशा कांहीं आत्तांच बाहेर जायला निघाल्या आहेत असें दिसायला पाहिजे असेल तर तशाहि प्रकारचे झकपक कपडे 'तैय्यार'. पण या सगळ्यावर 'कळस' म्हणजे 'पायां'त घालावयाचे बूट ! नं. २८० चे बूट हे या कामासाठीं सुयोग्य. त्यामुळें मृत व्यक्तीविषयीं तुमची आस्था आणि प्रेम व्यक्त होतात. हे बूट एकदां पायांत चढले कीं ( बहुधा त्यांच्या चकचकीत कातड्यांतच ) माणसाचा

स्वभाव, त्याचें कर्तृत्व हीं परावर्तित होणार. उत्कृष्ट शैलीनें बनविले असल्यामुळें हे बूट यशस्वी जीवनाचें 'पदचिन्ह'च वाटतात.

इतकें सगळें ( आणखी खूप इतर ) वाचल्यावर आपण एकदां तरी मरून पहावेंच असें कुणाला वाटणार नाहीं ?

मृत्यूचें प्रमाण कमी झाल्यामुळें जे नुकसान होते तें कमी करण्यासाठीं अमेरिकन दफनवाल्यांनीं एक नवीन शक्कल लढविली आहे. हे लोक ठिकठिकाणीं हजारों एकरांचे प्लॉट्स् विकत घेतात आणि तिथें 'अॅडव्हान्स बुकिंग' सुरू करतात. आयत्या वेळीं निराशा टाळण्यासाठीं, 'हाऊस फुल्ल' होण्याच्या अगोदरच उतावळे लोक तिथें भाऊ गर्दी करतात आणि जिवंत असतांना रहायला जागा असो किंवा नसो, मेल्यानंतर रहायला नव्वद इंच खोल जागेची दफनभूमीमध्यें ( छे छे ! 'स्मृति—उद्यानांत' ) कायमची व्यवस्था करून टाकतात. एका दृष्टीनें पाहिलें तर हेहि धोरणीपणाचे आहे. कारण माणसाला रहायला जेवढी जागा लागते तिचा घरासकट खर्च फक्त १५००० डॉलर्स असतो तर 'स्मृतिउद्यानां'त तेवढयाच जागेची किंमत १८३६०० डॉलर्स असते ! पण स्मृति उद्यान म्हणजे असतेंहि तसेंच. तिथें रम्य वनश्रीचा कायमचा शेजार असतो. किंवा सागराच्या घनगंभीर संगीताची साथ सदैव असते. शिवाय प्रत्यक्ष उद्यानांत इतालियन आणि फ्रेंच मार्बलचे गालिचे जिकडेतिकडे घातलेले असतात हें वेगळेच ! 'स्मृति-उद्यान' म्हणजे तुम्ही समजलांत काय ? तें कांहीं पै-पैसा सांठवून मरतांमरतां उभें केलेले आणि धड गिलावासुद्धां नसलेले 'मातृस्मृति' नव्हे ! आतां तसें म्हणाल तर काम थोडें खर्चाचें आहे. पण या जगांत खर्चाशिवाय होतंय् काय आजकाल ?



सर्व वर्गांची सर्व तिकिटें खलास

अमेरिकेंतल्या मरणाची समस्या ही अशी जवळजवळ जीवनमरणाचीच समस्या झाली आहे. ईगन किंवा नॉर्मासारख्या स्वच्छंदी, निर्मळ जीवन जगणाऱ्या माझ्या स्नेह्यांशी या विषयावर बोलायची संधि मला कधीं मिळाली नाहीं. पण हीं दोन्ही माणसें इतकीं जिवंत होतीं, जगण्यांत इतकीं दंग होतीं; कीं त्यांच्याशीं या विषयावर बोलणें हेंहि मला विसंवादी वाटलें असतें.

पण मी अमेरिकन मरणाच्या डोळ्याला डोळा भिडवून पाहिलें असल्यामुळें माझ्यापुरतेंच माझ्या प्रश्नाचें उत्तर द्यायचें तर मी असें म्हणेन कीं शहाण्या माणसानें अमेरिकेंत मरूंच नये. त्यानें आपलें सारखें जगत रहावें. ईगन आणि नॉर्मा यांच्याप्रमाणें सारखें जगत रहावें.

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम 37699 दि.
क्रमांक 3591 नों. दि.

# १४ · हवाईऽऽ : मंतरलेलें बेट

‘ हवाई ऽ ऽ ’ म्हणजे ‘ हवाई ’ नव्हे. म्हणजे यांतली ‘ ई ’ ही ईड-लिंबूंतली नव्हे. ‘ इजारीं ’तली तर नव्हेच नव्हे. या टोंकदार ‘ ई ’चा उच्चार करतांना शिष्टाचार थोडा बाजूला ठेवून दांत चक्क विचकावे लागतात. अशी ही जादूची ‘ ई ’ आहे. पण खरें म्हणजे हेंहि तितकेंसें बरोबर नाहीं. कारण हवाईमधलीं तीनहि अक्षरें जादूचीं आहेत आणि तीं एकत्र केलीं कीं हवाई हें जादूचें बेट निर्माण होतें.

हवाईला जाणें म्हणजे सदेह स्वर्गाला जाणें. आणि ही मेहेरबानी कांहीं देवाच्या लाडक्या अशा एखाद्याच तुकारामाकरितां नाहीं. तुम्ही, आम्ही—कोणीहि यावें आणि या पाचूच्या बेटाचें सौंदर्य लुटावें. निळ्याभोर पॅसिफिक्-मध्यें चमचमणाऱ्या, झगमगणाऱ्या हवाईचें लावण्य न्याहाळावें. समुद्र-किनाऱ्यावरच्या या रुपेरी वाळूवरून संथ पावलें टाकीत चालावें, किंवा डोंगरावरून धांवत अनंत हस्तांनीं उधळलेल्या हिरव्या सौंदर्याच्या खाणी धुंडत जावें, हवाई पऱ्यांच्या हातांत हात घालून नाचावें, प्रकाशाचा सोपान चढत मद्यालयांत जावें, नाइट–क्लबांत शिरून रात्रीचा दिवस करीत नृत्य करावें, पहावें. चालतांचालतां मधेंच कुठेंतरी पाय पडतो, कसलीतरी कळ दाबली जाते आणि या जादूई नगरीच्या अंतर्महालाचीं दारें खुलीं होतात. कमळ उमलावें त्याप्रमाणें सौंदर्याचें आणखी एक विश्व उमलतें. अनेक उमलतात. नुसती रसि-कता नाहीं चालणार इथें मिस्टर, हिंमतसुद्धां हवी. जीवन भोगण्याची आणि

तो गुदमरून टाकणारा आनंद सहन करण्याची, पेलण्याची ताकदहि हवी...

असो. पण त्या विमानाचें काय? स्वर्गसुखाचीं नुसतीं वर्णनें वाचण्यांत किंवा ऐकण्यांत काय फायदा? परंतु हे प्रश्न मुळींच अवघड नाहींत. कारण एकदोन नव्हे, तर चांगल्या सात विमान–कंपन्यांचे हंसतमुख एजन्ट्स अदबीनें आपल्या सेवेसाठीं सदैव हजर असतात. छे छे! 'एजंट' हें काय यांचें वर्णन झालें? हे खरें म्हणजे शापभ्रष्ट यक्ष किंवा देवदूत. यांच्याशीं पांच मिनिटें बोललें तरी त्यांचा जन्म हा केवळ आपल्या सेवेसाठीं झालेला आहे याबद्दल कोणाचीहि खात्री पटावी. साक्षात् सौजन्यानें सूटबूट चढविला, टाय घातला आणि इंग्रजींतून बोलायला सुरुवात केली तर तें जसें बोलेल तसेंच हे 'सदेह स्वर्ग आणि कंपनी लिमिटेड्'चे देवदूत बोलतात. प्रत्येक 'पॅशिंजरा'नें स्वर्गारोहण केलें आणि तो नीट स्वर्गवासी झाला म्हणजे या एजंटाचा जीव भांड्यांत पडणार, आणि लगेच यांना 'पोंचवलें', आतां पुढच्या विमानासाठीं आणखी 'शिटा' कुठल्या मिळतात असें म्हणत तो कामाला लागणार! गिऱ्हाइकांचा संतोष हाच ज्यांचा फायदा त्या कर्मयोग्यांना विश्रांति कसली!

अमेरिकन उन्हाळा आला कीं सगळे रस्ते मुळीं तुम्हांला 'स. स्व. आणि मंडळी'च्या ऑफिसांतच घेऊन जातात. मीहि एकदां असाच ऊन खाण्यासाठीं बाहेर पडलों आणि स्वर्गाचीं तिकिटें रिझर्व्ह करणाऱ्या लोकांच्या गर्दीबरोबर या ऑफिसांत जाऊन कसा आणि कधीं पोंचलों हें मला कळलेंसुद्धां नाहीं.

'May I help you, Sir?'— एका सुंदरीनें मला विचारलेला प्रश्न. हें 'सर' म्हणजे साधें नव्हे, अगदीं हवाईऽऽसारखें—सऽऽऽर. 'Won't you sit down, please!' सुंदरी लगेच मला म्हणाली. आणि यानंतर बहुधा 'आपल्याला एक कपभर अमृत दिलें तर चालेल कां?' असेंच ही विचारणार अशी माझी समजूत होती. तसें तिनें विचारलें असतें तरीहि मला कांहींच आश्चर्य वाटलें नसतें...नंतर माझ्यापुढें तिनें आणून ठेवलेली ती रंगीबेरंगी, मुलायम, झुळझुळीत कागदावरची माहितीपत्रकांची चळत. इतक्या सुंदर मुलीनें इतकीं सुंदर माहितीपत्रकें आणणें हेंही योग्यच होतें.

बरें त्यांत 'सगळेच्या सगळे पैसे आगाऊ भरले पाहिजेत', 'आम्हीं

अमक्या गोष्टीस जबाबदार नाहीं,' 'तमकी जोखीम स्वीकारण्यांत येणार नाहीं', 'एकदां भरलेले पैसे कोणत्याहि सबबीवर परत मिळणार नाहींत', असल्या धमक्यांचा मागमूसहि नाहीं. तुमच्याकडून येणाऱ्या पैशांची काळजी कसली? पैसे तुम्ही द्यालच. ती काळजीची आंठी बिलकुल नको तुमच्या कपाळावर '–ट्रॅव्हल नॅव्, पे लेटर' ही पॅन ॲम्‌ची योजना आहेच. अर्थात् हें विमान–कंपन्यांचेंच वैशिष्ट्य असें नव्हे. तर जवळजवळ प्रत्येक बाबतींतच तें खरें आहे. म्हणजे घराच्या बाबतींत आहे, कपड्यांच्या बाबतींत आहे, इतर वस्तूंच्या बाबतींत आहे. आधीं मरून घ्या आणि तुम्हांला पुरल्यानंतर पैसे द्या; आधीं परीक्षेंत पास व्हा आणि नंतर अभ्यास करून फी भरा—अशा योजना अमेरिकेंत अजून कशा झाल्या नाहींत याचेंच मला आश्चर्य वाटतें.

तसें पाहिलें तर अमेरिकेच्या अगदीं पूर्व–टोंकापासूनसुद्धां हवाईचा स्वर्ग दूर नाहीं. ('दिल्ली दूर नहीं' यांतला हा प्रकार नव्हे. कारण दिल्ली ही प्रत्यक्षांत नुसतीच दूर नाहीं तर 'सुदूर'हि असते.) अगदींच दोन बोटें अंतरावर नसला तरी हा स्वर्ग अमेरिकेंतल्या कोणत्याहि ठिकाणापासून अर्ध्या दिवसापेक्षांहि कमी अंतरावर आहे. पॅन् अमेरिकनची जाहिरात सांगतेच —'Jet all the way in less than half a day.' या 'इंटरकॉंटिनेंट्ल् जेट् क्लिपर'मध्यें बसलें कीं स्वर्गाची वाट खुली. या शाही विमानांत पांच सुंदर तास, तीनशें सुंदर मिनिटें (१८००० अतिसुंदर सेकंदेंहि) घालवायची आणि हवाईला पोचायचें. (पण पोंचायचें हा काय शब्दप्रयोग झाला? 'उतरायचें' सुद्धां नाहीं. स्वर्गांत का कोणी उतरतें? तिथें जमिनीवरचे पाय सोडून तरंगायचेंच!)

त्यांतून तुम्हांला 'बी' किंवा 'सी' क्लास देवांचें विमान नको असेल तर चांगल्या फर्स्ट क्लास देवांकरितां राखीव अशा विमानांतून उड्डाण करा. या प्रेसिडेंट स्पेशलमध्यें अधिक जागा, अधिक आराम, तैनातीला अधिक दास-दासी, शेफ्नें तयार केलेलीं चमचमीत जेवणें, ज्यादा 'सोमरस', लाउंजमध्यें बसायची सोय. आणखी काय पाहिजे? फक्त (मागाहून द्यावयाचे) पैसे थोडे अधिक, इतकेंच. कोणी म्हणेल हे जातिभेद आणि वर्गभेद कसले? पण अशीं नाकें मुरडण्यांत हंशील नाहीं. पृथ्वीप्रमाणेंच स्वर्गाच्या वाटेवरसुद्धां भेदभाव

कुणाला चुकले नाहींत.

बरें, हें काम जरा महाग वाटलें तर सोडून द्यावें. तिसरा वर्ग म्हणजे कांहीं अगदींच 'थर्ड क्लास' नव्हे हें लक्षांत ठेवावयास पाहिजे. '–इंद्रधनुष्य योजना' (Rainbow Service) झकास आहे. म्हणजे पैसे द्यायचे काटकसर–योजने–इतकेच; पण रेलून बसतां येतील अशा मऊमऊ सीट्स्, स्वादिष्ट रुचकर जेवण आणि पूर्वापारची — म्हणजे बहुधा अनादि–अनंतकाळापासून चालत आलेली सौजन्यपूर्ण सेवा, हीं तोंडीं लावायला आहेतच. पॅन् अमेरिकनचीं वैशिष्टयें येथें संपलीं असें तुम्हांला वाटलें काय? वाटलें असल्यास तें बरोबर नाहीं. कारण ही कंपनी स्वर्गेच्छूंना सगळ्याच गोष्टीची निवड करायची जास्तींत जास्त संधि देते. एक तर अमेरिकेंतल्या कुठल्याहि ठिकाणाहून तुमची उचलबांगडीची व्यवस्था, दुसरें म्हणजे जेथून तुम्ही निघालांत तिथेंच परत येतांना उतरलें पाहिजे असें बंधन नाहीं. आतां या शेवटच्या दोन फायद्यांविषयीं कोणी दुष्ट म्हणेल कीं हे फायदे कसले? हवाईऽऽला जायचें म्हणून काय कुणी विमानांत बसण्यासाठीं स्वतःचें गांव सोडून दुसऱ्या गांवाला जाईल? आणि येतांना–सुद्धां सरळ स्वगृहीं परत येण्याऐवजीं प्रवासाच्या सुरस आणि चमत्कारिक गोष्टी सांगण्यासाठीं तो सासऱ्याच्या गांवीं उतरेल काय? या दुष्ट माणसानें लक्षांत ठेवावयास हवें कीं, जाहिरातदारांना असे प्रश्न विचारावयाचेच नसतात.

शिवाय प्रवासाला लागणाऱ्या त्या तीनशें सुंदर मिनिटांविषयीं एक सांगायचें राहिलेंच. हवाईऽऽला गेल्यावर 'सर्फ रायडिंग' आणि सूर्यस्नान यांनीं उतू चाललेले दिवस आणि मौजेनें आणि अधिक मौजेनें सांडणाऱ्या रात्री घालवण्याठीं जो एक 'मूड' तयार व्हावा लागतो, मनाचे बांध फुटून त्याची जी एक तयारी व्हावी लागते, त्या दृष्टीनेंच हीं तीनशें मिनिटें जणूं कांहीं वेतलेलीं असतात. प्रवास शांततेंत, सुखांत होतो. शेजारच्या माणसाशीं सुखसंवाद करायचा झाल्यास आरडाओरडा करून बोलावें लागत नाहीं, तर स्वाभाविक आवाजांत या गुजगोष्टी करतां येतात. घरीं बसल्यासारखें जेवतां किंवा मद्यपान करतां येतें. आणि हें सगळें चालू असतांना तुमचें प्रचंड जेट् क्लिपर सहाशें मैल वेगानें मेघाच्छादित मार्गावरून पुढें पुढें जात असतें.

'अधिक पहा', 'अधिक मजा करा' असें तुम्हांला आव्हान आहे. तुम्ही

म्हणाल तशी सर्व व्यवस्था एजंटमहाराजांनीं अगोदरच केलेली असणार. एकंदर खर्चाचा आंकडासुद्धां हा सर्वज्ञ माणूस तुम्हांला आगाऊ देऊं शकतो.

एजंटानें माझ्यापुढेंसुद्धां अनेक योजना मांडल्या. पहिल्या योजनेमध्यें होनोलुलु आणि ओॲहूमध्यें आठ ' चमत्कृतिपूर्ण ' दिवस घालवण्याची आंखणी होती. वायकिकी समुद्रकिनाऱ्यावरच्या आलिशान हॉटेल्मध्यें मुक्काम, भरपूर रिकामा वेळ आणि शिवाय पोहणें, गॉल्फ, खरेदीला जाणें किंवा नुसतेंच वाळूंत पडून सूर्यस्नान करणें. हें सगळें करण्यासाठीं खर्च १५२० रुपये फक्त ! त्यांतले १५० रुपयेच फक्त आगाऊ द्यायचे; उरलेले चोवीस हप्त्यांनीं. दुसरी योजना याहूनहि थोडी अधिकच आकर्षक. आठ चमत्कृतिपूर्ण दिवसांत आणखी एकाची भर. दरींतलें वेट माऊई हें या योजनेचें जादा आकर्षण. सर्व नयनमनोहर दृश्यें शांतपणें, सावकाश पहाण्याची संधि. शिवाय अडीच मैल उंच असलेल्या मॉना लोआची भेट आहेच. तिथें वाटल्यास स्कीइंग करावें किंवा रानडुकराची शिकार. जन्मभर ज्या प्रवासाची सुगंधी आठवण मनांत दरवळत राहील असा दर्दभरा आठवडा. खर्च रुपये २००२ फक्त.

एजंटाला मीं गमतीनें म्हटलें, " इतका खर्च प्रत्येकीं केल्यावर त्याची जन्मभर आठवण रहावी हें योग्यच नव्हे काय ? "

यावर तो हंसून म्हणतो, " खम् ऑन् नॅव् ! " ( म्हणजे बहुधा ' काय बोलतां राव ! तुम्हांला परवडणार नाहीं म्हणजे झालंच. अहो, तुम्ही इंडियन संस्थानिक आहांत हें काय आम्हांला माहीत नाहीं ? '–एजंटाच्या तीन साध्या शब्दांमध्यें एवढा मोठा आशय असूं शकतो ! )

" शिवाय तुझ्या टाइमटेबलाप्रमाणें मी मौज करणें हें मला अजिबात मंजूर नाहीं. स्वर्गांत टाइमटेबल ही कल्पनाच भयंकर आहे. " माझ्या आयुष्यांतला बेस्ट आठवडा मीं कसा घालवावा हें सांगणारा हा कोण ?


पण ह्याबद्दल त्याचा कांहींच आग्रह नव्हता.

फक्त परत येणाऱ्या विमानाची वेळ आणि ठिकाण एवढें मात्र लक्षांत ठेवायला हवें.

शेवटीं एकदांचें तें तीनशेंवें सुंदर मिनिट संपतें आणि आपलें आकाशयान हवाईऽऽच्या पायथ्याशीं तरंगूं लागतें. होनोलुलु शहराच्या आकाशरेषेवरचा

मोठाथोरला अननस दिसूं लागतो. वाटतें कीं छोट्या ॲलिस्प्रमाणें कुठल्या मंतरलेल्या भूमीकडे आपण जात आहोंत ! एवढा मोठा अननस कीं त्याच्या आंत जाऊन ऐसपैस बसावें आणि आजूबाजूचा कापून खावा. आतां तसें म्हणाल तर पलिकडच्याच बाजूला पर्ल हार्बरच्या वेळीं पडलेल्या चौदा हजार लोकांचीं थडगींहि आहेत. त्यावेळीं उध्वस्त झालेल्या ' ॲरिझोना ' या जहाजाचे अवशेष आहेत. या गोष्टी स्वर्गांत कुठून आल्या ? तर त्याचें उत्तर हेंच कीं, हा ' सदेह ' स्वर्ग आहे म्हणून तुम्हांला हें जाणवलें.

विमानाच्या बाहेर पाय पडतो न पडतो, तोंच आपण सुंदर हवाईयन



आकाशांतील अननस

युवतींच्या गराड्यांत सांपडतों. नुसत्या सुंदर युवती नव्हेत, तर हातांत पुष्पमाला घेतलेल्या. या फुलांचें नांव ' ली '. आणि या हवाईयन स्वागताला म्हणतात, ' अलोहा '. शिवाय त्या दुसऱ्यातिसऱ्या कोणा व्ही. आय्. पी. च्या गळ्यांत घालण्यासाठीं नव्हेत. कारण आपण सगळेच या विमानांतून आलेले लोक व्ही. आय्. पी. ना ! आतां सौजन्य थोडें बाजूला ठेवायला पाहिजे. कारण एरवीं आपल्याला जर कोणी हार घातलाच तर तो कांहीं आपण गळ्यालादेखील लागूं देत नाहीं. म्हणजे हार घालणाऱ्या व्यक्तीची तो घालायची आणि आपली

तो घालू न द्यायची, अशी जवळजवळ झटापटच होते. असला विनय येथें कामाचा नाहीं. पुष्पमाला व्यवस्थित घालून घ्यायची आणि सर्वत्र ती तशीच ठेवून मिरवायचे.

येथून आतां वायकिकी किनाऱ्यावरचें तें आलिशान होटेल! हाराचें वजन इतका वेळ गळ्यांत वागविल्यामुळें, नाहीं म्हटलें तरी जरा दमल्यासारखें वाटत असेलच. तेव्हां थोडें च्याऊम्याऊ करून घटकाभर विश्रांति घेतलेली बरी.—अरेच्या! तेवढ्यांतच एक लहानशी डुलकी लागली का! असो, कुछ फिकीर नहीं! 'घाई' हा शब्द तात्पुरता आपल्या डिक्शनरींतून काढून टाकलेला बरा.

नंतर थोड्या वेळानें फेरफटका मारायला बाहेर पडावें. याकरितां योग्य वेळ कोणती?—कोणतीहि. कारण आपल्याला ज्यावेळीं बाहेर पडावेंसें वाटतें तीच येथें योग्य वेळ असते. रस्त्याला लागलांत कीं असें दिसतें – रंगीबेरंगी हवाईयन शर्टस् घालून लोक फिरताहेत आणि त्या रंगांपेक्षांहि अधिक सुंदर आणि नाजुक रंगांची पखरण असलेले कपडे घालून स्त्रिया. यांच्या चालण्यांत संथपणा आहे. पण संथपणा म्हणजे मरगळलेपणा नव्हे. हे लोक खरें म्हणजे चालत नाहींत; ते तरंगत चालले आहेत. या बाबतींत अमेरिकेचें हें पन्नासावें राज्य इतर एकूणपन्नासांपेक्षां वेगळें आहे. इतर राज्यांपासून हजार मैल दूर असल्यामुळें कीं काय, अमेरिकन घाईचा संपर्क यांना फारसा झालेला नाहीं. वाघ मागें लागल्याप्रमाणें हे रस्त्यांतून धांवत जात नाहींत. शिवाय मोटारीसुद्धां सत्तर–ऐंशीं मैल वेगानेंच गेल्या पाहिजेत असाहि यांचा हट्ट दिसत नाहीं. चाळीस मैल वेगानें जाऊनहि मुक्कामाला पोंचतां येतें हें सत्य यांना पटलें असावें असें वाटतें.

रस्त्याच्या या कडेला जी इमारत आहे तिला राजवाडा म्हणतात. पूर्वी येथून काळा राजा या बेटावर राज्य करीत असे. आतां येथें सरकारी ऑफिस आहे हें ठीकच. राजवाड्यासमोर ती पाहिलीत का प्रचंड तोफ? कधींकाळीं हिच्या अजस्त्र तोंडांतून या बेटाची सगळी भूमि हादरून सोडणारे गोळे कडाडत, धडाडत बाहेर पडले असतील. अरे! पण हें काय! आतां जॉन् आणि जॅक् त्या प्रचंड तोफेला रेलून चक्क शिळोप्याच्या गप्पा छाटीत बसले

आहेत. हल्लीं उंसाची गोडी किंचित् कमी झालीय् किंवा मघांशीं मटकावलेला मासा जरा वातड होता, अशा तक्रारी हे करीत असतील काय ?

समोर वळसा घेणारा रस्ता थेट समुद्रकिनाऱ्यावरच जातो. मैलोमैल सगळीकडे रुपेरी वाळू पसरली आहे. समुद्राच्या मंद लाटा हिच्याशीं पाठशिवणीचा खेळ खेळत आहेत. सर्फ रायडिंगला ऊत आला आहे. बोटींच्या शेपट्या धरून वेगानें पाणी कापीत जाणाऱ्या फळकुटांवरून आपलीं अंगें मागें झोंकून जाणारे हे लोक कसे वाटतात ? बेगुमानपणें हे सागरावर स्वार झाले आहेत. आणि त्या फळकुटावर तर एका कुत्रोबांनींहि स्वारी केली आहे. पलिकडच्या त्या गृहस्थानें तर अगदींच कमाल चालविली आहे. वेड्यानें खांद्यावर बायकोला घेतलें आहे. आणि तीं दोघेंहि पाणी कापीत चाललीं आहेत. तें पाहून बायको मला म्हणते, —

" तुम्ही घेऊन जाऊं शकाल का तसं ? "

" हात्तिच्या ! त्यांत काय ? त्या बाईला ना ? सहज ! "

" काय म्हणालांत ? " बायको डोळे वटारून विचारते.

" कुठं काय ! कांहीं नाहीं ! " मी म्हणतों.

हें सर्फ रायडिंग म्हणजे कांहीं विशेष नाहीं असें जर आपल्याला वाटलें तर आणखी एक सागरी साहस करून पहावें. काय करायचें, कीं समुद्रांत खोल दडलेले मोठेमोठे मासे शोधून काढायचे आणि त्यांची करायची शिकार, — भाल्यानें किंवा स्पिनरनें.

कल्पनारम्य देवदेवता, राजे राण्या, स्वाऱ्या, लढाया यांचा मनोरंजक इतिहास हवाईऽऽला आहे. राज्य अमेरिकेचें असलें तरी गोरे लोक फक्त एकतृतीयांश. उरलेल्यांत निम्मे जपानी आणि मग सगळे इतर. एकूण अवघे तीन लाख लोक. अमेरिकेची छाप मात्र सगळीकडे. टूथपेस्ट, साबण, सौंदर्यप्रसाधनें, फूटबॉल, रेडिओ, टेलेव्हिजन, इतकेंच काय पण अमेरिकन लोकांप्रमाणेंच हवाईऽऽमधल्या लोकांनाहि हॅंबर्गर्सचें वेड. हा पावाच्या दोन तुकड्यांमध्येंच घातलेला मांसाचा तुकडा खातांना एक हजार मैलांवरच्या अमेरिकेंत पसरावा लागतो तितकाच मोठा जबडा इथेंहि पसरावा लागतो. कारण आधींच पाव जाड, त्यांत मधला तुकडाहि चांगलाच बाळसेंदार.

पण हवाईऽऽ अमेरिका असूनसुद्धां संपूर्णपणें अमेरिका नाहीं. मार्दव, ऋजुता मोठ्या अमेरिकेंतसुद्धां असतात; पण तिथें कित्येकदां हे गुण उसने आणल्यासारखे वाटतात. हवाईऽऽच्या छोट्या अमेरिकेंत या गुणांना उसनेपणाचा वाससुद्धां यायचा नाहीं. मार्दव हें मुळीं तिथल्या वातावरणांतच भरून राहिलें आहे. 'Gentleness is a way of life'. हवाईयन लोकांच्या रक्तांतूनच तें वहातें. शिवाय हवाईऽऽ 'कॉस्मॉपॉलिटन्' आहे, वैचित्र्यपूर्ण आहे, अद्‌भुत आहे. तिथलें अन्न, निशा-जीवन, संगीत, नृत्य यांत अशी मौज भरलेली आहे, कीं जी तुम्हांला उरलेल्या ४९ अमेरिकांच्यांत सांपडायची नाहीं. लुआऊमध्यें मिळणारे रसरशीत खाद्य-पदार्थ, ताऱ्यांच्या मांडवांतले हवाईयन लोकच करूं शकतील असें धुंद ' हूला ' नृत्य, वर्षभर पसरलेले रंगीबेरंगी फुलांच्या मखमलीचे गालिचे, चमचमणाऱ्या समुद्राचीं खुणावणारीं दृश्यें, किनारे आणि पर्वत, धबधबे आणि ज्वालामुखी, यांतल्या फारच थोड्या चिजा मोठ्या अमेरिकेंत सांपडतील. 'Aole oe i noho ike i a Hawaii' अशी एक हवाईयन म्हण आहे. तिचा अर्थ मला माहीत नाहीं. पण ' जोंपर्यंत तुम्हीं हवाई पाहिलं नाहीं, तोंपर्यंत तुमचं जिणं व्यर्थ ' असाच तो असला पाहिजे यांत मला मुळींच संशय नाहीं. अशा या जगावेगळ्या बेटाचें वर्णन करणारी म्हण इतक्या जगावेगळ्या शब्दांचीच असायला नको काय ? ' सागराला नटवून टाकणारी इतकी लावण्यसंपन्न भूमि जगांत कुठेंहि नाहीं ' असें मार्क ट्वेननें हवाईऽऽबद्दल म्हटलें आहे तें विनोदानें नव्हे.

हवाईऽऽची राजधानी होनोलुलु ज्या बेटावर आहे त्याचें नांव ओअ‍ॅहू. पण होनोलुलु हें पाहण्यासारखें एकच ठिकाण नव्हे, किंवा रेंगाळण्यासारखें ओअ‍ॅहू हें एकच बेटहि नव्हे. कावाई हें बगीच्यांचें बेट आहे, माउई हें दऱ्यांचें बेट आहे, आणि ज्यामुळें या सबंध समूहाला हवाईऽऽ हें नांव पडलें तें हवाईऽऽ हें ' ऑर्चिड ' फुलांचें बेट आहे. होनोलुलु पाहून झालें कीं माणसानें ' गांवाकडे ' निघावें किंवा दुसऱ्या बेटांकडे उड्डाण करावें. विमानानें तर हीं बेटें कांहीं मिनिटांच्या अंतरावर आहेत.

लाव्हापासून बनलेली या बेटांची शेत-जमीन सुपीक आहे. नुसत्या ऊंसाचें उत्पन्नच दहा लाख टन. अर्धें उत्पन्नच मुळीं उंसापासून. ( येथील सर्व गोडवा

या उंसाचाच परिणाम काय ? ) याशिवाय अननस, पपया, केळीं आणि अमेरिकेंत फक्त फ्लॅरिडासारख्या ठिकाणीं मिळणारे नारळ आणि आंबे. नारळाच्या झाडावर सरासर चढत जाणारीं तीं गांवाकडचीं पोरें, कारखान्याच्या प्रचंड यंत्रांकडे अजूनहि नवख्या, बुजऱ्या नजरेनें पाहणारे ते खेडुत, आपल्यासारख्या परक्यांचें अस्तित्व सहन करणाऱ्या त्या अंगभर फुलें माळलेल्या हवाईयन स्त्रिया–या निष्पाप लोकांना पाहिलें म्हणजे वाटतें कीं, औद्योगिक संस्कृति यांच्या जवळ येऊन गांवाच्या वेशीपाशींच थबकली आहे. तिला पुढें येववत नाहीं. छत्रीसारख्या हॅट्स् आणि तंग विजारी घातलेले ते Cowboys–गोपाल, ( कीं गोबाल ! ) बेटे समुद्रांतून पोहत बाजाराला चालले आहेत. त्यांतले सुधारलेले खपाऱ्यांतून बसून निघाले आहेत. तिकडून हवाईचे कोणी पाटील बाजाराहून परत आलेले दिसतात. बऱ्याच गाई त्यांनीं मोठ्या बोटींतून आपल्याबरोबर आणलेल्या आहेत. आठवड्याच्या बाजारांत खरीदलेल्या. या गोमातांची क्रेनच्या साहाय्यानें अक्षरशः उचलबांगडी होत आहे. आमच्याप्रमाणेंच चार बव्ये लोक या ' होली खॅब् 'चें आतां काय होणार म्हणून पहात आहेत.

या पलिकडच्या 'कोना इन् 'मध्यें आपलें रात्रीचें भोजन आहे. पण दर्शनींच हें काय लचांड ? सोवळें नेसलेला, डोक्यावर हॅट् आणि गळ्यांत हार घातलेला हा गृहस्थ शांतपणें टॅरोचे आंबवलेले कंद कुटीत बसलेला आहे. पांथस्था, हें लचांडहि नव्हे आणि गौडबंगालहि नव्हे. आपल्याच रात्रीच्या भोजनाची तयारी हा सोवळें नेसलेला साहेब करीत आहे. पण हें सोवळें कांहीं केवळ भारतीय प्रवाशांसाठीं नव्हे बरं का ! इथला सर्व कारभार निधर्मी. नाहींतर ही साहेबी हॅट सोवळ्याबरोबर कशाला आली असती ! जॅकपासून जनूभाऊंपर्यंत सगळीं गिऱ्हाइकें खूष झालीं पाहिजेत ना !

या लोकांच्या गांवजेवणाला ' लुआऊ ' असें लुसलुशीत नांव आहे. जेवणाला आणखी एक शब्द ' काउकाउ '. म्हणजे खाऊखाऊचाच धाकटा भाऊ. ( तेवढीच आपल्या खाजगी व्युत्पत्तिकोशांत एका चवदार शब्दाची भर ! ) लुआऊचें खास आकर्षण म्हणजे पकविलेलें सबंध डुक्कर ! केवळ वनस्पती आणि कोवळें धान्य यांवर पोसलेलें ! ' अब्रह्मण्यम् ' म्हणून जर हें खाणार

नसाल तर एका उत्कृष्ट मेजवानीला मुकाल, त्यापेक्षां थोडें अपेयपान करावें म्हणजे, हें तथाकथित अभक्ष्यभक्षण करायची मनाची तयारी होते, आफ्रिकेंतले लोक सबंध उंटावर ताव मारतात; हवाईतले सबंध डुकरावर. नाहींतरी, अख्खी कोंबडी खाणारे भारतीय खवय्ये तरी काय कमी आहेत ?—अहो, खाऊन तर पहा फक्त एक तुकडा ! Just one tiny, little piece !...हं ! खाल्ला That's like a good boy ! कसा वाटला ? ... अरे, पण तुम्ही बोलायलाच तयार नाहीं. बोलणें आणि खाणें या दोन गोष्टी एकदम करणें हें चांगलें नाहींच ... Go ahead !... आतां हा खाद्यविशेष चांगला आहे कीं नाहीं, हें सांगायचीसुद्धां गरज नाहीं. शब्दांपेक्षां कृतीच जास्त बोलकी असते. नाहींतरी भोजन हें 'यज्ञकर्म' आहे असें थोरामोठ्यांनीं सांगितलें आहेच.



लुसलुशीत 'लुआऊ'

या आणि इतर निरनिराळ्या चमचमीत पदार्थांवर ताव मारून आपण तृप्त होतों तोंच नर्तक-गायकांचे ताफे हात जोडून उभे. हवाईयन, समोअन, ताहीतिअन हीं डोळ्यांचें पारणें फेडणारीं आकर्षक नृत्यें. त्या नृत्यांगनांचें पदलालित्य आणि स्वर-किन्नरींचें स्वरवैभव. फुलासारख्या नाजूक आणि पिसापेक्षां हलक्या अशा या गोष्टींचें वर्णन करायला शब्दांचें हें केवळ जडजंबाल! सांगण्याचें तात्पर्य एवढेंच कीं, इंद्र वगैरे मंडळींना जीं सुखें घाऊक प्रमाणांत सदासर्वकाळ मिळत असावींत त्यांचें एकेक नमुना पाकिट येथें सर्वांच्या हातीं लागतें.

हवाईऽऽच्या डायरींतील अशीं कितीतरी सोनेरी पानें. सगळी डायरीच

मुळीं सोनेरी पानांची, तिथें एखाददुसऱ्या पानाचें काय म्हणा ! वायकिकीच्या 'रीफ्' हॉटेलमधलें तें मस्त 'बुफे डिनर.' त्याची लज्जत काय माणसानें वर्षा-सहा महिन्यांत विसरावी ! आणि त्यानंतर 'रीफ्'च्या सुंदर जलाशयांत झालेलें देखणें पोलिनेशियन जलनाट्य. नंतर एकदां अवतरलेली 'फिलिपीन्समधली ती रात्र'. भोजनोत्तर झालेलें तें विलोभनीय उग्र मादक नृत्य, तें बहुरंगी नेपथ्य, तें स्वरांत न्हालेलें संगीत, त्या कमनीय फिलिपिना सुंदरी... पण हा हन्त हन्त ! अशा रात्रीहि शेवटीं संपतातच. आयुष्यांतल्या कांहीं सोनेरी क्षणांशीं रेंगाळावें आणि त्यांचें लावण्य मनांत सांठवून ठेवावें असें माणसाला वाटतें. पण 'टाइम' या नांवाचा जो करारी आणि कर्कश म्हातारा असतो तो मात्र अरसिकपणें आपल्याला फराफरा ओढीत पुढेंच नेत रहातो.

हवाईऽऽमध्यें एक-तृतीयांश संख्येनें जपानी लोक असल्यामुळें त्या संस्कृतीचा–निदान खाद्यपदार्थांचा–अनुभव आपल्याला येथें मिळावा असें कुणालाहि वाटत असतेंच. आणि कलकत्त्यांत असली आ.ण सच्चेपणाचा मक्ता सांगणारे लखीबाबूचे 'एकमेव वंशज' असे पांचपंचवीस सुवर्णकार जसे आपल्याला ओळीनें दुकानें मांडून बसलेले दिसतात, तसेच अगदीं 'रीअल जॅपनीज् फूड' देऊं म्हणणारे खरेखोटे जपानी हॉटेलवाले इथें अनेक. अशा बाबतींत आपलें सर्वज्ञ अशा एजंटमहाराजांनाच शरण गेलेलें बरें. यानें पहा आपल्याला बरोबर आणलें कीं नाहीं ? म्हणजे तें चपटें नाक, ते एवढेसे डोळे ! एजंटाचे नव्हे हो, जपानी चहालयांतल्या या बाईसाहेबांचे. निदान हेंच 'खरें' जपानी


हवाईयन 'हूला'

होटेल असें आपल्याला समजून चालायला हवें. येथें आतां ' सुकियाकी ', आणि ' साके ' हें जपानी तंडुलमद्य, जपानी आदरातिथ्य आणि जपानी करमणूक – हीं सर्व आपल्याला भेटल्याशिवाय रहाणार नाहींत. या हॉटेलच्या बाबतींत बनवाबनवीचा प्रकार असूं शकणार नाहीं. ओढूनताणून आणलेलें आदरातिथ्य काय इतकें पायघोळ आणि नम्रमधुर असतें ? ही खानदानच जपानी दिसते. ' साके 'ची ती एकमेवाद्वितीय चव मनांत सांठवीत आणि इथें आहोंत तोंपर्यंत एकदोनदां तरी या चहाल्यांत परत यायचेंच असें ठरवीत येथून हॉटेलांत परत जायचें. ' पुनरागमनायच '–ती चपटें नाकवाली बाई नाहींतरी आपल्याला म्हणालीच कीं नाहीं ?

आतांपर्यंतचे हवाईऽऽ – वर्णन ऐकून एखाद्याला असा प्रश्न पडण्याचा संभव आहे कीं, हीं बेटें केवळ भोजनविशेषांकरितांच प्रसिद्ध आहेत काय ? लंडनमध्यें राणीसाहेबांच्या भेटीला गेलेल्या ' पुसी कॅट् ' नें सबंध मुक्कामांत काय केलें, तर राणीच्या खुर्चीजवळच्या उंदराला पिटाळून लावलें. त्याचप्रमाणें हवाईऽऽच्या स्वर्गांत आम्हीं भोजनभाऊंप्रमाणें पळीपंचपात्री घेऊन हिंडणें एवढेंच केलें काय ? गुटगुटीत बनणें एवढाच आमच्या हवाई ऽऽ भेटीचा उद्देश होता काय ? हे प्रश्न थोडेसे बरोबर आणि बरेचसे चूक आहेत. चूक अशाकरितां कीं, अन्नप्रश्न हा कुठेंहि झालें तरी फार महत्त्वाचाच. या दृष्टीनें पाहतां, हवाईऽऽत अत्यंत कलात्मकतेनें तो सोडविण्याचे आम्हीं केलेले प्रयत्न स्तुत्य ठरावेत. बरोबर अशाकरितां कीं, कौतुक करण्यासारखें हवाईऽऽच्या भूगोलांत खूपच आहे, पण दोन जेवणांमध्यें जीं मध्यंतरें – कधींकधीं फार मोठीं – असत त्यांत आम्हींहि हेंहि कार्य केलेंच.

उदाहरणार्थ, जुन्या हवाईऽऽतल्या ' कोना इन् 'मधील एक हल्काफुल्का दिवस. तिथेंहि भोजनप्रबंध उत्तमच होता हें निराळें, पण तिथलीं तीं कोंकणच्या किनाऱ्याची आठवण करून देणारीं नारळाचीं झाडें, नारळीचाच उपयोग करून बांधलेलीं खोपटें, झोपड्या, विस्तीर्ण निळ्या तलावांतलें बोटिंग, रेतींत रेलून केलेलें उनउनीत सूर्यस्नान आणि या सगळ्या अनुभवाला गहिरी डूब देणारें जुन्या हवाईऽऽचें रांगडें, अनाघ्रात सौंदर्य. वाळूंत पडल्यापडल्या पाहिलेले ते सोनेरी सूर्यास्त. ( आणि रात्रीच्या जेवणाला उशीर होईल म्हणून

शेवटी केलेली ती कांहींशी अकारण लगबग ! )

शिवाय नायगारापेक्षांहि अधिक उंचीवरून कोसळणारे 'रेनबो फॉल्स'सारखे जलस्रोत. मध्यान्हीच्या उन्हांत झुचमळणारीं पर्वतशिखरें आणि हॅलेमाव्हमाव हा ( निद्रिस्त ) ज्वालामुखी. त्याची ती आग ओकणारी प्रचंड खाई, धगधगता लाव्हा वाहून नेणाऱ्या त्या धमन्या. ज्वालामुखें आणि गंधकाचे किनारे. शहरांत घडलेल्या प्रकृतिस्वरूपाच्या दैदीप्यमान दर्शनानंतर आडवाटेला घडणारें विध्वंसक शक्तीचें हें रौद्रभयानक, दृष्टी भाजून काढणारें दर्शन. मद्यालयांतल्या मोहिनी–नृत्यानंतर अग्नीच्या मुखांत दिसणारें हें तांडवनृत्य. 'अधिक भोग', 'अधिक मजा कर' हे चार्वाकी मंत्र जपणाऱ्या भोगलोलुपाला हा निवृत्तीचा इशारा ! नायगाऱ्याच्या जलौघाप्रमाणें ओतणारा तो धगधगीत लाव्हा रस, सहाशें फूट उंच आणि दोन मैल रुंद भुजा पसरून सागराला विळखा घालण्याठीं सामोरा गेलेला तो प्रलय आणि त्याचा रस्ता रेखीत जाणारे ते गंधकाचे किनारे, हें सारें अग्निकांड विमानांतून सुरक्षितपणें घेतलेल्या चित्रपटांत छातीवर हात ठेवून तिचे ठोके मोजीत पहावें आणि समाधानाचा सुस्कारा सोडावा कीं बरें झालें, आपण १९५० सालीं येथें नव्हतों.

नंतर याच ठिकाणीं फर्नचीं रोपटीं दचकत, भीत वाढलीं आणि आतां तीं इतकी धीट आणि मोठीं झालीं आहेत कीं, गंधकाच्या किनाऱ्यावर तीं आपली दाट सांवली टाकतात. बाकी माणूस या दोहोंपुढें तुच्छच बरें का ! त्या ज्वालामुखीपुढें काय, किंवा प्रचंड फर्न वृक्षांसमोर काय, तो या दोघांपुढें आपला इवलासाच, किरंगळीएवढा दिसतो – पिग्मीसारखा.

सारांश काय, ज्याची कुवत तोळामासा, त्यानें इकडे फिरकूंसुद्धां नये. नाहींतरी हिंमत नाहीं त्यानें शिवधनुष्याच्या वाटेला जावेंच कां ? पण तरीहि एवढें मात्र खरें कीं, जन्माला येऊन माणसानें एकदां तरी असा रम्य-भीषण अनुभव घ्यावा, या विराट दर्शनानें कावरेंबावरें व्हावें, ' मुखंच परिशुष्यति ' अशी स्वतःची स्थिति करून घ्यावी आणि त्याबरोबर आपल्याला कांहीं वेगळें —भयंकर पण सुंदर गवसलें याबद्दल धन्यता मानावी.

सुखाच्या झिणझिण्या आणणारा हा शिणवटा घेऊन मग परत वायकिकी-

वरच्या आपल्या हॉटेलांत जावें लाउंजमधल्या आरामखुर्चीत डोळे मिटून, विअ-रचे घुटके मधूनमधून घेत बसावें. आपण जरी कंपनीच्या वेळापत्रकाप्रमाणें प्रवा करीत असलों तरी हे एजंट लोक इतके चतुर असतात कीं त्यांनीं विश्रांतीच्या वेळासुद्धां अगदीं बरोबर योजून ठेवलेल्या असतात. त्याचें कुठलेंहि वेळापत्रक काढून बघा, कधीं सबंध सकाळचा वेळ विश्रांति, तर कधीं सबंध संध्याकाळचा, --अशीं अर्ध आणि पूर्णविरामचिन्हें त्यांत विचारपूर्वक पेरलेलीं असणारच. नाहींतरी हवाईऽऽसारख्या ठिकाणीं असा वेळ लागतोच कीं, ज्यावेळीं आपल्याला कांहीं म्हणजे कांहींच करायचें नसतें. कसलाहि विचार करायचा नसतो. परत येण्याचा, जाण्याचा, रहाण्याचा, खर्चाचा -- कसलाच. ' जस्ट री ऽ ऽ ऽ लॅक्स. '

मग एके दिवशीं हें सगळें संपतें.--आतां परत घराकडे.

येथून परततांना हें लक्षांत ठेवायला हवें कीं, ' पॅन ॲम् ' किंवा ' कार्टन् ' ही थोर मंडळी होती म्हणून आपलें हवाईऽऽचें स्वप्न साकार झालें. 'कार्टन्' आणि ' अधिक चांगला प्रवास ' या दोन्ही गोष्टींचा अर्थ एकच. १८९९ सालपासून हे शब्द समानार्थी होते. अजूनहि आहेत. हवाईऽऽतील यशस्वी मुक्कामाची नव्याण्णव टक्के खात्री म्हणजे ' कार्टन् ' वरची तुमची भिस्त.

मीसुद्धां एके दिवशीं असाच ' पॅन् ॲम् ' किंवा ' कार्टन् 'च्या ऑफिसांत जाणार आणि तो सौजन्यमूर्ति एजंट नामक गृहस्थ तरंगत माझ्याकडे आला कीं त्याला म्हणणार,

" हे देवदूता, मला हवाईऽऽला घेऊन चल. "

-- कारण हवाईऽऽच्या काल्पनिक प्रवासाचें सुख हें कांहीं झालें तरी खऱ्या प्रवासाच्या सुखापुढें कितीतरीं ठेंगणेंच. म्हणून एढच्या वेळीं मात्र या प्रवासाची संधि मी गमावणार नाहीं. मग या धांदलींत अगदीं शेंडी तुटली तरी बेहत्तर !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ...३७६८८... दि: ...
क्रमांक ...३५१... नों दि ...६।२।६६

REFBK-0014265
REFBK-0014265